# सदाचार-चिंतनी..

डॉ. गजानन श्रीपत खैर

भाग २ रा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३९३४

REFBK-0024794

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे 30

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

31 JUN 1986

7 SEP 1986

4 FEB 1990

(क्र. मा. पद्दा)
५०००-३-८४

# सदाचार चिंतनी

## दुसरा भाग

व्यवहारातील अनुभवावरील
चिंतनातून जन्मलेले विचार

REFBK-0024794

चिंतनिक

डॉ. गजानन श्रीपत खैर

मूल्य दहा रुपये फक्त

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०

प्रकाशक

प. श. कुलकर्णी

एम्. एस्सी./इंजि./एफ्.टेक्./लंडन.

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाकरिता

१७८६ सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

© प्रकाशकाधीन

| | | |
|---|---|---|
| प्रथमावृत्ती | १५ | जून १९६८ |
| पुनर्मुद्रण १ ले | १ | ऑगस्ट १९७२ |
| पुनर्मुद्रण २ रे | १ | ऑक्टोबर १९७८ |
| पुनर्मुद्रण ३ रे | | ऑक्टोबर १९८२ (विजया दशमी) |

मुद्रक

म. द. कश्यप एम्. ए.

महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना

१७८६, सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३०

# प्रकाशकाची प्रस्तावना

सदाचार चिंतनी या पुस्तकाचा दुसरा भाग वाचकांच्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे. पहिला भाग ज्यांनी वाचला आहे ते या दुसऱ्या भागाचे अधिक उत्साहाने स्वागत करतील. हे विचार-धन संग्रही ठेवावे असे त्यांना खास वाटेल.

हे पुस्तक एका विशिष्ट क्रमाने वाचायला पाहिजे असे मुळीच नाही. कोठेही उघडा आणि नजर ठरेल तेथून वाचा. तुम्हाला ते विचारप्रवण करील. एखाद्या कृतीचे मूल्यमापन करून दाखवील. उदाहरणार्थ, "टीका व निंदा करणारे अनेक आहेत. त्याला फारशी बुद्धी लागत नाही. कौतुक करणारे थोडे ! त्या थोड्यांत तुमचे नाव असू द्या" (पान ४५). एवढ्या दोन ओळी ज्याने वाचल्या त्याच्या मनावर संस्कार झाल्यावाचून राहाणार नाही. यात साठविलेला विचार एकदा जरी कृतीत उतरला तरी त्याला प्रचीती येईल की जीवनातील साधा अनुभव सुद्धा किती अर्थपूर्ण असतो.

'शिक्षणाची विराट शाळा' या विचारात लेखकाने म्हटल्याप्रमाणे माणसांचे शिक्षण एकसारखे चालूच असते. शाळा कॉलेजात शिकविले जाते तेवढेच शिक्षण अशी एक चुकीची कल्पना आहे. शाळा कॉलेजच्या बाहेर एक मोठे वातावरण असते. त्यातही गुरू असतात. आणि त्यांच्याकडून कळत न कळत प्रत्येकजण शिकत असतो. या व्यापक शाळेतील गुरू दाखविण्याचे काम या पुस्तकाने केले आहे. या गुरूपासून लेखकानें स्वतःचे विचार-धन कसे वृद्धिंगत केले हे वाचकांना या पुस्तकात पाहावयास सापडेल. अशा तऱ्हेने व्यापक शाळेत आजन्म शिकण्याची प्रवृत्ती वाचकांच्या मनात निर्माण झाली तर हा ग्रंथ प्रकाशित केल्याचे आम्हास श्रेय मिळेल असा विश्वास वाटतो.

जीवनातील कितीतरी गोष्टींकडे लेखकाने सदाचार-मूलक विचाराने पाहिलेले आहे. गाठीभेटीस येणारी माणसे, वर्तमानपत्रातील बातम्या, कामगारांचे शिक्षण, प्रचलित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्न, येणारी पत्रे, त्यांचे नित्य ग्रंथ वाचन . . . या सर्वांनी त्यांना विचारांचे खाद्य पुरविले आहे आणि जीवनाशी संबंध येणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली आहे.

लहानपणी मुलांवर धार्मिक आणि नैतिक संस्कार करण्याची सोय जुन्या काळी फार मर्यादित होती. मुख्यतः ही जबाबदारी कुटुंबातच पार पाडली जात असे. आता बदललेल्या काळात घरी पालकांना व शाळेत शिक्षकांना प्रश्न पडतो की नैतिक

संस्कार करावयाचे म्हणजे नेमके काय करावयाचे ? या प्रश्नाचे उत्कृष्ट उत्तर म्हणजे 'सदाचार-चिंतनी' होय. जीवनातील निरनिराळ्या अनुभवांकडे ज्या दृष्टीने पाहावयाचे ती दृष्टी वाचकांना या छोट्या ग्रंथाने मिळेल. अशी दृष्टी प्राप्त होणे आणि तिचे आचरणात प्रतिबिंब उमटणे याचाच अर्थ नैतिक संस्कार किंवा नैतिक शिक्षण. रात्री निजण्यापूर्वी घरातील मुलांना एकत्र जमवून पालकांनी या पुस्तकातील रोज एक विचार जरी वाचून दाखविला तरी त्यांनी आपली नैतिक शिक्षण विषयक जबाबदारी पार पाडली असे म्हणता येईल. या अर्थाने 'सदाचार-चिंतनी' हे नैतिक शिक्षणाचे क्रमिक पुस्तक आहे असे म्हणावयास हरकत नाही.

याचा अर्थ असा नाही की हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांकरिताच आहे. यातील विचारधन कोणालाही उपयोगी पडेल असे आहे. उदा., "पन्नाशीचा स्वतःला प्रश्न" (पान ४८) हा विचार पाहा. प्रौढांनी हे विचार आत्मसात करावेत व आपल्या मुलांना, नातवंडांना, विद्यार्थ्यांना संस्काररूपाने द्यावेत.

या विचार-संग्रहात जेथे जेथे कृतीला आवाहन आहे त्या कृती लेखकाने स्वतः केलेल्या आहेत. दान आणि त्याग यांतील भेदाचे (पान ६५) विवरण करताना ते म्हणतात, "दानधर्माच्या मुळाशी त्यागाचे तत्त्व आहे. आपल्याला जे काही मिळते त्यातील काही अंश आपण समाजाला, समाजातील गरजू व्यक्तींकरता परत द्यावा. स्वार्थाबरोबर परार्थाचाही विचार करावा." लेखकाने आपले सारे आयुष्य गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता वेचलेले असून सुद्धा, आयुष्यातील प्राप्तीचा मोठा वाटा (रु. ५०,०००) पुनः संस्थेला अर्पण केला. समाजासाठी झिजत असताना सुद्धा जे थोडेफार मिळाले ते देखील 'इदं न मम' म्हणून परत समाजाला द्यायचे, ही निरिच्छता, निरपेक्षता आणि औदार्य, गीतेतील तत्त्वज्ञान ज्याने आत्मसात केले आहे त्याला खरोखरी साजेशी आहे. लेखकाने हा एक उच्च आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

अशा लेखकाचे हे विचार वाचकांना सदाचार–प्रवृत्त करतील अशी आशा आहे. मुंज, विवाहप्रसंग, वाढदिवस अशा निरनिराळ्या प्रसंगी आबालवृद्धांना भेट देऊन वाचकांनी या सद्विचारांचा प्रसार करावा.

या ग्रंथाचा पहिला व तिसरा भाग उपलब्ध झाले आहेत तेही वाचकांना आवडतील.

— **प्रकाशक**

लेखकाची प्रस्तावना

# या ग्रंथाचा मालमसाला

सदाचार चिंतनीचा हा दुसरा भाग आहे. पहिला भाग वाचकांना इतका आवडला की कोठेही जाहिरात न देता त्याचे तिसरे पुनर्मुद्रण झाले, इतक्या प्रती खपल्या. समाजात वाचकांना सात्त्विक, विधायक, व्यवहारोपयोगी, सदाचार प्रेरक अशा विचारांची किती आवड आहे ते यावरून सिद्ध होते. म्हणून हा दुसरा भाग प्रकाशित होत आहे. ( तिसराही भाग प्रसिद्ध झाला आहे. )

या चिंतनीतील विचारांची पार्श्वभूमी काय आहे ते वाचकांना कळावे म्हणून माझ्या जीवनातील काही संबद्ध व महत्त्वाच्या अशा गोष्टींची माहिती मी या प्रास्ताविक लेखात देणार आहे. आत्मचरित्राची प्रसिद्धी हा त्यात उद्देश नाही. या ग्रंथातील विचार कोणत्या परिस्थितीतून जन्माला आले ते वाचकांना कळावे हा हेतू आहे.

एक पुस्तक तयार करावे म्हणून खुर्चीवर बसून तीनचार महिन्यांत लिहून काढलेला हा ग्रंथ नाही. कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनात जे लहानमोठे प्रसंग येतात व घडामोडी होतात त्यांतून बाहेर पडण्याकरता माणसाला काही विचार करावा लागतो तेव्हा कृती होऊ शकते. जे प्रसंग माझ्यावर आले तेच इतर सर्व-सामान्य व्यक्तीवर येणार. आपण केलेल्या चिंतनाचा, विचाराचा व कृतीचा फायदा इतरांनाही मिळावा म्हणून मी हे विचार त्या त्या वेळी नोंदून ठेवले. अगदी भीज-पावसासारखे सावकाश असे हे लेखन झालेले आहे.

प्रासंगिक विचारांच्या मागे प्रत्येक माणसाचे अनुभव असतात. बालपणा-पासून मिळालेले संस्कार व विचार जीवनात प्रभावी होत असतात. बालपण, कौटुंबिक जीवन व सार्वजनिक आयुष्य यांत जे अनुभव मला मिळाले त्यांच्या आधारावर माझे विचार व चिंतन झाले. हे माझे जीवन काय होते ते, व इतरांना मी सांगतो ते माझ्या स्वतःच्या वागण्यात कितपत उतरले आहे, हे वाचकांना कळावे असा माझा उद्देश आहे. मुख्य ग्रंथ हे तत्त्वज्ञान आहे आणि माझे जीवन हा त्याचा व्यवहार आहे.

## इतरांसारखे व्हायचे नाही

गेल्या पन्नास वर्षांत माझ्या कामाच्या स्वरूपात कसकसा बदल होत गेला आणि कामाच्या मागील मानसिक आणि बौद्धिक बैठक यांच्यामध्ये कसकशी

उत्क्रांती झाली याचे सिंहावलोकन केले म्हणजे आपण निघालो कोठून आणि आलो कोठे असे मनाला वाटू लागते. लहानपणी मोठमोठ्या वक्त्यांनी आणि लेखकांनी विद्यार्थ्यांच्यापुढे भाषणे करून, तुम्ही मोठे व्हा, शिवाजीसारखे मोठे व्हा, लोकमान्य टिळकांसारखे मोठे व्हा, असे सांगितले म्हणजे माझ्या छातीवर दडपण पडे. मला असे वाटे, मला इतके मोठे कसे होता येईल !

मग शेवटी कॉलेज जीवनात विचार करता करता मी निर्णय केला की, आपण इतरांसारखे मोठे होण्याचा मुळीच प्रयत्न करावयाचा नाही. आपण स्वतः आपणच राहण्याचा प्रयत्न करायचा. मी ठरविले की 'मी' म्हणजे 'मीच' राहणार आहे. 'मी' दुसरा कोणीही होणार नाही. ग. श्री. खैर हा ग. श्री. खैर म्हणूनच जन्माला आला आणि तसेच त्याने शेवटपर्यंत राहावे. इतरांची नक्कल करू नये. असे ठरविल्यावर माझ्या छातीवरील दडपण कमी होत गेले, आणि मनाला अधिक मोकळेपणा आणि अधिक स्वातंत्र्य वाटू लागले. इतरांसारखे होण्याचे बंधन मी लादून घेतले नाही.

## कामातील बहुविधता

"अण्णा, तुम्हाला टेलिफोन आला आहे," असे मुलगा सांगायला येतो. कार्यालयापासून लांब असलेल्या टेलिफोनकडे मी धावत धावत जातो.

"हॅलो, मी डॉ. खैर. आपलं काय काम आहे ?"

उलट बाजूने निरोप येतो, "आम्हाला पाणी भरण्यासाठी एक मुलगा पाहिजे. तेवढा पाठवून द्यावा." असाच कुणी कार्यालयात येतो, आणि पंगत वाढण्यासाठी स्वावलंबी विद्यार्थ्यांची मागणी करतो. आमच्या स्वयंपाकिणीचा किंवा मोलकरणीचा मुलगा उनाडपणा करतो, याला आश्रमात ठेवा, अशी गळ घालण्यासाठी कुणी येतात. एके दिवशी अगदी फाटके आणि मळके कपडे घातलेला एक मनुष्य कोचावर येऊन बसला. मला वाटले, आता हा काहीतरी पैसे किंवा जेवण मागणार. पण तो म्हणाला, "माझी सगळी इस्टेट संस्थेला देऊन टाकावयाची आहे." आणि खरोखरीच त्याने तसे केले ! पंधरा हजार रुपये संस्थेला मिळाले ! शैक्षणिक संस्था स्थापन करावयाची आहे म्हणून तिची घटना कशी असावी आणि प्रारंभीची उभारणी कशी करावी, याची सल्लामसलत घेण्यासाठी काही माणसे येतात. मी शिक्षणतज्ज्ञ आहे असे मानून स्वतःच्या मनातील शैक्षणिक मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी काही लोक येतात. निरनिराळ्या शिक्षणविषयक समित्या आणि उपसमित्या यांचे सभासद शैक्षणिक कामासाठी येतात. संमेलने, परिषदा, चर्चासत्रे, सभा—यांच्या कार्यात अध्यक्ष किंवा वक्ता म्हणून भाग घ्यावा यासाठी विनंती करण्याकरता मोठ्या आग्रहाने काही लोक बोलवायला येतात. कधी कधी अनेक ठिकाणी नकार

मिळाल्याने त्यांची गरज फार असते, अणि वेळही थोडा असतो, त्यामुळे मी होकार देतो. आमच्या मुलीला स्थळे सांगा म्हणून विनंती करण्यासाठी मुलींचे बाप येतात. आजच्या सामाजिक जमान्यात उत्पन्न होणारे आपले कौटुंबिक प्रश्न कसे सोडवावेत याचा सल्ला घेण्यासाठी माजी विद्यार्थ्यांपैकी नवीन पिढीतील तरुण येतात. "पीएच्. डी." चा प्रबंध लिहावयाचा आहे किंवा "मास्टर ऑफ एज्युकेशन" च्या परीक्षेस मी बसणार आहे त्याचे मार्गदर्शन करा म्हणून विनंती करण्यासाठी काही प्रौढ विद्यार्थी येतात. प्रस्तावना किंवा अभिप्राय द्या म्हणून ग्रंथकार येतात.

माझ्या कामाचे स्वरूप असे बहुरंगी आणि बहुढंगी होते. ज्या प्रकारची माणसे येत त्या प्रकारचा पत्रव्यवहारही होई. त्यामुळे मी कोण आहे आणि माझे जीवित-कार्य काय आहे असा प्रश्न उत्तर आयुष्यातही माझ्या मनात कधी कधी येतो.

## संस्था प्रमुखाची कामे

१९५० साली गु. दादासाहेब केतकर दिवंगत झाले. त्यानंतर संस्थाप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी पडली. संस्थेतील कामाची व्यवस्था पाहाणे आणि बाहेरील कामांचाही व्याप सांभाळणे ह्या दोन्ही गोष्टी मला एकाच वेळी कराव्या लागल्या. काम, काम, काम, सतत कामच चालत आलेले आहे; विश्रांती, सुट्या रजा, मी फारशा घेतल्या नाहीत. आठवड्याचे सात दिवस आणि वर्षाचे बारा महिने कामच करीत आहे. अ. वि. गृहातील माझ्या कामाच्या प्रमुख बाबी अशा होत्या. निरनिराळ्या खात्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या अडीअडचणी सोडविणे, संस्थेच्या योगक्षेमाकरिता कमी पडणारे ६०–७० हजार रुपये कोठून कसे मिळतील याची विवंचना करणे, कालमानाप्रमाणे संस्थेत वाढ होत असली पाहिजे या दृष्टीने संस्थेतील कामाचा व्याप, आर्थिक बोजा फारसा न वाढता, कसा वाढेल याचा विचार करणे; संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालयामध्ये नवी सुधारणा काय करता येईल याचा विचार करणे; संस्थेत कामे चालू असत त्यांचा दर्जा चांगल्या प्रकारचा राहावा असा प्रयत्न करणे; नवीन कार्यकर्ते येत, त्यांच्यात परस्पर सहकारितेची भावना निर्माण कशी होईल, त्यांच्या व्याव-हारिक कामाच्या मागे तात्त्विक, वैचारिक आणि ध्येयात्मक मनोभूमिकेची वाढ कशी होईल याचा सतत विचार चालू ठेवणे – अशा तऱ्हेचे चिंतनात्मक, योजनात्मक, कृतिप्रधान आणि मार्गदर्शनात्मक असे माझ्या कामाचे स्वरूप होते.

## १९२० चे वातावरण

१९२० चा काळ म्हणजे महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा, धामधुमीचा काळ होता. त्याच वर्षी मी पदवीधर झालो. मी प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत असताना लो. टिळकांनी पुरस्कारिलेल्या स्वदेशी, बहिष्कार,

राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतु:सूत्रीच्या प्रचाराचे वातावरण देशात होते. शाळेबाहेरील वातावरणानेही माणसाच्या मनाचा पिंड बनतो. गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि राष्ट्रीय शिक्षण हे आपले सार्वजनिक कार्य असा संकल्प करून मी कामाला लागलो.

मी पदवीधर झाल्यानंतर कै. दादासाहेब केतकर यांनी विचारले, "तू आता काय करणार?" उत्तर दिले, "हे काय विचारता? व्यापाऱ्याच्या घरातील मुलगा किंवा शेतकऱ्याच्या घरातील मुलगा जसा आपापल्या धंद्याचा कारभार पाहतो, तसाच मी या संस्थेचा कारभार पाहणार आहे." हे उत्तर देण्यापूर्वी माझी भूमिका काय होती? मला असे वाटे, आपण गरिबीत जन्माला आलो. उपासतापास काढून आणि अनेक प्रकारचा त्रास सहन करून शिक्षण घेतले. बारा वर्षे मधुकरी मागितली आणि शेवटी पाच सहा वर्षांत संस्थेच्या मदतीने पदवीधर झालो. आपल्या-सारख्या गरीब स्थितीतील इतर विद्यार्थ्यांचे शिक्षण कोण करणार? आपणच हे काम अंगावर घेतले पाहिजे. ज्या समाजाने आपल्याला पोसले, त्याची त्या रूपाने सेवा केली पाहिजे. या ध्येयामध्ये पुढे विकास आणि भर पडत राहिली. परंतु मूळ उद्देश "गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण" हा आजही माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

मॅट्रिकच्या वर्गामध्ये असतानाच मी ठरवून टाकले की, आपण गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आपले आयुष्य वाहून घ्यावयाचे. मुलावर मदार असलेल्या माझ्या आईला जेव्हा मी हे सांगितले तेव्हा तिच्या डोळ्यातून पाणी आले. माझ्या गद्धेपंचविशीच्या वयामुळे त्या वेळी आईचे अंत:करण मला उमगले नाही. १९१६ सालचा हा प्रसंग आहे.

## संकल्पित कामाचा व्याप

उच्च शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर मी अनाथ विद्यार्थी गृहाचे काम अंगावर घेतले. अखेरपर्यन्त त्याच कामाशी माझा संबंध राहावा अशी माझी आज इच्छा आहे. पण गरीब विद्यार्थी म्हणजे माझ्या संस्थेतलेच असा संकुचित अर्थ मी करीत नाही. सर्व महाराष्ट्रातीलच नव्हे तर सर्व भारतातल्या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मी विचार करतो आणि या कामी योजना, सूचना, ठराव इत्यादी रूपाने जे करिता येण्याजोगे असेल ते करतो. कोठल्याही गावी गेल्यानंतर तेथील गरीब विद्यार्थ्यांच्या संस्थांना भेटी देतो. तेही माझे काम आहे, असे मी समजतो.

माझ्या कार्याचा नंतर विकास पावलेला भाग म्हणजे संस्थेतील आणि संस्थेबाहेरील व्यापक शैक्षणिक कार्य होय. सर्व महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा

प्रश्न सोडविण्याची प्रयोगशाळा, म्हणजे माझी शाळा असे मला वाटत आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आणि भारतातील शिक्षणविषयक समित्या, पोटसमित्या, मंडळे, परिषदा यांच्याशी माझे संबंध आहेत. 'शिक्षण तज्ज्ञ' ही पदवी मला कोणी केव्हा लावली हे आठवत नाही. पण पदवीदान समारंभ न करताच ती समाजाने रूढ केली आहे हे मात्र खरे ! थोर पदवी आणि स्वतःची मर्यादित विद्वत्ता यातील अंतराची जाणीव मला सतत असते.

## राष्ट्रीय शिक्षणाची प्रयोगशाळा

१९२० च्या असहकारितेच्या चळवळीचा मोठा भाग सरकारी शिक्षणावर बहिष्कार हा होता. त्या वेळी पुण्यात जी राष्ट्रीय शाळा निघाली तिच्यात मी अध्यापनाचा श्रीगणेशा केला. संस्थेच्या चिंचवड येथील शाखेत एक वर्ष काम करून त्यानंतर पुण्याच्या शाखेत १९२१ साली महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना संस्थेने केली. ही शाळा १९४८ पर्यंत राष्ट्रीय शिक्षणाची एक संस्था अशा वृत्तीने आम्ही चालविली. सरकारी मान्यता किंवा मदत याकरिता अर्जही केला नाही. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत शाळेने आपले शिक्षण-स्वातंत्र्य जतन केले. त्यानंतर मात्र सरकारी मान्यता घेतली. माझ्या शैक्षणिक प्रयोगांची आणि विचारांची भूमिका तयार करण्याच्या दृष्टीने या विद्यालयाचे क्षेत्र मी वाढविले. सरकारी बंधनामुळे इतर संस्थांना जे प्रयोग व ज्या सुधारणा करता येत नव्हत्या त्या महाराष्ट्र विद्यालयामध्ये करून पाहिल्या. शिक्षणमंत्री आणि शिक्षणाधिकारी यांनीही विद्यालयाच्या कार्याचा गौरव केला.

## संस्थापालन व ज्ञानोपासना

महाराष्ट्रात शैक्षणिक संस्था पुष्कळ निघालेल्या आहेत. ती आपली परंपराच आहे. संस्था चांगल्या रीतीने कशा चालवाव्यात, याचे तंत्र संस्थाचालकांनी चांगल्या रीतीने बसविलेले आहे. पण या शिक्षण संस्थांच्यामुळे महाराष्ट्राच्या बुद्धीचे आणि विद्वत्तेचे थोडे नुकसान झाले असे वाटल्यावाचून राहात नाही. विद्वानांनी व कर्तबगार व्यक्तींनी संस्था स्थापन केल्या आणि चालविल्या, परंतु या संस्थांच्या कारभारात आणि योगक्षेमात त्यांचा इतका वेळ जातो की, ज्ञान, व्यासंग, संशोधन आणि विद्वत्ता यांची उपासना करण्याला त्यांना वेळ व शक्ती राहात नाही. हाच प्रश्न थोडचाफार प्रमाणात माझ्यापुढेही उभा राहिला. मी संस्थेचा आजीव सेवक म्हणून बारा वर्षे काम करून व अनुभव घेऊन परदेशात गेलो व तेथून उच्चतम पदवी संपादित करून आलो. येथे आल्यानंतर कोल्हापूर, बडोदे इ. संस्थानांतील अध्यापक-महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करण्याविषयी मला सूचना करण्यात आल्या होत्या. त्या मी स्वीकारल्या असत्या

तर विद्वान प्राध्यापक आणि 'प्रिन्सिपॉल' म्हणून काम करून, आज सेवानिवृत्त होऊन सुखाने पेन्शन घेत बसलो असतो. संस्थेत आजीव कार्य करण्याचे व्रत मी स्वीकारले असल्याने बाहेरच्या नोकऱ्या नाकारून संस्थेतच पुन्हा कामाला सुरुवात केली. स्वाभाविकपणे संस्थेचा कारभार आणि योगक्षेम यांच्या विवंचनेत ज्ञानाच्या साधनेला आणि उपासनेला वेळ कमी मिळाला.

## शिक्षणशास्त्राचे अध्यापन

शिक्षणशास्त्राच्या उच्च पदवीचा अभ्यास पुण्यात सुरू झाल्यानंतर 'तुलनात्मक शिक्षण पद्धती' हा माझा आवडीचा विषय शिकविण्याकरिता सन्मान्य प्राध्यापक म्हणून मला पाचारण करण्यात आले. मी ते मान्य केले आणि शक्य तेवढी तयारी करून माझे पहिले व्याख्यान दिले. ते कसे होत आहे याचा विचार न करता मी एक तास संपविला. मी घरी आलो. माझ्या एका मित्राचे आणि वर्गातील विद्यार्थ्याचे पत्र आले होते की, 'तुमचे पहिले व्याख्यान अगदी उत्कृष्ट झाले.' पुणे, मुंबई आणि कर्नाटक या विद्यापीठांतून मी हा विषय 'मास्टर ऑफ एज्युकेशन' च्या विद्यार्थ्यांना शिकविला, व एम. ए. पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना-शैक्षणिक संशोधनाचे मार्गदर्शन केले. संस्थेची नित्याची कामे करून आपला विषय अद्ययावत ठेवण्याकरिता नियमित वेळ मिळत नसे. म्हणून माझे रविवारचे सुटीचे दिवस आणि आगगाडीत किंवा बसमध्ये प्रवास करताना मिळणारा वेळ यांचा मी अधिकाधिक उपयोग करून घेतला. नवीन ग्रंथांचे माझे पुष्कळसे वाचन प्रवासातच झाले.

## विधानपरिषदेचा सभासद

१९५२ ते १९५८ या काळात मी लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे काम केले. ही निवडणूक मोठी चुरशीची झाली, आणि तीत मला माझ्या कामाच्या तपश्चर्येचा उपयोग झाला. कौन्सिलमध्ये मी गेल्यापासून संस्थेला अप्रत्यक्षपणे फायदा झाला. संस्थेची उंची आणि पत वाढली. ही संस्था लेजिस्लेटर्स निर्माण करू शकते असा विश्वास लोकांना वाटला. अप्रत्यक्षपणे संस्थेचा प्रचार झाला आणि तिची पातळी उंचावली. आपण एका संस्थेचे जबाबदार चालक आहोत ही भावना सतत ठेवून निर्भीडपणाने परंतु सौजन्याने, निःस्पृहपणाने परंतु आदराने मी कौन्सिलमधील काम केले. स्वतंत्र सभासद असल्याकारणाने विरोधी पक्षात माझा समावेश झाला. परंतु माझ्या कामामुळे सरकारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोन्ही बाजूंकडून मला सारखाच मान मिळत गेला. माझ्या भाषणात अभ्यासूपणा, स्वतंत्र विचार, निर्भीडपणा, सभ्यपणा आणि वक्तृत्व हे गुण असल्याने माझी इंग्रजी भाषणे सर्वांना आवडत असत व तसे ते सांगत. मला वाटते की निदान मला तरी माझी भाषणे

वाचून आनंद होत असे. इतरांनी माझ्या कौन्सिलमधील कामांचे जे वर्णन केले त्याच्या आधाराने मी हे लिहिले आहे. एकदा मुख्याध्यापकांच्या सभेत शिक्षण-मंत्री चर्चा करीत बसले असता मधेच उठले आणि म्हणाले, "मला कौन्सिलमध्ये गेले पाहिजे. डॉ. खैर आता बोलणार आहेत." ही घटना मला नंतर कळली.

**उसन्या कला**

मी जन्मतः हाडाचा लेखक किंवा वक्ताही नाही. या गोष्टींची मनापासून मूळची हौसही नाही. परंतु हातात घेतलेल्या कामाने आणि समाजातील मागणीने मला या दोन्हीही क्षेत्रांत खेचून घेतले. मला एकदा माझ्या मित्राने विचारले, 'अण्णा, तू लेखन का करीत नाहीस?' मी उत्तर दिले, 'समाजाला काहीतरी सांगण्यासारखे आहे, आणि ते सांगितलेच पाहिजे इतके अपरिहार्य आहे, असे मनाला वाटल्याखेरीज मी लेखणीला हात लावणार नाही.' पाश्चिमात्य देशांत अडीच तीन वर्षे वास्तव्य केल्यानंतर आणि तेथील प्रगती, घडामोडी, विचारप्रवाह, आणि प्रवृत्ती पाहिल्यानंतर मला असे वाटू लागले की, या सर्व गोष्टी आपल्या बांधवांना सांगितल्याच पाहिजेत. हजारो रुपये खर्च करून मी या देशात आलो आहे, शिक्षण घेतले आहे, निरीक्षण केले आहे. लाखात एखाद्याच माणसाला अशी संधी मिळते. त्याची नैतिक जबाबदारी आहे की, पाहिलेल्या, ऐकलेल्या आणि त्यामुळे सुचलेल्या सर्व गोष्टी त्याने आपल्या समाजाला सांगितल्या पाहिजेत. असे न केल्यास तो एक चुकारपणा होईल आणि एका व्यक्तीवर झालेल्या खर्चाचा पुरेपूर मोबदला आपल्या देशाला मिळणार नाही. या भावनेने लेखनाला सुरुवात केली. लेख लिहिले. पुस्तके लिहिली. पण लेख आणि पुस्तके लिहिणे हे जीवनाचे अंतिम आणि सर्वस्वी ध्येय मी ठेवलेले नाही.

जी गोष्ट लेखनाची तीच व्याख्यानांची. आपण परदेशांत काय पाहिले ते लोकांना सांगावे म्हणून निरनिराळ्या निमित्ताने प्रवासाच्या योजना आखून नागपूर पासून वेंगुर्ल्यापर्यंत, शिक्षणसंस्थांतून व अन्यत्र व्याख्याने दिली. व्याख्यानाला लागणारे स्वयंसिद्ध गुण माझ्या ठिकाणी नव्हते. परंतु या कलेची आपल्या कामाला गरज आहे म्हणून मी तिची यथाशक्य जोपासना केली. आपल्या शिक्षणात सुधारणा व्हावी याकरता जरूर असणाऱ्या विचारांचा प्रसार करण्याच्या कामी माझ्या मराठी व इंग्रजी वक्तृत्वकलेचा मी उपयोग करून घेतला. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये ही कला मला फार उपयोगी पडली.

**काही शोक**

संगीताकडे माझा स्वाभाविक ओढा आहे. तसा बालपणी मला गुरू भेटला असता तर आज मी 'गजानन बोवा'ही झालो असतो, असे आपले मला वाटते.

मी गातो–पण स्वतःकरताच. हार्मोनियम, व्हायलीन, दिलरुबा, सतार इत्यादी वाद्ये स्वप्रयत्नाने वाजविण्याचा अनेकदा प्रयत्न करून सोडून दिला आहे ! काही वाद्ये घरी आहेत. सहा महिने–वर्षातून एखाद्या वेळी काढतो ! पण मला रेडिओ चांगला वाजवता येतो ! म्हणजे रेडिओवरील अभिजात संगीत मी नियमितपणे ऐकतो.

नियमित फिरायला जाणे आणि थोडा हलका व्यायाम नियमितपणे घरी करणे–हा माझा नेम आहे. माझे मित्र माझ्या या फाजील नेमबाजीची थट्टा करीत असतात. पण त्या नेमामुळेच मी जगलो आहे असे मला वाटते.

असे हे माझे जीवन आहे. कोणाही सार्वजनिक कार्यकर्त्याचे जीवन कसे असेल त्याचा हा एक नमुनाच आहे.

**तन-मन-धन- समर्पण**

आपल्या जीवनाचे सिंहावलोकन केले म्हणजे या सर्व गोष्टी आठवतात. त्या सर्वांचा विचार केला म्हणजे मला असे वाटते की सार्वजनिक कामी धनाच्या त्यागापेक्षाही वेळेचा आणि शरीराचा जो मी विनियोग केला तो अधिक मोलाचा होता. माझ्या जीवनातील सर्व वेळ आणि शरीरातील सर्व शक्ती मी संस्थेच्या कामाकडे लावली. सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत तेच काम आणि रात्री झोपेतही त्याच कामाचा ध्यास. माझे गुरुजी कै. दादासाहेब केतकर एकदा सांगत होते की, "त्या डेली मेलमध्ये आपल्याला इंग्रजी मजकूर द्यावयाचा राहिला आहे" असे तू झोपेत बडबडत होतास.

संस्थेची शाळा सकाळी पावणेसातची असल्यामुळे साडेसहापासून शाळेचे काम. संस्थेची आर्थिक स्थिती त्यावेळी अती वाईट होती. कै. केशवराव भोसले यांच्या ललित-कलादर्श नाटच मंडळीत रात्री प्रेक्षकांत मदतीची पेटी फिरवून एक एक पैसा किंवा एक एक आणा असे जे मिळेल ते जमा करण्याकरिता मी जात असे. तेथून रात्री बारा-साडेबारा वाजता आल्यानंतर पैसे मोजून पावती तयार करून ठेवायची आणि मग झोपायचे. शाळेकरता पुन्हा लवकर उठावयाचे.

बालगंधर्वांच्या नाटक मंडळीत मोठ्या मुष्किलीने मदत-पेटी फिरवायची परवानगी मिळाली होती. पण खुद्द गंधर्वांचे काम चालू असताना मला प्रेक्षकात जाण्याची मनाई होती. त्यामुळे घरी यायला उशीर होई. संस्थेतील मुलांना भाजी खायला मिळावी म्हणून कै. केतकर व मी, मंडईत सकाळी जाऊन, दलालांची भाजी खरेदी होई त्या वेळी त्यांच्यापुढे झोळी पसरून ती जमा करीत असू. नानाच्या पेठेत धान्याच्या दुकानात जमिनीवर पडलेले धान्य, त्याला मातेरे म्हणत, आम्ही जमा करून आणीत असू. पण पुढे व्यापाऱ्यांनी ते देणे बंद केले. त्यांना ते पारव्यांना व कबूतरांना द्यायला पाहिजे होते. सकाळी अध्यापनाचे काम,

दुपारी व्यवस्थापनाचे काम आणि सर्वच वेळी संस्थेकरिता भिक्षा आणि मदत मागण्याचे काम–अशा प्रकारचा कार्यक्रम मी घेतलेल्या व्रताप्रमाणे १९२० पासून चालविला.

## द्रव्यविषयक अपेक्षा व धोरण

मी सहा महिन्यांचा होतो त्या वेळेपासून दारिद्र्यात वाढलो. आईचे दूधही मला पुरेसे मिळाले नाही, कारण सर्व भावंडांचा चरितार्थ चालविण्याकरिता इतरांच्या मुलांना पाजणे तिला भाग होते. वयाच्या पाचव्या वर्षापासून मी मधुकरीची झोळी हातात घेतली. पंधराव्या वर्षापर्यंत सर्वस्वी या मधुकरीच्या झोळीवरच मी निर्वाह केला. घरचे ताजे अन्न मला काही माहीत नव्हते. घरचा सण असा मी पाहिला नाही. दिवाळीत घरी आंघोळ केली नाही. अनेक वेळा उपाशीपोटी शाळेत गेलो आणि दिवसा मधुकरीचे आणलेले अन्न रात्रीला ठेवून त्यावरच रात्र भागविली. थंडीच्या दिवसांत कधी कधी एक तांब्याभर कढत पाण्यात मी स्नान केले आहे. इतरांचे जुने कपडे वापरलेले आहेत. वरखर्चासाठी रोख पैसे मिळावेत म्हणून स्वावलंबनाची इतर कामेही करावी लागत. नागनरसोबाची चित्रे रंगविणे, काळ, केसरी, राष्ट्रमत ही वृत्तपत्रे वाटणे, कऱ्हाडच्या स्वदेशी काड्याच्या पेट्या विकणे, राजा रविवर्म्याची चित्रे बाजारात विकणे, नवीन वर्षाची पंचांगे विकणे, लग्न-मुंजीच्या वेळी दक्षिणा मागणे, असे अनेक उद्योग करावे लागले. पुढे पुढे सोळाव्या वर्षी अनाथ विद्यार्थी गृहात आश्रय मिळाल्यामुळे कष्टाचे जीवन तसेच राहिले तरी जबाबदारी थोडी कमी झाली.

सुदैवाने प्राथमिक शाळेत चांगले शिक्षण मिळाल्याने शिक्षणाचा पाया चांगला घातला गेला, अणि माध्यमिक व उच्च शिक्षण होऊ शकले. नादारी अथवा शिष्यवृत्ती मिळत गेली आणि ती टिकविण्यासाठी अभ्यासाची पातळी पण चांगली राखावी लागली.

अशा प्रकारची गरिबी पाहिलेली असल्यामुळे ती अंगवळणीच पडली. त्यानंतर अनुकूल परिस्थिती आली असताना मला ऐश्वर्याचा मोह झाला नाही. सुख आणि दुःख, दारिद्र्य आणि ऐश्वर्य या गोष्टी समान मानण्याचे तत्त्व प्रथम अनुभवाने आणि नंतर गीतेच्या वाचनाने माझ्या हाडामासात मुरले.

१९२० मध्ये मी संस्थेच्या कामाला सुरुवात केली. त्या वेळी संस्थेची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. ही संस्था ५० रुपयेही पगार देईल की नाही याची शंका होती. त्यामुळे कधी काळी या संस्थेतून वेतन मिळेल ही मला अपेक्षाच नव्हती. निर्वाहापुरते अन्न मिळेल आणि खर्चाला ५–१० रुपये मिळतील यापेक्षा अधिक अपेक्षा या संस्थेकडून मी केलीच नव्हती. १९२० साली मी बी. ए. झालो व तीन वर्षांनी एम्. ए. झालो. त्यानंतर स्थळ म्हणून मला पाहण्यासाठी लोक येऊ

लागले. त्या वेळी मी त्यांना सांगे, "मी संस्थेच्या सेवेचे व्रत घेतले आहे. भिक्षेवर चाललेली ही संस्था आहे. निर्वाहापुरते अन्न व कपडालत्ता घेऊन मी येथेच आयुष्य कंठणार आहे. अशा परिस्थितीत मुलगी द्यायची असेल तर द्या." माझा हा निर्धार ऐकल्यावर मुलीचे बाप परत येत नसत, आणि दिलेले मुलींचे फोटो परत घेऊन जात. अशी ३०-३५ स्थळे माझ्याकडे सहज येऊन गेली. एकदा मुलीच्या बापाने संस्था सोडून अन्यत्र काम केल्यास स्वतःच्या मालकीचे एक घरही देऊ केले. परंतु मला ह्या गोष्टीचा मोह झाला नाही. पुढे १९२४ साली संस्थेची घटना तयार करून ५०-७५ रु. पर्यंत आजीव सेवकाने घ्यावेत असे ठरले. परंतु मी १९२० पासून १९३६ पर्यंत ठरलेले असे वेतन घेतले नाही. संस्थेच्या कोठीतून धान्य, जरूर तो कपडालत्ता आणि ५–१० रु. किरकोळ खर्चाकरिता असे घेत असे. वेतनाविषयी विचार करता मला असे वाटे व वाटते की या संस्थेला पैसे देतात ते गरीब विद्यार्थ्यांकरिता देतात. त्या पैशांतून जरुरीपेक्षा जास्त पैसा घेणे म्हणजे गरीब विद्यार्थ्यांच्या तोंडचा घास काढून घेण्यासारखे आहे. वेतनश्रेणी ठरविण्याचे अनेक प्रसंग संस्थेत ज्या ज्या वेळी आले त्या त्या वेळी अपरिहार्य म्हणून काय घेता येईल एवढेच मी पाही. किमान किती घेता येईल याचाच मी विचार करीत असे. १९३९ ते १९४९ हा महायुद्धाचा काळ विशेष महागाईचा आणि टंचाईचा होता. त्या वेळी फेरविचार होऊन आजीव सेवकाचे वेतन ८० ते २०० रु. पर्यंत झाले. परंतु जीवनातील बालपण, परिस्थितीने व आलेल्या दारिद्र्यात, आणि १९२० ते १९४९ ही वर्षे बुद्धिपुरस्सर स्वीकारलेल्या दारिद्र्यात मी घालविली. वयाची ५० वर्षे अशी गेली.

१९३१ ते १९३३ अमेरिकेत व युरोपात उच्च शिक्षण घेऊन मी परत आलो. तिकडील ऐश्वर्याचे जीवन मी पाहिले होते. तेथील ऐश्वर्यातही पैशाच्या अभावी मी काटकसरीत व गरिबीतच राहिलो होतो. इकडे आल्यानंतर माझी भाषणे व लेख यांची माहिती झालेल्या लोकांनी मला चांगल्या नोकऱ्या देऊ केल्या. त्या मी स्वीकारल्या असत्या तर बंगला, मोटारगाडी, मानाची जागा आणि चांगले पेन्शन यांचा लाभ मला झाला असता. मी एकच उत्तर दिले की, "संस्थेशी माझे लग्न झाले आहे. संस्था मी सोडू शकणार नाही." ऐश्वर्य पाहिल्यानंतर आणि त्याची प्राप्ती जवळ आली असतानाही त्याचा मी मोह धरला नाही. १९२० साली संस्थेच्या सेवेचे व्रत घेऊन ठरलेल्या २५ वर्षांची मुदत १९४५ साली संपली. या २० वर्षांच्या काळात अक्षरशः सर्वस्व व स्व-सर्व मी या संस्थेला अर्पण केले. किमान वेतन स्वीकाराचा उल्लेख वर आलाच आहे. खाजगी प्राप्तीही संस्थेकडेच दिली. माझ्या तिन्ही पुस्तकांचा फायदा अदमासे १५०० ते २००० संस्थेकडेच दिला. ग्रंथाला मिळालेली ८००-९०० रु. पर्यंतची पारितोषिके संस्थेला दिली. युनिव्हर्-

सिटीतून मिळालेले परीक्षावेतन अदमासे १००० हा स्वप्राप्तीचा शेवटचा हप्ता १९४५–४६ साली संस्थेकडे दिला. २५ वर्षांच्या सेवेनंतर खाजगी प्राप्ती संस्थेकडे देण्याच्या बंधनातून मी स्वतःला मुक्त करून घेतले. त्याचे कारण माझी विशिष्ट सांसारिक परिस्थिती. जरुरीपुरते वेतन घेतल्याने शिल्लक टाकलेली नव्हती. कुटुंबातील थोरला मुलगा मेंदूच्या आजारामुळे शिक्षणास व संसारास मदत करण्यास असमर्थ. अशा स्थितीत माझे उतारवय व संसाराचा वाढता भार डोळ्यांपुढे दिसू लागला. संस्थेच्या पैशातून नव्हे, तर सुट्टीच्या सवडीच्या वेळात केलेल्या इतर कामांतून मिळालेली प्राप्ती शिल्लक टाकण्याची जरुरी वाटली.

## ध्येयवादामुळे त्याग होतो

मनुष्य स्वार्थत्याग कशाकरिता करतो ? माझ्या मते काहीतरी जिवंत ध्येयाकरिता तो त्याग करावयास तयार होतो. हा ध्येयवाद कार्यकर्त्यांत सतत जिवंत राहावा असे मला वाटते. कार्यकर्त्यांत ध्येयवाद जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत स्वार्थाची प्रवृत्ती बळावणार नाही; त्यागाची आणि सेवेची प्रवृत्ती बलवंत राहील अशी माझी खात्री आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांमधील ध्येयवाद सतत जिवंत ठेवणे आणि त्याची सतत छाननी करणे हे नव्या-जुन्या कार्यकर्त्यांचे सततचे कर्तव्य आहे.

आर्थिक दृष्टीने जसा मी त्याग केला, तसा स्वतःच्या वेळेच्या आणि कष्टाच्या दृष्टीनेही अंगचोरपणा न करता त्याग केला. संस्थेचे काम करताना कधी घड्याळाकडे पाहिले नाही आणि कष्टात कुचराई केली नाही. सतत ४० वर्षे सकाळी ६॥ वाजता कार्यालयात हजर राहाणे आणि भोजनाची व विश्रांतीची वेळ सोडून दिवस मावळेपर्यंत संस्थेत काम करणे, असा क्रम चाललेला असे.

## कौटुंबिक जीवनाचे स्वरूप

सावजनिक जीवनामध्ये ज्याप्रमाणे माझ्या यशाला अनेक व्यक्ती कारणीभूत झाल्या व त्यांच्यामुळे मी सार्वजनिक कार्य करू शकलो त्याचप्रमाणे माझ्या कौटुंबिक जीवनाचेही आहे. माझे कौटुंबिक जीवन सुखी आहे म्हणून सार्वजनिक जीवनाकडे मी अधिक लक्ष देऊ शकलो. माझी कौटुंबिक जबाबदारी कुटुंबातील लोकांनी उचलल्यामुळे माझ्यावरील खाजगी कामाचा भार हलका झाला.

महिन्याचा पगार हातात घेतल्याचे मला तरी कधी आठवत नाही. १९२० सालापासूत मी संस्थेत कामाला प्रारंभ केला व १९३७ पासून वेतन घ्यायला सुरुवात केली. आलेले वेतन परस्पर सौ. ताईंकडे जात असे व त्या आलेल्या वेतनात योगक्षेम चालवीत. मात्र आमच्या कुटुंबातील जमाखर्चाचे एक तत्त्व आहे.

कोणाचेही कर्ज काढावयाचे नाही. उधार जिनसा आणावयाच्या नाहीत. उधारी-उसनवारी आमच्या कुटुंबात बंद आहे. मीही कर्ज देण्याच्या भानगडीत पडत नाही, कारण त्यामुळे वैयक्तिक संबंध दुरावण्याची शक्यता असते. महायुद्धाच्या महागाईत यामुळे आम्हाला अतिशय हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. भाजीपाला, दूधदुभते, कपडेलत्ते या बाबतीत काटकसरीने व मिळेल त्यात भागवावे लागले. या सर्व गोष्टींचा आमच्या कुटुंबातील सर्वांच्या प्रकृतीवर परिणाम झाला. १९४८ नंतर मात्र वेतनवाढ झाल्यावर पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र या गोष्टीचा अनुभव आम्हाला आला.

घरात एक प्रकारची संस्कृती असावी अशा मताचा मी आहे. पण ती नेमकी काय असावी हे मी निश्चित करू शकलो नाही. भोजनापूर्वी आम्ही सर्वजण प्रार्थना म्हणतो. घरात देव आहेत पण त्यांच्या पूजेकरिता पाळयाच लावाव्या लागत. सद्विचार, चारित्र्य, चांगल्या सवयी या दृष्टीने पाहिले तर आमच्या घरातील संस्कृती इतरांना विशेष जाणवते.

घरातील सर्वांनी कष्टाची कामे करावीत असा माझा आग्रह असतो. आई मोलकरीण नाही, बाप मजूर नाही व मुले जहागीरदाराची वारसदार नाहीत; सर्वांनी वाटून घरातील कामे करावीत हे तत्त्व आहे व त्याप्रमाणे आचरण असते. घरात कामाच्या पाळया होत्या. पाळया लावल्या तरच कामे होतात; पण पाळीत काम नसेल तर ते बिनवारशीच राहते. आपण होऊन कोणी कामाला हात लावीत नाही. न सांगता कामे करावीत अशी माझी शिकवणूक होती पण त्याप्रमाणे होत नसे.

घरात मुलांचे लाड होत नव्हते पण फार कठोर शिस्त होती असेही नाही. परंतु आचरणाचे काही नियम असत. गोडीगुलाबीने पटवून देऊन सांगण्यावर भर असे. घरात मुलांमध्ये आवडता नावडता असा भेद नव्हता. आई वडिलांचे सर्वांवर सारखे प्रेम आहे. मुलांना आपल्यावर प्रेम नाही असे वाटण्याचा संभव असतो म्हणून मी विनोदाने म्हणतो की या महिन्यात 'क्ष' व्यक्ती आवडती असे सरकारने ठरविले आहे. या बाबतीत मुलांना काय वाटते हे सांगणे कठीण आहे.

सौ. ताईंचे शिक्षण मराठी चार यत्तेपर्यंतच झाले आहे हे कोणास खरे देखील वाटणार नाही. आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांशी त्या इतक्या सफाईने वागतात की त्यांच्या कमी शिक्षणाची कोणास शंका देखील येणार नाही. एखादा पाहुणा इंग्रजीतून बोलल्यास ताई हसून आपणास समजले असे दाखवितात व वेळ भागवून नेतात. ताईंनी आपल्या तुटपुंज्या शिक्षणाला वाचनाची सतत जोड दिली. प्रथम प्रथम वाचलेल्या सर्व पुस्तकांची यादी ठेवली होती. त्यांना रोजचे वर्तमानपत्र संपूर्ण वाचल्याशिवाय चैन पडत नाही. मी त्यांच्याकडून मराठी सातवीपर्यंतची सर्व

भाषेची व इतिहासाची पुस्तके वाचून घेतली. भोजन करताना एकीकडे इंग्रजीची तीन रीडरे त्यांना मी शिकविली, परंतु उपयोगाच्या अभावी ती आता विसरून गेली.

आतापर्यंत घरातील सर्व जबाबदारी सौ. ताईनी वाहिली आहे. घरातील व घराबाहेरील कामे त्या पाहतात. बाजारहाट करणे, स्वतःचे, मुलांचे व माझेही कपडे खरेदी करणे, हंगामाप्रमाणे दूरदृष्टी ठेवून धान्य खरेदी करणे या गोष्टी ताईच पाहतात. एकदा नाशिकला गेलो असताना डॉ. सौ. येसूताई देवधर यांनी विचारले, "पुण्यास कोळसे कसे आहेत?" मी ताबडतोब उत्तर दिले "काळे कुळकुळीत आहेत." तसेच एका स्नेह्याच्या पत्नीने विचारले, "पुण्यात दूध कसे आहे?" मी उत्तरलो, "पांढरे शुभ्र." त्यामुळे मला बाजारभाव विचारण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही.

आम्ही आश्रमाच्या आवारात राहात असताना सौ. ताईंचे संस्थेच्या कामात काही प्रमाणात सहाय्य होत असे. माझे पाहुणे म्हणजे संस्थेचे पाहुणे. त्यांचे आदरातिथ्य ताईंनाच करावे लागते. आल्यागेल्याचा चहा, हे एक मोठे प्रकरणच असे. आश्रमातल्या स्वयंपाकात सल्लामसलतीसाठी ताईंचा उपयोग होत असे. शिवाय आश्रमातील आजारी मुलांचे कमीजास्त पाहणे याकडेही ताई एके काळी लक्ष पुरवीत असत. त्यामुळे संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांत ताईंबद्दल अगत्य दिसते. आश्रमात आलेला माजी विद्यार्थी ताईंना हटकून भेटणारच. माझ्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या समारंभाची निमंत्रणे पाठविताना ओळखीचे माजी विद्यार्थी गाळले जाऊ नयेत म्हणून ताईंनी डोळ्यात तेल घालून यादी तपासली.

माझ्या अनुभवाप्रमाणे सौ. ताईंचा स्वभाव शांत व समाधानी आहे; अर्थात मुलांचा अनुभव निराळा असल्यास मला माहीत नाही. सुखदुःखांत समाधानी राहण्याची त्यांची वृत्ती आहे. पंचेचाळीस वर्षांच्या वैवाहिक जीवनात आमचे कधी भांडण झाल्याचे मला आठवत नाही. याचा अर्थ ताई माझ्याशी भांडल्या नाहीत. परंतु माझा स्वभाव शीघ्रकोपी होता. मी अनेकदा संतापत असे. त्यांच्या शांत-वृत्तीला माझी शीघ्रकोपी वृत्ती हळूहळू शरण गेली व माझा स्वभाव शांत बनला. निदान इतर लोक तरी असे म्हणतात. गरिबीत त्यांनी काटकसरीचा संसार केला. चाळीस वर्षांत एक तोळा सोनेसुद्धा मी त्यांच्यासाठी विकत घेतले नाही. त्यांनी दागिन्यांसाठी किंवा महाग कपड्यांसाठी कधी आग्रह धरला नाही. एके काळी फाटक्या लुगड्यांना दंड घालून त्यांनी भागविले आहे. धोतरांना मधे शिवण घालून मी दिवस काढले आहेत. परंतु ही सर्व गरिबी व काटकसर सौ. ताईंनी आपल्या शांत व सोशिक स्वभावाने सहन केली आहे. जिच्या माहेरी एके काळी लाखाच्या उलाढाली चालत अशी ही व्यक्ती माझा गरिबीचा संसार आनंदाने चालवीत आहे.

अशा प्रकारचे माझे कुटुंब आहे, सार्वजनिक कामाच्या रगाड्यातून मोकळे झाल्यानंतर घरी येऊन घरच्या माणसात खेळीमेळीने राहण्यात एक प्रकारचा आराम वाटतो. मी मुलांची थट्टामस्करी करी, मुलेही माझ्याविषयीचा आदर कायम ठेवून माझी थट्टामस्करी करीत. इतके असले तरी माझ्याविषयी त्यांना धाक वाटे, तो का ते मला समजले नाही. प्रवासाला जावयाचे असेल अगर एखादी वस्तू विकत घ्यायची असेल तर मुले प्रथम ताईची परवानगी मागण्यास जात आणि एखादे वेळी ताई नकाराचा वाईटपणा आपणाकडे नको म्हणून माझ्याकडे बोट दाखवीत. मुले माझी परवानगी काढण्याविषयी टंगळमंगळ करीत. मी खुषीत आहे असे पाहून परवानगी काढीत. माझा परवानगी देण्याचा हक्क शाबीत करण्यासाठी मी काही वेळा नकारही देई, पण कारणे सांगून.

भोजनाच्या वेळी इतर गप्पागोष्टी हा आमचा सर्वांचाच दिवसाचा विरंगुळा असे. त्याकरिता एखाद्या दिवशी मुले जेवण लांबवीत अथवा मी तरी लवकर जेवी. मग जेवताना संसारातील गोष्टींपासून जगातील राजकारणापर्यंतच्या सर्व गोष्टींचा ऊहापोह होई. त्या वेळी कोण वर्तमानपत्र वाचतो त्याची परीक्षा होई. कधी कधी हिंदी, इंग्रजी बोलण्याचा सराव होई. काव्यपठनाची परीक्षा होई भोजनाची वेळ हा एक व्यापक शिक्षणाचा तासच असे. सुटीचे दिवशी रात्री-दुपारी आम्ही सर्वजण पत्ते, कॅरम खेळत असू. त्यात आमची एकमेकाला गाढव करण्याची अहमहमिकाच लागे. नाटक-सिनेमाचे वेड आमच्या घरात कोणालाच नाही. परंतु चांगल्या सिनेमाची चर्चा आम्ही खूप करतो. पाच सहा महिन्यांतून सर्वजण मिळून एखादा सिनेमा पाहायला जात होतो.

मुलामुलींची लग्ने होऊन त्यांचे संसार सुरू झाले आहेत त्यापूर्वी आमचा संसार कसा होता त्याचे हे चित्र आहे.

## मला घडविणारी माणसे

जीवनात मला बहुसंख्य माणसे चांगली भेटली त्यामुळे मानवाच्या मूलभूत चांगुलपणावर माझा विश्वास आहे. जीवनावर संस्कार करणाऱ्या तीन व्यक्ती. पहिली आई. तिने अखेरपर्यंत एक सूत्र ठेवले होते. "शिक्षण सोडायचे नाही." स्वत: निरक्षर असूनही शिक्षणावर तिची दांडगी श्रद्धा. त्याकरता अलोट कष्ट आणि स्वार्थत्याग तिने केला. जीवनात माणूसकी आणणारे विचार मला गुरूंनी दिले. मला आयुष्यात काही शिक्षक असे मिळाले की त्यांनी माझा ध्येयवाद तयार केला. त्यामुळे चारित्र्यसंपन्न राहून मी सार्वजनिक सेवा करीत आहे. जीवनाला वळण लावणारा तिसरा वर्ग मित्रांचा. तेही मला चांगले भेटले. माझ्या महत्त्वाकांक्षांना उत्तेजन देऊन सहाय्य करणारे आणि निरपेक्ष प्रेम करणारे स्नेही

मला मिळाले. काम करताना बरोबर सहकारी चांगले असले तर कामात हुरूप वाटतो. मला माझे सहकारी चांगले मिळाले आहेत. त्यांची माझी मने निगडित झाली आहेत. आमचा परस्परांवर विश्वास आहे. शेवटी जीवनातील अंगीकृत कार्यात संपूर्ण एकजीव होणारी व त्या जीवनात समाधान मानणारी पत्नी असल्या-शिवाय संसार सुखाचा होत नाही. त्याही दृष्टीने मी अत्यंत भाग्यवान आहे. अशा रीतीने माझ्या सुखी, समाधानी, उपयोगी आणि यशस्वी जीवनाचे श्रेय माझ्या भोवतालच्या अनेक व्यक्तींकडे जाते. आई, गुरू, स्नेही, सहकारी आणि पत्नी या सर्वांचा माझ्या मूलभूत प्रवृत्तीवर संस्कार होऊन आजचा "मी" झालेलो आहे. यातील माझा अंश पाचवा सहावा असेल!

## तीन शत्रूंशी सामना

जीवनात मला तीन शत्रूंशी सतत सामना द्यावा लागला. दारिद्र्य, प्रकृती आणि मनोविकार.

दारिद्र्यात जन्माला आलो त्यात बालपण आणि विद्यार्थिदशा गेली. आणि पुढे जीवनातही मी जाणूनबुजून गरिबीचे जीवन पत्करले. पूर्वीचे दारिद्र्य परि-स्थितीने लाभले, नंतरचे मी आपणहून अंगीकारिले. विद्यार्थी जीवनात गरिबीशी झगडताना मी अनेक खटपटी केल्या. त्यामुळे जीवनात अनुभव मिळाले. मधुकरी, आगंतुकी, शागिर्दी, भिक्षुकी, वारकरी, दुकानदार, फेरीवाला, चितारी, वर्तमान-पत्रविक्या असे अनेक उद्योग केले. पण ते करीत असताना आईने दिलेला मंत्र सोडला नाही. "शिक्षण सोडायचे नाही." तो ध्रुवतारा होता. पण या गरिबीच्या जीवनाचा माझ्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला, कारण प्रकृतीचे भांडवल मूळचेच कमी होते.

लहानपणी आकडी येत असल्याने अनेक वेळी "आता हा मेला" म्हणून मला घोंगडीवर काढल्याचे सांगतात. पाळण्याला लागलेल्या आगीने जन्माची खूण केलेली आहेच. माझी प्रकृती कधी धडधाकट असल्याचे मला आठवतच नाही.

प्रकृती सुधारण्याकरिता आणि ती चांगली ठेवण्याकरता मला सतत सामना द्यावा लागला आहे. पण मी निराश न होता आरोग्यविषयक पुस्तकांचे वाचन करतो. निरनिराळ्या आरोग्यतज्ज्ञांकडून निरनिराळ्या युक्त्या शिकून घेतो. स्वतः प्रयोग करतो आणि प्रकृती चालू ठेवतो. माझे स्नेही भेटले म्हणजे पहिला ठराविक प्रश्न—"प्रकृती कशी काय आहे" हा असतो. माझेही आता ठराविक उत्तर असते "संभाळून आहे." पंचविसाव्या वर्षी माझ्या स्नेही डॉक्टरांनी विनोदाने मला तपासल्यावर सांगितले — "You are an encyclopaedia of all diseases." आपण सर्व रोगांचा एक कोशच आहात. असा हा एन्सायक्लोपीडिया

मी जवळ जवळ सत्तरीपर्यंत कार्यक्षम स्थितीत वाळगला आहे. त्याकरता मला सतत कष्ट पडले आहेत. नियमित व्यायाम, आसने, प्राणायाम, निसर्गोपचार, पथ्यपाणी, मनःशांती, चिंतन आणि आत्मसंयमन—यांचे आधाराने दुर्बळ शरीरही सांभाळले आहे.

तिसरा सामना मी आपल्या मनाशी सतत करीत आलो आहे. सामान्य माणसाच्या ठिकाणी जे सर्व प्रकारच्या सुखलालसांचे आणि मनोविकारांचे मोह असतात ते माझ्याही ठिकाणी आहेत. परंतु विचारपूर्वक मी त्यांच्याशी सामना देत आलो आहे. सार्वजनिक जीवनात माझ्याशी ज्याचा वरवर संबंध येतो त्यांना वाटते, हा मनुष्य शांत, संयमशील इत्यादी इत्यादी आहे. पण तसे होण्याकरता मला माझ्या मनाशी झगडा द्यावा लागलेला आहे. त्याच्यामागे अनेक वेळा निश्चय, संकल्प, मनाने स्वतःच घेतलेल्या शिक्षा व स्वतः घेतलेली प्रायश्चित्ते आहेत, यांची वाच्यता मी करीत नाही. हा माझ्या मनाच्या विकासाचा इतिहास आहे, तो मी सिद्धान्ताच्या रूपाने इतरांस सांगत असतो. तो असा: 'मनुष्य जसजसा वयाने मोठा होतो, तसतसा त्याच्या मनाचा विकास झाला तरच तो मोठा. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, या विकारांवर ज्या प्रमाणात तो जय मिळवतो त्या प्रमाणात तो वाढला, नाही तर वयाने मोठा पण मनाने बालकच राहिला. He is a grown up infant !" तसे राहू नये हा माझा सतत प्रयत्न असतो.

## माझी तीन व्रते

सार्वजनिक जीवनात पडल्यापासून जे अनेक बरेवाईट प्रसंग आले व इतर माणसांचे संबंध आले त्यावरून मी स्वतःच्या जीवनात तीन व्रतांचा निश्चय केलेला आहे. त्या प्रत्येक व्रतामागे काही ना काही प्रसंग घडलेले आहेत.

पहिले व्रत—माणसांची मने दुखवायची नाहीत हे आहे. विद्यार्थी प्रवेशावरून मी एका गृहस्थाला व्यवस्थापकाच्या तोऱ्यात फार टाकून बोललो. पण नंतर पश्चात्ताप झाला. त्यावेळेपासून पुनः पुनः मनाला आठवण करून देऊन हे व्रत मी पाळीत असतो. आपल्याला जी गोष्ट साधायची ती कटू शब्द न बोलताही गोडी गुलाबीने साधता येते असा माझा अनुभव आहे. या माझ्या व्रतामुळे मला शत्रू नाहीत. मी शत्रू केले नाहीत. मला जीवनात तीनचार माणसेच अशी भेटली की जी अकारण शत्रू झाली. पण तो त्यांचा स्वभाव आहे, त्याला मी जबाबदार नाही. अप्रिय करणाऱ्या व वागणाऱ्या व्यक्तीशी देखील मी कधी अबोला धरीत नाही. मतभेदाची बाब बाजूला ठेवून इतर गोष्टीत तिच्याशी आपलेपणाचे संबंध ठेवतो. दुसरा माणूस माझ्याशी बरे-वाईट कसेही वागो. माझा धर्म चांगले वागण्याचा आहे. हे माझे व्रत आहे.

**दुसरे व्रत** – बुद्धी व विचार यांच्यावर गंज चढू द्यायचा नाही. कर्मठ, जुन्या पुराण्या, प्रगतिपराङ्मुख अशा विचारांची जुनी म्हातारी माणसे पाहिली की आपण वृद्धपणी असे होता कामा नये असे मी मनाला, बजावीत असतो. त्याकरता सतत व्यापक वाचन, विचार आणि चिंतन यांचा उपयोग मला होतो. आपले विचार प्रगतिशील, गतिमान राहिले पाहिजेत असा माझा सतत प्रयत्न असतो. ते एक व्रतच आहे.

**तिसरे व्रत** – सर्वांच्या विचाराने काम करणे हे तत्त्व मी कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनात कटाक्षाने पाळतो. त्याला लोकशाही तत्त्व असे नाव द्यायला हरकत नाही. चार माणसांना बरोबर घेऊन काम करायचे तर त्यांचेही विचार घ्यायला पाहिजेत. आपल्या विचाराला थोडी मुरड घालायला पाहिजे. आपण एखाद्या हुकूमशहाच्या हाताखाली आहोत असे घरातल्या माणसांना किंवा व्यवसायातील सहकाऱ्यांना वाटता कामा नये. प्रत्येक माणसाला विचारशक्ती आहे. तिला वाव दिला तर त्या माणसालाही कामाविषयी आपलेपणा वाटेल. आपल्या विचाराला वाव आहे असे वाटल्याशिवाय कामाबद्दल आपुलकी वाटत नाही. ती वाटल्याशिवाय मनुष्य सर्वस्व पणाला लावीत नाही.

या व्रतांचा मला जीवनात फार उपयोग झाला आहे. कुटुंबात, संस्थेत, सार्वजनिक जीवनात मी आपली मते मांडतो, पण फार आग्रह धरून ताणीत नाही. पुन: पुन: सांगून मन वळवतो, इतरांचा चांगला भाग घेतो, आणि सर्वसंमत असा मधला मार्ग काढतो.

## जीवनातील श्रद्धा

मनुष्य काही श्रद्धांच्या आधाराने जगत असतो. तशा माझ्या तीन श्रद्धा आहेत.

**पहिली श्रद्धा** – पहिली श्रद्धा बुद्धीवर आहे. मी बुद्धिवादी मनुष्य आहे. विचारशक्ती हे अलौकिक शस्त्र असून जीवनातील कोणताही प्रश्न सोडवायला ती समर्थ आहे असा मला विश्वास वाटतो. बुद्धीवर श्रद्धा हा शब्दप्रयोग पुष्कळांना विरोधाभासाचा वाटेल, नाही का ? पण माझा तसा मन:पिंड आहे हे खरे. मी नेहमी म्हणतो की, ' अडचणीतून बाहेर पडायला मार्ग आहे. There is always a way out. " शोधून काढणे हे बुद्धीचे काम आहे. बुद्धी हे शस्त्र आहे. ते सतत उपयोगाने तीक्ष्ण ठेवले पाहिजे.

**दुसरी श्रद्धा** – मानवाच्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे. एखाद्या-बद्दल कोणी वाईट सांगितले तर माझा एकदम विश्वास बसत नाही. मनुष्य सुधारू शकेल असे प्रत्येकाबद्दल मला वाटते. शैक्षणिक क्षेत्रात या माझ्या " सुधारणा-वादी " तत्त्वज्ञानामुळे सहकाऱ्यांशी माझे प्रेमाचे सभ्य मतभेदही होतात. ज्याला

जसे अनुभव येतात तशी त्याची श्रद्धा बनत जाते. उलट पक्षी आपापल्या श्रद्धे-प्रमाणे मनुष्य वागतो; तसे त्याला अनुभव येतात. माणसांना सुधारण्याच्या प्रयत्नांना कमी अधिक प्रमाणात यश येते असे मला वाटते. विद्यार्थ्यांनाच नव्हे तर प्रौढ आणि वृद्ध माणसांनाही सुधारण्याचा मी प्रयत्न करतो. माणसाचे विचार व दृष्टी बदलली तर वागणूक सुधारते ही माझी श्रद्धा आहे.

**तिसरी श्रद्धा** – सतत चांगले काम करीत राहावे. त्याचा मोबदला कुठे ना कुठे, केव्हा ना केव्हा तरी, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मिळाल्याशिवाय राहात नाही. ही श्रद्धाच आहे. प्रत्यक्ष सिद्ध करता येणार नाही. पण चांगले काम करायला माणसाला काहीतरी प्रेरणा पाहिजे असते. ती या स्वरूपात माझ्या ठिकाणी मी निर्माण केली आहे. मला अनुभवही चांगला आलेला आहे. चांगल्या वागणुकीचे समाजात चीज होते. थोडयाही सत्कार्याचे कौतुक समाज मोठया प्रमाणात करतो असा मला प्रत्यय आला आहे. एकच अपवाद. लोक स्वत:च्या स्वार्थाला फारसा धक्का न लावता शक्य असेल तेवढे इतरांच्या चांगुलपणाचे चीज करतात. स्वार्थ आणि सत्कार्य-गौरव असा विरोध आला तर बहुसंख्य माणसे पहिल्याला पसंती देतात.

## ग्रंथवाचनातील दृष्टी

जीवनाचे तत्वज्ञान बनविण्याच्या दृष्टीने मला काही ग्रंथांचा उपयोग झाला आहे. त्यातील प्रमुख भगवद्गीता. सतत वाचनाने व अर्थाच्या मननाने गीता मला मुखोद्गत आहे. स्वामी रामतीर्थांच्या ग्रंथांचाही बराच परिणाम माझ्यावर झालेला आहे. विद्यार्थीदशेत प्राचीन शिक्षणपद्धतीप्रमाणे आदर्श विद्यार्थी कसा असावा ते वाचून मी त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करी. अलीकडे माझे बरेचसे वाचन शैक्षणिक वाङमयाचे असते. खरे म्हणजे सार्वजनिक कामाच्या रगाडयातून वाचायला वेळच मिळत नसे. म्हणून माझे बरेचसे वाचन प्रवास करताना होते. लघुकथा वाचन हा माझा बौद्धिक विश्रांतीचा मार्ग आहे. पण या कथांतून आजचे समाजप्रश्न काही कळू शकतात काय या दृष्टीने मी त्या वाचतो. सिनेमा पाहण्याचीही मला आवड आहे. त्यात सामाजिक प्रश्न आणि ऐतिहासिक विषय असलेल्या चित्रपटांची आवड अधिक. प्रत्यक्ष पाहणे जमत नाही म्हणून मी परीक्षणे वाचून समाधान मानतो.

## माझी संपत्ती व ऐश्वर्य

मी जीवनात काय मिळवले असा विचार येतो तेव्हा त्याचे उत्तर मला सुचते—गेल्या चाळीस-पन्नास वर्षात जे माझे विद्यार्थी महाराष्ट्रभर पसरले आहेत, तीच माझी संचित संपत्ती आहे. हे विद्यार्थी मला थोरल्या भावाप्रमाणे कुटुंबातील

एक व्यक्ती या नात्याने मानतात. एवढी माणसे, एवढी धाकटी भावंडे मी मिळविली, त्यांचे संसार सुखाने चालले आहेत--ही का लहान संपत्ती आहे ? हेच माझे ऐश्वर्य आहे.

**मूळ भांडवल**

तसे म्हटले तर माझे जीवन सामान्य आहे. फार अलौकिक घटना त्यात नाहीत. असल्या तरी मला त्या तशा वाटल्या नाहीत . या लेखामुळे एक आत्म-निरीक्षणाची मला संधी मिळाली. तिचा फायदा घेतो. सामान्य दुसऱ्या दर्जाची बुद्धी, तिसऱ्या दर्जाची प्रकृती. या दर्जाच्या माणसाचे जीवन तेच माझे. फरक इतकाच आहे की शेकडा नव्याण्णव माणसे ही बुद्धी आणि शक्ती संसाराच्या कारणी लावीत असतात. मी माझ्या बुद्धीचा व शरीराचा उपयोग सार्वजनिक कामाकडे केलेला आहे, करीत आहे. असेच शेवटपर्यंत राहण्याची शक्यता आहे.

**सार्वजनिक समई**

लढवय्ये, धाडसी प्रवासी, संशोधक, क्रांतिकारक, राजकारणी पुरुष—यांच्या जीवनात जे चित्तथरारक प्रसंग असतात, ते सामान्य समाजसेवकाच्या जीवनात सापडणे कठीण आहे. त्यांचे जीवन संथ जळणाऱ्या समईप्रमाणे स्वतःला संपवून प्रकाश देण्याचे असते. या जीवनात वैचारिक विकास आणि लहान सहान अनुभव असणार. आजचा काळच अशा कार्यकर्त्यांचा आहे.

**जीवनाचा जमाखर्च**

मला लहानपणी वाटायचे की, साठ-सत्तराव्या वर्षी मनुष्य किती म्हातारा आणि निकामी होत असेल ! असा विचार करता करता सत्तरावे वर्ष लागले ! पण असे वाटते की, अद्यापि पुष्कळच करायचे राहिलेले आहे. पन्नाशी नंतर माणसाला त्याच्या जीवनाची आणि कार्याची व्यापक क्षितिजे दिसू लागतात. अशाच वेळी शारीरिक दुर्बलता येऊ लागते. हा मानवी जीवनातील दैवदुर्विलास आहे. जीवनाचा जमाखर्च काढायला अजून पुष्कळ अवकाश आहे, असे मला वाटते. फलश्रुती काय झाली याचा विचार करायला अद्याप अवधी आहे. पण दैनिक आणि वार्षिक जमाखर्चाचा आढावा आपण घेतो त्या दृष्टीने पाहिले असता खर्चाच्या बाजूला सत्तर वर्षे गेली असली तरी जमेची बाजू काही कमी नाही. वडील भावासारखा मान देणारे अनेक माजी विद्यार्थी महाराष्ट्रात विखुरलेले आहेत. आपले प्राध्यापक म्हणून मला ओळखणारे अनेक शिक्षक गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटकात पसरलेले आहेत. मुख्याध्यापक आणि अध्यापक यांच्या स्वरूपात मोठा मित्र परिवार सर्वत्र आहे. निरनिराळी शैक्षणिक मंडळे किंवा समित्या यांच्यात घेतले असता हा माणूस विधायक कार्य करील, असा लोकांचा समज आहे. थोडीफार ग्रंथनिष्पत्ती झाली आहे. या माणसाचे विचार वाचण्यासारखे व मनन

करण्यासारखे आहेत असे वाटणारा मोठा वाचकवर्ग आहे. याच प्रकाराने अशाच प्रकारची जमा आणखीही काही वर्षे व्हावी अशी उमेद आहे. आणि समाजाची तशी अपेक्षा आहे.

**काय शिकलो ?**

मनुष्य काहीएका विचाराने काम करतो, आणि काम करता करता त्याचे विचारही बनत जातात. तीच त्याची वैचारिक भूमिका बनते. अशी माझी भूमिका काय आहे ? असा मी विचार करतो तेव्हा मला माझ्या विचारात दोन तीन गोष्टी प्रामुख्याने दिसत असत. माणसाने सत्कृत्य करीत असावे. त्याच्या मनाप्रमाणे मनातील गोष्ट होतेच असे नाही पण काही तरी चांगले होते एवढे मात्र खरे. दुसरा विचार असा की माणसाने विधायक आशावादाचा प्रसार करीत राहावे. निराशावादी लोक पुष्कळच असतात. त्यांच्यात माझी भर नको. जीवनातील आशावादी विधायक बाजू पाहून ती समाजापुढे मांडणारे लोक हवेत. तिसरा विचार मनात नेहमी येतो तो असा की अलौकिक आणि थोर पुरुष होणे कोणाच्या हातात नाही. परंतु सद्विचार आणि सदाचार यांची आपल्या मगदुराप्रमाणे लहान मोठी वर्तुळे निर्माण करणे आपल्या हातात आहे. तेवढे तरी त्यांनी करावे. जीवनातील एखादा तरी विचार आणि आचार असा असावा की, ज्याला आपले जीवन माणसाने समर्पण केले आहे.

## या ग्रंथाचा उपयोग

या सदाचार चिंतनीत वाचकांना असा एखाद दुसरा विचार सापडला तर त्यांच्या जीवनात पुष्कळ स्थित्यंतर घडून येईल. असा अनुभव अनेकांना आलेला आहे. सुरू केलेला व्यवसाय चालत नाही म्हणून निराशेने बंद करण्याचा एका वाचकाचा विचार त्याने माझा लेख वाचून बदलला; वैतागून आत्महत्या करायला प्रवृत्त झालेल्या एका वाचकाचे मन या ग्रंथातील एक विचार वाचून शांत झाले. हे विचार प्रसिद्ध झाल्यावर अनेक मासिके त्यांचे पुन्हा मुद्रण करतात. काही लोक सार्वजनिक ठिकाणी फलकावर लावतात. कित्येकजण ते आपल्या ऑफिसमध्ये फिरवितात. सद्विचारांची वर्तुळे व क्षेत्रे वाढविण्याच्या कामी वाचकांचाही उपयोग होवो असे इच्छितो. तो या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे.

[ १५–६–१९६८, ७० वा वाढदिवस ]

वरील प्रस्तावना लिहून आता चार वर्षे झाली. मी १९७० पासून संस्थेतून आजीव सेवकाची ५० वर्षे सेवा करून निवृत्त झालो. निवत्तिपूर्वी माझी रु. ५०,००० ची प्राप्ती संचयदान म्हणून संस्थेस समर्पण केली. संस्थेच्या 'अनुसंधान-समिती' चा मी सभासद आहे. सध्या गीतेचा सूक्ष्म अभ्यास व याच विषयावर संशोधन ग्रंथ प्रकाशन, व्याख्याने या रूपाने गीतेचा समाजात प्रसार करतो.

१५–६–१९७२<br>
७४ वा वाढदिवस

# सदाचार चिंतनी

3934

# लेखकाचे वाङ्मय

१. **सदाचार चिंतनी** – ५ भाग. प्रत्येकी ११८ ते १५६ पाने, एकूण पाने. ६७६ कौटुंबिक, व्यावसायिक, सामाजिक प्रसंगावर चिंतन. प्रत्येकी कि. रु. १०

२. **मूळ गीतेचा शोध** – पृ. २१०, ३ आवृत्त्या. गीतेची रचना व संदेश यांवर मौलिक संशोधन, गीता वाङ्मयात महत्त्वाचा ग्रंथ. रु. १०

३. **गीता विकास** – पृ.२५६, २ आवृत्त्या. संशोधनाचे आधाराने संकलित स्वरूपात विकास दाखविणारे गीतेचे विवरण छपाई चालू

४. **मराठी गीता व विवरण** – पृ. १२७. २ आवृत्त्या. अध्याय व श्लोक यांच्या क्रमाने गीतेचा अर्थ व विवरण. सुसंगती दर्शक सिंहावलोकने व प्रस्तावना. प्राथमिक वाचनार्थ आवश्यक. रु. ६

५. **त्रिकाल गीता** – पृ. ४५. ३ आवृत्या. गीता विकासाच्या ३ अवस्था ३ रंगांत. मूळ गीता व नंतर दोन वेळ पडलेली भर छपाई चालू

६. **गीतेतील मुख्य विचार** – पृ. ११०. ५ आवृत्त्या. मुख्य ५२ विचार, २०० श्लोक, अन्वय, अर्थ, विवरण व प्रत्यक्ष व्यवहार. अत्यंत लोकप्रिय. शिक्षण संस्था व कुटुंब यांना उपयुक्त रु. ६

७. **सर्वबोध पद्यगीता** – पृ. ८४. ३ आवृत्त्या, संपूर्ण गीतेतील ७०० श्लोकांचा आर्या व इतर वृत्तांत मराठी अनुवाद. सोपा, मधुर, व पाठांतरास सुलभ. प्रत्येक परिच्छेदाचा गद्य सारांश. रु. ३॥

८. **गीतेचा दृष्टिकोन** – पृ. १७४. २ आवृत्त्या. संपूर्ण गीतेची विषयांच्या अनुरोधाने नवीन मांडणी व विवरण. एकेका प्रकरणात एकेक संपूर्ण विषय. आधुनिक ग्रंथाप्रमाणे अभिनव रचना छपाई चालू

९. **जीवनात गीता** – पृ. २१२. पहिली आवृत्ती, गीतेतील मुख्य प्रश्न, त्यांची उत्तरे, आजच्या भाषेत त्यांची मांडणी व आजच्या जीवनात उपयोग. गीतेवरील एक नवीन व स्वतंत्र भाष्य रु. १२

१०. **गीतेतील मुख्य विचार** – पुरवणी, मराठी श्लोक, मुख्य विचारांचे २०० श्लोक. आवश्यक. पाठांतरास उपयुक्त रु. २

११. Quest for The Original Gita – पृ. २६२, पहिली आवृत्ती (संपली). गीतेवरील संशोधनाचा इंग्लिश अनुवाद व विकासदर्शक ३ रंगांत गीता. आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा ग्रंथ (सोमय्या पब्लिकेशन मुंबई) रु. ३२

१२. Gita, My Research and Interpretation – पृ. ३२, पहिली आवृत्ती. गीतेवरील संशोधनाचा संक्षिप्त सारांश व गीतेचे सुसंगत विवरण. लास्की इंस्टिट्यूट, अमदाबाद, प्रकाशन. रु. ६

१३. **बालगड व इतर कथा** – पृ. २८, २ री आवृत्ती. बालकांकरिता गोष्टी. रु. ३

# अनुक्रमणिका


| क्रम | विषय | पान नं. |
|---|---|---|
| १ | तामसी गुणाचे लोक | १ |
| २ | शिक्षणाची विराट शाळा | २ |
| ३ | विचार फोटोंचे आल्बम | ३ |
| ४ | करमणुकीचे दोन प्रकार | ४ |
| ५ | पूर्णतेचे मोजमाप | ६ |
| ६ | प्रामाणिक गैरसमज आणि—— | ७ |
| ७ | माझा भ्रमनिरास झाला | ८ |
| ८ | कलेची प्रसूती आणि प्रसिद्धी | १० |
| ९ | काळ-काम-वेगाची उदाहरणे | ११ |
| १० | काळजाच्या जखमेवर काळाचे मलम | १३ |
| ११ | आजच्या काळातील स्थितप्रज्ञ | १४ |
| १२ | आग, असंतोष, अफवा अन् आजार | १६ |
| १३ | सद्विचारांचा पाऊस | १७ |
| १४ | तुमच्या कामावर तुमचा शिक्का | १८ |
| १५ | अपेशाचे खापर दुसऱ्यावर | १९ |
| १६ | दोनच जाती—सज्जन आणि दुर्जन | २१ |
| १७ | अन्नयज्ञ का ज्ञानयज्ञ ? | २२ |
| १८ | खुर्ची मिळते, गुण मिळवावे लागतात | २३ |
| १९ | प्रार्थनेतील अर्थना | २४ |
| २० | सामान्य माणूस—असामान्य जबाबदारी | २५ |
| २१ | थोडक्यात चुकामूक | २६ |
| २२ | राष्ट्रीय गुणांची पातळी | २८ |
| २३ | विद्यार्थी-वर्तनाची संहिता | २९ |
| २४ | जग जागे,—आम्ही झोपेत | ३० |
| २५ | सावध राहाणार की गाफील ? | ३१ |
| २६ | तलवार, तराजू, हातोडा, नांगर आणि लेखणी | ३२ |
| २७ | निराशेवर मात करा | ३३ |
| २८ | अर्धा पेला भरलेला ! | ३५ |
| २९ | मानवाला आपली देणगी काय ? | ३६ |
| ३० | एकाच माळेचे मणी ! | ३७ |
| ३१ | आता विशाल दृष्टी ठेवा | ३८ |
| ३२ | तुमच्या व्यवसायाचा केन्द्रात | ३९ |
| ३३ | गृहस्थांची घरे | ४१ |
| ३४ | जुनी नाणी—पण सोन्याची | ४२ |
| ३५ | निरोप घेण्याची कला | ४३ |
| ३६ | कौतुक करण्यात कंजूषपणा | ४४ |
| ३७ | गीतेतील मुख्य विचार | ४५ |
| ३८ | काम ! फार काम !! फार फार काम !!! | ४६ |
| ३९ | पन्नाशीचा स्वतःला प्रश्न | ४८ |
| ४० | आनंद, समाधान आणि शांती | ४९ |
| ४१ | अपघाताचे मूळ तुमच्याच स्वभावात आहे | ५० |
| ४२ | स्वर्गीय जवाहरलालजींचे वारस—आपणच | ५२ |
| ४३ | शतायुषी व्हाल—कशाकरता ? | ५३ |
| ४४ | अपमानही सोसावा लागतो | ५४ |
| ४५ | मम्मी, डॅडी, अंकलची साथ | ५५ |
| ४६ | कामे करणारा—करवून घेणारा | ५६ |
| ४७ | घडामोडींचा अर्थ लावायला शिका | ५७ |
| ४८ | मनाची आघाडी खंबीर हवी | ५८ |
| ४९ | दानाचा फायदा श्रीमंतही घेतात | ५९ |
| ५० | पालकांना प्रोग्रेसबुक येणार ! | ६१ |
| ५१ | अलौकिक कर्तबगारीत दोष जिरून जातात | ६२ |
| ५२ | स्तुती—पण तिसऱ्याचीच | ६४ |

| क्रम | विषय | पान नं. |
|---|---|---|
| ५३ | दान आणि त्याग यांतील भेद | ६५ |
| ५४ | जनताशक्तीचे गुण व दोष | ६६ |
| ५५ | वार्तांचे अर्थ व परिणाम | ६८ |
| ५६ | अन्नावर अनावर आसक्ती | ६९ |
| ५७ | आधुनिक आश्रम–व्यवस्था | ७० |
| ५८ | मातृदेवा ! काय ही स्थिती ? | ७२ |
| ५९ | विवेकानंद–लघू आवृत्ती | ७४ |
| ६० | राष्ट्रीय ऐक्याची वैदिक ऋचा | ७५ |
| ६१ | भ्रष्टाचार आणि वरिष्ठ लोक | ७६ |
| ६२ | अनुभव आणि शहाणपण ! ! | ७७ |
| ६३ | नव्या लेखकांना संधी | ७९ |
| ६४ | अश्व, वृषभ आणि गर्दभ–प्रवृत्ती | ८० |
| ६५ | मुलांच्या शिक्षणाकरिता पालकांना वेळ नाही ! ! ! | ८१ |
| ६६ | 'कामचुकारपणा म्हणजे देशद्रोहच !' | ८३ |
| ६७ | कडू अनुभव चघळीत बसू नका | ८४ |
| ६८ | इतर धर्मातील सुविचार | ८५ |
| ६९ | हातातल्या गोष्टीही हातात नसतात | ८७ |
| ७० | तुमची सिताफळं पाण्यावरली हायेत | ८८ |
| ७१ | हार नाकारण्याचे तारतम्य | ८९ |
| ७२ | भ्रष्टाचाराचे मूळ विचारात | ९० |
| ७३ | अन्नोन सोल्जर्स–अज्ञात वीर | ९१ |
| ७४ | भारत-पाक संघर्षाचा तुम्हाला बोध | ९२ |
| ७५ | दीन बालकांचा बालक-दिन | ९३ |
| ७६ | आपल्या आटोक्यातील आदर्श | ९४ |
| ७७ | सतत वाचाल तरच वाचाल | ९६ |
| ७८ | नुसते "चांगले" म्हणू नका | ९७ |
| ७९ | कुशल मध्यस्थांची गरज | ९८ |
| ८० | बोला, पण आधी शब्द तोला | ९९ |
| ८१ | अशी ही नवी दृष्टी ! | १०० |
| ८२ | योगायोगांचा वाहता प्रवाह | १०२ |
| ८३ | सात पिढ्यांचे सात सूर | १०३ |
| ८४ | उलट्या काळजाची अवलाद | १०४ |
| ८५ | निदान इतके करता येईल | १०६ |
| ८६ | नवे द्रष्टे व लेखक पाहिजेत | १०७ |
| ८७ | चिकित्सक वृत्ती वाढवाच | १०९ |
| ८८ | अक्षर-लेखनाची कसोटी | ११० |
| ८९ | आपली माणसे—त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारा | ११२ |
| ९० | माणूस पाहून काम द्या | ११३ |
| ९१ | लहान भांडणे विसरायची असतात | ११४ |
| ९२ | गीतेने बनवलेला माझा पिंड | ११६ |
| ९३ | गणेश उपासना आणि बुद्धिविकास | ११७ |
| ९४ | स्त्री-पुरुष समानता | ११९ |
| ९५ | रागाच्या रोगावर उपाय | १२० |
| ९६ | संकटाच्या सान्निध्यात संसार | १२२ |
| ९७ | रागाचा रोग—उपचार व पथ्यपाणी | १२३ |
| ९८ | माणसं वागवण × × × × × आहे | १२५ |
| ९९ | जाळपोळ आणि मोडतोड हा देशद्रोह आहे | १२६ |
| १०० | सत्तेचे—सामुदायिक शक्तीचे कोलीत | १२७ |

ग्रंथालय ... क्र. 3934 28658 21/1/65

# सदाचार-चिंतनी

## भाग दुसरा

### १. तामसी गुणांचे लोक

**जगात** तामसी वृत्तीची माणसे सदा सर्वकाळ राहणारच. मानवी जीवनाला प्रारंभ झाला तेव्हापासून हा गुण अस्तित्वात आला. मानवी जीवनाच्या अंतापर्यंत हा गुण जगात राहणार आहे हे धरून चालावे. तामसी वृत्तीची जुनी माणसे गेली तरी नवी नवी माणसे जन्माला येत असतातच.

समाजात कितीही सुधारणा झाली तरी त्यात तामसी प्रवृत्तीची माणसे असणारच. त्यांचे प्रमाण थोडे कमी अधिक होईल एवढेच. देवांच्या वेळी दैत्य होते, रामाच्या वेळी रावण होता, धर्मराजाच्या वेळी दुर्योधन होता, श्रीकृष्णाच्या वेळी कंस होता--असा हा प्राचीन पौराणिक इतिहास आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी सात्त्विक वृत्तीच्या साधूसंतांनाही त्यांच्या हयातीत तामसी वृत्तीच्या माणसांनी छळायला कमी केले नाही. आजही समाजात तामसी गुणांची माणसे आहेत. तशीच ती उद्या आणि परवाही राहतीलच.

तामसी माणसे चिरंतन असली तरी त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची साधने बदलू शकतील. त्यांत सुधारणा करता येईल. तामसी गुणाच्या माणसांवर नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा अधिक परिणामकारक करता येईल. हे काम शासनाचे आणि समाजाचे आहे.

तामसी माणसांच्या ठिकाणी स्वार्थीवृत्ती, दुष्टपणा, क्रौर्य, मत्सर, माणुसकीचा अभाव—अशा प्रकारचे दुर्गुण असतात. त्यांच्यावर कायद्याचे व शिक्षेचे बंधन पाहिजे. समाजात अशा माणसांना कीर्ती, मान-सन्मान, मोठेपणा न देणे हे आपल्या हातात असते. कोणत्याही प्रकाराने तामसी गुणांना उत्तेजन देऊ नका. त्याबद्दल नापसंती दाखवा, निषेध करा, त्यांना थारा देऊ नका. त्याचबरोबर सात्त्विक वृत्तीला उत्तेजन द्या. सुधारणा करू इच्छिणाऱ्या तामसी वृत्तीच्या माणसांना प्रोत्साहन द्या. त्यांच्या परिवर्तनाला अनुकूल वातावरण निर्माण करा.

मनुष्य सात्त्विक किंवा तामस वृत्तीच्या एका विशिष्ट पातळीवर जन्माला येतो. त्याच्या मनात आले तर स्वत:च्या प्रयत्नाने तो स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणू शकतो. उलट तो त्याच पातळीवर राहू शकतो किंवा त्याचे अध:पतनही होऊ शकते.

प्रत्येक माणसात तामसी गुणाचा काही अंश असतो. तो त्याने स्वप्रयत्नाने कमी केला पाहिजे. या दुर्गुणाचा अतिरेक झाला म्हणजे कुटुंबात, आळीत, गावात आणि देशात या माणसाचा उपद्रव व्हायला लागतो.

तामसी वृत्तीला उत्तेजन देऊ नका. तिला सतत नियंत्रणात ठेवा; स्वत:च्या वृत्तीवर आत्मसंयमनाने, इतरांच्या वृत्तीवर सामाजिक नियंत्रणाने.

[ १७-१-१९६०

# २. शिक्षणाची विराट शाळा

**माणसांचे** शिक्षण एकसारखे चालूच असते. शाळा-कॉलेजात शिकवले जाते तेवढेच शिक्षण अशी एक चुकीची कल्पना आहे. शाळा-कॉलेजच्या बाहेर एक मोठे वातावरण असते. त्यातही गुरू असतात आणि त्यांच्याकडून आपण कळत न कळत शिकत असतो.

घर आणि घरातील वडील माणसे ही एक लहान पण महत्त्वाची शाळा आहे. येथे आई-बाप, मोठी भावंडे, चुलते-मामे इत्यादींच्या वागण्याचे अनुकरण लहान माणसे करतात. अप्रत्यक्षपणे वडील माणसे लहानांना घरात शिकवीत असतात. बोलावे कसे, हालचाली कशा कराव्या, कामे कशी करावी, बाजार व्यवहार कसा करावा, बाहेरच्या माणसाशी कसे वागावे, स्वच्छता, नियमितपणा, आदरसत्कार, धार्मिक वृत्ती, चांगल्या वाङमयाचे वाचन अशा अनेक गोष्टी वडील माणसे आपल्या प्रत्यक्ष आचरणाने शिकवीत असतात.

जसे घरी तसे बाहेर समाजात असते. प्रत्येक प्रौढ वरिष्ठ माणूस हा कनिष्ठांचा गुरूच असतो. त्याच्याकडे पाहून हाताखालची लहान लहान माणसे अनुकरणाने शिकत असतात. जितका माणूस मोठा तितके त्याचे अनुकरण करणारे अनुयायी अधिक. म्हणून ज्येष्ठ वरिष्ठ माणसाचे वागणे-बोलणे-चालणे ही एक शाळाच आहे, याची जाणीव त्याने ठेवायला हवी. त्याच्या चांगल्या गुणांचे अनुकरण होते तसेच, किंवा त्यापेक्षा जास्त, त्याच्या दोषांचेही अनुकरण होते. म्हणून वरिष्ठ माणसांनी आपल्या कनिष्ठांपुढे नेहमी चांगला आदर्श ठेवायला हवा. मोठेपणाची ही किंमत त्याने द्यायलाच पाहिजे. जादा वेतन, जादा जबाबदारी.

आणखी शिक्षण देणारे गुरू म्हणजे लोकप्रिय व्यक्ती. यांत सर्व नटनटी, खेळाडू, लेखक, कलावंत इत्यादी माणसे येतात. त्यांना न कळत, त्यांचे सहीसही अनुकरण करणारे, हजारो अज्ञ अपक्व बुद्धीचे लोक असतात. ते सतत आपल्या प्रिय कलाकारांचे अनुकरण करीत असतात. केशरचना, वेशभूषा, अंगविक्षेप आणि कृती यांचे शिक्षण नटनटी देत असतात.

अशी ही शिक्षणाची विराट शाळा झाली आहे. या अफाट शिक्षणसागरापुढे शाळा आणि कॉलेज म्हणजे एक लहान तलाव आहे, छोटा उपसागर आहे. सागरात खारट पाणी सर्वत्रच असते, पण काही भागात मोतीही सापडतात !

तुम्ही तुमच्या भोवतालच्या कनिष्ठ लहान माणसांना आपल्या उदाहरणाने व आचरणाने काय शिकवीत असता याचा विचार करा. असा विचार अनेक लोक करू लागतील असे वातावरण निर्माण करा.

आपण स्वत: कोणापासून काय शिकलो व शिकतो याचाही विचार करा. प्रत्येक माणसाच्या मनश्चक्षूपुढे एखाददुसरी आदर्श व्यक्ती असते. हा आदर्श जितका परिपूर्ण आणि वरच्या दर्जाचा, त्या प्रमाणात तुमच्याही जीवनाची उंची वाढेल.

भलत्याच गोष्टीचे अनुकरण करू नका. चुकीचे आदर्श डोळ्यासमोर ठेवू नका. तुमच्या विभूती काळजीपूर्वक निवडा आणि मगच त्यांना अंत:करणात जागा द्या.

[ २२-२-१९६०

# ३. विचार-फोटोंचे आल्बम

**आपला** फोटो काढला जावा अशी हौस पोरापासून थोरापर्यंत सर्वांना असते. एखाद्या समारंभाचा फोटो घेतला जात असताना त्यात आपणही यावे म्हणून लहान मुले मधेच डोके घालतात. वर्तमानपत्रात आज आपला फोटो आला आहे का नाही ते रोज सकाळी मोठमोठे पुढारी देखील पाहात असतात ! आपण कसे दिसतो हे पाहण्याची आणि आपण कसे आहोत हे लोकांना दाखवण्याची माणसाची नैसर्गिक इच्छा असते. या बाबतीत लहान थोर सर्व सारखेच !

आपण वयाच्या व जीवनाच्या निरनिराळ्या अवस्थांत कसे दिसत होतो ते पाहण्याकरता आणि दाखवण्याकरता लोक आपले फोटो घेऊन त्यांचे आल्बम तयार करतात. आपले बालपणाचे फोटो मिळाले तर त्यांचा आपण संग्रह करतो. प्रौढपणी काढलेल्या फोटोंचे आल्बम करून ठेवतो. लग्नातले, प्रवासातले, कौटुंबिक जीवनातले असे अनेक प्रकारचे फोटो घेऊन त्यांचा संग्रह आपण करतो.

असाच संग्रह आपल्या वैचारिक अवस्थांचा नाही का करता येणार ? आयुष्याच्या निरनिराळ्या अवस्थांत आणि प्रसंगी आपले विचार काय होते त्यांचे फोटो घेऊन त्यांचाही संग्रह करता येईल. विद्यार्थी जीवनात, पदवीधर झाल्यावर, नोकरी लागल्यावर, विवाहानंतर, बढतीनंतर, संस्मरणीय प्रसंगानंतर, कौटुंबिक-सामाजिक-राजकीय घडामोडीनंतर––सारांश विचारांना चालना देणाऱ्या प्रत्येक प्रसंगानंतर, आपल्याला काय वाटले ते विचार लिहून ठेवले तर ते विचारांचे एक आल्बमच होईल. चित्रांचे आल्बम पाहताना आयुष्याचे सिंहावलोकन होऊन जसा आनंद वाटतो,तसे हे वैचारिक आल्बम पुनः पुनः वाचूनही एक बौद्धिक आनंद होईल.

चित्रांचा आनंद डोळ्यांना मिळतो, विचारांचा आनंद बुद्धीला मिळेल. आपल्या बुद्धीचा, विचारांचा, भावनांचा विकास कसकसा होत गेला ते कळेल. फोटोवरून आपण बालपण-तारुण्यामधून वृद्ध कसे झालो ते दिसेल. वैचारिक आल्बमवरून आपल्या विचारात वृद्धत्व आले की वर्धिष्णुता म्हणजे विकासशीलता राहिली ते कळेल.

वयोमानाप्रमाणे शरीरात वाढ ( जाडीजुडी ) होत गेली तसा विचारातही विकास झाला असेल तर तुम्हाला अभिमान वाटेल. तसा झाला नसेल तर राहिलेल्या आयुष्यात तुम्हाला तो घडवून आणता येईल.

फोटोमुळे तुमच्या बाह्य जीवनाचा व कृतींचा इतिहास याची स्मृती व नोंद राहील. त्याचप्रमाणे विचारांच्या लिखाणामुळे तुमच्या बुद्धीच्या विकासाची नोंद राहील. म्हणून आपले विचार लिहून ठेवायची सवय करा. छापण्याकरता नव्हे–– आपल्या स्वतःच्या आनंदाकरता. फोटोच्या आल्बमप्रमाणे विचारांचेही आल्बम ठेवायला लागा. बाह्य जीवनाइतकेच महत्त्व बौद्धिक वैचारिक जीवनालाही द्या. नाही तर तुमच्या शिक्षणाचा उपयोग काय ?

तुम्ही विचाराल असे आल्बम कोठे आहे का ? आहे. तुमच्या हातातच. हेच पुस्तक, हे माझ्या विचारांचे आल्बमच आहे.

[ २५–२–१९६०

# ४. करमणुकीचे दोन प्रकार

**आपल्या** कलांचा आणि करमणुकीचा दर्जा फार निकृष्टावस्थेला पोचला आहे अशी ओरड नेहमी ऐकू येते. असे असले तरी नाटक-सिनेमाला जाणारी गर्दी काही कमी होत नाही. तिकिट मिळवायला क्यूमध्ये उभे राहावे लागते, इतकेच नाही तर काळ्या बाजार-भावाने अधिक पैसे देऊन ते घ्यावे लागते. लेखक,

उत्पादक आणि निर्माते म्हणतात की, "मागणीप्रमाणे पुरवठा." लोकांना जे लागते ते आम्ही पुरवतो.

करमणुकीत दोन प्रकार आहेत : बाह्य इंद्रियांना सहज आकलन होण्यासारख्या आणि आनंद देणाऱ्या; आणि इंद्रियांच्यापेक्षा पलीकडे असणाऱ्या मनाला व बुद्धीला समाधान देणाऱ्या. दृष्टी आणि कान यांना तृप्ती देणाऱ्या करमणुकी फार लौकर आणि मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होतात. सर्व प्रकारचे व दर्जाचे नाच, हाणामारी, धावपळ, निसर्गाची दृश्ये, शृंगारिक प्रसंग, तालबद्ध संगीत, रॉक अँण्ड रोल, अशा गोष्टी सामान्य जनांना प्रत्यक्ष दिसतात, ऐकू येतात; त्या समजायला फारसा विचार करायला लागत नाही. अशा करमणुकी अत्यंत लोकप्रिय होतात. लहान मुलांना सर्कस आणि जादूचे प्रयोग आवडतात, कारण त्यात प्रत्यक्ष दृष्टीचे समाधान होते. माणसे वयाने मोठी असली तर विचार, शिक्षण आणि संस्कार यांची पातळी जोपर्यंत आपण वाढवली नाही तोपर्यंत अशाच करमणुकी लोकप्रिय होणार. ही एक संक्रमणावस्था आहे.

आज सामान्य माणसाजवळ पैसा आहे. पूर्वी कलेला राजाश्रय होता; तसा आज कलेला सामान्य जनांचा लोकाश्रय आहे. सामान्य जनांच्या पातळीवर कला निर्माण केली तरच फायदा होईल, म्हणून निर्माते त्या दर्जाची करमणूक पुरवतात.

बुद्धीला आणि विचाराला चालना देणारी करमणूकही निर्माण होते. परंतु तिचा आश्रयदाता वर्ग आज तरी अगदी लहान आहे. शिकलेले लोक थोडे आणि त्यातले पैसे खर्चून करमणूक करून घेणारे त्याहूनही कमी. त्यामुळे उच्च दर्जाच्या करमणुकीला भरपूर लोकाश्रय मिळणे काही काळ कठीण आहे.

समाजातील सर्वसामान्य माणसाच्या शिक्षणाचा, विचारांचा, बुद्धीचा आणि संस्कारांचा दर्जा वाढल्याखेरीज उच्च दर्जाच्या कलेला आणि करमणुकीला उत्तेजन मिळणार नाही. असा प्रयत्न रशियासारख्या कम्युनिस्ट समाजपद्धतीमध्ये होत आहे. त्या देशात हीन दर्जाच्या कलेला आणि करमणुकीला उत्तेजन दिले जात नाही. उलट बहुजन समाजाची सांस्कृतिक पातळी वरच्या श्रेणीची व्हावी याकरता योजनापूर्वक प्रयत्न होत आहे. आपल्या देशातील सरकारचे, कम्युनिस्टांचे, कामगार नेत्यांचे, बहुजन पुढाऱ्यांचे—कोणाचेच लक्ष या गोष्टीकडे नाही. त्यामुळे व्यापारी तत्त्वावर करमणूक आणि कला यांचे उत्पादन होत आहे. अधिक शिकलेल्या सामान्य लोकांकडूनच श्रेष्ठ कलेची मागणी होईल तेव्हा तिची पातळी सुधारेल.

सामान्य जनांच्या शिक्षणाची व संस्कारांची पातळी झपाट्याने सुधारेल असा कार्यक्रम पाहिजे.

[ २५-२-१९६०

# ७. पूर्णतेचे मोजमाप

हातात घेतलेल्या गोष्टी पूर्ण करण्याची प्रवृत्ती बालांपासून प्रौढांपर्यंत सर्वांच्या ठिकाणी असते.

आईने काही काम सांगितले की मुले म्हणतात, "थांब, एवढा निबंध पुरा करून येतो." मुलांनी आईजवळ काही मागितले तर आई म्हणते, "आता दोनच पोळ्या राहिल्या, त्या झाल्या की तुला देते." आपण एखादे पुस्तक वाचीत असतो तेव्हा आंघोळीची वेळ झालेली असली तरी प्रकरण पूर्ण करून मग उठतो. ऑफिसमध्ये कोणी भेटायला आला तरी हातातले पत्रलेखन पूर्ण करून मग आपण त्याच्याशी बोलतो.

द्रव्यार्जन करणारा मनुष्य पैसे शिल्लक टाकतो. ९० झाले की १०० करायचा प्रयत्न करतो. ९०० झाले की १००० पुरे करतो. ९००० झाले की १०००० पुरे करायचा प्रयत्न करतो. ९०,००० झाले की लाखाचा आकडा पुरा करावासा वाटतो. आपण फिरायला गेलो की परतण्यापूर्वी एका ठराविक ठिकाणापर्यंत पोचायचा प्रयत्न करतो. क्रिकेट खेळणाराच्या ९० धावा झाल्या की तो १०० गाठण्याचा यत्न करतो. एखाद्या विषयावर टाचण करताना ९ मुद्दे झाले तर १० वा मुद्दा ओढून ताणून आणला जातो. सारांश काम, फिरणे, खेळ, वाचन, बचत इत्यादी प्रत्येक गोष्टीत काहीतरी काल्पनिक पूर्णता आणण्याचा माणसाचा सहज प्रयत्न असतो.

आता त्याला कोणी असे विचारले की १०० म्हणजेच पूर्ण का, ९९ पूर्ण का नाही, तर त्याला काही उत्तर नाही. अमुक ठिकाणी का थांबायचे त्याला तसे समर्पक उत्तर नाही. संकेताने असे ठरले आहे की ती पूर्णतेची मर्यादा आहे.

ही पूर्णतेची मर्यादा गाठणे चांगले. त्यामुळे आपल्या नेहमीच्या शक्तीपेक्षा थोडी अधिक शक्ती आपण उपयोगात आणतो. माणसाची बुद्धी आणि ताकद ही काही प्रमाणात रबरासारखी आहे. ती थोडी ताणता येते. वाढवता येते.

पण ताण देण्यालाही मर्यादा आहे हे लक्षात ठेवा. रबरी फुग्यात काही मर्यादेपर्यंत हवा भरली तर तो फुगून डौलदार दिसतो. पण आणखी थोडी भरली तर मात्र फट् होऊन फुटतो. ही मर्यादा बालबुद्धीला कळत नाही, प्रौढांना कळते. तसेच आपल्या सामर्थ्याचेही आहे. त्याच्या ताणण्याची मर्यादा ज्याची त्याने ओळखली पाहिजे. नाहीतर बुद्धीवर, प्रकृतीवर व शरीरावर फाजील ताण पडून नुकसान होण्याचा संभव असतो. निवडणुकीच्या दगदगीत फाजील ताण पडून

माणसे खलास झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. मागल्या पिढीत डॉ. लोहोकरे यांचे असे एक उदाहरण आहे. *अलीकडले उदाहरण कै. स. गो. बर्वे यांचे. "अगदी दमून गेलो" अशा अर्थाचे शेवटचे उद्‌गार होते त्यांचे. कै. शास्त्री यांच्यावर असाच कामाचा अधिक ताण पडला असावा!

आपल्या सहनशक्तीच्या आणि कमाल प्रयत्नांच्या मर्यादा आपण ओळखाव्यात, आणि--"ही माझी मर्यादा. मी येथे थांबतो." असे म्हणण्याचे धैर्य दाखवावे. पूर्णत्वाची मर्यादा कोणाची १०० असेल तर कोणाची ९० असेल. एखाद्याची ७५ देखील असेल. हा जीवनातील विविधतेचा भाग आहे असे समजून समाधान मानावे.

आपली पूर्णतेची मर्यादा आपण ठरवावी. इतरांच्या संकेतावर व अपेक्षेवर जाऊ नये. मग ती शंभराच्या अलीकडे असेल किंवा पलीकडेही असेल.

[२७-२-१९६०

* विस्तार १६-३-१९६८]

# ६ प्रामाणिक गैरसमज आणि–

आपल्या सरळ साध्या कृतीविषयीही इतरांचा गैरसमज होतो. सर्वसामान्य मनुष्य तुमच्या प्रत्येक गोष्टीत फार खोलवर जात नाही. त्याला तितका वेळही नसतो. चारचौघे जे काही बोलतात त्यावरून तो तुमच्याविषयी मत बनवीत असतो. हे मत कधी अनुकूल असते, कधी प्रतिकूल असते.

प्रामाणिक माणसांचा गैरसमज दूर करणे सोपे असते. त्यांना योग्य ती माहिती दिली, आपली बाजू समजावून सांगितली म्हणजे प्रांजलपणाने ते आपला गैरसमज दूर करतात. वास्तविक आणि व्यक्तिनिरपेक्ष दृष्टीने पाहण्याची त्यांची तयारी असते. गैरसमज करून घेण्यात त्यांचा काही विशेष उद्देश किंवा फायदा नसतो.

गैरसमज करून घेणारांचा दुसरा एक वर्ग आहे. खवचट, कुटाळ, खट्याळ आणि दुष्ट लोक यात येतात. त्यात अशिक्षित आणि सुशिक्षित दोन्ही प्रकार आहेत. इतरांची निंदा किंवा नालस्ती यातच त्यांना स्वारस्य वाटते. कोणत्याही माणसाची आणि त्याच्या कृतीची चांगली बाजू त्यांना दिसतच नाही. त्यांना ती पाहायचीच नसते. इतरांची कुटाळकी, कुचाळकी आणि अवहेलना हाच त्यांचा सवडीचा आणि आवडीचा धंदा असतो. अशा लोकांना तुम्ही तुमच्या हेतूविषयी आणि कृतीविषयी कितीही वस्तुनिष्ठ माहिती दिली तरी तिच्याकडे ते अजिबात

लक्ष देत नाहीत. माहिती घेतली तर नालस्ती करता येणार नाही; म्हणून ते तिकडे दुर्लक्ष करतात. घेतली तर ती विकृत स्वरूपात मांडतात !

एखादी व्यक्ती किंवा संस्था आपली प्रगती करून पुढे येऊ लागली की ती यांच्या डोळ्यात खुपते. ती त्यांच्या मत्सराला आणि द्वेषाला पात्र होते. या लोकांची वृत्ती श्वानासारखी असते. मनुष्य जागच्या जागी उभा राहिला तर कुत्रे अंगावर येत नाही. पण मनुष्य पळू लागला की कुत्रे मागे लागते आणि लचका तोडते. कुत्र्याला गती सहन होत नाही, दुष्ट माणसांना प्रगती सहन होत नाही.

अशा माणसांना ओळखून त्यांच्याशी वागायचे एवढेच आपल्या हातात असते. त्यांच्यापासून दूर राहू नका. मनात त्यांना ओळखा आणि अगदी नेहमी-सारखे संबंध ठेवा. त्यांचा दुष्टपणा त्यांच्याजवळ. तुम्ही त्याच्याशी संबंध तोडला की नालस्ती जास्त करतील. संबंध ठेवा, त्यामुळे त्यांच्या कुटाळकीला थोडा पायबंद बसेल.

जगात दुर्जन नेहमी राहणार. ते सद्‌गुणांची आणि सत्कृत्यांची अवहेलना करणार. राजा भर्तृहरी कवीला असाच अनुभव आला ना ? तो म्हणतो :

तत् को नाम गुणो भवेत् स गुणिनां, यो दुर्जनैर्नाङ्कितः ?

दुष्ट लोकांनी ज्याची निंदा केली नाही असा सद्‌गुणी माणसांचा एक तरी गुण आहे का ?

[ १-३-१९६०

# ७. माझा भ्रमनिरास झाला

**तीस-चाळीस** वर्षांपूर्वीची गोष्ट. साम्यवाद आणि समाजवाद यांच्या चर्चेने वातावरण भारून गेले होते. राष्ट्रीय संपत्तीची, उत्पादन साधनांची, वाहतुकीची, व्यापाराची, मालकी व मक्तेदारी, व्यक्तीकडे असावी की समाजाकडे म्हणजे राष्ट्राकडे असावी, या प्रश्नाबाबत दोन पक्ष होते. व्यक्तिगत मालकीमुळे सर्व फायदा खाजगी मालकांना मिळतो म्हणून कामगारांना आपलेपणा वाटत नाही. आर्थिक बाबींची मालकी राष्ट्राकडे आली म्हणजे फायद्याचा उपयोग समाजाला होतो, म्हणून कामगार आपली कामे अधिक आपलेपणाने करतील अशा अपेक्षा निर्माण केल्या जात होत्या.

खाजगी उद्योगधंद्यांतून होणारा फायदा मालकांच्या तिजोरीत जातो. ते बंगले बांधतात, मोटारी उडवतात, चैन करतात म्हणून कामगारांना वैषम्य वाटते. म्हणून सर्व मालकी समाजाकडे यावी म्हणजे सर्व नफा समाजाला मिळेल.

देशाच्या मालकीचे उद्योगधंदे आपण चालवतो म्हणून कामगार अभिमानाने व देशप्रेमाने आपली कामे आस्थापूर्वक मन लावून करतील.

गेल्या पंचवीस तीस वर्षांत प्रत्यक्ष अनुभव उलटाच आला. या देशात रेल्वेवाहतूक, पोस्टखाते इत्यादी काही उद्योगधंदे समाजाच्याच मालकीचे आहेत. त्यांच्यापासून निर्माण होणारा नफा कोणाच्या खाजगी तिजोरीत जात नाही. त्याखेरीज गेल्या वीस वर्षांत देशाच्या मालकीचे अनेक उद्योगधंदे निघाले आहेत. लोखंड-पोलादाचे कारखाने, रासायनिक धंदे, विजेची उपकरणे, खतांचे कारखाने इत्यादी अनेक उद्योगधंदे सरकारी क्षेत्रात आले आहेत. राष्ट्रीयीकरणामुळे कामगार वर्गावर होणारा सुपरिणाम या क्षेत्रात होईल असे माझ्या भाबड्या मनाला वाटले ! प्रत्यक्ष अनुभव निराळा आला.

कामगार वर्ग खाजगी किंवा राष्ट्रीय असा काहीएक भेदभाव करीत नाही! मालकी कोणाकडे का असेना, आम्हांला जादा वेतन द्या. ते दिले की आणखी जादा द्या; ते दिले तरी आणखी जादा द्या. आणि हे प्राप्त व्हावे म्हणून संप, बंद काम, मंद काम, कामचुकारपणा, नासधूस, घेराओ, साबोटेज या गोष्टींचा सतत उपयोग केला जातो.

आजचे सरकार पुष्कळसे कामगारवर्गाविषयी सहानुभूती बाळगणारे आहे. कायदे, नियम, इत्यादी कामगारांच्या हिताचे झाले आहेत. अन्यायाचे परिमार्जन करण्याकरिता यंत्रणा निर्माण झालेली आहे. सारांश, औद्योगिक क्षेत्रात न्याय आणि शांतता राहील असे सर्व प्रयत्न होत आहेत; तरी पण, बंद काम आणि मंद काम यांचे प्रमाण वाढतच आहे.

कामगारांच्या उत्पादनक्षमतेची तुलना केली तर असे दिसते की प्रगत देशांच्या मानाने भारतातील कामगारांच्या उत्पादनाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. अशा स्थितीत 'मंद काम, बंद काम' हे धोरण सर्रास अंमलात आले तर या देशाची आर्थिक स्थिती कशी सुधारणार याची चिंता वाटते. लोकांची काम करण्याची वृत्ती आणि सवय मारून टाकली जाते. याचे अनिष्ट परिणाम अत्यंत दूरगामी आहेत. कामगारांचे राज्य आले तरी या सवयी जाणार नाहीत.

मी यातून निष्कर्ष एकच काढला. वैयक्तिक धनाच्या तृष्णेला अंत नाही. ते धन मग खाजगी मालकाकडून मिळणारे असो, किंवा समाजाकडून असो, घेणाराची वृत्ती सतत जास्त मागण्याकडे, जास्त घेण्याकडे असते. त्यात न्याय आणि वाजवी-पणा पाहिला जात नाही. शे-दीडशे रुपये मिळवून जेमतेम कुटुंबखर्च भागवणा-राची जी वृत्ती, तीच दीड-दोन हजार पगार मिळवणाऱ्या विमानहाकणाऱ्या पायलटांची पाहिली म्हणजे खात्री पटते, की ही बाब निव्वळ जीवनवेतनाची नसून धनतृष्णेची

आहे. या तृष्णेला अंत नाही. ती सतत वाढत राहाणारी आहे. तिचे स्थान व्यापक होत आहे. एका काळी ती मालकांच्या ठिकाणी होती. आता ती कामगारांच्या ठिकाणी आली आहे. दोघांची प्रवृत्ती एकच, आम्हाला अधिक धन पाहिजे.

मालक-कामगार-अधिकारी या सर्वांच्या धनतृष्णेच्या पायी सर्वसामान्य समाज नागवला जात आहे. त्याने अधिक धन कोणाकडे मागायचे ? तोही मग मिळेल त्या भल्याबुऱ्या मार्गाने धन मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्यातून भ्रष्टाचार जन्म घेतो.

धनाची अपेक्षा अवश्य असावी, पण धनतृष्णा नसावी. तिला न्याय, नियम आणि समाजहित यांची मर्यादा ठेवून त्यांचे बंधन घालावे. ते सध्या नाही.

[१७-७-१९६०

# ८. कलेची प्रसूती आणि प्रसिद्धी

**कला** आणि साहित्य यांची निर्मिती ही अगदी वैयक्तिक गोष्ट आहे. तिचे साम्य मातेच्या प्रसूतीशीच आहे. पूर्णकालाच्या बालकाला जन्म देणे मातेला अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणे परिपक्व कल्पनेला चित्रात, शिल्पात किंवा भाषेत अभिव्यक्ती देणे हे कलावंताला आणि लेखकाला अटळ आहे. बालकाच्या आणि कलावस्तूच्या प्रसूतीवर समाजाचे नियंत्रण असू शकत नाहीच, किंबहुना त्या व्यक्तीचेही राहू शकत नाही. अत्युत्कट विचार, कल्पना व भावना यांचा जोर अंतःकरणात झाला की त्याचा बाह्य आविष्कार होणे अपरिहार्यच असते. उत्कृष्ट ग्रंथ, काव्ये, कलाकृती यांची निर्मिती अशी आपोआप स्वयंस्फूर्तीने झालेली असते.

कलाप्रसूतीच्या बाबतीत ही गोष्ट झाली. कलाप्रसिद्धीचा प्रश्न मात्र समाजाशी निगडित आहे. त्या कलाकृतीचे समाजावर होणारे परिणाम कलाकाराने लक्षात घ्यावयास पाहिजेत. विशेषतः नाटक, काव्य, कादंबरी, लघुकथा, चित्रकला इत्यादी कृतींचा परिणाम समाजावर काय होणार आहे, त्याचा कलाकाराने पूर्ण विचार करावयास हवा. त्याचा अंदाज बांधायला हवा.

समाजाला भिऊन आपली कलाकृती अंधारात ठेवावी असा माझ्या लिहिण्याचा उद्देश नाही. कलाकाराने अशा परिणामांचा पूर्ण विचार करायला पाहिजे. आपल्या मनात जो परिणाम अपेक्षित आहे तोच होईल का त्यापेक्षा भलताच परिणाम होईल याचा विचार अनेक लेखक व चित्रकार करीत नाहीत ज्यांच्या कलेला खूप मागणी आहे असे कलावंत वेळेच्या अभावी, आणि ज्यांना

आपल्यावर असलेल्या सामाजिक जबाबदारीची कल्पना नाही असे लेखक अनुभवाच्या अभावी, आपापल्या कृती घाईघाईने प्रसिद्ध करतात.

बुद्धिपुर:सर समाजाला नवीन दिशा दाखविण्याचा, नवीन विचार व कल्पना प्रसृत करण्याचा अधिकार कलावंतांना निश्चितच आहे. प्रत्येक व्यक्तीचा तो जन्मसिद्ध अधिकार आहे आणि अशा कल्पना व विचार निर्माण करणारे लेखक व चित्रकार ज्या समाजात असतील तो समाज बौद्धिक दृष्टीने प्रगतिशील व जिवंत राहील.

आजच्या समाजाचे दुर्दैव असे आहे की, असा बुद्धिपूर्वक सामाजिक बदल घडवून आणण्याची ईर्षा बाळगणारे लेखक व कलावंत कमी आहेत. बहुसंख्य कलाकार सामाजिक परिणामांच्या दृष्टीने उदासीन असतात. कलाकृती तयार झाली की प्रसिद्धीला गेली--अशी त्यांची प्रवृत्ती असते.

बुद्धिपुर:सर व योजनापूर्वक परिणाम करण्याच्या दृष्टीने आणि अनिष्ट व अनपेक्षित परिणाम टाळण्यांच्या दृष्टीने—कलाकृतीत सुधारणा, बदल आणि संस्कार करणे आवश्यक असते.

सारांश, कलेची स्वयंस्फूर्त निर्मिती होणे ही वैयक्तिक लहरीची बाब आहे. कलेची प्रसिद्धी आणि तिचा प्रसार ही सामाजिक जबाबदारीची गोष्ट आहे. निर्मिती नैसर्गिक रीतीने झाली तरी समाजात तिला प्रसिद्धी आणण्यापूर्वी लेखक-कलाकाराने तिच्यावर इष्ट, अपेक्षित आणि संकल्पित परिणामाच्या दृष्टीने संस्कार करायलाच हवेत. या बाबतीत आळस उपयोगी नाही. घाई चालायची नाही. उतावीळपणा खपायचा नाही.

कलेची प्रसूती आणि प्रसिद्धी यांतील फरक सतत लक्षात ठेवा.

[१८-७-१९६०

# ९. काळ-काम-वेगाची उदाहरणे

**शाळेत** असताना तुम्हाला गणितात किती मार्क मिळत होते ? बहुतेकांना पन्नास-साठाच्या वर असतील असा तर्क करायला काही हरकत नाही. अंकगणितात काळ-काम-वेग असे एक प्रकरण असे. एक पुरुष किंवा बाई एका दिवसात इतके काम करते, तर इतक्या दिवसांत किती काम होईल, किंवा इतक्या कामाला किती दिवस लागतील--अशा स्वरूपाची ती उदाहरणे असत.

आजच्या काळात अशा उदाहरणांच्या आधारावर माणसे व्यवहार करू लागली तर त्यांची फसगत होईल ! कागदावर त्यांच्या गणिताचे जे उत्तर येईल ते व्यवहारात प्रत्यक्ष अनुभवाला तसे येईलच असे नाही. कशामुळे हा फरक झालेला आहे ?

काळ तोच आहे. कामे तशीच आहेत. पण वेगात फार फरक पडला आहे. काळ–काम–वेग या तीन गोष्टींपैकी एका गोष्टीत भिन्नता आली तरी उत्तरात फरक पडणारच. वेग हा आता अनिश्चित भाग झालेला आहे, आणि या गणितात वेतनविषयक महत्त्वाच्या प्रश्नाने फारच बदल घडवून आणलेला आहे. सम-व्यस्ताचे प्रमाण बदललेले आहे.

प्रत्येक कामाबद्दल त्याचे योग्य व वाजवी वेतन मिळाले पाहिजे हे महत्त्वाचे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे. काळ–काम–वेगाच्या व्यवहारात योग्य वा न्याय्य वेतनाच्या तत्त्वाची अत्यंत चांगली भर पडलेली आहे. मानवी व्यवहारातील ही अत्यंत पुरोगामी अशी सुधारणा आहे.

परंतु या सुधारणेचा आपल्या समाजात तरी अपेक्षित असा परिणाम अद्याप दिसून येत नाही. वेतनाचा परिणाम कामावर व वेगावर व्हायला पाहिजे. सम प्रमाणात व्हायला पाहिजे. अधिक वेतनाच्या पोटी अधिक काम व अधिक वेगाने काम व्हायला पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारात निराळा अनुभव येत आहे. वेतने वाढत आहेत पण कामाचे आणि वेगाचे प्रमाण कमी होत आहे.

न्याय्य आणि योग्य प्रमाणात वेतन वाढायलाच पाहिजे. पण त्याबरोबर कामाचे आणि वेगाचे प्रमाण वाढले नाही तर हा समाज सतत दारिद्र्यात खितपत राहील. या देशाची औद्योगिक आणि आर्थिक स्थिती सुधारणार नाही, आणि त्यामुळे वाढलेले वेतन घेणारांचीही आर्थिक स्थिती सुधारणार नाही. या सिद्धांताची जाणीव स्पष्ट शब्दांत देण्याची आता वेळ आली आहे. पण असा प्रचार करणारा नेता हा कामगारांतूनच निर्माण झाला पाहिजे. माझ्यासारखा बाहेरचा ते म्हणू लागला तर कामगारद्रोही म्हणून कपाळावर शिक्का बसायचा.

काम करणारांनी योग्य प्रकाराने आपले ठरलेले काम करावे याकरता त्यांच्यावर इन्स्पेक्टर नेमूनही फारसा उपयोग होणार नाही. इन्स्पेक्टरची पाठ वळली की कामाचा वेग मंद किंवा बंद करता येतो. कामाची स्फूर्ती अंत:करणातून आल्याशिवाय कामगार किंवा कर्मचारी कामे करणार नाहीत. ही स्फूर्ती कोणती ? यात दोन विचार आहेत.

पहिला विचार सामाजिक व आर्थिक स्वरूपाचा आहे. तो हा की या देशाचा उत्कर्ष प्रामाणिक आणि आस्थापूर्ण वृत्तीने केलेल्या कामामुळेच होऊ

शकेल. देशाची संपत्ती ही देशातील लोकांच्या कष्टामुळे वाढत असते. हा विचार सर्व जनतेत प्रभावी झाला पाहिजे. विशेषतः कामे करणारांत.

दुसरा विचार नैतिक स्वरूपाचा आहे. मी जे वेतन घेतो त्याचा मोबदला योग्य कामाच्या स्वरूपात दिला नाही तर मी हरामचा पैसा घेतो, फुकट वेतन घेतो, किंबहुना चोरीचा व्यवसाय करतो असे होईल—अशी जाणीव निर्माण झाली पाहिजे. लहान कामगारापासून वरच्या अधिकाऱ्यापर्यंत ही भावना प्रभावी होणे जरूर आहे. कर्तव्यनिष्ठेच्या तत्त्वाचे बाळकडू समाजाला देणे आवश्यक आहे.

देशाच्या आर्थिक उन्नतीकरता, आणि वेतनाचा प्रामाणिक मोबदला देण्याकरता मी काम करतो या दोन भावना वाढीस लावल्या पाहिजेत. त्याच श्रद्धा कामाला स्फूर्ती देऊ शकतील.

नव्या औद्योगिक युगाकरता या नव्या श्रद्धांची फार आवश्यकता आहे.

[ १६–८–१९६०

## १०. काळजाच्या जखमेवर काळाचे मलम

**सुखदुःखाच्या** प्रसंगांतून कोणाचीही सुटका झालेली नाही. मानवाचा अवतार घेणाऱ्या परमेश्वरालाही, राम आणि कृष्ण यांनाही, सुखदुःखे भोगावी लागली. आपण तर सामान्य मानव. सुखदुःखांचा भोग हेच आपले जीवन.

माणूस सुखाविषयी फारसे बोलत नाही परंतु दुःखाच्या कहाण्या तो वारंवार आणि घोटून घोटून सांगत असतो. मानवी जीवनाला प्रारंभ झाला तेव्हापासून दुःख त्याच्या मागे लागलेलेच आहे. हा अनादिकालापासूनचा प्रश्न आहे आणि तो अनंतकालपर्यंत चालेल.

धर्माचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रारंभच दुःखामुळे झाला. जन्म-मृत्यू-जरा-व्याधी ही मानवाची सततची दुःखे आहेत. त्यांपासून मुक्ती मिळवावी याकरता निरनिराळे धर्मपंथ आणि विविध विचारमार्ग निर्माण झाले.

उत्कट दुःखाचे प्रसंग प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात केव्हाना केव्हा तरी येतात. अनपेक्षित अपघात, जवळच्या माणसाचे आजारीपण, जिवलग व्यक्तीचा मृत्यू, व्यवसायात किंवा नोकरीत अनपेक्षित अपयश अथवा अपमान, विश्वासातल्या माणसाने केलेला विश्वासघात, अब्रूला लागलेला कलंक, अपेक्षाभंग, असे कितीतरी दुःखाचे प्रसंग येतात, येण्याचा संभव असतो, येतीलही. जे जगात इतरांच्या बाबतीत घडते, त्याला तुमचा आमचा तरी अपवाद कसा होईल ? आज ना उद्या, एवढाच

प्रश्न असतो. कोणत्या प्रकारचे दुःख हेही काळच ठरवीत असतो. आपल्या हातात काय आहे ?

आपल्या हातात एकच आहे. मनाची तयारी. जे जे जगात घडते ते ते आपल्याही बाबतीत घडण्याची शक्यता आहे. न घडले तर आपण सुदैवी व सुखी. पण घडले तर मनाची तयारी ठेवावी. या पूर्वतयारीने दुःखाचा पहिला धक्का धीराने सहन करता येईल. मनुष्य एकदम खचून जाणार नाही. विचारी व संयमी वृत्तीमुळे दुःखाची उत्कटता कमी करता येईल. माणूस ताठ उभा राहून डोळे उघडून दुःखाकडे पाहून म्हणेल, 'ये, माझी तयारी आहे. मी तुलाही पचवून टाकू शकेन. शरण जाणार नाही. माझे मन मी यापूर्वीच विचारांचे घण घालून घालून पोलादासारखे कणखर बनवले आहे. मी तुला हार जाणार नाही. माझे व्यक्तित्व तुझ्यापेक्षा मोठे आहे.'

आपल्या हातात एवढेच आहे. दुःखाचा पहिला हल्ला धैर्याने सहन करून त्यातून शिरसलामत बाहेर पडलो की बाकीचे काम काळ करीत असतो. काळजाच्या दुःखावर काळ मलम लावीत असतो. कालांतराने जखम भरून येते. घाई करण्यात काही अर्थ नसतो.

उत्कट दुःखाच्या वेळी माणसाला वाटते, हे दुःख आपण जन्मभर विसरणार नाही; ते आपल्याला जन्मभर पुरणार. पण जीवनाचे सिंहावलोकन केले तर अनुभव निराळा येतो. कालाच्या प्रवाहात दुःख वाहून जाते, विसरून जाते, सौम्य होते.

आपल्या दुःखाचे निराकरण इतरांच्या सहानुभूतीवर अवलंबून ठेवू नका. खरी सहानुभूती वाटणारी व दाखवणारी माणसे थोडी. पण प्रत्येकाला त्याचे त्याचे दुःख काय कमी असते ? शेवटी आपल्या स्वतःच्या विचाराने, पूर्वतयारीने आणि काळाच्या मदतीने दुःखाचा भार कमी करायचा आहे हे सत्य लक्षात ठेवा.

लढाईवर गेलेला शिपाई छातीवर शत्रूच्या गोळ्या झेलण्याच्या तयारीनेच जातो. संसारात पडलेल्या माणसानेही दुःखाचे हल्ले झेलण्याची तयारी ठेवायला पाहिजे. धर्माचा आणि तत्त्वज्ञानाचा हाच संदेश आहे. तयारी ठेवा. निर्विकार राहा. ततो युद्धाय युज्यस्व । जीवनाच्या संग्रामाची तयारी ठेवा. संग्रामात जखमा होणारच.

[२२-११-१९६०

# ११. आजच्या काळातील स्थितप्रज्ञ

**एकदा** आम्ही तीनचार मित्रमंडळी प्रवास करीत होतो. बोटीतून प्रवास चालू होता आणि जेवणानंतर आम्ही गप्पा मारीत बसलो. त्याच दिवशी काही

धार्मिक स्थळे पाहून आल्यामुळे ईश्वर, आस्तिक्यबुद्धी, उपासना, देवदर्शन इत्यादी गोष्टींवर चर्चा चालू होती. चर्चेत भाग घेणारे सर्व बी. ए., एम. ए. असे उच्च शिक्षित होते. चर्चेच्या ओघात मी सहज म्हणालो की, "गीतेमध्ये दुसऱ्या अध्यायात ज्या स्थितप्रज्ञाचे वर्णन केले आहे तसे होण्याचा मी अल्पसा प्रयत्न करतो." त्यावर समोर बसलेले माझे मित्र एकदम उसळून तिरस्काराने आणि अवहेलना बुद्धीने म्हणाले, "अहाहा ! कोठे गीतेतला स्थितप्रज्ञ आणि कोठे आपण ! स्थितप्रज्ञ व्हायला अनेक जन्म घ्यायला पाहिजेत."

एम. ए., एल्‌एल्. बी. होऊन एका मोठ्या अधिकारावर असलेल्या या माणसाच्या कल्पना ऐकून मी विचार करू लागलो. आपल्या सुशिक्षित लोकांमध्येही धर्मातील शिकवणुकीविषयी अज्ञान आहे. गीतेत सांगितलेल्या गोष्टी आपल्याकरता नाहीत, अगदी अलौकिक पुरुषाकरता आहेत, अशी अनेकांची कल्पना आहे. त्यामुळे ग्रंथातील तत्त्वे ग्रंथात राहतात आणि त्यांचे आचरण करण्याचा प्रयत्न होत नाही.

अर्जुनाने श्रीकृष्णाला प्रश्न केला—स्थितप्रज्ञ कर्मयोगी कसा बोलतो चालतो ते मला सांगा. त्यानंतर गीतेत जे वर्णन आले आहे ते प्रत्येकाने तोंडपाठ करण्यासारखे आहे. त्यात दोन विचार प्रमुख आहेत. स्थितप्रज्ञ आपल्या इंद्रियांना ताब्यात ठेवतो. त्यांना बळी पडत नाही. काम आणि क्रोध यावर त्याचे नियंत्रण असते. हा एक विचार. दुसरा विचार असा की तो सुख-दुःख, यश-अपयश, मान-अपमान अशा दोन्ही विरोधी गोष्टींकडे निर्विकार मनाने पाहतो. ही स्थितप्रज्ञाची दोन प्रमुख लक्षणे आहेत. यात तुम्हाला व मला आचरणात न आणता येण्यासारखे काय आहे ?

माझ्या मित्राची कल्पना अशी की स्थितप्रज्ञ मनुष्य जटा आणि दाढीमिशा वाढवतो, भगवी छाटी परिधान करतो, चोवीस तास ध्यान-धारणा करतो, घरदार सोडून देतो आणि समाजापासून अगदी वेगळा राहतो.

उलट माझी आजच्या स्थितप्रज्ञाची कल्पना अगदी निराळी. तो शर्ट आणि बुश-कोट घालतो, नेकटायही वापरतो, बूट-पायमोजे घालतो, रोज सेफ्टीब्लेडने दाढी करतो, चहाकॉफी पितो, संसारात राहतो, कचेरीत-कारखान्यात काम करतो. नाटक-सिनेमाही पाहतो; आणि इतके करूनही रात्री गीता वाचून आत्मचिंतन करतो व स्थितप्रज्ञ होण्याचा प्रयत्न करतो.

स्थितप्रज्ञता ही मनावर आहे. बाह्य स्वरूपावर व जीवनपद्धतीवर ती अवलंबून नाही. संसारात राहूनही जो आत्मसंयमन करू शकतो आणि सुखदुःखांना निर्विकारपणे तोंड देतो तो स्थितप्रज्ञ. एखादा साधा कामगार किंवा पोस्टमनही

स्थितप्रज्ञ असू शकेल. उलट सर्व वेद-उपनिषदे—दर्शने यांचा अभ्यास केलेला एखादा विद्वान पंडित किंवा शास्त्री काम-क्रोधाला आणि सुख-दुःखांना बळी पडलेला असेल.

आपणांपैकी प्रत्येकाला स्थितप्रज्ञ होता येईल. आदर्श आणि परिपूर्ण अशा उन्नत जीवनाची ही गीतेतील कल्पना प्रत्येक मानवाकरता आहे.

नसे दुःखात उद्वेग सुखाची लालसा नसे ।
नसे तृष्णा भय क्रोध तो स्थितप्रज्ञ संयमी ।। —गीताई

[१२-२-१९६१

# १२. आग, असंतोष, अफवा अन् आजार

**मराठी** मूळाक्षरातील अ-आने प्रारंभ होणारे हे चार पुरुष अतिशय भयंकर आहेत. त्यांच्या जाती अगदी निराळ्या दिसल्या तरी त्यांच्या प्रवृत्तींत अतिशय साम्य आहे.

त्यांचा प्रारंभ अगदी लहान असतो. तो लक्षात देखील येत नाही. विडी-सिगारेट मधून निघालेली एक ठिणगी—पण ती मोठमोठी घरं, प्रचंड कारखाने, तेलाच्या टाक्या, अरण्ये—सगळ्यांची राखरांगोळी करून टाकते. आजाराचे तसेच आहे. पडसे-खोकल्यापासून आणि बारीक तापापासून प्रारंभ होणारा आजार क्षयावर जाऊन माणसाचा क्षय करून टाकतो. दुर्लक्ष केले तर अपचनासारखा रोग पुढे अल्सरप्रमाणे जन्माचा दुर्धर रोग होऊन आयुष्य क्षीण करतो.

माणसाचे चारित्र्य आणि सांपत्तिक स्थिती यांच्याविषयी अफवा पसरल्या तर माणसाची अब्रू आणि पत त्या धुळीला मिळवतात. समाजात धुमसणारा असंतोष राज्यकर्त्यांनी वेळीच दूर केला नाही तर राज्यक्रांती होते आणि सिंहासनावर बसणारे लोक तुरुंगात बसतात किंवा फासावर चढवले जातात.

या चारही गोष्टींचे मूळ अगदी लहान असते. लक्षात न येणारे असते. म्हणून अगदी सावधानतेने त्यांच्यावर लक्ष ठेवायला हवे, आणि लक्षात आल्याबरोबर त्यांच्यावर योग्य ते इलाज आणि उपाय करायला हवेत. शीघ्र प्रसरणशीलता हा त्यांचा समान गुणधर्म आहे. तुमच्या लक्षात त्यांचे अस्तित्व येऊन तुम्ही इलाज करीपर्यंत त्यांचा खूप विस्तार झालेला असेल. म्हणून तातडीने उपाययोजना करण्याचे धोरण ठेवायला हवे. या बाबतीत 'वेळ' हा महत्त्वाचा विचार आहे. जितकी लौकर उपाययोजना होईल तितके चांगले. जितका उशीर होईल तितका उपयोग होण्याचा संभव कमी कमी होत जातो. "टू लेट", "वेळ गेली"

म्हणण्याची पाळी न यावी, कुटुंबात, शेतात, कारखान्यात, गावात, राज्यात, संस्थेत, समाजात—कारभार आणि व्यवस्था पाहाणाऱ्या व्यक्तींनी हा विचार लक्षात ठेवावा. यांतील एकेक शक्ती नाश करायला समर्थ आहे. मग त्या सगळ्या एकत्र आल्या तर काय होईल ? कल्पना करा.

[९-१०-१९६१

## 13. सद्विचारांचा पाऊस

**चांगले** विचार हे पावसासारखे आहेत. कधी धो धो मुसळधार पाऊस पडून सगळीकडील घाण वाहून जाते, आणि वातावरण व जमीन स्वच्छ होतात. कधी भीजपावसाची सतत धार पडून ते पाणी जमिनीत मुरते आणि अनेक महिने वनस्पतींना जीवन देते.

जमिनीवरील पाणी तापले की वाफ होऊन आभाळात ढग जमतात. अनुभव आणि चिंतन यांच्या उष्णतेने मनुष्य विचार करतो आणि मग विचारांचे ढग तयार होतात. पुरेसे ढग जमले की पर्जन्यधारा वाहू लागतात. विचार परिपक्व झाले की शब्दांचे रूप घेऊन कागदावर उतरतात. जीवनाला (पाण्याला व अंतः-करणाला) उष्णता लागल्याशिवाय ढग आणि विचार यांचा संचय होत नाही. तो झाल्याशिवाय पाण्याचा अथवा विचारांचा वर्षाव होत नाही.

पाऊस इतरांकरता पडत नाही. ढगांना पाण्याचे ओझे झाले की ते खाली पडते. डोळस आणि विचारी माणसाला विचारांचे ओझे झाले की तो त्यांना मुक्तद्वार करून देतो आणि मनावरचे ओझे कमी करतो. त्याला हलके वाटते.

पाऊस सर्वत्र पडतो. आपण पडतो तेथे खडक आहे का सुपीक शेत आहे, जमीन आहे का समुद्र आहे--असे तो कधी पाहात नाही. विचारी लेखकही आपले विचार सर्वांना देतो. कोणी ते स्वीकारील की नाकारील हे तो फारसे पाहात नाही. सद्विचारांचा प्रसार करावा, काही तरी, कधी तरी,—चांगलेच होईल, निदान वाईट होणार नाही असा त्याला भरवसा असतो.

सामर्थ्यवान प्रभावी विचाराने एखाद्या वेळी समाजातील मानसिक घाण धुऊन काढली जाते. वातावरण स्वच्छ, निर्मळ, सात्त्विक, स्फूर्तिदायक असे होते. पण असे नेहमी होत नाही. अनेक शतकांनी एखादा धर्मसंस्थापक किंवा तत्त्वज्ञानी जन्माला येतो आणि तो विचारांची दिशा बदलून टाकतो. पण भीजपावसासारखे

विचार देणारे सज्जन प्रत्येक काळात आपले कार्य करीत असतात. समाजाला सद्विचार देत असतात.

पाऊस दरवर्षी पडतो म्हणून तो नको असतो असे कधी झाले आहे का ? बरेचसे पाणी वाहून जाते, थोडे पाणी मुरते आणि जीवन समृद्ध करते. बरेचसे विचार लोक वाचतात आणि विस्मृतीच्या समुद्रात सोडून देतात. तरी पण एखादा विचार त्यांच्या मनाला चिकटल्याशिवाय राहात नाही. माणसाचे जीवन समृद्ध करायला एखादाही प्रभावी विचार उपयोगी पडतो; म्हणून चांगल्या विचारांचा प्रसार करीत असावे. कधी ते खडकासारख्या कठीण अंतःकरणावर पडून वाहून जातील तर कधी ते संसारतापाने तप्त आणि मृदु झालेल्या अंतःकरणावर पडून त्याला गारवा आणि पुनर्जीवन देतील.

पाणी तेच पण दरवर्षी ते नव्या स्वरूपात पृथ्वीवर पडते. शाश्वत स्वरूपाचे विचारही जुनेच असतात. पण प्रत्येक पिढीत ते नवीन भाषा घेऊन बाहेर पडतात. प्रत्येक पिढीला त्या पिढीतील व्यक्तीने, त्या त्या काळातील परिस्थितीला उद्देशून जुनेच विचार नवीन भाषेत दिले तरी ते पाहिजे असतात.

चांगल्या विचारांचे उत्पादन करा.

उत्पन्न झालेल्या विचारांचा प्रसार करा.

वातावरण शुद्ध होईल. जीवन समृद्ध होईल.

[ ११-११-१९६१

# १४. तुमच्या कामावर तुमचा शिक्का

पोस्टमनने पत्र आणून टाकल्याबरोबर केवळ अक्षरावरून आपण ओळखतो की हे पत्र अमक्याचे आहे. घरात चांगला स्वयंपाक झाला की तो कोणी केला असेल ते न सांगता लक्षात येते. कचेरीची झाडलोट आणि व्यवस्थित मांडणी पाहिल्याबरोबर ती कोणत्या गड्याने केली ते तुम्ही ओळखता. पत्राचा चांगला मसुदा पुढे आल्याबरोबर नाव न सांगता तो लेखक तुमच्या मनात उभा राहतो. शाळेच्या वर्गात असलेल्या शांततेवरून किंवा गडबड-गोंगाटावरून वर्गावर कोणाचा तास आहे त्या शिक्षकाचे नाव मुख्याध्यापकाला सांगता येते. कारखान्यात ठेवलेल्या मौल्यवान मशिनरीच्या सुस्थितीवरून तिच्यावर कोणत्या कामगाराने काम केले आहे ते मालकाला कळते.

हे सर्व आपोआप कसे होते ? प्रत्येक कामावर ते काम करणारा न कळत आपला शिक्का मारीत असतो. हे शिक्के आपल्या परिचयाचे असतात. कामाचा

बिनचूकपणा, सुबकता, व्यवस्थितपणा, परिपूर्णता, श्रेष्ठता इत्यादींची पातळी पाहून ते काम कोणी केले असेल ते समजू शकते. कारण प्रत्येक मनुष्य कोणत्या दर्जाचे काम करतो, त्याचा आपल्याला परिचय असतो.

काम करणारांत तीन प्रकार असतात. चुकारपणाने अगदी निकृष्ट दर्जाचे काम करणारे आणि अंगचोरपणा करणारे काही लोक असतात. आपला वेळ, श्रम आणि बुद्धी यांपैकी एकही गोष्ट ते प्रामाणिकपणाने कामाकडे लावणार नाहीत. दुसरा प्रकार सामान्य कार्यकर्त्यांचा—ते आपले 'रूटीन' काम चार चौघांसारखे करतील. फार चांगले नाही, फार वाईटही नाही; निकृष्टही नाही पण उत्कृष्टही नाही—सारे कसे अगदी सामान्य दर्जाचे ! असे लोक बहुसंख्य असतात. पण अगदी थोडे लोक या दोन वर्गांपेक्षा अगदी निराळे असतात. प्रत्येक कामात ते आपली सारी शक्ती, युक्ती, बुद्धी, वेळ आणि कौशल्य पणाला लावतील. ज्या कामाला ते हात लावतील ते बिनचूक, परिपूर्ण, उत्कृष्ट दर्जाचे, लक्ष वेधून घेणारे असेच करतील. आपल्या कृतीवर ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची मुद्रा उठवतील. काम पाहिल्याबरोबर तुम्ही म्हणाल की ही कृती अमक्याची आहे. तिचा शिक्काच त्या कामावर आहे.

काम करणारांचे हे तीन प्रकार कनिष्ठ सेवकांतच असतात असे नाही. मध्यम आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांतही अंगचुकार, मध्यम आणि उत्कृष्ट असे प्रकार असतात. कुटुंबात, कचेरीत, कारखान्यात, दुकानात, सैन्यात—सर्वत्र असे तीन दर्जांचे काम करणारे असतात. आपापल्या कामावर ते आपली मुद्रा उठवीत असतात.

तुमच्या कामावर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा शिक्का उठतो. आपली प्रत्येक कृती श्रेष्ठ दर्जाची, बिनचूक, परिपूर्ण, सुंदर राहील अशीच करा. कृतीवरून लोक तुमच्या व्यक्तिमत्त्वाची पातळी ठरवतील.

[ १०-१-१९६२

## १७. अपेशाचे खापर दुसऱ्यावर

**सोलीव** यश कधीच कोणाला मिळत नाही. यशाच्या मागे आणि पुढे अनेक अपयशे असतात. आपल्याला यश दिसते. यशस्वी माणसाने अनेक अपयशे पचविलेली असतात.

एखाद्या कृतीत यश किंवा अपयश येते याची अनेक कारणे असतात. गीतेमध्ये सांख्य तत्त्वज्ञानातील पाच कारणे दिली आहेत—अधिष्ठान, कर्ता, करण

विविध कृती आणि दैव. आधुनिक भाषेत सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, प्रत्यक्ष काम करणाऱ्याच्या ठिकाणी असलेले गुणदोष, काम करण्याचे त्याचे स्थान, त्याला उपलब्ध असलेली साधनसामग्री, त्याने प्रत्यक्ष केलेली कृती आणि शेवटी मानवाच्या आटोक्याबाहेर असलेल्या अदृश्य शक्ती—अशा पाच गोष्टींवर यशापयश अवलंबून असते.

वरील विवेचनावरून लक्षात येईल की यशापयश मिळण्याला लागणाऱ्या पाच गोष्टींपैकी बहुतेक ज्याच्या त्याच्या आटोक्यातल्या आहेत. पण दैव म्हणून पाचवा भाग आहेच.

शहाणा माणूस अपयशानंतर आत्मनिरीक्षण करतो. काय चुकले, काय कमी पडले म्हणून अपयश आले, त्याची चिकित्सा करतो, आणि बोध घेऊन स्वतःच्या कामात सुधारणा करतो. आपले दोष मान्य करायला तो कचरत नाही. असा कार्यकर्ता सतत सुधारणा आणि चाळणा करीत करीत यश मिळवतो.

याच्या उलट मूर्ख माणसाचे असते. ते आपल्या अपयशाबद्दल दुसऱ्या कोणाला तरी दोष देतात. सगळी जबाबदारी इतरांवर किंवा परिस्थितीवर टाकून आपण निर्दोष आणि परिपूर्ण आहोत असे भासवतात. दुसऱ्यावर जबाबदारी टाकल्यामुळे स्वतः विचार करून सुधारणा करण्याची त्यांना गरज भासत नाही. म्हणून त्यांच्यात सुधारणा होत नाही. त्यांना सतत अपयशच येत राहते. कारण अपयशाची कारणे त्यांच्या स्वतःच्या ठिकाणीच असतात. ती दूर झाली नाहीत तोपर्यंत यश येण्याची आशा नाही. प्रयत्नात कमतरता, चिकाटीचा अभाव, साधनांची अपूर्णता, चुकीची वेळ, निर्बुद्ध क्रिया—अशा अनेक कारणांमुळे माणसाला अपयश येते. त्यांचे निराकरण होत नाही.

सतत नापास होणारे विद्यार्थी, व्यवसायात प्रगती न करणारी माणसे, नोकरीत मागे राहणारे कर्मचारी, निवडणुकीत आपटी खाणारे उमेदवार, खाजगी धंद्यात अपेशी होणारे लोक—आपल्या अपयशाचे खापर इतरांवर फोडतात. त्यांनी आत्मनिरीक्षण करून स्वतःच्या ठिकाणी सुधारणा करायची सवय ठेवली तर त्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे मिळायचे तेवढे यश मिळेल. सर्व अचूक प्रयत्न करूनही जे अपयश येते त्याला कोणाचाच इलाज चालत नाही. पण आजूबाजूच्या लोकांना दोष देऊन आपण नामानिराळे राहू नये.

अपयशाचा धनी ज्याचा तो. यशाचाही धनी तोच.

[ १०-१-१९६२

# १६. दोनच जाती—सज्जन आणि दुर्जन

**जगात** निरनिराळ्या लोकांशी वागण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील भेदाभेद कसे लक्षात ठेवावेत ही एक व्यावहारिक अडचण असते. सर्वसामान्य माणसाची रीत अशी असते की दुसरी व्यक्ती कोणच्या जातीची, पोटजातीची, धर्माची, पंथाची किंवा राजकीय पक्षाची आहे ते पाहून त्याप्रमाणे काही सद्‌गुण किंवा दुर्गुण त्या व्यक्तीच्या ठिकाणी असणारच असे गृहीत धरावयाचे. या वृत्तीमुळे अनेक चांगल्या माणसांवर आपण काल्पनिक दुर्गुण लादतो आणि वाईट माणसांकडून काही सद्‌गुणाची अपेक्षा करतो. अशा आपल्या वृत्तीमुळे आपण इतर व्यक्तींवर अन्याय करतो आणि स्वतःचीच निराशा करून घेतो.

हिंदु–मुसलमान–ख्रिश्चन, मालक–नोकर, जमीनदार–कुळ, घरमालक-भाडेकरी, वरिष्ठ अधिकारी–कनिष्ट सेवक, काँग्रेस पक्ष–इतर पक्ष, सासू–सून, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्य–हरिजन, शिक्षक–विद्यार्थी, भारतीय–अभारतीय, असे निरनिराळ्या गटातले लोक, दुसऱ्या गटातील व्यक्तींबद्दल मनात काही तरी पूर्वग्रह धरून त्याच्याशी वागतात. आपल्या गटातील लोक तेवढे चांगले आणि दुसऱ्या गटातील लोक वाईट असे गृहीत धरून, पण स्पष्ट न बोलता, एकमेकांशी वागत असतात. मीही या मनःस्थितीतून गेलो आहे. पुढे विचार व निरीक्षण केल्यावर मला निराळा अनुभव आला. ज्यांना मी निराळ्या वर्गातले समजत होतो त्यांच्यात माझे मित्र होते. आणि माझ्या वर्गातले ज्याना समजत होतो त्यात माझा द्वेष करणारे होते. थोडा अधिक विचार केल्यावर असे आढळले की प्रत्येक गटात सज्जन माणसे आहेत.

अशा रीतीने अनेक वर्षे अनुभव घेतल्यावर मी अशा सिद्धान्ताप्रत आलो आहे की जगात माणसांच्या दोनच जाती आहेत. एक जात सज्जनांची आणि दुसरी जात दुर्जनांची.

समाजातील व्यक्तींची संख्या मोठी असल्याकारणाने व्यवहाराच्या सोयीकरता लहान लहान गट करून राहण्याची व वागण्याची प्रवृत्ती समाजात अपरिहार्य आहे. जाती, पोटजाती, धर्म, पंथ, व्यवसाय, राजकीय मते, प्रांत इ. निरनिराळ्या तत्त्वावर लहान लहान समूह करून, आपल्याला समान अशा इतर माणसांच्या गटात राहण्याची प्रवृत्ती असते. त्यामुळे जातिभेद, वर्णभेद, प्रांतिक भेद, पक्ष भेद इत्यादी निर्माण होतात.

ह्या सर्व भेदांना छेदून जाणारी रेषा ही सद्‌गुण दुर्गुणांची असते. सद्‌गुणी आणि दुर्गुणी माणसे प्रत्येक समूहात असतात. म्हणून माणसांची निवड करताना

एकच व्यापक कसोटी डोळ्यापुढे ठेवावी, आणि आपल्या मनाला प्रश्न विचारावा की, हा मनुष्य सज्जनांच्या जातीचा आहे की, दुर्जनांच्या जातीचा आहे ? त्याप्रमाणे त्याच्याशी वागावे.

[१४-१-१९६२

## १७. अन्नयज्ञ का ज्ञानयज्ञ ?

**धर्मसाधनाकरिता** यज्ञ करण्याची परंपरा आर्यावर्तामध्ये फार प्राचीन कालापासून आहे. परंतु या यज्ञसंस्थेमध्ये उत्क्रांती झालेली आहे. विचारी माणसांनी व समाज-नेत्यांनी यज्ञाचा अर्थ कालमानाप्रमाणे बदलून घेतला.

प्रारंभी यज्ञ द्रव्यमय होते. त्यांत पशूचा बळी दिला जाई. पुढेपुढे हिंसा नको म्हणून तुपाचा व अन्नधान्याचा यज्ञ करण्याची प्रथा समाजात रूढ झाली. त्याच्याही पुढे विचारवंतांनी असा निर्णय घेतला की, अग्नीमध्ये अन्नधान्यांची आहुती देऊन यज्ञ करण्यापेक्षा शुद्ध चारित्र्य आणि ज्ञानाची उपासना हाच खरा यज्ञ, तो करावा.

गीतेमध्ये एक वाक्य आहे, 'श्रेयान् द्रव्यमयाद् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप ।' त्याचप्रमाणे त्रिसुपर्णाच्या उत्तरभागामध्ये असे म्हटले आहे की, माणसाचे जीवन हाच एक यज्ञ आहे. या यज्ञात विषय-वासनांची आहुती देऊन तपश्चर्या करणे हाच खरा विद्वान् माणसाचा यज्ञ.

"ॐ तस्यैवम् विदुषो यज्ञस्यात्मा यजमानः, श्रद्धा पत्नी, हृदयम् यूपः, कामः आज्यम्" इत्यादी.

हे रूपक फारच सुंदर असून सर्वांनी त्याचा अर्थ लक्षात घ्यावा. यज्ञाची अत्यंत उदात्त कल्पना त्यात आहे.

अष्टग्रहीच्या अरिष्ट शान्तीकरिता भारतात सर्वत्र यज्ञयाग झाले, दुर्मिळ असे अन्नधान्य व तूप यांची आहुती यज्ञात दिली गेली. अर्थ न समजता वैदिक मंत्रांचे पठण केले गेले. त्या सर्वांचा परिणाम आकाशातील ग्रहांवर काहीही झाला नाही. उलट समाजातील अंधश्रद्धा मात्र अधिक दृढमूल झाली.

यज्ञमार्गाने ग्रहांची शांती करण्यापेक्षा ग्रहमालेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याच्या वृत्तीला समाजात चालना मिळाली असती तर तो श्रेष्ठ दर्जाचा ज्ञानयज्ञ झाला असता. पुढारलेल्या देशांतील सर्व शास्त्रज्ञ अंतराळाच्या संशोधनात कितीतरी पुढे गेले आहेत. त्यांनी संपादन केलेल्या ज्ञानाचा प्रसार करून त्या ज्ञानान

भर घालण्याची स्फूर्ती तरुण शास्त्रज्ञांना देणे हा खरा ज्ञानयज्ञ. हीच खरी अष्टग्रहीची शान्ती !

दर वर्षी कोठे ना कोठेतरी एखादा महायज्ञ कोणीतरी करतो आणि त्याकरिता हजारो रुपये निरनिराळ्या मार्गांनी खर्च होतात. अग्नीच्या मार्गाने देवांना आहुती पोचतात ही प्राचीन कल्पना उराशी बाळगणारे अनेक लोक आहेत. वैज्ञानिक प्रयोगशाळा, विमानप्रवास, टेलिव्हिजन, प्राचीन संस्कृतीचे व इतिहासाचे संशोधन इत्यादी गोष्टी ज्या युगात वाढत आहेत त्या युगाशी ही द्रव्य-यज्ञाची कल्पना अगदी विसंगत दिसते. अगदी शिकलेले, विजारबूट घालणारे लोक तिला बळी पडतात आणि त्यांचे पाहून अशिक्षित अडाणी माणसे त्यांचे अनुकरण करतात.

आपल्या समाजाला अशाच निमित्ताने व प्रसंगांनी अंधश्रद्धेच्या युगातून हळूहळू डोळस ज्ञानाच्या युगात आणणे हे विचारवंतांचे व समाजनेत्यांचे काम आहे.

[ २०-२-१९६२

# १८. खुर्ची मिळते, गुण मिळवावे लागतात

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजाचा अनेक अंगांनी विकास होत आहे. त्या प्रमाणात कामे वाढत आहेत. कामांची व्यवस्था पाहण्याकरिता अधिकाराच्या जागाही वाढत आहेत. पूर्वी जेथे गोरे साहेब होते अशा अनेक खुर्च्यांवर आता हिंदी अधिकारी बसले आहेत. अधिक प्रमाणात बसतील.

अधिकारावर येण्याचे नोकरीतील तंत्र ठरून गेलेले आहे. कालक्रमाने वरिष्ठ अधिकारी निवृत्त झाला किंवा वर चढला की, खालचा नोकर "एक पाऊल पुढे" सरकून वरच्या जागेवर विराजमान होतो. रांगेत उभे राहाणे, क्यूमध्ये वाट पाहणे एवढेच त्याला करावे लागते. काही ठिकाणी विशेष कसोटचा असतात. पण बहुतेक ठिकाणी ज्येष्ठता (सिनिऑरिटी) हाच गुण मानला जातो.

खालच्या माणसाला वरची खुर्ची मिळणे ही आनंदाचीच गोष्ट आहे. पण कालक्रमानेच मिळणाऱ्या त्या खुर्चीला किंवा अधिकारपदाला लागणारे गुण त्याने प्रयत्नाने संपादन करावे लागतात. ते करण्याकडे सध्या कमी लक्ष आहे.

अधिकारी व्यक्तीमध्ये काही विशेष गुण लागतात. माणसांना युक्तीने वागवून घेणे, दूरदृष्टीने योजना करणे, आपल्या धोरणांचे दूरवर परिणाम अजमावणे, आदर्श वर्तनाचा व कर्तबगारीचा नमुना घालून देणे—असे अनेक गुण

अधिकाराची खुर्ची अडविणाऱ्या माणसात पाहिजे असतात. प्रयत्न केल्यास हे गुण संपादन करता येतात. ते नसल्यास कनिष्ठांचा उपहास मात्र पदरी येतो.

आपल्या सामाजिक कारभारात शैथिल्य येण्याचे मुख्य कारण हे आहे की, अधिकारपद व त्याला लागणारे स्वसंपादित गुण यांची फारकत होत आहे. म्हणून वरच्या खुर्चीवर बसणारांनी त्या अधिकार-पदाचे आवश्यक गुणही संपादन करावे. तसे झाले तरच सामाजिक कारभारातील शैथिल्य नाहीसे होऊन चोखपणा वाढेल.

अधिकाराच्या खुर्चीवर बसणारा माणूस आपल्या खात्याचा कायाकल्प घडवून आणू शकेल. वक्तशीरपणा, संपूर्ण वेळ चोख काम, पैशाच्या व्यवहारात निःस्पृहता व प्रामाणिकपणा, कनिष्ठांना न्यायाने वागवण्याचे धोरण, समाजाची कामे करण्याकरिता आपण सेवक आहोत व त्याकरता पगार खातो ही जागृत जाणीव, असे काही गुण वरिष्ठ अधिकाऱ्यात असतील तर त्याच्या हाताखालच्या नोकरांतही ते उतरू लागतील. उलट अधिकारी अंगचुकार, जुलमी, पक्षपाती आणि लाचखाऊ असला तर त्याच्या सर्व खात्यात हे दुर्गुण शिरल्याशिवाय राहणार नाहीत.

वरिष्ठांनी आत्मनिरीक्षण करावे.

[ १६-३-१९६२

# १९. प्रार्थनेतील अर्थना

**मानवाच्या** दैनंदिन कार्यक्रमात प्रार्थना हा एक निरंतरचा भाग होऊन बसला आहे. आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात नेहमी अथवा प्रासंगिक रीतीने प्रार्थना म्हणण्याचे किंवा ऐकण्याचे प्रसंग येतात.

प्रार्थनेत काही तरी उदात्त विचार व भावना ग्रथित केलेल्या असतात. धार्मिक, नैतिक, सामाजिक किंवा राष्ट्रीय विचारांचा व भावनांचा मनावर संस्कार व्हावा, ही अपेक्षा असते.

तुम्ही प्रार्थना करता तेव्हा काय करता, याचा थोडा विचार करा व आत्मनिरीक्षण करा. प्रार्थनेचा आपण केवळ अभिनय करतो की खरोखरीची प्रार्थना करतो ? बहुसंख्य लोक प्रार्थनेची कसरत करतात ! ! ठराविक पवित्रा, ठराविक मुद्रा आणि ओठांची हालचाल—यापलीकडे प्रार्थनेला अर्थ उरत नाही. विचार आणि भावना यांचा स्पर्श प्रार्थना करणाराला होत नाही.

प्रार्थनेत अनेक सात्त्विक विचार असतात. त्यांतील एखादया विचारावर प्रत्येक वेळी मन केंद्रित करा. असे वारंवार करता करता त्या प्रार्थनेतील अर्थ मनापुढे साकार होऊ लागेल. त्याचा हळूहळू मनावर परिणाम होईल. मनाचा परिणाम आचरणावर होईल.

धातूच्या पत्र्याला ठोकून ठोकून सुंदर आकार देता येतो. प्रार्थना ही माणसाच्या मनाला विचारांचा व भावनांचा सूक्ष्म धक्का देणारी शक्ती आहे. परंतु या शक्तीचा आपण बुद्धिपुरःसर उपयोग करून घेतला पाहिजे. तसे केले तर आपल्या मनाची घडणही सुंदर होईल.

या उपक्रमाचा मला स्वतःला फार उपयोग झाला आहे. तुम्हालाही होईल.

सध्या आपल्या कौटुंबिक जीवनातून प्रार्थना लुप्त झाली आहे. भोजनापूर्वी एखादी चांगली प्रार्थना म्हणण्याची पद्धती प्रत्येक कुटुंबात सुरू होणे अवश्य आहे. आपल्या संस्कृत व मराठी वाङमयात अनेक उत्कृष्ट विचार आहेत, त्यांतील एखादा भोजनापूर्वी म्हणण्याची प्रथा सुरू करावी. कारण कुटुंबातील सर्व माणसे एकत्र येण्याचा हाच एक प्रसंग असतो.

मी ज्या ज्या ठिकाणी जातो तेथे तेथे पुढील प्रार्थनेचा प्रसार करतो—

आनंदी आत्मविश्वासू । सदाचारी पराक्रमी ॥
अखंड ज्ञानजिज्ञासू । मिताहारे शतायुषी ॥

[ १३-४-१९६२

# १०. सामान्य माणूस—असामान्य जबाबदारी

**आजचे** युग सामान्य माणसाचे आहे. राजकारणात, सामाजिक जीवनात आणि औद्योगिक विकासात सर्वसामान्य नागरिकाला महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु त्या प्रमाणात या सामान्य माणसाची शैक्षणिक व नैतिक पातळी वाढविण्याचा जोरदार प्रयत्न होत नाही.

आजच्या यांत्रिक युगामुळे या सामान्य माणसावर अभूतपूर्व अशी जबाबदारी पडलेली आहे, परंतु ती पेलण्याची आणि उमजण्याची पात्रता त्याच्या ठिकाणी निर्माण झालेली नाही. कित्येक उतारूंचे प्राण ज्याच्या हातात आहेत असा बसचा किंवा रेल्वेचा ड्रायव्हर, शेकडो उतारूंची गाडी योग्य किंवा अयोग्य मार्गाने नेण्याचा सांधा बदलणारा रेल्वेचा नोकर, हजारो नागरिकांच्या पाणी-पुरवठ्यात योग्य किंवा अयोग्य औषध मिसळणारा नगरपालिकेचा सेवक—असल्या एकेका

सामान्य व्यक्तीच्या अंगावर केवढी मोठी जोखीम आहे ! ती न उमगल्यामुळे रोज कितीतरी अपघातांच्या वार्ता आपण वाचतो !! बस–रेल्वे–विमान यांच्या अपघाताची वार्ता नाही असा एकही दिवस जात नाही.

लोकशाही कारभारामुळे या सामान्य माणसाच्या हातात अभूतपूर्व सत्ता आलेली आहे. या सत्तेच्या क्षेत्रातील इतर सामान्य नागरिकांना तारण्याची किंवा मारण्याची सत्ता, त्यांनीच निवडून दिलेल्या, सामान्य प्रतिनिधींच्या हातात आलेली आहे. पण ही सत्ता पेलण्याची पूर्वतयारी न झाल्यामुळे कारभारात शैथिल्य आणि लाचलुचपत यांचे प्रमाण वाढत आहे.

आजच्या सामान्य माणसावर असामान्य जबाबदारी पडलेली आहे. ती पेलण्याकरिता शैक्षणिक आणि नैतिक दृष्टीने त्याला समर्थ बनविले पाहिजे. व्यापक स्वरूपाचा योग्य असा प्रौढ शिक्षणाचा तातडीचा कार्यक्रम आखला तर आजच्या पिढीला 'याचि देही याचि डोळा' फायदा होईल. आणि दूरदृष्टी ठेवून असाच सुयोग्य असा शैक्षणिक कार्यक्रम तरुण पिढीच्या शिक्षणाकरिता आखला तर वीस वर्षांनंतरच्या पुढच्या पिढीला सुरक्षित जीवन आणि शुद्ध कारभार यांचा लाभ होईल

आज अनेक व्यवसाय, उद्योगधंदे आणि सामाजिक कामे यांची वाढ होत आहे. पण त्या त्या कामांना लागणारे शिक्षण देण्याची आणि त्या कामातील सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्याची सोय नाही. प्रत्येक व्यवसायाला किमान शिक्षण आवश्यक असते आणि त्या व्यवसायाचे काही नीतिनियम (एथिक्स) असतात. वैद्यकीय व्यवसाय हे त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. त्या पद्धतीचे अनुकरण प्रत्येक व्यवसायात व्हायला पाहिजे.

सर्वसामान्य माणसाला त्याच्या त्याच्या कामाचे शिक्षण मिळून त्याची आचारसंहिता शिकविली गेली तर काही सुधारणा होईल. सरकार आणि व्यवसाय-संघटना यांनी सहकार्याने असा कार्यक्रम आखला पाहिजे.

[ ६–६–१९६२

## २१. थोडक्यात चुकामूक !

**थोडक्यात** चुकामूक ! किती वेळा तरी आपल्या प्रत्येकाच्या तोंडून हे उद्गार निघत असतात. जीवनात माणसांची चुकामूक होते; त्याचप्रमाणे यशाची व आपली चुकामूक होत असते. या चुकामुकीमुळे हळहळ, दुःख व पश्चात्ताप करण्यात आपला कितीतरी वेळ व शक्ती वाया जात असते.

परीक्षेचेच उदाहरण घ्या ना ! कोणी दोन मार्कांनी नापास होतो, कोणाचा दोन मार्कांनी दुसरा वर्ग जातो आणि कोणाचा दोनच मार्कांनी पहिला वर्ग किंवा पहिला क्रमांक जातो. थोडक्यात चुकामूक ! प्रवासातही हाच अनुभव येतो. गाडी पाचला असावी आणि आपण पाच वाजून एक सेकंदाने स्टेशनमध्ये जाताच गाडीने आपल्या देखत प्रयाण करावे. एकच सेकंदाची चुकामूक ! मी अनेक वेळा निवडणुकीला उभा राहिलो. त्यात दोन प्रसंगी निकाल असे लागले की केवळ एका मतानेच मी पडलो. एकाच मताची चुकामूक ! लॉटरीत एखाद्याला दहा हजार रुपये बक्षीस मिळावेत आणि त्याच्या तिकिटाच्या अलीकडचाच क्रमांक आपला असावा. दोन तिकिटे घेतली असती तर काय बहार आली असती ! खेळांच्या स्पर्धेत तर हा अनुभव वारवार येतो. एकच शेवटला टोला आणि जय आपला; आणि नेमका तोच टोला हुकावा ! किती थोडक्यात चुकामूक !

न्यू यॉर्कमध्ये असताना तीस वर्षांपूर्वी 'बॅक स्ट्रीट' नावाचा एक चित्रपट मी पाहिला. एका तरुणाची व तरुणीची उद्यानात ठरलेली भेट एकाच क्षणाने चुकली आणि त्या बिचाऱ्या तरुणीला जन्मभर अज्ञातवासात राहावे लागले.

तुमच्या जीवनात अशी कितीतरी उदाहरणे सापडतील. यश आणि अपयश यांच्यातील रेषा निश्चित असते, आपण मात्र कधी केसभर अलीकडे असतो किंवा तितकेच पलीकडे असतो आणि याच थोड्या अंतराने यशाची व आपली चुकामूक होते.

कधी अलीकडे व कधी पलीकडे ! कभी आर कभी पार ! हा महत्त्वाचा शब्दप्रयोग आपण लक्षात घेत नाही. थोडक्यात चुकल्याने जसे अपयशाचे प्रसंग येतात तसेच थोडक्यात सावरल्यामुळे आपली अपेक्षा नसताना यश मिळाल्याचेही प्रसंग असतात. आपण मात्र अशा प्रकारच्या यशाचे स्मरण करून आशावादी होण्यापेक्षा अपयशाच्या प्रसंगांनीच जास्त खचून जातो.

अगदी काठावर मिळणारे यश आणि अपयश हे फारसे आपल्या हातात नसते. येथे थोडातरी दैवाचा भाग येतोच. अशा प्रसंगी एकच विचार करावा की थोडक्यात अपयशाप्रमाणे थोडक्यात यशही आपल्याला पुष्कळ वेळा मिळालेले आहे. आपण आटोकाट प्रयत्न केला. आता झालेला निकाल शांतपणे स्वीकारण्यात पुरुषार्थ आहे.

[१७-७-१९६२

# २२. राष्ट्रीय गुणांची पातळी

**देशाच्या** उत्कर्षाकरिता यंत्रसामग्री आणि उद्योगधंदे यांची गरज असते; परंतु तितकीच किंवा त्यापेक्षा अधिक गरज उद्योगधंद्यात यशस्वी होण्याकरिता लागणाऱ्या सद्‌गुणांची असते. या सद्‌गुणांचा विकास न झाल्यास यंत्राचा उपयोग लोखंडापेक्षा अधिक नाही.

जर्मनांच्या सहकार्याने रूरकेला या ठिकाणी पोलादाचा कारखाना निघाला, तो अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाला नाही. त्याच्या कारणांची मीमांसा करण्याकरिता सॉल्व्हिन कमिशन नेमले होते. अपयशाची चिकित्सा करताना या अहवालात जी कारणे दिली आहेत त्यांत Unsatisfactory discipline, high percentage of absenteeism, insubordination and other staff problems ही मुख्य आहेत. गैरशिस्त, गैरहजेरी, गैरवर्तन आणि सहकार्याचा अभाव या दुर्गुणांमुळे उत्कृष्ट यंत्रसामग्री काही करू शकली नाही. यावर उपाय म्हणून देखरेख करण्याकरिता अधिक जर्मन तज्ज्ञ आणावे लागणार आहेत.

औद्योगिक विकासाला लागणाऱ्या मानसिक सद्‌गुणांच्या दृष्टीने आपली राष्ट्रीय पातळी या प्रकारची आहे. या पातळीवरून अगदी थोडक्या काळात आपल्याला वर यावयाचे आहे. आपल्या एकंदर समाजात अधिक प्रमाणात शिस्त, अंग मोडून काम, परस्परांत सहकार्य आणि विनय हे गुण आल्याशिवाय वेगाने प्रगती होणार नाही.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनी आणि जपान या दोन्हीही देशांची धूळधाण झाली होती. बाँबच्या आणि तोफांच्या माऱ्याने इमारती आणि कारखाने बेचिराख झाले होते. पण एका पिढीच्या आमदानीत या दोन्ही देशांनी पुन्हा पूर्वीसारखीच प्रगती करून दाखवली आहे. नवीन इमारती बांधल्या, कारखाने उभारले, व्यापार वाढवला, जागतिक बाजारपेठा मिळवल्या आणि समाजाची आर्थिक स्थिती सुधारली. आपण त्यांच्यापेक्षा कितीतरी मागे आहोत. मागासलेले राष्ट्र म्हणून किती दिवस म्हणवून घेणार ?

गैरशिस्त, गैरहजेरी, गैरवर्तन आणि असहकार या दुर्गुणांमुळे आपली पीछेहाटच होईल. आपल्या वैयक्तिक आणि सामुदायिक जीवनात हे दुर्गुण नाहीसे करून उत्कर्षाला लागणाऱ्या मानसिक गुणांचा विकास करू या.

[ १५-८-१९६२

# २३. विद्यार्थी-वर्तनाची संहिता

**भारतीय** संस्कृतीमध्ये गुरू आणि शिष्य यांचे नाते अतिशय पवित्र मानले जाते. आईबाप शरीराला जन्म देतात; परन्तु बुद्धीला व मनाला जन्म देण्याचे काम गुरूचे ! म्हणून आईबापापेक्षाही जास्त महत्त्व गुरूंचेच !

गुरुशिष्य-नात्याचे आज अधःपतन झाले आहे. गुरूचा झाला शिक्षक आणि पुढे मास्तर ! शिष्य आणि विद्यार्थी ही संज्ञा जाऊन "शाळेतली पोरं" हा शब्दप्रयोग रूढ झाला. पवित्र नात्याऐवजी बाजारी नाते आले.

गुरुशिष्य-संबंधाला पुन्हा पूर्वीच्या उच्च स्थानावर नेण्याचा संकल्प राज्य-कर्त्यांनी केला आहे. त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी वागण्याची पूर्वपरंपरा पुन्हा सुरू केली पाहिजे. विद्यार्थी-वर्तनाचे काही प्राचीन संकेत सर्वांनी पाळले पाहिजेत; मग ते बाल असोत वा प्रौढ असोत. गुरूंच्या आसनावर बसू नये. गुरुजींना नेहमी अनेक वचनाने संबोधावे. तो, तू किंवा तुम्ही न म्हणता आपण म्हणावे. रस्त्यात गुरुजी भेटल्यास थोडे थांबून त्यांना नम्रतापूर्वक वंदन करावे. त्यांच्या हातात एखादे जड ओझे अथवा वस्तू असल्यास "मी घेऊ का ?" असे विचारून आपला आदर प्रगट करावा. गुरूपुढे सभ्यपणाने बसावे आणि ते उभे असताना आपण बसून न बोलता उभे राहून बोलावे.

आपले विद्यार्जन पूर्ण झाल्यावर आदराचे चार शब्द लिहून आपली कृतज्ञता व्यक्त करावी. हीच प्रेमाची गुरुदक्षिणा !

वरील प्रकारच्या आचरणाला पैसा लागत नाही. फक्त अंतःकरणाचे सौजन्य व दाक्षिण्य लागते ! शिक्षकाचा पेशा पूर्वी गरिबीचा होता आणि समाजातील संपत्ती कितीही वाढली तरी इतर व्यवसायांपेक्षा शिक्षकाचा पेशा यापुढेही कमी द्रव्यलाभाचाच राहणार.

अशा या जीवनात विद्यार्थ्यांचे प्रेम व शिक्षण पूर्ण करून संसारात पडलेल्या माजी विद्यार्थ्यांची कृतज्ञता ह्या गोष्टींनीच विरंगुळा मिळतो, कृतकृत्य वाटते, आनंदाची फुलबाग बहरते. संपत्ती न मिळाली तरी कृतज्ञ, सौजन्यशील, विनयशाली असे शिष्य मिळाले, असे समाधान वाटते.

तुम्ही म्हणाल, "पूर्वीच्या तोलाचे गुरू कोठे आहेत ?" पूर्वी काय किंवा आज काय, अत्युच्च आदर्शाचे गुरू थोडेच राहणार. सर्वसामान्य शिक्षकात

गुणाबरोबर एखाद-दुसरा दोष राहाणारच. आपण गुण घ्यावेत; दोषाकडे डोळे झाकावेत. प्राचीन गुरूंनीच असे सांगितले की, आमचे गुण आहेत ते घ्या, दोष घेऊ नका.

शिक्षकाच्या आणि अध्यापकाच्या व्यवसायाला 'मास्तरकी, मास्तरकी' म्हणून हिणवू नका. उपहास करू नका. तुच्छ लेखू नका. मास्तरकी हीच 'मास्टर–की' गुरुकिल्ली आहे. तुमच्या जीवनात क्रांती घडवून आणणारी ही मास्टर की आहे, हे लक्षात ठेवून गुरुजनांशी आदराने, सौजन्याने, सभ्यपणाने वागा. तुमच्या संस्कृतीला ते शोभून दिसेल.

[ १३–९–१९६२

# २४. जग जागे–आम्ही झोपेत

**दोन** आठवड्यांपूर्वीची घटना. एका अमेरिकन ॲस्ट्रॉनॉटने (अंतरिक्ष प्रवाशाने) नऊ तासांत ६ पृथ्वीप्रदक्षिणा केल्या. ही सर्व घटना आपल्या घड्याळाप्रमाणे सायंकाळी ६–३० वाजेपासून पहाटे ३–४५ पर्यंत घडत होती. हा सर्व वृत्तान्त अमेरिकन रेडिओवरून सर्व जगाला ध्वनिक्षेपित केला जात होता आणि त्याची दृश्ये अमेरिकेत आणि युरोपमध्ये टेलिव्हिजनवर दाखविली जात होती. अंतरिक्ष-प्रवाशाचे आकाशयान ज्या कंट्रोल सेन्टरवरून दिग्दर्शित केले जात होते तेथील डायरेक्टर मधूनमधून सर्व वृत्तान्त सांगत होता. अमेरिका आणि युरोपमधील लक्षावधी लोक हे सर्व ऐकत होते आणि पाहात होते. सात वर्षांच्या बालकापासून सत्तर वर्षांचे वृद्ध जगातील विज्ञानाची ही प्रगती डोळ्यांनी पाहात होते आणि कानांनी ऐकत होते.

हे सर्व चालू असताना भारतातील आम्ही बाल, तरुण आणि वृद्ध सुखाने झोपलो होतो.

या अंतरिक्ष प्रवासाचा वृत्तान्त कोलंबोच्या केंद्रावरून व्हॉइस ऑफ अमेरिकेतर्फे प्रक्षेपित केला जात होता; परंतु आमच्या बरोबर आमचे रेडिओही त्या वेळी झोपलेले होते. जपानमधून आणि अमेरिकेतून आणलेले जे ट्रान्झिस्टर रेडिओ दिवसभर आमच्या गळ्यात, घरांत आणि बाहेर लोंबत होते तेही त्यांच्या मालकांसह सुखनिद्रा घेत होते.

खरोखरी एक अमेरिकन तरुण जिवावर उदार होऊन नऊ तासांत सहा पृथ्वीप्रदक्षिणा करण्याला निघतो, हा प्रसंगच तरुणांना किती स्फूर्तिदायक असावयास

पाहिजे ! या प्रवासाची खडा न् खडा माहिती आपण ऐकू या, अशी जिज्ञासा, त्यांच्या ठिकाणी असावयास पाहिजे ! अमेरिकेतील, इग्लंडमधील, जर्मनीतील, जपानमधील तरुण ह्या पराक्रमी आणि साहसी घटनेमधून स्फूर्तीचा संचय करीत असतात. त्यांच्या स्फूर्तीच्या बळावर त्यांचे देश आगेकूच करणार आहेत. आमच्या तरुणांचे भावी कालातील व्यवहार जगातील पुढे गेलेल्या या देशांतील तरुणांशी आहेत, ही गोष्ट लक्षात ठेवून आपली पूर्वतयारी केली पाहिजे.

तीन शतकांपूर्वी युरोपियन साहसी प्रवाशांनी आपल्या देशात येऊन साम्राज्य स्थापन केले, त्या वेळी आमच्या तरुणांना जगाची काही ओळख नव्हती, तशी साधनेही नव्हती. आज रेडिओसारखी साधने उपलब्ध आहेत. अथांग जगात काय चालले आहे ते ऐकण्याचे कान आपल्याला उपलब्ध झालेले आहेत. या दृष्टीने आपण त्यांचा उपयोग करतो काय ? रेडिओमुळे सर्व जग आपल्या घरात आले आहे. पण तेथे काय चालले आहे ते न ऐकता आम्ही फक्त फिलमी संगीत ऐकतो. दोन्हीकडे कान द्या.

[१०-१०-१९६२

# १५. सावध राहाणार का गाफील ?

**तुमच्या** ठिकाणी सावधानतेचा गुण आहे का ? थोडे आत्मनिरीक्षण करा. जाणीवपूर्वक या गुणाचा विकास करण्याचा सतत प्रयत्न करा.

सावधानतेचा गुण प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी पाहिजे. व्यक्तीच्या ठिकाणी या गुणाचा उत्कर्ष झाला म्हणजे राष्ट्रामध्येही तो आपोआप येईल. सावधानता हा आपला राष्ट्रीय गुण झाला पाहिजे.

सावधानता म्हणजे सर्वत्र लक्ष. सर्वत्र तसेच सतत. बुद्धीने, मनाने, नेत्राने व कानाने सतत चाचणी घेऊन आपल्या आजूबाजूला काय चालले आहे आणि आपण काय करावयास पाहिजे, ही वृत्ती म्हणजेच सावधानता. हा गुण व्यक्तीच्या ठिकाणी नसल्यास त्या जागी गाफीलपणा आणि निष्काळजीपणा हे दुर्गुण घर करू लागतात.

रानावनातील प्राणी पाहा. सावधानतेचा उत्कृष्ट नमुना. अन्नाचा शोध आणि स्वतःचे रक्षण या गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीने त्यांचे डोळे, कान, मान आणि पाय सतत आणि सर्व ठिकाणी किती जागरूक आणि चपळ असतात ते पाहा. त्यांना गुरू करा.

अवधान म्हणजे लक्ष. सावधानता म्हणजे सदोदित सर्वत्र लक्ष देऊन व्यवहार करण्याची वृत्ती. सध्या आजूबाजूला काय चालले आहे, आणि लौकरच येणाऱ्या

भावी काळात काय होणार आहे, याचा सतत विचार म्हणजे सावधानता. याच्या उलट शेजारी काय चालू आहे आणि उद्या काय होईल याविषयी अज्ञान म्हणजे दुर्लक्ष किंवा गाफीलपणा. सावध माणसाची बुद्धी, मन, इंद्रिये आणि शरीर सतत चपळ असतात. गाफील माणसाची बुद्धी आणि शरीर, दोन्ही सुस्त आणि निद्रिस्त असतात. सावधानता हे जिवंतपणाचे लक्षण आहे.

तुम्हांला प्रपंचात या गुणाचा उपयोग होईल. त्यामुळे लहान सहान अपघात टळतील. चोरीचे प्रमाण कमी होईल. मुलांना कुसंगती लागणार नाही. तुमच्या नोकरीत, व्यापारधंद्यात आणि सार्वजनिक जीवनात या गुणाचा बुद्धिपुरःसर उपयोग केल्यास तुमचा उत्कर्ष होईल.

राष्ट्रीय जीवनात तर ह्या सद्‌गुणाची अतोनात जरुरी आहे. जे राष्ट्र गाफीलपणा सोडून सतत जागरूक राहते त्याच्यावर परचक्र येणार नाही आणि आले तरी शत्रूची धूळधाण झाल्याशिवाय राहणार नाही.

सावधानतेचा गुण कसा वाढवावा ? तुमची कर्तव्यक्षेत्रे ठरलेली आहेत. रोज मनाने त्यांची उजळणी करा. त्या प्रत्येक क्षेत्राच्या बाबतीत मी काय केले आणि काय करावयास पाहिजे, याचा दिवसातून शक्य तितक्या अधिक वेळ विचार करा. सावधानतेचा गुण तुमच्या ठिकाणी आपोआप निर्माण होईल.

व्यक्तीच्या या गुणाचा फायदा देशालाही होईल.

[१४-१-१९६३

# २६. तलवार, तराजू, हातोडा, नांगर आणि लेखणी

**समाजाची** वाढ सर्व बाजूंनी व्हावयास पाहिजे. सर्व क्षेत्रांत नैपुण्याने काम करणारी माणसे तयार करण्याची योजना दूरदर्शी समाज करीत असतो. अशा माणसांत खालपासून वरपर्यंत सर्व पातळीवरची लहान-थोर माणसे लागतात. नेते लागतात तशी सामान्य माणसेही लागतात.

तलवार ही देशाच्या रक्षणाचे प्रतीक आहे. तराजू देशाच्या व्यापाराची व आर्थिक स्थितीची दर्शक आहे. हातोडा हा उद्योगधंद्याच्या वाढीचा निदर्शक आहे. नांगराने शेतीचा उत्कर्ष व्यक्त होतो आणि लेखणी ही समाजाच्या बुद्धिमत्तेची निशाणी आहे.

सैनिक, व्यापारी, कारागीर, शेतकरी आणि विचारी लेखक अशा सर्वांची देशाला सतत गरज असते. असे सर्व लोक तयार करण्याची योजना दूरदर्शी नेते करतात.

परंतु यांतील लेखणी अशी आहे की इतर चारही व्यवसायांशी तिचे सहकार्य झाले तर त्या लेखणीच्या लेखनाला तेज चढते आणि जोम येतो.

लेखणीच्या हातामागील अंतःकरणात आणि डोक्यात ज्या भावना, जो अनुभव व जे विचार असतील ते कागदावर उमटतील. सैनिक, व्यापारी, कारागीर आणि शेतकरी यांनी लेखणीशी काडीमोड करण्याची गरज नाही. किंबहुना याच व्यावसायिकांनी आपापले अनुभव व विचार कागदावर लिहिले तर समाजाला त्यांचा फार उपयोग होईल.

लेखनाकरिता लेखन करण्यापेक्षा अनुभव प्रतिपादण्याकरिता लेखन झाले तर नव्या पिढीला अधिक मार्गदर्शक ठरते.

आजच्या मराठी वाङ्मयात पुरेशी विविधता नाही. विविध क्षेत्रांत अनुभव घेतलेल्या व्यक्तींनी लेखन केले नाही तोपर्यंत हे दारिद्र्य असेच चालू राहणार रणक्षेत्रावर, व्यापारात, कारखान्यात आणि शेतावर अनुभव घेतलेले लोकही लेखणीला चालना देतील तर मराठी वाङ्मय बहुरूपी आणि संपन्न होईल. अशा वाङ्मयाची उपकारात्मक आणि अनुकूल प्रतिक्रिया समाजातील सर्व क्षेत्रांतील व्यक्तींवर आणि व्यवसायांवरही पडेल.

तुमचा व्यवसाय कोणताही असो—तुमचा अनुभव, तुमच्या भावना, तुमचे विचार, तुमचे ज्ञान लिहून काढा. समाजाला ते हवे आहे. अनुभवाचा जिवंतपणा त्यात असल्याने त्यालाही ललित वाङ्मयाचा साज चढवता येईल. आजच्या ललित वाङ्मयाला आलेला एकांगीपणा त्यामुळे कमी होईल.

[ १८–२–१९६३

# २७. निराशेवर मात करा

**तुम्हाला** कधी निराशेचा प्रसंग आला आहे काय ? त्या वेळी तुम्ही आपल्या मनाला कसे सावरून धरलेत ? किती दिवस निराशेत गेले ? पुन्हा मनाचा उत्साह येण्याला किती दिवस लागले ? कोणत्या गोष्टीत पुन्हा तुमचे मन रममाण झाले ? पुन्हा एखाद्या आशेच्या मागे तुम्ही लागलात काय ? एकदा आशेची निराशा झाली तरीही, पुन्हा यशाची आशा ठेवून दुसऱ्या गोष्टींमागे लागलात ना ?

मनुष्य आशेवर जगत असतो. लहान असो वा मोठा असो. बाल असो किंवा प्रौढ असो, आपापल्या कुवतीप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे एखाद्या गोष्टीची आशा ठेवीत असतो व त्या आशेवर जगत असतो. ही आशा मनाला उत्साह देते आणि कर्तव्याला प्रेरणा देते.

मनात बाळगलेली ही आशा कधी फलद्रूप होते किंवा कधी निष्फळ होते. ज्या वेळी आशा फोल होते त्या वेळी माणूस कसे वागतो हे अतिशय महत्त्वाचे आहे. एखादा निराशेच्या खोल दरीत कोसळतो, खचून जातो. निराशावादी, निरुत्साही, उदासीन असा होऊन आयुष्याचे दिवस ढकलीत राहतो.

उलट दुसरा एखादा निराशेवर मात करून पुन्हा दुसरी एखादी गोष्ट हातात घेऊन, पुन्हा यशाची आशा बाळगून, पूर्वीइतक्याच उत्साहाने व जोमाने कामाला लागतो. जीवनात असे हे चक्र चालूच असते.

बाह्य परिस्थिती आपल्या हातात नाही तोपर्यंत यश हे सर्वस्वी आपल्या हातात नाही. म्हणून आपल्या आशा कधी पूर्ण होणार, तर कधी फोल होणार. हा जीवनात जगाचा नियमच आहे. यशापयशाची शक्यता निम्मानिम असते.

माणसाने एकाच गोष्टीच्या आशेवर मन केंद्रित न करता, अनेक गोष्टींचा व अनेक आशांचा पाठलाग एकाच वेळी चालू ठेवावा; म्हणजे एखाद्या गोष्टीत, अपयश आले तरी हातात घेतलेल्या दुसऱ्या गोष्टीचा पाठलाग करण्यात लक्ष लागेल व मनाची उमेद तिकडे वळवता येईल. मनात एकदम पोकळी निर्माण होणार नाही.

कर्मयोगी व्यक्तींच्या आचरणावरून, त्यांच्या अनुभवावरून या सिद्धांताची सत्यता पटते. परीक्षा-निकाल, नोकरी, बढती, व्यवसायात फायदा, विवाह, प्रेमप्रकरण, अपत्यप्राप्ती, पुत्रसुख, संसारसुख, निवडणूक, सामाजिक सन्मान— अशा अनेक गोष्टींत आपण आशा ठेवून कामे करीत असतो व यशाची अपेक्षा करीत असतो. म्हणून विद्यार्थ्यांना आणि प्रौढांना, सार्वजनिक कार्यकर्त्यांना व प्रापंचिक व्यक्तींना, लहान लहान आशा किंवा मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा बाळगणारांना, सर्वांनाच वरील सिद्धांत उपयोगी पडेल.

बंदुकीत दोन तरी गोळ्या असाव्यात. अंतःकरणातही निदान दोन आशा आकांक्षा ठेवाव्यात.

[ १५-३-१९६३

# २८. अर्धा पेला भरलेला !

**एकदा** दोन मित्र सुखदु:खाच्या गप्पा मारीत बसले होते. त्यांच्यापुढे थंड पेयाने भरलेला अर्धा ग्लास ठेवलेला होता. एक जण म्हणाला, "हा अर्धा पेला रिकामा आहे." त्यावर दुसरा म्हणाला, "हा अर्धा पेला भरलेला आहे." एकाच प्रश्नाकडे निराशावादी आणि आशावादी माणसे कशा तऱ्हेनें पाहातात याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहेत.

संसारात, जीवनात, समाजात आणि जगात, प्रत्येक क्षेत्रामध्ये थोडयाफार प्रमाणात चांगले वाईट आहे. दोन्हीही भास आहेत. सर्वत्र केवळ चांगले असे कधीच नव्हते आणि सर्वत्र केवळ वाईट असेही कधी होणार नाही.

महाभारताच्या काळामध्ये गीता सांगताना श्रीकृष्णाने आपण अवतार का व केव्हा घेतो त्याची मीमांसा करताना असे सांगितले, "परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम् ।" आणि अशा रीतीने, "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे ।।" हा परमेश्वराचा अवतार आपल्या अंत:करणातच आहे. सज्जनांना सुख मिळावे आणि दुष्टांचा नायनाट व्हावा ही प्रत्येकाच्या अंत:करणातील इच्छा हाच परमेश्वराचा अवतार आहे.

जगात काळोख आहे तितक्याच प्रमाणात प्रकाश पण आहे. कृतघ्न माणसे पुष्कळ आहेत पण त्याचबरोबर कृतज्ञ माणसेही काही कमी नाहीत. लाचलुचपत घेणारे व देणारे पुष्कळ आहेत; पण अशा मोहाला बळी न पडणारेही पुष्कळ आहेत. महाभारतकाळी देखील दुष्ट लोक होते तसेच साधूही होते.

जग आणि जीवन हे अनादिकालापासून विरोधी गोष्टींनी विणले गेले आहे. वस्त्राला आडवे उभे धागे असतात त्याप्रमाणे संसाराचे आहे. त्यात सुख आणि दु:ख, यश व अपयश, मान आणि अपमान प्रेम व द्वेष, मित्र आणि शत्रू, संपत्ती व आपत्ती—अशी अनेक द्वंद्वे आहेत. विचारी माणूस त्या दोन्हींकडे एकदम पाहतो आणि समाधानी राहतो. अज्ञानी माणूस एका वेळी एकाच गोष्टीकडे पाहतो त्यामुळे तो कधी सुखाच्या शिखरावर बसतो तर कधी दु:खाच्या खोल दरीत कोसळतो. स्तुती झाली की त्याला हर्षवायू होतो आणि कोणी निंदा केली की रडायला लागतो. म्हणून जीवनाकडे साकल्याने पाहा. एकांगी दृष्टी ठेवू नका.

जगात साधूंचा, सज्जनांचा, नीतीने वागणाऱ्यांचा जय व्हावा अशी इच्छा मनात बाळगू या. सत्याला आणि सत्कृत्याला सतत उत्तेजन देऊ या. जगातील सत्याचरणी माणसांत निदान एका माणसाची भर आपण घालू शकू.

कोणाची ? स्वतःचीच ! असे अनेकांनी करावयाचे ठरविले तर समाजात सज्जनांचे प्रमाण आपोआप वाढेल.

[ ६–४–१९६३

# १९. मानवाला आपली देणगी काय ?

**विज्ञान,** यंत्रशास्त्र आणि मानवशास्त्र यांच्या क्षेत्रांत रोज नवे नवे शोध लागत आहेत आणि नवे नवे उच्चांक स्थापन होत आहेत. प्रत्येक वेळी विचार येतो—या मोहिमेत आम्ही कोठे आहोत ?

अमेरिका–आफ्रिका–ऑस्ट्रेलिया खंडांचे शोध लागले. उत्तर ध्रुवाचा आणि दक्षिण ध्रुवाचा शोध अगदी अलीकडे लागला आणि चालू आहे. हिमालयाची उत्तुंग शिखरे पायाखाली घातली जात आहेत आणि समुद्राच्या तळाशी असलेली प्रतिसृष्टी शोधली जात आहे. पृथ्वीच्या पोटातील द्रव्यांचा शोध चालू आहे आणि अंतरिक्ष-संचारात चंद्र-सूर्याच्या शोधाकरता शर्यती चालू आहेत.

यात भाग घेणारे पुरुष आहेत आणि स्त्रियाही आहेत. परंतु हे सर्व पाश्चिमात्य जगातील आहेत.

वाहनांचे शोध घ्या. रेल्वे, मोटार, सायकल, विमान, यांत्रिक जहाज—सर्व शोध लावण्याचे श्रेय इतरांचे आहे. तीच गोष्ट इतर यंत्रशास्त्रात आहे.

ही झाली विज्ञानातील आणि यंत्रक्षेत्रातील प्रगती. विचार-क्षेत्र तर सर्वांना खुले आहे ना ? त्यातही लोकशाही–समाजवाद–साम्यवाद अशा प्रचलित तत्त्वांचा शोध किंवा विस्तार विचारवंतांनीच केला. समाजशास्त्र, भाषाशास्त्र,मानसशास्त्र, अर्थशास्त्र—सर्व वैचारिक क्षेत्रांतही अद्ययावत जोमाने प्रगती इतरत्र होत आहे.

या सर्व शोधांचा व प्रगतीचा फक्त फायदा आपण घेत आहोत. आपण फक्त गिऱ्हाईक आहोत; संशोधक आणि निर्माते अन्य आहेत; अन्यत्र आहेत. ही स्थिती आता पालटली पाहिजे. निसर्गावर चालू असलेल्या मानवाच्या मोहिमेत आपणही सामील झाले पाहिजे. समाज आणि जीवनविषयक वैचारिक क्षेत्रात आपणही मूलभूत विचारांची भर टाकली पाहिजे.

नवीन ज्ञानाची उत्पत्ती आणि संशोधनाचे मूळ शोधून काढा; विचारांत बदल करा. त्याशिवाय ही संशोधक वृत्ती आपल्या समाजात येणार नाही. चिरकाल रूढ आणि प्रतिष्ठित झालेले विचार, पद्धती व उपकरणे यांच्याविषयी आपण नव्याने विचार करू लागलो की नव्याने कल्पना सुचू लागतात. तायचुंग भात

आणि संकरित मका यांच्या पद्धती परदेशांतूनच आल्या पाहिजेत का ? जपानी लोकांनाही घेण्यासारखी कर्जत-राईस पद्धती का निर्माण होऊ नये ? आमच्या घरातील पाटा-वरवंटा आणि केरसुणी ही आमच्या संशोधक पराङ्मुखतेची निदर्शक आहेत. हजारो वर्षे गेली तरी त्यांत सुधारणा नाही !

वैचारिक आणि व्यावहारिक अशा प्रत्येक क्षेत्रात सुधारणा आणि संशोधन करण्याची दृष्टी ठेवली तर काही अलौकिक शोध आपणही जगाला देऊ. आज तरी बौद्धिक दृष्टीने आपण बांडगुळासारखे आहोत; इतरांच्या संशोधनावर जगत आहोत.

मानवजातीला आपल्या बुद्धीची, संशोधनाची आणि प्रतिभेची फळे भारतीयांनीही दिली पाहिजेत.

[ १८-६-१९६३

## ३०. एकाच माळेचे मणी !

**आजच्या** युगात व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनाला विलक्षण वेग मिळालेला आहे. अत्यंत वेगाने जाणारी वाहने निर्माण होत आहेत आणि होणार आहेत. जी प्रगती वाहनांच्या बाबतीत तीच जगातल्या प्रत्येक क्षेत्रात अत्यंत जलदीने घडून येत आहे. प्रश्न असा येतो की, या प्रगतीच्या प्रमाणात प्रत्येक माणसाने आपल्या स्वतःच्या प्रवृत्तीत आणि काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा केली आहे का अधोगतीच होत आहे ?

प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक घटकेला समाजात अनेक प्रकारचे अपघात होत आहेत. त्या अपघातांत शेकडो निष्पाप बालकांचे, असहाय्य स्त्रियांचे आणि कर्तबगार पुरुषांचे प्राण बळी पडत आहेत ! माल-मोटारींचे अपघात, उतारूंच्या मोटारींचे अपघात, रेल्वेचे अपघात, विमानांचे अपघात—अशा प्रकारचे वेगवान वाहनांचे अपघात रोज चालू आहेत. अपघातांची क्षेत्रे इतरत्रही पुष्कळच आहेत. अन्नातील भेसळीमुळे अनेक जीव मृत्युमुखी पडतात. चुकीच्या औषधामुळे अनेक जीव प्राणाला मुकतात. गैरहिशेबी बांधकामामुळे इमारती कोसळून माणसांची हत्या होते. कारखान्यातील यंत्र चालविण्याच्या चुकीमुळे अनेक लोक मृत्युमुखी पडतात. हीच यादी पुष्कळ लांबविता येईल.

हे अपघात ऐकले म्हणजे आपण अपघात करणाराला दोष देऊन मोकळे होतो. थोडा विचार केला तर असे दिसून येईल की, ज्या दुर्गुणांमुळे हे अपघात

होतात ते दुर्गुण आपल्यातही आहेत आणि सर्व समाजातही आहेत. हलगर्जीपणा, अनास्था, चालढकल, विलंब, चुकारपणा, हेळसांड, बेपर्वाई आणि बेफिकिरी हे दुर्गुण बहुतेक अपघातांच्या मुळाशी आहेत. या दुर्गुणांमुळे कधी आपण स्वतः बळी जातो आणि कधी आपण इतरांचा बळी घेतो !

दोष आणि दुर्गुण एकाच माणसाचा असतो. पण एका व्यक्तीच्या दोषामुळे ती स्वतः प्राणाला मुकते आणि त्याचबरोबर इतरांनाही बळी देते. निसर्गाचे नियम मोडले की अपघात होणारच.

याला उपाय एकच. आपल्या स्वतःपासून सुधारणेला सुरुवात करू या. तुमचे काम कोणते का असेना, जीवनाची सवय या दृष्टीने प्रत्येक कामात निष्ठा, बिनचूकपणा, वक्तशीरपणा, काटेकोरपणा, कर्तव्यदक्षता, उत्कृष्टपणाची महत्त्वाकांक्षा, व्यवस्थितपणा, समाजाची काळजी इत्यादी गुण वाढविण्याची प्रवृत्ती ठेवा. तुमच्यामुळे भोवतालच्या समाजात हे गुण वाढीला लागतील. हळूहळू सर्व समाजात सुधारणा होईल.

आज होणाऱ्या अपघातांच्या मुळाशी जी दुर्गुणांची प्रवृत्ती आहे ती प्रवृत्ती समाजाला मारक आहे. त्या दोषांचे अनुकरण करून अपघात करणारांच्या माळेत तुम्ही बसू नका. आज तरी आपण सर्व एकाच माळेचे मणी आहोत. ह्यात सुधारणा करा.

[१२-७-१९६३

# ३१. आता विशाल दृष्टी ठेवा

**गेल्या** दोन हजार वर्षांत आपल्या पूर्वजांनी ज्या चुका केल्या त्या आता पुन्हा करण्याला आपणाला सबब नाही. अकराव्या शतकात व त्यापूर्वी आलेले परके लोक कोठून आले, कसे आले त्यांची येथील राज्यकर्त्यांना माहिती नव्हती. सोळाव्या शतकापासून पश्चिमेकडील लोक भारतात आले, त्याचीही त्या वेळच्या सुशिक्षितांना फारशी माहिती नव्हती.

आज नवीन जग जन्मास येत आहे. नवी राष्ट्रे, नवे देश, नवी शस्त्रास्त्रे, नवे समाज आणि नवीन तत्त्वज्ञाने अस्तित्वात येत आहेत. त्या सर्वांची माहिती असलेली, माहिती घेण्याची कुवत असलेली, या ज्ञानाचा उपयोग जाणणारी आणि उपयोग करणारी माणसे पाहिजेत ! तीच उणीव आहे !

जग भारताकडे पाहात आहे; पण भारताला मात्र जगाचे अज्ञान आहे. साक्षर आणि शिक्षित पुष्कळ आहेत पण किती जणांना नवीन जगाचे ज्ञान आहे ?

घाना, सोमाली, लाओस, व्हिएतनाम, बोर्निओ, चिली, क्यूबा—अशा या नवीन जगाची माहिती नसलेलेच बहुसंख्य आहेत. 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्'—जगात आर्य धर्माचा प्रसार करू, असे कंकण बांधणारांना प्रथम जगाची माहिती असणे जरूर नाही का ?

इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान, जर्मनी इत्यादी पुढारलेल्या देशांची माहिती अनेक जणांना असते. पण आता जगात नवे नवे देश स्वातंत्र्य मिळवीत आहेत, जागृत होत आहेत, प्रगती करीत आहेत. आधुनिक प्रगतीत भारताच्या आगेमागे आहेत. आज उद्या ते बरोबरीला येतील, आणि आपल्या पुढेही जातील. आफ्रिकेतील अनेक देश आता मुक्त झाले आहेत. दक्षिण अमेरिकेतील देशांत संक्रमण होत आहे. मध्यपूर्व आणि अतिपूर्व प्रदेश संघर्षाचे स्थान होत आहे.

रोज काही ना काही निमित्ताने या देशांचे उल्लेख वर्तमानपत्रात आणि रेडियोवरील वार्तापत्रांत येत असतात. तुम्ही या देशांची नावे ऐकता आणि अपरिचित म्हणून सोडून देता. तसे करू नका. जगाचा नकाशा घरात ठेवा. हे देश कोठे आहेत ते पहा. तुम्ही पाहा, मुलांना दाखवा, बायका मंडळींना आणि प्रौढांना दाखवा. त्या देशांविषयी मिळेल तेवढी माहिती तुम्ही घेत जा आणि घरांत इतरांना देत जा.

नवीन जगाचा आपल्याला अनेक दृष्टींनी उपयोग आहे. आपल्या व्यापाराचे ते नवे क्षेत्र आहे. राजकारणात त्यांच्या सहानुभूतीची आपल्याला गरज आहे. आपले तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ त्यांना हवे आहेत. विवेकानंद, टागोर आणि गांधी यांच्या विचारप्रसाराचे ते नवे क्षेत्र आहे.

जगाच्या ज्ञानाची साधने पूर्वजांना नव्हती. ती आपल्याला उपलब्ध आहेत. त्यांचा उपयोग न केल्यास पुन्हा आपली पीछेहाट होईल.

हे नवे आव्हान आहे. ते न स्वीकाराल तर जगाच्या स्पर्धेत हराल !

[ १५–८–१९६३

## ३२. तुमच्या व्यवसायाचा वेदान्त

**गेल्या** महिन्यात एका इंग्रजी मासिकातली गोष्ट मी वाचली आणि मला गहिवरून आले व डोळयात आनंदाश्रू उभे राहिले. सुप्रसिद्ध अशा एका सर्कसमध्ये तिच्या मुख्य मालकाने एक धाडसाचा आणि अलौकिक असा प्रयोग बसविला होता. हा प्रयोग अनेक वेळा यशस्वी झाला. परंतु एके दिवशी अपघात होऊन

तीन माणसे मेली व इतर माणसे जखमी झाली. ह्या प्रसंगानंतरचा राहिलेला प्रयोग, आणि अयशस्वी झालेल्या प्रयोगाची यशस्वी आवृत्ती मालकाने प्रेक्षकांना करून दाखविली. ती झाल्यानंतर तो आपल्या खोलीत आला आणि आपल्या सहकारी बंधूंच्या देखत ढसढसा रडू लागला. ते पाहून त्याचा दोस्त म्हणाला, "अरे, असे रडून कसे चालेल ? पुढच्या मुक्कामाच्या आणि प्रयोगाच्या कामाला लागले पाहिजे. लोकांना धाडशी वृत्ती शिकविण्याचा आपला धंदा आहे. तो सोडून कसे चालेल ?" "वुई मस्ट गो ऑन सेलिंग करेज टु पीपल; दॅट इज अवर मिशन."

भगवद्गीतेत सांगितलेला कर्मयोग यापेक्षा काही निराळा आहे काय ?

प्रत्येक धंद्याला आणि व्यवसायाला काहीतरी विचारांची भूमिका असते, काहीतरी उद्देश असतात. बहुसंख्य लोक पोटाकरता, संसाराकरता, फायद्याकरता आपापली कामे करीत असतात. ह्या विचारातून कोणीच सुटत नाही. पण याच्या पलीकडेही पाहणारे काही थोडे लोक असतात. इतर लोक जे व्यवसाय केवळ भाकरीकरता करतात त्याच व्यवसायांना आपल्या अंतःकरणात ते एका उच्च ध्येयवादाची बैठक देतात. आपल्या धंद्याचा उपयोग इतरांनाही झाला पाहिजे, समाजाचे हित त्यामुळे साध्य झाले पाहिजे, माझे पोट आणि माझा संसार, यापेक्षा अधिक व्यापक स्वरूपाची सिद्धी माझ्या व्यवसायातून मी करीत आहे, अशा वृत्तीने ते आपली कामे करतात.

व्यवसाय एकच पण त्याकडे पाहण्याची दृष्टी बदलल्याबरोबर कार्यकर्त्याच्या मनातही किती फरक पडतो ! तो केवळ हमालासारखा दीनपणे राबत नाही. शाश्वत व्यापक स्वरूपाचा, निःस्वार्थी हेतूचा, ध्येयवादाचा आनंद त्याला होत असतो. त्यामुळे त्याला सतत स्फूर्ती मिळते. प्रासंगिक निराशेवर तो मात करतो. मनाची ईर्षा व उमेद जिवंत ठेवतो.

यालाच म्हणतात व्यवसायाचा वेदांत. आपापली कामे निष्काम वृत्तीने, कर्तव्यबुद्धीने, समाजहिताच्या दृष्टीने आणि सर्वस्व-समर्पणाच्या भावनेने केली म्हणजे त्यात माणसाला आनंद मिळतो. समाधान प्राप्त होते. द्रव्यप्राप्ती आणि कीर्ती सर्वांना सारखीच मिळते असे नाही. केवळ या दोन गोष्टींकरताच व्यवसाय करणारांना सतत असमाधान आणि दुःख वाटत राहील. डॉक्टर, वकील, व्यापारी, कारखानदार —कोणीही कितीही मोठा झाला तरी त्याच्यापेक्षाही मोठे लोक आहेत तोपर्यंत हा लहानच राहणार. माझ्या कुवतीप्रमाणे मी इतरांच्या उपयोगी पडतो आणि त्याचबरोबर द्रव्यार्जन करतो या एकाच गोष्टीने माणसाला समाधान मिळू शकते. अगदी स्वार्थी माणूस नेहमी दुःखीच राहणार.

तुमच्या कामाची वैचारिक बैठक काय आहे ?

[१८-९-१९६३

# ३३. गृहस्थांची घरे

**तुम्ही** गृहस्थाश्रमी आहात काय ? तसे असल्यास तुमचे घर हे खऱ्या अर्थाने गृह आहे का ? गृहस्थाश्रमी माणसाचे गृह म्हणजे तुमची काय कल्पना आहे आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे ? तुमच्या परिचित मित्रमंडळीपैकी किती जणांची घरे गृह या नावाला पात्र आहेत ?

घर म्हणजे केवळ निवारा देणाऱ्या चार भिंती व छप्पर नाही. ती निव्वळ भोजनाची व विश्रांतीची जागा नाही. या गोष्टी हॉस्टेलात व होटेलात मिळतात. त्यांना कोणी घर म्हणत नाही.

कुटुंबातील सर्व माणसे जेथे प्रेमाने संस्कारमय वातावरणात राहतात आणि स्वतःची मानसिक, बौद्धिक व आत्मिक उन्नती करून घेतात ते खरे घर. या दृष्टीने आपल्या गृहाकडे पाहा. भोजन, राहाणे आणि विश्रांती यांपेक्षा तुमच्या घरात अधिक काय काय होते ?

घरातील सर्व माणसांना काही सामुदायिक असा बौद्धिक कार्यक्रम असतो का ? चांगल्या ग्रंथांचे वाचन, सात्त्विक विषयावर चर्चा, विद्वान माणसांचा घराशी संबंध—यापैकी काही गोष्टी घरात होतात ?

धार्मिक, नैतिक आणि अध्यात्मिक दृष्टीने तुमची जी काही मते असतील त्यांना अनुसरून सर्वांचा असा काही कार्यक्रम होतो काय ? सामुदायिक प्रार्थना, पूजा, उपासना, धर्मग्रंथ वाचन, चिंतन इत्यादी गोष्टींना काही ना काही स्वरूपात वाव आहे का ?

तुमच्या घरात काही नित्यनैमित्तिक दानधर्म होतो का ? समाजातील रंजले गांजलेल्यांची आठवण कशा स्वरूपात ठेवली जाते ?

घरातील माणसे आजारीपणात न सांगता परस्परांची शुश्रूषा करतात का ? घरातील कष्टाच्या कामात सर्वांची भागीदारी आहे का नाही ?

घरातल्या माणसांच्या सद्गुणांना बाकीचे लोक वाव देतात का ? परस्परांच्या गुणांचे प्रेमाने कौतुक करतात का एकमेकांना हिणवून नाउमेद करतात ? दिवसातून, आठवड्यातून, महिन्यातून कधी तरी आबाल-वृद्ध एकत्र येऊन सामुदायिक करमणूक व मनोरंजन करतात का ? का जो तो आपापली बाहेर सोय पाहतो ?

अगदी महत्त्वाची गोष्ट म्हणजे घरात शांत वातावरण आहे का सतत भांडणे कचकच, रागवारागवी आणि चिडवाचिडवी चालू आहे ?

वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टी ज्या गृहात होतात तेथेच सद्‌गुणांची वाढ होते. तेथे सत्पुरुष व साध्वी जन्म घेतात. चांगल्या संस्काराची माणसे तयार होतात. अशा गोष्टी होत असल्या तरच ते गृह. नाही तर ती केवळ खाणावळ !

समाजाला स्थैर्य देणारी कुटुंबसंस्था अशा घरातून वाढीला लागते. गृहस्थाश्रमी जनांनी आत्मनिरीक्षण करावे. गृहाला संस्काराचे केंद्र करावे.

[ १८–१०–१९६३

## ३४. जुनी नाणी–पण सोन्याची

**आजकाल** जुन्या विचारांना आणि कल्पनांना जुने आणि बुरसट म्हणून हिणविण्याचा आणि तुच्छ लेखण्याचा प्रयत्न चाललेला आहे, आणि सांस्कृतिक संस्कार नसलेल्या आपल्या तरुण पिढीवर याचा अनिष्ट परिणाम होत आहे. अनेकांचे जीवन अकाली उध्वस्त होत आहे.

मातृप्रेम, पितृप्रेम, पातिव्रत्य, पतिभक्ती, बंधुभगिनी प्रेम, ब्रह्मचर्य, कौमार्य, इतर स्त्रियांविषयी माताभगिनींची भावना, मानसिक पावित्र्य, स्वार्थत्याग, दानधर्म, पापपुण्य, शुद्ध चारित्र्य, यज्ञ, तप, आत्मसंयम, एकपत्नीव्रत, स्वामिभक्ती, गुरुभक्ती—या व अशा प्रकारच्या कल्पना गेल्या ४–५ हजार वर्षांत भारतातील तत्त्वज्ञांनी, विचारवंतांनी आणि समाजशास्त्रज्ञांनी अनुभवाच्या आधारावर शोधून काढल्या, प्रचलित केल्या आणि लोकमान्य केल्या. या एकेका शब्दामागे किती तरी विचार आणि अनुभव साठलेला आहे.

पण आज हे विचार आणि हे शब्द बोलण्याची चोरी झालेली आहे. त्यांचा उपहास, बोलणाराचाही उपहास होतो. पाश्चिमात्य समाजाकडून येणाऱ्या स्वस्त वाङ्मयाच्या उथळ विचाराने भडकून गेलेले आणि पैशाकरिता लिहिणारे काही उथळ साहित्यिक हे याला जबाबदार आहेत. पाश्चिमात्य विद्येतील केवळ शास्त्राचा आणि विज्ञानाचा अभ्यास करून पाश्चिमात्य किंवा पौर्वात्य संस्कृती, तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्र यांचा गंधही नसलेले एकांगी शास्त्रज्ञ आणि विज्ञानपंडित हे देखील काही अंशी या परिस्थितीला जबाबदार आहेत.

समाजाच्या धारणेकरिता, कुटुंबाच्या स्थैर्याकरिता आणि व्यक्तीच्या जीवनात सुखसमाधान, शांती आणि आनंद निर्माण करण्याकरिता या कल्पना आजपर्यंत उपयोगी पडल्या. कुठल्याही समाजाला त्या यापुढे उपयोगी पडतील. पाश्चिमात्य समाजातील विचारवंतांच्या क्षेत्रात आजही ह्या सात्त्विक कल्पनांना मान आहे.

ह्या कल्पनांच्या अगदी उलट आणि विरोधी असलेल्या विचारांचा प्रादुर्भाव आपल्या जीवनामध्ये होत आहे. केवळ उपभोगाचे तत्त्वज्ञान, वैयक्तिक स्वार्थ-परायणता, समाजाला पराङ्मुख असलेली स्वार्थनिष्ठा, अर्थप्राधान्यता—अशा प्रकारच्या कल्पनांची चलती वाढत आहे. या कल्पनांनीच पाश्चात्य समाजाची प्रगती झाली, अशी चुकीची समजूत काही लोकांनी करून घेतली आहे. तिकडे वाढत असलेल्या मानसिक रोगांचे आणि गुन्हेगारीचे प्रमाण आपल्या समाजातही वाढू लागले आहे.

जीवनातील मूलभूत कल्पना, विचार आणि मूल्ये यांच्यावर समाजाचे स्थैर्य अवलंबून असते. जुन्या कल्पना याही जुन्या नाण्यांसारख्या आहेत. प्रत्येकाच्या घरात मनाच्या अडगळीत आज त्या पडून राहिलेल्या आहेत. ज्याने त्याने ही नाणी पुन्हा तपासून त्यांतील सुवर्णाचा उपयोग करून घेतला पाहिजे.

भौतिक प्रगतीशी या कल्पनांचा विरोध नाही. त्यांच्या पायावर उभारलेल्या प्रगतीनेच शाश्वत सुख, समाधान, शांती आणि ऐश्वर्य नांदेल.

[ २०-११-१९६३

## ३५. निरोप घेण्याची कला

**एखाद्या** गोष्टीचा आरंभ केव्हा करावा हे समजायला पाहिजे, आणि शेवट केव्हा करावा हेही कळायला पाहिजे. याला म्हणतात अक्कल किंवा व्यवहारज्ञान.

आपण अनेक प्रसंगी इतर माणसांकडे भेटायला जातो. नातेवाईक, मित्र-मंडळी, नवीन परिचित, अधिकारी, अपरिचित अशा अनेक प्रकारच्या व अनेक संबंधांच्या माणसांकडे कामाकरता किंवा कामाशिवाय जावे लागते. अशा प्रसंगी आपले बोलणे केव्हा संपवावे आणि निरोप केव्हा घ्यावा याचे तानमान ठेवायला पाहिजे. नाहीतर त्या माणसाची गैरसोय होते, किंवा अपमानकारक परिस्थितीत निरोप घेण्याची पाळी आपल्यावर येते.

एखाद्याच्या घरी सहज बसायला तुम्ही जाता. त्या माणसाची सहनशीलता संपली की तो प्रश्न विचारीनासा होतो. हो-ला हो करतो. कंटाळा आल्याचे सुचवितो. जांभया देतो. त्याच्या आधीच "येतो आता" म्हणून बाहेर पडणे सूज्ञतादर्शक असते. एखाद्या अधिकाऱ्याकडे तुम्ही गेला तर काम झाल्याबरोबर बाहेर पडणे शहाणपणाचे असते. त्याच त्या गोष्टी विचारीत बसण्याची खोड अगदी वाईट. लग्नसमारंभाला गेला तर वधूवरांशी एकदोन सेकंद बोलून निरोप घेणे

चांगले. इतर माणसेही वाट पाहात असतात. आजारी माणसाकडे गेला तर त्याला शीण येईल इतके बोलू नका. अभिनंदन, दुखवटा, समाचार इत्यादी कारणाकरता कोणाकडेही गेला तरी काम झाल्याबरोबर उठणे चांगले. दुसऱ्या माणसाने आग्रहाने बसवून घ्यावे आणि " थांबा की जरा " असे म्हणावे, यात स्वारस्य आहे.

मुख्य म्हणजे जेथे जाल तेथे त्या माणसाचे ऐकून घ्यायला शिका. आपलेच प्रवचन त्याला ऐकवू नका.

माझ्याकडे कधी कधी सल्ला विचारण्याकरिता किंवा चर्चा करण्याकरता माणसे येतात, आणि भेटीत एकसारखे स्वतःच बोलत राहतात ! मग मी त्यांना थांबवून म्हणतो, " मी तुमचे ऐकले. आता मधेच न बोलता माझे थोडे ऐका पाहू. " असे न केले तर ही मुलाखत लौकर संपणारच नाही. भेटीला जाणाऱ्या माणसांनी वेळेचा विचार सतत लक्षात ठेवायला हवा.

या गोष्टी शिकवण्याची शाळा किंवा अभ्यासक्रम नाही. त्या त्या प्रसंगी विचारपूर्वक आपणच आपले आडाखे बांधायचे असतात. त्या माणसाशी आपले संबंध, कामाचे स्वरूप, काळ-वेळ, त्या माणसाची स्थिती अशा अनेक गोष्टींचा विचार करून—निरोप केव्हा घ्यावा हे शहाणपणाने ठरवायचे असते.

[ १८–१२–१९६३

# ३६. कौतुक करण्यात कंजूषपणा

**प्रत्येक** समाजात काही रूढ झालेले संकेत आणि पद्धती असतात. सुंदर आणि चांगल्या गोष्टींचे कौतुक करण्याची प्रथा सुसंस्कृत, उदार आणि सहिष्णू प्रवृत्तीच्या समाजात असते. व्यक्तीच्या जीवनात आणि त्याच्या कामात कोठलाही चांगला गुण दिसला की शब्दाने, पत्र पाठवून किंवा भेटी पाठवून त्याचे कौतुक करण्याची प्रथा पुढारलेल्या समाजात असते.

कोणी चांगले गाणे गातो, कोणी सुंदर वाद्य वाजवितो, कोणी उत्कृष्ट संभाषण आणि विनोद करतो, कोणी उत्कृष्ट बागवगीचा करतो, कोणी उत्कृष्ट काव्य करतो किंवा लेख लिहितो, कोणी उदार हस्ताने दानधर्म करतो, कोणी आपल्या गोड शब्दाने दुःखितांचे सांत्वन करतो, एखादी गृहिणी उत्कृष्ट स्वयंपाक करते, दुसरी आपली गृहरचना आकर्षक आणि समाधान देणारी अशी करते, कोणी भगिनी उत्कृष्ट समाजकार्य करते तर कोणी आपला लहानसा प्रपंच ठाकठीकीने चालविते.

ही सर्व जगातील सत्कृत्ये आहेत आणि त्यांच्या मुळाशी त्या त्या व्यक्तींचे सद्‌गुण आहेत. या सद्‌गुणांचे कौतुक जितक्या अधिक प्रमाणात व्हायला हवे तितके होत नाही. कौतुक होत नाही म्हणण्यापेक्षा त्या कौतुकाचा आविष्कार आपल्या शब्दांत किंवा कृतीत प्रकट होत नाही असे म्हणणे अधिक बरोबर होईल. आपण गुणांचे कौतुक करण्यात अती कंजूषपणा दाखवितो. या बाबतीत आपण अधिक उदार झालो तर काही शब्द अधिक खर्च होतील पण त्यामुळे कितीतरी अधिक प्रमाणात सत्कृत्य करणाऱ्या व्यक्तीला आनंद वाटेल. ती व्यक्ती अधिकाधिक सत्कृत्ये करील आणि सद्‌गुणांचे वातावरणच निर्माण होईल.

कौतुक करायचे म्हणजे फाजील किंवा गैरवाजवी स्तुती करण्याची जरुरी नाही. स्तुती करण्यात अतिरेक वाईट ! पण कंजूषपणा त्याहून वाईट !

मी कोठेही जेवायला गेलो तर स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तींना स्मरणपूर्वक भेटतो आणि सांगतो की 'स्वयंपाक छान झाला होता. मी तिखट खात नाही म्हणून भाजी खाल्ली नाही. गैरसमज करून घेऊ नका.' समारंभात चांगली सनई वाजवणाऱ्या कलावंतालाही नमस्कार करून सुचवितो की छान वाजवले.' तोही धन्यवादपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. व्याख्यान संपल्यावर व्याख्यात्याला भेटून सांगतो की 'भाषण सुंदर झाले.' तोही अभिप्राय ऐकायला उत्सुक असतोच. लग्नाच्या पानसुपारीला गेलो म्हणजे निरोप घेताना मित्राला सांगतो—'सून छान मिळाली' किंवा 'जावई उत्तम आहे.' आपल्या निवडीवर त्यालाही शिक्कामोर्तब हवे असते. या सर्व गोष्टींमुळे मी हसत हसत आनंदाने बाहेर पडतो आणि माझ्या मागेही हास्य आणि समाधान रेंगाळत राहाते.

जगामध्ये सद्‌गुणांचे व सत्कृत्यांचे प्रमाण आधीच थोडे आहे. कौतुकाचे व स्तुतीचे चार शब्द बोलून त्यांना उत्तेजन देणे व ते वाढीला लावणे आपल्या हातात आहे. हा गुण प्रयत्नपूर्वक आणि अभ्यासाने तुम्ही वाढविला पाहिजे.

टीका व निंदा करणारे अनेक आहेत. त्याला फारशी बुद्धी लागत नाही. कौतुक करणारेच थोडे ! त्या थोड्यांत तुमचे नाव असू द्या.

[१४–१–१९६४

## ३७. गीतेतील मुख्य विचार

**आपल्या** शिक्षणातून बाहेर पडलेल्या नागरिकांना भारतीय विचार व तत्त्वज्ञान यांची फारशी माहिती नसते.

ती दिली जात नाही तोपर्यंत आपले शिक्षण व मन भारतीय व राष्ट्रीय होणार नाही.

धार्मिक व नैतिक शिक्षण द्यावे असे आज सर्वांना वाटू लागले आहे; पण योग्य पुस्तके व साधने नसतात. ‘मला काय करता येईल ?’ असा मी विचार केला.

**‘गीतेतील मुख्य विचार’** हे पुस्तक वरील विचारसरणी लक्षात घेऊन मी लिहिले आहे.

गीतेतील ७०० श्लोकांपैकी अंदाजे २०० महत्त्वाचे श्लोक घेतले आहेत. एकेका विचाराच्या दृष्टीने त्यांची सोयीस्कर मांडणी केली आहे.

प्रत्येक आठवडयाला एक विचार याप्रमाणे एका वर्षात या पुस्तकातील महत्त्वाचा भाग वाचकांनी मुखोद्गत व आत्मसात करावा अशी योजना करता येईल.

प्रत्येक इयत्तेत १० ते १५ विचार घेता येतील. ४०–५० पुस्तकांची एक पेटी ठेवल्यास एका वेळी सर्वांचे हातात पुस्तक राहील, कायमची व्यवस्था होईल.

प्रत्येक गृहस्थाजवळ हे पुस्तक स्वतःचे असल्यास व ते घरातील सर्वांना वाचनार्थ मिळाल्यास त्याच्या घरात गीतेच्या विचारांचा प्रसार होईल. वातावरण सुधारेल.

गीतेतील विचार व्यवहारात जाणता येतात, ही दृष्टी या पुस्तकाच्या वाचनाने येईल.

गीता वाचण्याइतके संस्कृतचे ज्ञान वाचकांना आपोआप होईल. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे—

आयुष्यात जन्मभर पुरेल अशी विचारांची शिदोरी आपल्या तरुण पिढीला मिळेल.

कोणी सांगावे—त्यातून दुसरा विवेकानंद निघून तो पुन्हा भारतीय विचारांचा प्रसार सर्व जगात करील !

पुस्तक लहान पण परिणाम मोठा आहे.

गीतेतील विचारांचे मनन आणि त्यांचा प्रसार ही भारताची एक वैचारिक सेवा आहे. ती आपण सर्व जण करू या.

[ ७–२–१९६४

# ३८. काम ! फार काम !! फार फार काम !!!

**खाजगी** संसारात, ऑफिसात, कारखान्यात, सार्वजनिक संघटनेत—सर्वत्र एकच सूर ऐकू येतो—‘मला काम आहे, फार काम आहे !’

वाढत्या संसारात आणि वाढत्या समाजात नवीन नवीन कामे नेहमी निघत असतात. अशी कामे झाली तरच व्यक्तीची व समाजाची प्रगती होते. पण एखादे नवीन काम निघाल्यावर 'मी हे करतो' असे आपण होऊन म्हणणारा उत्साही माणूस शंभरांत एखादा-दुसराच असतो, बाकीचे सर्व उघडपणे किंवा मनात म्हणत असतात, 'मला काम आहे. फार काम आहे !'

अशा बोलण्यात काही सत्य असते, काही अर्धसत्य असते, आणि पुष्कळ वेळा असत्यही असते. पण बोलणाराला त्याची जाणीव नसते.

उत्साही आणि उद्योगी माणूस अनेक कामे करीत असतो आणि त्याच रगाड्यात नवीन कामही अंगावर घेऊन करून जातो. काम करण्याच्या युक्त्या त्याला अवगत झालेल्या असतात. आपल्याच कामाचा बाऊ करणारा माणूस स्वतःच्या कामातही फारशी प्रगती न करता तेलघाण्याच्या बैलासारखा चक्राकार फिरत राहतो. त्याला गती असते, पण प्रगती नसते.

आपल्या आधुनिक जीवनात संसारातली आणि समाजातली कामे वाढली आहेत. वाढत आहेत, वाढणार आहेत. ती सर्व आपल्यालाच करायला लागणार आहेत. माणसे तेवढीच पण कामे जास्त, अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे.

जलदीने, कमी श्रमात आणि पद्धतशीरपणाने कामे करण्याच्या युक्त्या निघत आहेत. त्यांचे एक शास्त्रच बनत आहे. थोड्या विचाराने व योजनेने आपल्यालाही या युक्त्या हस्तगत करता येतील. त्यामुळे आपला वेळ, श्रम आणि चिंता यांत शेकडा १० ते ४० टक्के बचत होईल. त्या वेळात आणि श्रमात नवीन कामे करता येतील.

माणसाने कामातही तारतम्य ठेवावयास हवे. महत्त्वाचे कोणते, कमी महत्त्वाचे कोणते, आधी करण्याचे कोणते, नंतर करण्याचे कोणते; स्वतःच करण्याचे कोणते, इतरांकडून करवून घेण्याचे कोणते, आणि अनावश्यक कोणते—अशा प्रकारचा विचार करून कामाची योजना केल्यास नेहमीचे काम केल्याचे समाधान मिळून थोड्याफार प्रमाणात नवीन कामे अंगावर घेता येतील.

यापुढे 'काम आहे, मला फार काम आहे, फार फार काम आहे !' असे शब्द उच्चारण्यापूर्वी वरील दृष्टिकोनातून त्यात सत्य-असत्य किती आहे ते पाहा. नवीन कामे स्वयंस्फूर्तीने आणि हिरिरीने अंगावर घ्या आणि करून दाखवा. कर्तबगारी वाढेल. मोठे व्हाल.

[ १४-३-१९६४

# ३९. पन्नाशीचा स्वतःला प्रश्न

**स्वतःच्या** मनाला प्रश्न विचारून स्वतःच उत्तर देण्याची एक सुंदर परंपरा रामदास स्वामींनी सुरू केली. फार लोक तिचे अनुकरण करीत नाहीत, पण ती सर्वत्र सुरू करण्यासारखी आहे. रामदासांनी मनाला प्रश्न विचारले, उपदेश केला, आत्मनिरीक्षण करायला लावले. " मना सांग बा रावणा काय झाले ? " हा प्रश्न. " अकस्मात ते राज्य सर्वही बुडाले " हे त्यानें दिलेले उत्तर. मग यापासून बोध काय ? " म्हणोनी कुडी वासना सांड वेगी । बळे लागला काळ हा पाठिलागी " हा मनाला उपदेश.

चाळिशीच्या पुढे आणि पन्नाशीच्या आगेमागे प्रत्येकाने आपल्या मनाला काही प्रश्न विचारावेत आणि स्वतःच त्यांची उत्तरे द्यावीत. हे मना, तुझ्या देहाला आता चाळीस वर्षे झाली. चाळिशीचा चष्मा लागून ही दृष्टी आणि शरीरयष्टी यापुढे कमकुवत होत जाणार याची सूचना मिळाली.

डोळे शाबूत होते तोपर्यंत तू काय काय वाचलेस ? मराठी भाषेतील उत्कृष्ट म्हणून समजले जाणारे ग्रंथ तू वाचलेस काय ? मराठी भाषेचा मुकुटमणी जी ज्ञानेश्वरी ती तू कधी पाहिलीस तरी का ? दासबोध, गीतारहस्य यांसारखे त्या त्या युगातले वैचारिक क्रांती करणारे ग्रंथ तू वाचलेस का ? तुला संस्कृत येते; विसरलेही असेल. महाभारत आणि रामायण हे या देशाचे अनेक वर्षे रंजन आणि शिक्षण करणारे ग्रंथ--ते तू मुळातून वाचलेस का ? म्हणे जिजामातेने बाल शिवाजीला महाभारत-रामायणातल्या गोष्टी सांगून त्याच्या ठिकाणी सुसंस्कार दृढ केले. तिच्या वेळेला हाताने लिहिलेल्या पोथ्या असतील. तुला चांगले छापील ग्रंथ उपलब्ध आहेत. हिंदू धर्माचा प्रमाणभूत ग्रंथ जो भगवद्‌गीता तो एकदा तरी तू वाचलास का ?

तुला इंग्रजी येते ना ? काय केलास त्याचा उपयोग खर्डे घासण्यापलीकडे ? त्या भाषेत म्हणे शेक्सपीयरची उत्कृष्ट नाटके आहेत. एखादे तरी वाचून पाहिलेस का ? जर्मन भाषेतील गटेचे फाउस्ट, इटालियन भाषेतले डांटेचे डिव्हाईन कॉमेडी, रशियन भाषेतील कौंट टॉलस्टॉय यांचे ग्रंथ--या सर्वांची आता इंग्रजी मराठी भाषांतरे उपलब्ध आहेत. ती तू कधी पाहिलीस का ?

पुरे, पुरे, पुरे हे प्रश्न. सर्वांचे उत्तर एकच आहे. नाही, नाही, नाही. हे मना, यातले मी काही वाचले नाही. मला कोणी हा विचारच सुचवला नाही.

अरे, पण अजून तुझी निम्मी हयात जायची आहे. त्या अवधीत तू हे सहज करू शकशील. आजच निश्चय कर, रोज एकदोन तास तरी उत्कृष्ट ग्रंथाचे वाचन केल्याशिवाय झोपणार नाही म्हणून. शतायुर्वै पुरुषः । अजून चाळीस पन्नास वर्षे उमर आहे. गावात ग्रंथालय आहे. कोणीही तुला ही पुस्तके वाचायला देईल. प्रारंभ कर. साठाव्या सत्तराव्या वर्षी हाच प्रश्न मी तुला पुनः पुनः विचारीन त्या वेळी नापास होऊ नकोस.

[७-४-१९६४

# १०. आनंद, समाधान आणि शांती

**चिंता** आणि मानसिक ताण हा अनादी कालापासून मानवाच्या मनाचा आणि शरीराचा शत्रू त्याला छळीत आला आहे. यांत्रिक आणि भौतिक संस्कृतीच्या आजच्या युगात त्यांचे प्राबल्य फार वाढलेले आहे. संसारातील कष्ट आणि अडचणी यांच्या वाढलेल्या विवंचना आपल्या अनुभवाला येत आहेतच. त्यांच्याच भरीला राजकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचा ताण आपल्या मनावर पडत आहे.

वैद्यकीय शास्त्रात "चिंता आणि ताण" या विषयावर फार महत्त्वाचे संशोधन चालले आहे. रक्तदाब, हृदयविकार, मज्जातंतूचे रोग, मानसिक रोग, कॅन्सर व मधुमेह हे आधुनिक समाजातील घातक रोग आहेत. मानसिक चिंतेमुळे ते निर्माण होतात व वाढतात, असे अनुभवाला येत आहे.

मानसिक रोगांवर मानसिक औषधच पाहिजे. द्रव्ययुक्त औषधांचा तात्कालिक परिणाम होईल, पण पुढे तोही कमी होऊ लागेल. या वाक्यावर खूण करा. ते लक्षात ठेवा.

चिंता आणि ताण कमी होईल अशा प्रकारच्या मनोवृत्तींचा अभ्यास, विकास आणि संवर्धन करणे हा उत्कृष्ट मार्ग आहे. हाच एकमेव उपाय आहे. हेच औषध आहे. हाच उपचार आहे.

"आनंद, समाधान आणि शांती" या विचारांचे अहोरात्र चिंतन करा. ज्या ज्या वेळी मन रिकामे असेल त्या त्या वेळी या विचारांचे चिंतन करा. रात्री निजताना पहिली झोप होऊन जाग आल्यावर, सकाळी उठल्याबरोबर आणि दिवसा ज्या ज्या वेळी मन रिकामे असेल तेव्हा आनंद, समाधान आणि शांती हे

विचार मनात आणा. विचाराच्या पलीकडे जाऊन आनंदी, समाधानी आणि शांत मनोवृत्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. हळूहळू ह्या प्रवृत्तीशी आपले तादात्म्य होईल.

अनुभव घेऊन पाहा. पहिला परिणाम तुमच्या चेहेऱ्यावर होईल. त्यानंतर सर्व अवयवांवर आणि शेवटी मनावर. शरीरावरचा ताण कमी होऊन ते शिथिल होईल आणि मनावरचा ताण कमी होऊन ते निश्चिंत, आनंदी आणि शांत होईल.

संसारात दुःख, असमाधान आणि अशांती निर्माण करणारे प्रसंग येणारच. त्या मानाने त्यांचा मनावर परिणामही होणारच. पण त्या मनाला आपल्या मूळ प्रवृत्तीकडे खेचण्याचा आपला सतत प्रयत्न असावा. त्याला शांत, समाधानी आणि आनंदी करण्याची सवय करावी.

आजच्या युगात देहाचे आणि मनाचे आरोग्य राखण्याचा हाच एक मार्ग आहे. अनुभव घ्या. अनुभवाचे बोल आहेत. तुम्हालाही गुण येईल.

[ २०-४-१९६४

## ४१. अपघाताचे मूळ तुमच्याच स्वभावात आहे

**मुद्दाम** घडवून आणलेले अपघात हे बुद्धिपुरःसर केलेल्या अपघातात येतात देशद्रोही व्यक्तींनी केलेले अपघात या सदरात येतात. पण आपोआप व न कळत झालेले अपघात हे मानवी स्वभावातील दोषांमुळे होतात. गाफीलपणाची प्रवृत्ती समाजात वाढू लागली की तिचा प्रादुर्भाव व्यक्तीच्या ठिकाणी होतो. या प्रवृत्तीतून अपघातांचा जन्म होतो. समाजातील अनेक व्यक्तींच्या ठिकाणी सर्वत्र असलेला दोष, एखाद्या व्यक्तीमध्ये प्रगट होऊन त्यातून अपघातांची घटना होते

गाफीलपणा, कामचुकारपणा, हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, दुर्लक्ष, अनियमितपणा, चालढकल, नियमांचे उल्लंघन, बेपर्वाई या दुर्गुणांचा प्रसार समाजामध्ये झाला म्हणजे अपघातांची संख्या वाढते. सध्या आपल्या देशात अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. हे दुर्गुण तुमच्या माझ्यात आहेत; इतरांच्यात आहेत; सर्व समाजात त्यांनी मूळ धरले आहे. काम स्वतःचे असो, सरकारी असो की सार्वजनिक असो—त्यात एक प्रकारचा गाफीलपणा आणि बेपर्वाई वाढत चालली आहे. तिचा प्रादुर्भाव ज्या व्यक्तीच्या ठिकाणी अधिक होतो ती अपघाताला कारणीभूत होते.

आपल्या समाजात काम करणाऱ्या लोकांत, अपघात-प्रवृत्तीच्या दृष्टीने तीन वर्ग करता येतील--

(१) आपली कामे सतत काळजीपूर्वक व सावधानतेने करणारी माणसे. यांच्या हातून अपघात होणार नाहीत.

(२) आपले काम सामान्यपणे काळजीपूर्वक करणारी पण क्वचित प्रसंगी निष्काळजी राहणारी माणसे.

(३) सर्वच कामात सदासर्वकाळ गाफीलपणा आणि बेपर्वाई दाखविणारी माणसे.

या तीन वर्गांपैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गातील कर्मचाऱ्यांकडून अपघात अधिक होतात. त्यांच्याकडे अधिक जोखमीचे आणि जबाबदारीचे काम जितक्या प्रमाणात दिले जाईल तितक्या मोठ्या प्रमाणात ते अपघात घडवून आणतील.

हा गाफीलपणा घरीदारी आणि समाजात सर्वत्र दिसून येतो. दूध उतास जाणे, कपडे पेटणे, यंत्रावर काम करताना हातपाय तुटणे, मोटारींच्या टकरी होणे, आगगाड्या पडणे, आगी लागणे इत्यादी लहान मोठ्या सर्व अपघातांच्या मुळाशी गाफीलपणा हा एक सामाजिक दुर्गुण आहे. तो प्रत्येकाने आयुष्यात एकदा दाखविला तरी अनेक अपघातांच्या घटना घडून येऊ शकतात. जन्मभर काळजी घेऊन एखाद्या क्षणी गाफीलपणा दाखविला तरी अपघात होतात. चांगला पोहणारा पाण्यात बुडतो, चांगला ड्रायव्हर अपघातात मरतो—यातील इंगित हेच आहे. गाफीलपणाचा एकच क्षण अपघाताला पुरे. काळपुरुषाला क्षमा मंजूर नाही. गाफीलपणाची शिक्षा झाल्याशिवाय राहात नाही.

समाजाला या गोष्टीची जाणीव करून दिली पाहिजे. प्रत्येकाने आपले काम काळजीपूर्वक, सावधानतेने, नियम पाळून केले पाहिजे. ही राष्ट्रीय प्रवृत्तीच झाली पाहिजे. याविरुद्ध वागणाराला अत्यंत कडक शासन केले पाहिजे. गाफीलपणा आणि हलगर्जीपणा यांचे कठोरपणाने निर्मूलन केले पाहिजे. कुटुंब, शाळा, कारखाने, कचेऱ्या, वाहतूकखाती इत्यादी सर्वच ठिकाणी हे धोरण ठेवले पाहिजे.

ज्या कामात अपघाताचा व मनुष्यहानीचा संभव जास्त त्या कामावरच्या माणसाची निवड अत्यंत काळजीपूर्वक केली पाहिजे. अशा माणसांना तांत्रिक आणि सामाजिक पूर्वशिक्षण द्यायची योजना हवी. आपल्यावर किती मोठी जबाबदारी आहे, आपल्या एकाच चुकीमुळे केवढा गंभीर अनर्थ होणार आहे—याचे शिक्षण त्याला मिळायला पाहिजे.

जीवन बदलले त्याबरोबर मनोवृत्तींतही बुद्धिपूर्वक व योजना करून परिवर्तन घडवून आणणे अवश्य आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# ४२. स्व. जवाहरलालजींचे वारस—आपण

**पंडित** जवाहरलाल गेले. गौतम बुद्ध, अशोक, लोकमान्य टिळक, म. गांधी या विभूतींच्या मालिकेत ते अजरामर झाले. भारताच्या आणि जगाच्या इतिहासातील काही पाने त्यांनी आपल्या कृतींनी भरली. त्यांचे आपण वारस आहोत.

भारत खरा भाग्यवान आहे. पारतंत्र्याच्या काळात लो. टिळक, म. गांधी, कविवर्य टागोर यांच्यासारख्या अलौकिक व्यक्ती त्याला मिळाल्या. स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभकार्याकरिता स्वर्गीय जवाहरलालसारखा अद्वितीय पुरुष त्याला मिळाला. जगातील इतर राष्ट्रांना हे भाग्य लाभलेले नाही.

जगाच्या वैचारिक आणि राजकीय क्षेत्रात भारताला आज मोठे स्थान आहे. त्याचे श्रेय स्व. जवाहरलालना आहे.

त्यांच्यासारखा लोकोत्तर पुरुष निर्माण करणे आपल्या हातात नाही. परंतु त्यांच्या गुणांचा वारसा अखंड चालू ठेवणे तर आपल्या हातात आहे ना ? ते आपण करू या.

दूरदृष्टी, कष्ट, निष्ठा आणि त्याग यांचा वारसा स्व. जवाहरलालनी आपणासाठी ठेवला आहे. हे गुण वाढवून तो वारसा आपण निरंतर पुढे चालवू या. त्याकरिता संकुचित मन, कामचुकारपणा, विश्वासघात आणि स्वार्थ या दुर्गुणांचे निर्मूलन करू या. आधी आपल्या वैयक्तिक जीवनापासून या गोष्टीला प्रारंभ करू.

यापुढील भारताचा काही कालखंड सामान्यजनांच्या कर्तबगारीचा आहे. तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसांचा आहे. अशा माणसांनीच जपान-जर्मनीसारख्या देशांचा कायापालट केलेला आहे. अशा माणसांनीच आशिया, आफ्रिका, दक्षिण-अमेरिका या देशांत स्वातंत्र्याची क्रांती घडवून आर्थिक आणि सामाजिक संक्रमण चालू केले आहे. या देशांपेक्षा आपण अधिक भाग्यवान आहोत.

अलौकिक विभूती या प्रत्येक पिढीला मिळत नाहीत. युगायुगांनी त्या जन्माला येतात. कपिला-षष्ठीच्या किंवा सिंहस्थाच्या योगासारखा त्यांचा जन्म असतो. त्यांच्याकरता वाट पाहून चालणार नाही.

स्वर्गवासी टिळक, गांधी आणि नेहरू यांच्यासारखे जागतिक कीर्तीचे थोर पुढारी मिळाले नसतानाही अनेक देशांनी भारतापेक्षा अधिक प्रगती केली आहे. थोर पुरुषांच्या गुणांचे अनुकरण करून सामान्य माणसांनीच आपापल्या क्षेत्रांत असामान्य कामे केली पाहिजेत.

आपला देश मोठा आणि त्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा मोठी. त्यामुळे रामचंद्र, श्रीकृष्ण यांच्यापासून थेट स्व. नेहरूंपर्यंत थोर विभूतींचा वारसा आपणाला लाभला आहे.

परंतु स्व. जवाहरलालजींच्या सारख्या थोरांच्या गुणांचा वारसा चालू ठेवला नाही तर मात्र आपण कपाळकरंटे ठरू. तसे होणार नाही; तसे आपण करणार नाही.

[ ८-६-१९६४

# ४३. शतायुषी व्हाल—कशाकरता ?

**साठीच्या** पुढे गेलेल्या माणसांची संख्या खूपच झालेली आहे ! षष्ठ्यब्दि-पूर्तीचे समारंभ पूर्वी फार क्वचित होत. आता त्यांची संख्या खूपच वाढलेली आहे. दिवसेंदिवस दीर्घायुषी व्यक्तींची संख्या समाजात मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. वैद्यकशास्त्र आणि आरोग्यशास्त्र या क्षेत्रात झालेल्या आधुनिक प्रगतीमुळे आजार आणि मृत्यू यांचे प्रमाण कमी झालेले आहे. सरासरी आयुर्मर्यादा वाढलेली आहे. तुम्ही व्यवस्थित तऱ्हेने राहिलात तर शंभर वर्षे सहज जगाल !

पण इतकी वर्षे जगून जीवनाच्या शेवटी फलश्रुती काय ? हा प्रश्न शंभराव्या वर्षी विचारण्यापेक्षा आजच आपल्या मनाला विचारा.

मागल्या पिढीतील कित्येक कर्तबगार पुरुष ऐन तारुण्यात कालवश झाले. जेमतेम चाळीस पंचेचाळीस एवढेच अल्पायुष्य त्यांना मिळाले, पण या अल्प-कालावधीत त्यांनी केलेली कामे पाहून अचंबा वाटतो स्वामी विवेकानंदांनी एकोणचाळीसाव्या वयानंतर समाधी घेतली.

आपल्या दीर्घ आयुष्याच्या कालखंडात आपण काय करणार, याची योजना आणि आराखडा करण्याची कल्पना कशी काय वाटते ? आपण पंचवार्षिक योजना वगैरे गोष्टी ऐकतो. त्याच धर्तीवर आपल्याही आयुष्याची स्थूल योजना करता येईल. अर्थात ती फारच लवचिक राहील. तुम्हाला नोकरी, धंदा आणि व्यवसाय या गोष्टी कराव्या लागणारच. पण त्या चालू असतानाही इतर काही गोष्टी करण्यास आजपासून सुरुवात करा. तुमच्या दीर्घायुष्याच्या अखेरीला या गोष्टींचा खूप मोठा संचय होईल. एखादे उपयुक्त सामाजिक कार्य, एखाद्या आवडीच्या विषयाचा व्यासंग, स्वभावानुरूप ललितकलेची साधना, एखाद्या सात्त्विक छंदाची वाढ आणि क्रमाक्रमाने सद्‌गुणांचा विकास आणि दुर्गुणांचा निरास यांपैकी एक

किंवा अनेक गोष्टी साध्य करण्याच्या प्रयत्नाला आजच लागावे हे चांगले. ७० ते १०० वर्षे जगलेला माणूस सर्व दृष्टींनी परिपूर्ण असावयास पाहिजे, नाही का ?

सेवेच्या काळात मनाला विरंगुळा, सेवानिवृत्तीनंतर कालक्रमणेचे साधन आणि जीवनाच्या अखेरीला सात्त्विक समाधान, अशा सर्व दृष्टींनी हे उपक्रम उपयोगी पडतील.

आयुष्याच्या अखेर सिंहावलोकन करताना आपल्या ठिकाणी विफलतेची निराशा यावी, का उपयुक्त व संपन्न जीवनाचे समाधान वाटावे हे आजच ठरवा.

[ १०-७-१९६४

## ४४. अपमानही सोसावा लागतो

**माणसाला** संसारात कधी कधी अपमानही मुकाट्याने गिळावा लागतो. त्यामुळे काहीही कमीपणा न येता आपले सामर्थ्य वाढते.

संसारात आणि समाजात हरघडी आपला जवळच्या माणसाशी संबंध येतो. यात जवळची आप्तमंडळी, मित्र, सहकारी इत्यादी असतात. आप्तमंडळीत सख्खी मुले, भाऊ-बहिणी, पती-पत्नी, सुना, जावई इत्यादी माणसे असतात. सहकारी आणि मित्रमंडळीत आपल्यापेक्षा वयाने, अनुभवाने, अधिकाराने आपल्यापेक्षा कनिष्ठ माणसेही असतात. यांच्याकडून एखाद्या वेळी अगदी अनपेक्षितपणे आपला अवमान होतो.

अनपेक्षितपणे म्हणायचे कारण—एरव्ही ही माणसे तुम्हाला मान देतात. तुमच्यावर प्रेम करतात. तुमच्याकरता झीज सोसतात. जिवाला जीव देतात. तुमचे वय, अनुभव, अधिकार इत्यादी लक्षात घेऊन तुमच्याशी आदबीने, आदराने, आज्ञाधारकपणे वागतात. पण चोवीस तास अशी तारेवरची कसरत माणसाला, जमत नाही.

व्यवहारात असे अनेक प्रसंग येतात की त्या वेळी ही माणसे नाखूष होतात चिडतात, संतापतात, निराश होतात. त्यांच्या मनाचा तोल जातो. अशा एखाद्या वेळी त्यांच्याकडून तुमचा अवमान होतो. अवज्ञा होते. न कळत होते. मुद्दाम करायचा हेतू नसतो.

अशा वेळी त्यांची पूर्वपुण्याई लक्षात घेऊन अवमान गिळायचा असतो. दहा वेळी मान ठेवील तो एखादे वेळी अवमान करील. शंभर वेळा तुम्हाला साष्टांग नमस्कार घालणाराचा एखादे वेळी तुम्हाला पाय लागण्याचा संभव आहे. अशा

वेळी मनाची शान्ती आणि तोल घालवू नका. त्यामुळे तुमचे काही नुकसान होणार नाही. फायदा होईल.

नुकसान त्या माणसाचे होईल. त्याने शंभर वेळा नमस्कार घातल्याचे पुण्य जाईल. पण तुम्ही उलट रागावला तर त्याने आजपर्यंत केलेल्या प्रेमाबद्दल कृतघ्नपणा दाखवल्यासारखे होईल. कालांतराने त्याच्याशी शांतपणे बोलून त्याला त्याची चूक पटवून द्या. त्याला पश्चात्ताप होईल.

म्हणून म्हणतो, कधी कधी अपमानही गिळावा लागतो.

[ ११-८-१९६४

## १७. मम्मी, डॅडी, अंकलची साथ

**महाराष्ट्रातील** काही प्रतिष्ठित कुटुंबांतून आता मम्मी, डॅडी, आणि अंकल या शब्दांची साथ पसरू लागली आहे ! थोडी चांगली स्थिती आलेल्या काही मध्यम वर्गीय कुटुंबातूनही या शब्दांचा उपयोग होऊ लागला आहे. विशेषतः दिल्लीच्या कारभारात किंवा संरक्षणखात्यात नोकर असलेल्या लोकांच्या कुटुंबांतून ही पद्धती फार आढळून येते.

ह्या प्रथेला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. इंग्लिश माध्यमाच्या शाळांतून आणि इंग्लिश माध्यम असलेल्या वसतिगृहांतून मुलांना ठेवण्याचा उपक्रम मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला आहे. त्या ठिकाणी रोजचे संभाषण इंग्लिशमधून होते. शाळेतून घरी आलेली बालके आईबापाशी इंग्लिशमध्ये बोलू लागली आणि त्यांना मम्मी, डॅडी म्हणू लागली म्हणजे पालकांच्या मनाला गुदगुल्या होतात ! धन्यता वाटते. पाश्चिमात्य जीवनाचे निर्बुद्ध आणि लाचारीयुक्त अनुकरण करणारे आपले चित्रपटही याला जबाबदार आहेत. पाश्चिमात्य पद्धतीचे पोषाख, हावभाव, गाणी आणि भाषा यांचे अनुकरण करण्यात आपल्याकडील नट व नटी अभिमान बाळगतात. त्यांचेच अनुकरण आपल्या घरांतील मुले करतात.

प्रत्येक भाषा जन्माला आल्याबरोबर अगदी पहिले शब्द प्रचारात येतात ते जवळच्या नातलगांविषयी असतात. संस्कृत आणि मराठी भाषेत असे स्वतंत्र शब्द इंग्रजी भाषेपेक्षा अधिक आहेत. प्रत्येक देशात व समाजात जन्माला आलेली मुले बोलायला लागल्याबरोबर आईबापांना व बंधूभगिनींना आपापल्या भाषेत हाका मारतात. महाराष्ट्रात आणि मराठी बोलणाऱ्या समाजात आई, वडील, भाऊ, वहिणी, मावशी, आत्या यांना संबोधण्याच्या काही विशिष्ट प्रथा आहेत आणि

त्या चांगल्या आहेत. त्यांच्या मागे काही भावना आहेत. आपले गृहजीवन आणि विचार त्यांच्याशी निगडित झाले आहेत. दु:ख झाले की "अग आई" सहज तोंडातून येते. काव्यसाहित्यातूनही आईचा महिमा वर्णिलेला आहे. तेथे 'ममी' शब्द बसणार नाही. हजारो वर्षे या देशात राहणाऱ्या आम्ही आई, बाबा, भाऊ, ताई, इत्यादी शब्द व त्यांच्या मागील भावना निर्माण केल्या आहेत.

त्या तरी जतन करू या ! नाही तर काही दिवसांनी तुमची मुलेच तुम्हाला विचारतील, 'आई-बाबा' या शब्दांचा अर्थ काय ? त्यांना मराठीत काय म्हणतात ?

[ १५-८-१९६४

# ४६. कामे करणारा–करवून घेणारा

**कामाचे** सोंग करणारे शेकडो मिळतात. प्रत्यक्ष प्रामाणिकपणाने काम करणारे थोडे मिळतात. आणि स्वत: काम करून त्याचबरोबर इतरांकडूनही काम करवून घेणारे अगदी दुर्मिळ असतात. पण अशा लोकांना मागणी फार आहे.

कामचुकारपणा करायला फारसे भांडवल लागत नाही. वातावरणातून, एकमेकांच्या संगतीने, माणसे कामचुकारपणा फार लौकर शिकतात. प्रामाणिकपणाने काम करायला मात्र अधिक गुण लागतात. आपण पैसे घेतो. त्यांचा योग्य मोबदला कामाच्या रूपाने दिला पाहिजे, ही जाणीव असावी लागते. हातात घेतलेल्या कामावर प्रेम असावे लागते. कष्टाची सवय हवी आणि कर्तव्य हाच धर्म असा ध्येयवाद असायला पाहिजे. अशी माणसे आपापली कामे निष्ठेने करतात.

इतरांकडून काम करून घेणारांच्या ठिकाणी मात्र यापेक्षा अधिक गुण असावे लागतात. पहिली गोष्ट म्हणजे स्वत:चे काम वक्तशीरपणाने, पूर्ण वेळ आणि उत्कृष्टपणे करण्याची जिद्द असावी लागते. तिचे अनुकरण हाताखालचे लोक आपोआप करतात.

इतर माणसांच्या स्वभावाची व गुणांची पारख करणारा, त्यांना योग्य ते काम देऊन ते त्यांच्याकडून करून घेऊ शकतो. इतरांच्या मनाशी समरस होऊन त्यांच्या पातळीवर जाऊन पाहण्याची कल्पनाशक्ती अशा माणसाच्या ठिकाणी असायला पाहिजे. अशा माणसाला वरिष्ठपद, मोठी जागा, नेतृत्व, वरची खुर्ची आपोआप मिळते.

स्वतः काम करणाराला आपल्या पायापुरते पाहिले तरी चालते. त्याच्या वरिष्ठाला दूरवरची धोरणे ठेवायला लागतात. नवीन नवीन काम निर्माण करणे आणि झालेल्या कामाचा उपयोग करणे असे दुहेरी धोरण त्याला ठेवायला लागते.

खालच्या लोकांकडून हडेलहप्पीने काम करून घेणारे काही लोक असतात. दुसरे गोडीगुलाबीने आणि माणुसकी दाखवून त्यापेक्षा अधिक काम करवून घेऊ शकतात. माणसे आणि यंत्रे यांत फरक आहे. माणसांना माणुसकीची, आपलेपणाची, सहानुभूतीची, उत्तेजनाची, न्यायाची अपेक्षा असते. या गोष्टी मिळाल्या की माणसे आनंदाने, समाधानाने, आपलेपणाने कामे करतात.

वरिष्ठाच्या ठिकाणी एक प्रकारची हुकमतही असावी लागते. हुकमत म्हणजे काय ? केवळ अधिकार प्राप्तीने हुकमत साध्य होत नाही. स्वतःच्या कामात प्रावीण्य, स्वतः कष्ट करण्याची तयारी, कनिष्ठांना न्यायाने आणि माणुसकीने वागवण्याची प्रवृत्ती, श्रेष्ठ बुद्धिमत्ता, दूरदृष्टी, ध्येयवाद या गोष्टी असल्या की हुकमत साध्य होते. अशा माणसाच्या वागण्यात, आवाजात, दृष्टीत जरब असते. त्यामुळे त्याला यशस्वी नेतृत्व प्राप्त होते.

अशा माणसांची गरज आज प्रत्येक क्षेत्रात आहे. कचेरीत, कारखान्यात, सैन्यात, राजकारणात, समाजात—सर्वत्र नेतृत्वाची गरज आहे. स्वतः काम करून इतरांकडून काम करवून घेणाऱ्या नेतृत्वामुळे प्रगती होते.

वरच्या जागांची हाव धरणारांनी आत्मनिरीक्षण करून पाहावे की ' नेतृत्वाचे हे गुण माझ्या ठिकाणी आहेत का?' नसल्यास प्रयत्नाने साध्य करून घ्यावेत. गुण आले की अधिकारपदे तुम्हाला शोधीत येतील.

[ २-९-१९६४

# ४७. घडामोडींचा अर्थ लावायला शिका

**प्रत्येक** घटनेच्या मागे काही अर्थ असतो. तो ज्याला समजतो तो शहाणा. आपल्या खाजगी जीवनात, कुटुंबात, समाजात, देशात, जगात प्रत्येक घटकेला काही ना काही तरी घडत असते. त्याला काही तरी कारणे असतात आणि त्या घटनेतून आणखी काही तरी घडामोडी पुढे होणार असतात. आजच्या घटनेतून भावी घटनांची बीजे असतात.

एखाद्या नवीन माणसाशी ओळख किंवा एखाद्या नवीन पुस्तकाचे वाचन यांचा परिणाम तुमच्या भावी आयुष्यावर होऊ शकतो. तुमच्या कुटुंबास एखाद्या

बालकाचे अथवा नातेवाइकाचे आगमन हे घरातल्या माणसांच्या संबंधात स्थित्यंतर घडवून आणू शकते. अशाच प्रकारे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या घटनांचे परिणाम कालांतराने होत असतात.

बहुसंख्य सामान्य माणसांच्या लक्षात अशा घडामोडी फारशा येत नाहीत. ज्यांच्या लक्षात त्या येतात ते त्यांना तेथेच सोडून देतात. अगदी थोडी माणसे अशा घटनांवर विचार करतात, त्यांच्या संभाव्य परिणामांचा अंदाज बांधतात, त्यांच्यापासून आपल्याला काय बोध मिळेल याचा विचार करतात. अनुभव सर्वांनाच मिळतात, पण त्यांचा उपयोग करून शिकणारे थोडेच असतात. त्यात तुम्ही आहात ही आनंदाची गोष्ट आहे.

अशी विचाराची सवय लागली म्हणजे त्यातूनच एक अनुभवाचा वेदान्त, तत्त्वज्ञान, किंवा व्यवहारज्ञान तयार होते. ही माणसे सूज्ञ म्हणून समजली जातात आणि त्यांच्या मार्गदर्शनाचा समाजाला फायदा होतो. समाजाची प्रगती आणि स्थिरता अशा व्यक्तींवर अवलंबून असते.

तुम्ही स्वतःला ही सवय लावून घ्या आणि कुटुंबातल्या माणसांतही ती वाढवा. चार माणसे एकत्र आली म्हणजे गैरहजर व्यक्तींची नालस्ती करण्यात वेळ घालवतात. नालस्ती, टीका, कुचेष्टा, निंदा हा मानवाचा अनादी कालापासून करमणुकीचा व वेळ घालवण्याचा मार्ग आहे ! त्याचेच अनुकरण करण्यापेक्षा त्यांनी अशा लहानमोठ्या घडामोडींवर विधायक चर्चा केली तर त्यांच्या ज्ञानात, विचारात, अनुभवात भर पडेल. शहाण्या आणि विचारी माणसांचे समाजातील प्रमाण वाढेल. आपला समाज अधिक विचारी व सुसंस्कृत होईल.

[ ८-९-१९६४

# ४८. मनाची आघाडी खंबीर हवी

**देशाचे** संरक्षण हा भारतापुढे अत्यंत महत्त्वाचा व निकडीचा प्रश्न आहे. प्रत्येक लहान थोर नागरिकाने त्याचा विचार करावयास पाहिजे. संरक्षणाची जबाबदारी सरकारची आहे तशीच ती आपली प्रत्येकाची आहे.

संरक्षणाची तयारी-तीन प्रकारांनी होत असते. नागरिकांची मने खंबीर पाहिजेत. त्यांची मनगटे दणकट पाहिजेत आणि त्यांची शस्त्रे अद्ययावत पाहिजेत. त्यांपैकी तिसरी जबाबदारी सरकारची आहे. परंतु कणखर मन आणि जोरदार मनगट तयार ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.

यू. नो. चे माजी कार्यवाह कै. सर डाग हॅमरशील्ड यांचे प्रसिद्ध वाक्य आहे कीं "युद्धाचा जन्म माणसाच्या मनात होतो." हे वाक्य पुरे करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, "संरक्षणाची तयारी सुद्धा माणसाच्या मनातच होते." भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या मनात ही वृत्ती रुजवली पाहिजे.

जिवंत प्राण्यामध्ये स्वसंरक्षणार्थ प्रतिकार-वृत्ती अगदी नैसर्गिक आहे. एक महिन्याचे मांजराचे पिल्लू देखील डिवचले असता जबडा वासते आणि पंजा उगारते. जन्मसिद्ध असलेल्या ह्या मनोवृत्तीची जोपासना प्रत्येकाने केली पाहिजे. आई, बाप, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, कवी, वक्ते, संपादक, कचेऱ्या-कारखान्यांचे मालक, कारकून व कामगारांचे नेते—या सर्वांनी आपापल्या क्षेत्रात संरक्षण मनोवृत्तीचे संवर्धन केले पाहिजे. मनोवृत्ती आणि शरीरयष्टी तयार ठेवणे आपले कर्तव्य आहे. अद्ययावत शस्त्रास्त्रे देणे हे सरकारचे काम आहे.

भारताचे तरुण मजबूत हाडापेराचे आणि भरभक्कम शरीराचे असे व्हायला हवेत. त्याकरता नियमित व्यायाम आणि मेहनत आवश्यक आहे. जोर-बैठका, नमस्कार, आसने यांसारखा व्यायाम घरीही करता येतो, आणि धावण्याचा व्यायाम कोठल्याही रस्त्यावर किंवा मैदानात करता येतो. व्यायाम न घेणारे खुजट नेभळट तरुण या देशाला नकोत. पोलादी हाडापेराचे आणि बुरुजासारख्या छातीची माणसे देशाच्या संरक्षणाकरता पाहिजेत. त्यांच्या शरीराप्रमाणे त्यांची मनेही पोलादी पाहिजेत. स्वातंत्र्य टिकवण्याची जिद्द आणि शत्रूला पाणी दाखविण्याची ईर्षा मनात असेल तरच मनाची आघाडी खंबीर राहील.

आपल्या देशाच्या संरक्षणाचे बुरूज आपण राष्ट्राच्या मनोवृत्तीत बांधू या. मनाची आघाडी खंबीर ठेवू या.

[९-९-१९६४

# ४९. दानाचा फायदा श्रीमंतही घेतात

**श्रीमंत** लोक फक्त दान देतात अशी सर्वसामान्य कल्पना आहे. पण इतरांनी दिलेल्या दानाचा ते फायदा घेतात, हे कसे काय ते लौकर लक्षात येणार नाही.

सार्वजनिक स्वरूपाच्या ज्या मोठमोठ्या संस्था आहेत त्या दानधर्मावर चालतात, आणि त्यांचा फायदा गोरगरीब, मध्यम वर्गीय आणि श्रीमंत असे सर्व लोक घेतात. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचा खर्च केवळ फीवर भागत नाही. चालकांना देणग्या मिळवायला लागतात, तेव्हा ग्रंथालये, मोठमोठ्या प्रयोग-

शाळा, सभागृहे इत्यादी इमारती उभ्या राहातात. मोठ्या ग्रंथालयांचा फायदा सर्व लोक घेतात आणि ग्रंथालयांना दानशूर लोकांच्या देणग्या असतात. विद्यापीठात मुख्यत: सुखवस्तू पालकांची मुले शिक्षण घेतात. अशा विद्यापीठांना धनिकांच्या मोठमोठ्या देणग्या मिळवाव्या लागतात. हॉस्पिटलमध्ये गरीब आणि श्रीमंत दोघांचीही व्यवस्था होते. श्रीमंत पैसा देऊन उपचार घेतात पण त्यांच्याकरता होणाऱ्या खर्चाच्या मानाने तो कमीच असतो. ही यादी अशीच वाढवता येईल. लहानमोठ्या गावांत असणाऱ्या सर्व प्रकारच्या संस्था पाहा. त्यांना उदार लोकांच्या देणग्या असतात आणि त्या संस्थांचा फायदा गरीब आणि श्रीमंत सर्वच लोक घेतात.

संस्थांचा फायदा सर्वांनी घेण्यात वावगे काही नाही. गरीब देशांनाही श्रीमंत देशांकडून देणग्या घ्याव्या लागतात; तसेच संस्थांचे आहे. समाजात दानधर्माची प्रवृत्ती आहे म्हणून सार्वजनिक कामे चालतात आणि त्यांचा सर्वांना उपयोग होतो.

इतरांच्या औदार्याचा फायदा आपणाला झाला आहे, याची सर्वांनी जाणीव ठेवावी आणि आपल्या दानधर्माचा फायदा समाजाला द्यावा. तसे केले नाही तर कृतघ्नपणा पदरात येईल. समाजातील सार्वजनिक संस्थांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा आपण घेतला, पण त्या संस्थांचा योगक्षेम चालावा म्हणून आपल्या खिशातून आपण काही दिले नाही तर आपण स्वार्थी ठरू. तुम्ही जो पैसा मिळवता त्यातला काही भाग तरी समाजाकडे परत गेला पाहिजे. प्रत्येक जण आपला संसार आणि आपला गोतावळा यांच्यापुरतेच पाहू लागला तर सार्वजनिक कामे कशी चालतील? महाविद्यालये, विद्यापीठे, हॉस्पिटले, ग्रंथालये, संग्रहालये, उद्याने, प्रयोगशाळा, क्रीडाशाळा इत्यादी संस्था समाजाची भूषणे आहेत. त्यांचा योगक्षेम चालवण्याकरता दानधर्म करणे, देणग्या देणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.

भारतीय आचारधर्मात हा रोजच्या कार्यक्रमातला आवश्यक भाग आहे. यज्ञ–दान–तप: कर्म न त्याज्यम् कार्यमेव तत् । यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ।। मनाला पावित्र्य, शान्ती आणि समाधान देणाऱ्या अनेक गोष्टींत दानाचाही समावेश आहे. समाजाला न देता जो आपल्या संपत्तीचा उपभोग घेतो त्याला "चोर" अशी संज्ञा गीतेने दिली आहे.

तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव स: ।।

[ १०–९–१९६४

# ७०. पालकांना प्रोग्रेसबुक येणार !

**शाळेतल्या** मुलांना प्रोग्रेसबुक असते आणि ते दरमहा तुमच्याकडे सहीकरता येते. त्यात मुलांच्या अभ्यासाची आणि इतर वर्तनाची प्रगती लिहिलेली असते. अगदी त्याच पद्धतीने पालकांच्या प्रगतीची नोंद ठेवण्याकरता व ती दरमहा भरण्याकरता एक पालक-प्रोग्रेस-बुक येणार आहे ! पालकांची बौद्धिक प्रगती आणि वर्तनविषयक सुधारणा या बुकात नोंदली जाणार आहे ! ही प्रोग्रेसबुके कोणी लिहायची, ती कोणाला दाखवायची, त्यावर सही कोणी करायची आणि सुधारणाविषयक सूचना कोणी द्यायच्या तो तपशील अद्याप ठरावयाचा आहे.

काळजी करू नका. भिऊ नका. ही आपली रिकामपणात सुचलेली माझीच कल्पना आहे ! पण ती व्यवहारात आणली तर काय होईल याचा तुम्हीही रिकामपणाच्या वेळात विचार करा. आपापसात चर्चा करा. पालक बिघडू लागले आहेत म्हणून मुले बिघडतात असे वाटणारा एखादा शिक्षणमंत्री आला आणि त्याने खरोखरच अशी पालक-प्रोग्रेस-बुके सुरू केली तर काय होईल ? मला वाटते, असे झाले तर मुलांच्या प्रोग्रेसबुकातही एकदम सुधारणा दिसायला लागेल ! गुरुजींनी त्यांना दिलेल्या अभिप्रायात, मार्कात आणि शेऱ्यात एकदम खरोखरच प्रगती दिसायला लागेल. घराच्या वातावरणातून सुधारणा झाली की मुलांच्या वागण्यात आणि अभ्यासात प्रगती झालीच पाहिजे.

आता असे करा. स्वतःपुरते प्रोग्रेसबुक तुम्हीही एक वर्षभर ठेवूनच पाहा. त्या निमित्ताने महिन्यातून एकदा तरी तुम्ही सिंहावलोकन आणि आत्मनिरीक्षण कराल. पहिली गोष्ट अभ्यासाची घ्या. तुमच्या बौद्धिक विकासाची नोंद यात येईल. तुम्ही काय काय पुस्तके वाचली ते लिहा. काय काय लिहिले याची नोंद करा. चांगली व्याख्याने, रेडियोवरची भाषणे, चर्चा इत्यादी ऐकल्या असतील तर त्यांचे टिपण करा. तुम्ही हिंदी, जर्मन, जपानी, रशियन यासारखी एखादी नवीन भाषा शिकत असाल तर नोंद करा. मुलांना त्यांच्या अभ्यासात मदत करता यावी म्हणून किंवा केवळ जिज्ञासा म्हणून मुलांची शाळा-महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमातील पुस्तके वाचली असतील तर ती लिहा. मासिकातले चांगले लेख वाचले असले तर तेही भरा. सारांश, तुमच्या बौद्धिक विकासाकरता तुम्ही जे जे केले असेल ते ते लिहा. मग मुलांना दाखवा आणि सांगा—'बघा, आम्हीही अभ्यास करतो.'

दुसरे सदर आले व्यायामाचे. तुम्ही काही नियमित व्यायाम घेता का ? जोरबैठका, नमस्कार, आसने, प्राणायाम, धावणे, फिरणे, बागकाम, लाकडे फोडणे,

स्वतःची व घरातील कामे करणे इत्यादी शारीरिक श्रमाचा व्यायाम घेत असाल तर त्याची नोंद करा. घेत नसाल तर आजपासून प्रारंभ करा.

तिसरे सदर आहे नियमितपणाचे. तुम्ही सकाळी लौकर आणि वेळेवर उठता का ? कामाला जायला किती वेळा उशीर झाला ? घरी यायला किती वेळा निष्कारण उशीर झाला ? सर्वांची नोंद करा.

आता अभ्यासेतर कार्यक्रम म्हणजे छंदाचे संदर आहे. तुमचा रिकामपणाचा वेळ तुम्ही कसा घालवता, ते येथे लिहायचे आहे. गायन, चित्रकला, तिकिटसंग्रह, यंत्रकाम, रेडियो बनविणे, बगीचा, गुलाबाची मशागत—अशा प्रकारचा काही छंद तुम्हाला आहे का ? शनिवार–रविवार–सण इत्यादी सुट्टचा कशा घालवता ? स्पष्टपणे लिहा. मुलांनाही कळू द्या तुमचे छंद. ते अनुकरण करतील.

आता शेवटचे सदर वर्तन. सहसा तुमचे वर्तन वाईट नसते हे आम्हाला माहीत आहे ! पण काही व्यसन वगैरे असले तर नोंद करून ठेवा. हळूहळू ते कमी करून निर्व्यसनी व्हायचा प्रयत्न करा. घरातल्या माणसांशी कसे वागता ? किती वेळा निष्कारण रागावता ? कधी लोभाला बळी पडलात का ? रोज काही तरी धार्मिक-नैतिक कार्यक्रम करता का ? देवपूजा, जपजाप्य, धार्मिक ग्रंथ वाचन, गीतावाचन, देवदर्शन अशा प्रकारचे सात्त्विक-वृत्तींचा विकास करणारे काही करता की नाही ? नसल्यास सुरू करा.

आता वरील प्रत्येक विषयात स्वतःला मार्क द्या. पास झालात का ? कोणता वर्ग मिळाला ? पहिलाच असेल बहुतेक. नापास तर नक्की नाही.

[ १०–९–१९६४

# ७१. अलौकिक कर्तबगारीत दोष जिरून जातात

**माणूस** म्हणजे गुण आणि दोष यांचे मिश्रण. प्रत्येक माणसात काही गुण तसेच काही दोष असतात. त्यांचे प्रमाण कमीजास्त असते. तसेच त्यांची पातळीही कमी अधिक उंचीची असते.

सर्वसामान्य माणसात गुणांची व दोषांची पातळी मध्यम असते. अलौकिक आणि थोर व्यक्तींमध्ये गुणांची पातळी अतिशय उंच असते. त्यांच्यातही दोष असतात, पण त्यांचे प्रमाण कमी असते, आणि त्यांच्या गुणांमुळे दोष लुप्त होतात.

देवादिकांनी मानवी अवतार घेतले असे आपण म्हणतो. मानव म्हटला की गुण आणि दोष आलेच. असेच गुणदोष राम, कृष्ण इत्यादी अवतारांतही आपणास दिसतात. देवादिक अवताराप्रमाणे थोर थोर विभूतीही दोषापासून अलिप्त नाहीत. त्यांच्या अलौकिक सद्‌गुणांपुढे दोषांचे सामर्थ्य कमी पडते. गुणांच्या अग्नीमध्ये दोषांची राख होऊन जाते. श्रीरामाच्या ठिकाणी पितृप्रेम, सत्यनिष्ठा, बंधुप्रेम, त्याग, पराक्रम, असे असामान्य गुण होते. त्याने अन्यायाने केलेला सीतेचा त्याग स्त्रियाही विसरून जातात. श्रीकृष्णाच्या ठिकाणी ज्ञान, नीती, मित्रप्रेम, पराक्रम इत्यादी मोठे गुण होते. त्यांच्यापुढे त्याच्या वृंदावनातील काल्पनिक लीलांनाही सात्त्विक आणि दैवी स्वरूप दिले जाते. बाजीरावाच्या ठिकाणी अलौकिक पराक्रम होता. त्याच्यापुढे त्याच्या मस्तानीप्रेमाला गौणत्व प्राप्त झाले. स्वर्गवासी जवाहरलाल नेहरूंच्या ठिकाणी जाज्वल्य देशप्रेम, अलौकिक कर्तबगारी, त्याग, जनताप्रेम असे गुण होते. त्यापुढे त्यांच्या हट्टीपणाचा लोकांना विसर पडला. अलौकिक उत्कट सद्‌गुणांत एखाद्या दोषाचा लोप होऊन जातो. अनेक गुणांत एखादा दोष जिरून जातो.

विचारी लोकांनी एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी की मोठ्या माणसांचे दोष हे दोषच असतात. ते गुण होऊ शकत नाहीत. ते सहन करायचे, विसरायचे, गौण मानायचे, त्यांच्याकडे कानाडोळा करायचा—पण त्यांच्यावर सद्‌गुणाची पुटे चढवायची नाहीत. त्यांचे अनुकरण करायचे नाही. त्यांच्या अनुकरणाला प्रोत्साहन द्यायचे नाही, कारण सामान्य माणसाच्या ठिकाणी तेवढे तारतम्य नसते. गुणांचे अनुकरण करायला प्रयत्न करावा लागतो. दोषांचे अनुकरण सहज आणि लौकर होते. श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान आणि पराक्रम यांचा लोकांना विसर पडतो. त्याच्या गोकुळातील लीलांनाच कवी आणि साहित्यिक यांनी फाजील महत्त्व देऊन श्रीकृष्णाचा आदर्श विकृत करून टाकला आहे. कृष्णाच्या गीतेकडे तर साहित्यिकांचे लक्षही नाही ! त्यांनी गीतेपेक्षा राधेलाच फाजील महत्त्व दिले आहे.

असामान्य स्त्रीपुरुषांची चरित्रे वाचा. त्यांच्या सद्‌गुणांचे अनुकरण करा. त्यांच्यातले दोष कटाक्षाने टाळा. शेवटी सद्‌गुण ते सद्‌गुण आणि दोष ते दोषच आहेत हे लक्षात ठेवा. गुणांचे प्रमाण इतके मोठे असावे की, त्यात एखादा दोष विसरून जावा.

[२३-९-१९६४

# ७२. स्तुती—पण तिसऱ्याचीच

**पैसे** खर्च न करता इतरांच्या आनंदात भर टाकण्याचे एक स्वस्त, सोपे, सुलभ साधन आपल्या प्रत्येकाजवळ आहे. स्तुती. स्तुतीमुळे आनंदित होत नाही असा मनुष्य विरळा. सामान्य माणसे स्तुतीने प्रसन्न होतात यात काही आश्चर्य नाही. पण बौद्धिक, मानसिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात वरच्या पातळीवर पोचलेली माणसेही स्तुतीची भुकेली असतात. स्तुतीने त्यांना समाधान वाटते. आपल्या कुटुंबातली माणसे, नातेवाईक, मित्रमंडळी, सहकारी, परिचित, व्यवसाय क्षेत्रातली वरिष्ठ आणि कनिष्ठ माणसे—सर्वांना तुमच्या स्तुतीमुळे आनंद वाटेल.

स्तुती अतिरेकाला गेली म्हणजे तिला तोंडपूजेपणाचे स्वरूप येते. त्या दुर्गुणापासून अलिप्त राहा. खोटे न बोलता, ढोंग न करता— खऱ्या गुणांची व वास्तविक चांगुलपणाची स्तुती करण्यात काय वाईट आहे ? स्तुती करायची म्हणजे "स्तुती सुमनांचा वर्षाव" करायला पाहिजे असे नाही. खऱ्या गुणांबद्दल आपले कौतुक आणि गुणग्रहण अनेक संयमित मार्गांनी दाखवता येते. त्यामुळे स्तुतीला तोंडपुजेपणाचे स्वरूप येत नाही आणि कौतुकाचा स्वीकार करणारालाही लाजल्यासारखे होत नाही.

समोर असलेल्या माणसाच्या गुणाचे कौतुक न करता तिसऱ्याच व्यक्तीचे गुणगान करण्याची सवय काहींना असते, ती फार वाईट. वसंतरावांच्या स्वागताचा समाचार घेत असताना गोविंदराव फार आतिथ्यशील आहेत असे म्हणायचे; उषाताईंच्या चहाचे घोट घेताना स्तुती करायची प्रभाताईंच्या चहाची. गजाननरावांची बाग पाहात असताना म्हणायचे की नारायणरावांची बाग फार सुंदर आहे. एखाद्या लेखकाने, कवीने किंवा चित्रकाराने आपली कलाकृती दाखवायला आणली की स्तुती करायची तिसऱ्याच कवीची, लेखकाची किंवा चित्रकाराची. कृष्णाबाईंचा काळासावळा गोजिरवाणा मुलगा पाहात असताना राधाबाईंचा बाळ गोरा आहे म्हणायचे. या प्रसंगांत स्तुती झाली, पण कोणाची ? ज्याच्यासमोर तुम्ही इतरांची स्तुती केली त्याची अप्रत्यक्षपणे अवहेलनाच नाही का झाली ? पण न कळत शहाणी माणसे देखील असला मूर्खपणा करतात. म्हणून निदान गप्प बसा. पण ज्याचा गौरव करायचा त्याच्याच समोर इतरांचे पोवाडे गाऊ नका. प्रत्येकाला त्याचे श्रेय त्याच्या हजेरीत द्या. काही नुकसान होणार नाही. त्या माणसाच्या आनंदात भर पडेल. त्याला उत्तेजन मिळेल.

संसारात कष्ट आणि दु:खे पुष्कळच आहेत. आपण काही त्यांचा परिहार करू शकत नाही; पण आनंदात भर टाकणे आपल्या हातात आहे. दिलखुलास

अंत:करण, गुणग्राहक दृष्टी आणि कौतुक करण्याचे चार शब्द---एवढ्या भांडवलावर आपण पुष्कळ आनंद निर्माण करू शकतो.

[२४-९-१९६४

# ७३. दान आणि त्याग यांतील भेद

**दानधर्माचे** महत्त्व प्रत्येक धर्मात सांगितलेले आहे. भारतीय संस्कृतीत जीवनाची योजनाच अशी होती की संसारी माणसाच्या हातून रोज काही ना काही तरी दानधर्म व्हावा. आल्यागेल्या याचकाला भिक्षा घालणे, अतिथीला भोजनास बसवणे, गायीला गोग्रास देणे, मधुकरी, वार अशा अनेक मार्गांनी दानधर्माची सवय लागावी अशी जीवनाची रचना होती.

कालमानाप्रमाणे आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती बदलते. दानधर्माची प्रवृत्ती अधिक पद्धतशीरपणाने संघटित व व्यवस्थित करण्याकरता संस्था निर्माण झाल्या आहेत. व्यक्तीला दान देण्यापेक्षा संस्थेकडे दान दिले असता त्याच्या विनियोगाची व्यवस्था चांगली होते. दान देणाराची व घेणाराची दोघांची सोय होते.

दानधर्माच्या मुळाशी त्यागाचे तत्त्व आहे. आपल्याला जे काही मिळते त्यातील काही अंश आपण समाजाला, समाजातील गरजू व्यक्तींकरता, परत द्यावा. स्वार्थाबरोबर परार्थाचाही विचार करावा. समाजाकडून आपण अनेक स्वरूपात द्रव्य आणि सेवा घेतो; काही प्रमाणात तरी या द्रव्याचा त्याग करून ते समाजाला दिले पाहिजे. देण्याची सवय पाहिजे, निव्वळ घेण्याची प्रवृत्ती असू नये.

दानधर्म करायला मनुष्य श्रीमंतच पाहिजे असे नाही. त्यागाची वृत्ती, देण्याची सवय, ममत्व सोडण्याची तयारी, 'इदं न मम' म्हणून पाणी सोडण्यातील पावित्र्य---या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. दानाचे प्रमाण माणसाच्या ऐपतीप्रमाणे व बुद्धीप्रमाणे राहील. त्यागाचा मोठेपणा दानाच्या आकारावरून ठरवता येत नाही.

श्रीमंत माणसेही त्यागाच्या दृष्टीने कंजूष असू शकतात. उलट गरीब माणसेही त्यागाच्या दृष्टीने उदार असू शकतात. एक स्वामी बसमधून प्रवास करीत होते. पैसे नव्हते म्हणून कंडक्टर त्यांना खाली उतरवू लागला. एका भिक्षेकऱ्याने आपल्या झोळीतले सर्व पैसे देऊन स्वामींना तिकिट देवविले. बसमध्ये सधन व्यापारी, पैसेवाले लोक अनेक होते. ते दानधर्मही करीत असतील. पण साध्या भिकाऱ्याने दाखविलेली त्यागाची वृत्ती त्यांच्या ठिकाणी नव्हती.

त्यागाचे मोजमाप माणसाच्या वृत्तीवरून करावयाचे असते. श्रीमंताने दिलेले लाख रुपये आणि गरीबाने दिलेला एक रुपया—यांत आर्थिक दृष्टीने फरक आहे, पण अध्यात्मिक दृष्टीने साम्य आहे. दोघांच्या त्यागाचे महत्त्व समान आहे.

आपल्या ठिकाणची त्यागाची वृत्ती जिवंत ठेवा. दैनिक जीवनात लहानसहान त्याग करण्याने त्यागाची सवय कायम राहते. स्वार्थी वृत्ती कमी होते. द्रव्यसंचयाची हाव मर्यादित राहते.

[२९-९-१९६४

## ५४. जनताशक्तीचे गुण व दोष

**आजचे** युग हे जनता-युग आहे. जनता ही कल्पना, शक्ती आणि वर्ग—ही नव्याने अस्तित्वात आली आहेत. गेली दोन शतके त्यांचा विकास होत होता. आज त्यांचा प्रसार जगातील प्रत्येक देशात झालेला आहे. भावी काळ हा जनतेचा आहे. समाजाचे भावी स्वरूप आणि त्याच्या प्रगतीची दिशा निश्चित करण्याचे काम जनता या शक्तीचे आहे. म्हणून, या नवीन शक्तीच्या गुण-दोषांची माहिती पाहिजे. तिच्या मर्यादा लक्षात यायला पाहिजेत. उद्देश हा की गुणांचा विकास करता यावा आणि दोषांचा परिहार करण्याचा प्रयत्न व्हावा. जनतेच्या शक्तीला ज्या मर्यादा असतील त्यांच्यापलीकडे समाजाला नेण्याकरता इतर शक्तींची जोड जनताशक्तीला देता यावी.

संख्येचे सामर्थ्य हा जनताशक्तीचा अतिशय मोठा गुण आहे. या सामर्थ्यापुढे सम्राटांच्या शस्त्रांचे सामर्थ्यही हतबल होऊन जाते. भावनांचा भयंकर जोर हा जनतेचा दुसरा मोठा गुण आहे. ज्या भावनांचा स्वीकार जनतेने केला असेल त्यांचा जोरदार आविष्कार आणि प्रभाव जनतेतील प्रत्येक व्यक्तीमध्ये होतो. कृतिशीलता हा जनतेचा तिसरा गुण आहे. हातात घेतलेले कार्य सर्व सामर्थ्यानिशी तडीला नेण्याचे काम जनताच करू शकते. सर्वस्वत्यागाची तयारी हा जनतेचा चौथा अत्यंत महत्त्वाचा गुण आहे. जनतेच्या प्रवाहात सापडलेली व्यक्ती त्यागाच्या कल्पनेने इतकी भारली जाते की त्या वातावरणात प्रत्येक व्यक्ती अलौकिक स्वार्थत्याग करायला सिद्ध होते. तन, मन आणि धन यांचे समर्पण करण्याची जनतेची शक्ती अमर्याद असते.

या सर्व गुणांचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने जनतेचे नेतृत्व ज्या व्यक्तीला किंवा पक्षाला लाभले त्याला आपला कार्यक्रम यशस्वी करणे शक्य व सुलभ होते.

परंतु हे पक्ष व नेते जनतेच्या फक्त शक्तीचाच उपयोग करून घेतात आणि दोषांचा परिहार करण्याचा काही प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे आज जगातील सर्वच देशांत, केवळ भारतातच नव्हे, जनतेची शक्ती प्रतिगामी मार्गाला लागत आहे. मानवी जीवनाची उच्च उदात्त मूल्ये त्यामुळे दुर्लक्षिली जात आहेत. कसे ते पाहा.

जनतेचा उपयोग मूलगामी विचारांची प्रेरणा निर्माण करण्यापेक्षा एखाद्या उथळ नेत्याच्या उथळ विचारांचा प्रसार करण्याकडे केला जातो. असे विचार बहुधा आकुंचित वृत्तीचे असतात व ते जनतेला लौकर आकर्षिक करतात. व्यापक ध्येयापेक्षा संकुचित ध्येयाकरता जनतेच्या शक्तीचा उपयोग केला जातो. जनतेतून स्वतंत्र, निराळा, भिन्न, विधायक विचार निर्माण करण्याला काही प्रोत्साहन मिळत नाही: असा कोणी निघाल्यास त्याला विरोध होतो.

आकुंचित वर्गजुटीची प्रवृत्ती जनतेत जोपासली जाते. विशिष्ट व्यवसायाचे किंवा हिताचे लोक एकत्र येतात आणि स्वतःच्या हिताच्या व फायद्याच्या आधारावर त्यांची एकजूट व शक्ती केंद्रित केली जाते. मग न्याय-अन्याय, कायदा, नियम, व्यवहार-सरलता गोष्टी पाहिल्या जात नाहीत.

आपल्याच वर्गातील नेत्यावर जनतेची निष्ठा असते. विचाराच्या अचूकतेपेक्षा नेत्याची जातगोत, व्यवसाय, वर्ग, या गोष्टी जनतेला अधिक आपलेपणाच्या वाटतात. बाहेरच्या माणसाने चार हिताच्या गोष्टी सांगितल्या आणि केल्या तरी त्यांना किंमत दिली जात नाही.

विधायक कामापेक्षा विध्वंसक कामाकडे जनतेची प्रवृत्ती फार लौकर वळवता येते. मोडतोड, जाळपोळ, पाडापाडी, लूटमार, हाणामारी, खून—अशा स्वरूपात जनतेच्या भावना व्यक्त करायला तिचे नेते उत्तेजन देतात. कारण तसे करणे अगदी सोपे जाते. विधायक गोष्टीकडेही जनतेची शक्ती वळवता येईल. पण तसे केले जात नाही.

जनतेला तर्कनिष्ठ आणि बुद्धिप्रधान असे विचार आकलन होऊ शकत नाहीत. जनतेतीलच असामान्य विचारांचा पुरुष असला तरी त्याची विचारसरणी जनतेला आकलन होऊ शकत नाही. कारण सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीचा आवाकाच सामान्य असतो. त्याची बुद्धी फार खोल किंवा फार उंच जाऊ शकत नाही. त्यामुळे विचारप्रधान नेतृत्वापेक्षा भावनाप्रधान नेतृत्वाचा प्रभाव जनतेवर अधिक पडतो.

जनतेचे हे गुणदोष सर्व काळी सर्व समाजात आढळून येतात. आपला समाज त्याला अपवाद नाही. या परिस्थितीत सुधारणा करणे जनतानेत्यांचे कर्तव्य आहे. जनतेमध्ये अधिक शिक्षणाचा प्रसार करणे, तिला विचार करण्याची सवय लावणे,

न्याय-अन्याय यांतील तारतम्य शिकवणे; व्यापक ध्येयवाद देणे, स्वतंत्र बुद्धिमत्तेला उत्तेजन देणे--या गोष्टी पक्षनेत्यांनी केल्या तर जनतेच्या संस्कृतीची पातळी निश्चितपणे सुधारेल.

[ २९-९-१९६४

# ५५. वार्तांचे अर्थ व परिणाम

**प्राचीन** काळच्या आणि आजच्या साक्षर नागरिकांत फरक कोणता आहे ? अगदी महत्त्वाचा फरक असा, की आजचा नागरिक वर्तमानपत्र वाचल्याशिवाय किंवा वार्तापत्र ऐकल्याशिवाय झोपत नाही. पूर्वी अशी स्थिती नव्हती. आज रस्ता झाडणाऱ्या कामगारापासून तो देशाच्या अध्यक्षापर्यंतचे सर्व लोक सकाळची वृत्तपत्रे वाचतात. घरातल्या आजीबाईपासून खेड्यातल्या शेतकऱ्यापर्यंतचे सर्व लोक निदान रेडिओवरील वार्तापत्र ऐकतात. देशात आणि जगात काय चालले आहे त्याच्या वार्ता चोवीस तासांच्या आत आपल्या कानावर किंवा दृष्टीवर येऊन आदळतात.

मी म्हटले 'कानावर व दृष्टीवर' आदळतात. त्यांच्या 'आत' शिरतातच असा प्रयोग मी केलेला नाही ! कारण बहुतेक लोक या वार्ता किंवा घटना एका कानाने ऐकतात व दुसऱ्या कानाने सोडून देतात. 'दु-काना'तून जाताना आतील 'माला'वर त्यांचा फारसा परिणाम होत नाही. त्यामुळे 'अर्थप्राप्ती' ही बेतावाताचीच होते. बातम्यांचा अन्वयार्थ आणि त्यांचा संभाव्य परिणाम यांचा विचार करणारे अगदी थोडे असतात. तुम्ही त्यांचा जितका विचार करता तितका इतर लोक करीत नाहीत.

प्रत्येक घटनेत काही अर्थ असतो. तिचे तात्कालिक आणि दूरगामी परिणाम होणार असतात. काहींचा संबंध तुमच्या जीवनाशी, काहींचा देशाच्या भवितव्याशी आणि काहींचा मानवाच्या जीविताशी असतो.

तुम्ही रोज एकदोन घटनांवर विचार करीत जा आणि इतरांच्याजवळ तो बोलून दाखविण्याची सवय करा. भोजनाच्या वेळी कुटुंबातल्या मुलाबाळांना व स्त्रीपुरुषांना तो सांगत जा. त्यांनाही विचार करण्याची सवय होईल. विचाराने विचार वाढतो. बुद्धीला चालना मिळते. वातावरणात बौद्धिक व वैचारिक कस निर्माण होतो. समाजातील विचारात्मक जीवन वाढीला लागते.

वृत्तपत्राचा संपादक आणि तुम्ही यांत हाच महत्त्वाचा फरक आहे: संपादकाला रोजच्या बातम्या वाचाव्या लागतात, त्यांतील महत्त्वाच्या कोणत्या त्या

निवडाव्या लागतात, आणि अशा दोनतीन निवडक घटनांवर सर्व बाजूंनी विचार करून संपादकीय लिहावे लागते. असे अनेक वर्षे करता करता ही सवयच त्याच्या अंगवळणी पडते. अनेक घटनांवर त्याने विचार केलेला असतो. त्याचा अन्वयार्थ लावलेला असतो. त्यामुळे त्याच्या लिहिण्याला आणि बोलण्याला एक प्रकारचे महत्त्व प्राप्त होते.

अगदी अल्प प्रमाणावर प्रत्येक वाचक हाही एक संपादक आहे. लिहिण्याची व छापून प्रसिद्ध करण्याची जबाबदारी त्याच्यावर नाही. पण वाचन करून निवडक घटनांवर विचार करण्याची व ते विचार आपल्या संवादात किंवा गप्पागोष्टींच्या वेळी इतरांना सांगण्याची संधी प्रत्येकाला मिळू शकते.

या सवयीचा दुसरा एक सात्त्विक परिणाम होईल. चार माणसे जमली की पाचव्या गैरहजर माणसावर टीका करणे हा सगळ्यांचा एक आवडीचा छंद असतो. अनुपस्थित व्यक्तीची नालस्ती हा गप्पागोष्टीत प्रमुख विषय असतो. रिकामपणाचा वेळ कुटाळकीत घालवणारे लोक अनेक असतात. त्यांना बोलायला दुसरा विषय नसतो. अशा मंडळीत प्रचलित घडामोडींवर बोलणारा एखादा सभासद असला तर तो या कंपूचा बौद्धिक कायाकल्पच करून टाकील.

वार्ता वाचून व ऐकून त्यावर विचार करायची व बोलायची सवय करा.

[३०-९-१९६४

# ५६. अन्नावर अनावर आसक्ती

**आपल्या** शरीरातील प्रत्येक अवयवात एकेका विशिष्ट शक्तीचे अस्तित्व असते, असा सर्वसामान्य समज आहे.

बुद्धीचे स्थान–डोके. प्रेमाचे स्थान–काळीज. ईश्वराचे स्थान–अंतःकरण. या संकेतात एक भर घालणे अवश्य आहे. ती अशी, आरोग्याचे स्थान–आपले पोट. योगसाधकाला अन्न हे ब्रह्म आहे. पण खादाड माणसाला योगी होता येणार नाही. अन्न तारी, अन्न मारी.

अन्नाचा युक्तीने उपयोग केला तर त्याचा दोन प्रकारांनी उपयोग होतो; पोषण आणि औषधोपचार. अन्नाने पोषण होते. शरीर सुदृढ होऊन त्याचे आरोग्य वाढते. आरोग्यामुळे बुद्धी आणि मन यांचे सामर्थ्य प्रभावी होते.

अन्नाचा उपयोग कांही प्रमाणात औषधोपचारासारखाही होतो. आहारोपचार हे शास्त्र प्राचीन आयुर्वेदात प्रगत झाले होते. पथ्यपाणी व अनुपान यांना पूर्वी

फार महत्त्व होते. पाश्चात्य वैद्यकाने अलीकडे हे शास्त्र बरेच वाढवले आहे. त्याची माहिती प्रत्येकाल असणे अवश्य आहे.

अन्नाचा दुरुपयोग केला म्हणजे आजार आणि स्वभावविकृती निर्माण होतात. शेकडा ९९ रोगांचे कारण खादाडपणा आणि आचरट आहार हे आहे. त्यामुळे रोग वाढतात. स्वभावातील रागीटपणा, चिडखोरपणा, आळस, सुस्ती, बुद्धिमांद्य हे दोष वाढीला लागतात.

जेवणातल्या पहिल्या भागाचे अमृत होते. दुसऱ्या भागाचे रक्त होते. तिसऱ्या भागातून मात्र दूषित द्रव्ये निर्माण होतात. जेवणातले शेवटचे पुष्कळसे घास अनावश्यक असतात. पोट भरल्यावर घेतलेले अन्न स्वतःच्याच किंवा इतरांच्या आग्रहाने आपण खातो. त्याची शरीराला गरज नसते. अनावश्यक असताना घेतलेला एकेक घास आयुष्यातील एकेका दिवसाचा घास करतो ! आजार आणि अपमृत्यू यांना जवळ आणतो.

अती खाणे हा रोग आहे. तसेच राजस आणि तामस अन्न खाणे हाही रोगच आहे. तिखट, तेलकट, आंबट, दाहक, रुक्ष, जड, शिळे, जीवनसत्त्वरहित असे अन्न प्रमाणात खाल्ले तरी ते आरोग्याला आणि मानसिक समाधानाला मारक असते. समतोल आहाराचे शास्त्र साधे सोपे आहे. त्याची माहिती प्रत्येक व्यक्तीला पाहिजे. पुरेशी पोषणद्रव्ये आणि जीवनसत्त्वे असलेला आहार प्रमाणात घेतला तर आरोग्य वाढते. तामसी आहाराने आजार आणि अपमृत्यू यांचे प्रमाण वाढते.

युक्ताहार करणारी व्यक्ती आरोग्यसंपन्न, बुद्धिमान, कर्तबगार, समाधानी, सुखी व शांत असते. अती आहार आणि चुकीचा आहार घेणारा माणूस विकृतींनी भरलेला, सदा रोगी, चिडखोर, सुस्त, असमाधानी आणि तामसी वृत्तीचा बनतो.

अन्नावर माणसाची वासना असणे हे अपरिहार्य आहे. पण अशी वासना अनावर झाली की ती माणसाचे जीवन निरुपयोगी, रोगग्रस्त आणि अल्पायुषी करते. म्हणून—

अन्नावरची वासना अनावर नसावी.

[ ३०-९-१९६४

## ५७. आधुनिक आश्रम—व्यवस्था

**शिक्षण,** नोकरी आणि पेन्शन असे तीन आश्रम आधुनिक कालात प्रस्थापित झाले आहेत. प्राचीन काली चार आश्रम होते—ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ आणि संन्यास. पूर्वीच्या चार आश्रमांची जागा आता वर लिहिलेल्या आधुनिक तीन

आश्रमांनी घेतली आहे. वानप्रस्थ आणि संन्यास आश्रम या अवस्था आता प्रचारातून गेल्या आहेत.

वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षी बालकमंदिरात (मॉंटेसोरी किंवा किंडरगार्टन) प्रवेश झाल्यानंतर अठरावीस वर्षांनी म्हणजे वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होते. मग नोकरी लागते व त्याच सुमारास सांसारिक जीवनाचा प्रारंभ होतो. पंचावन ते साठीच्या आसपास मनुष्य सेवानिवृत्त होऊन पेन्शन घेऊन घरी बसतो. हे झाले तीन आश्रम.

पेन्शनरीचा किंवा सेवानिवृत्तीचा काल हा आयुष्याचा मोठा क्रांतिकारक विभाग आहे. कारण माणसाच्या जीवनात एकदम मोठे संक्रमण होते. काल दिवसभर सात आठ तास काम करणाऱ्या माणसाला आज एकदम काही एक काम न करता हातपाय जोडून घरी स्वस्थ बसण्याची पाळी येते. काही लोक सेवानिवृत्तीच्याही कालात अंशकाल (पार्टटाईम) व्यवसाय करतात, पण अशी संधी अगदी थोड्या लोकांना मिळते.

आरोग्य आणि वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे आता माणसाचे आयुष्य आणि आरोग्य दोन्हीत वाढ झालेली आहे. त्यामुळे शरीर व मन कार्यक्षम असतानाही कित्येकांना त्या त्या खात्यातील नियमामुळे निवृत्त होणे भाग पडते. हे जुने लोक केव्हा निवृत्त होतात आणि आपण त्यांच्या खुर्चीवर केव्हा जाऊन बसतो याकडे तरुण कर्मचाऱ्यांचा डोळा असतो.

या सेवानिवृत्तीच्या जीवनाची पूर्वतयारी केलेली नसली तर माणसाचे आयुष्य अत्यंत कंटाळवाणे, नीरस आणि दुःखमय होते. म्हणून या वृद्धावस्थेतील जीवनाचे प्रश्न आकलन करून त्यांची तारुण्यातच तयारी करणे शहाणपणाचे होईल. विद्यार्थी अवस्थेत जशी नोकरीची तयारी करावी लागते तशी तारुण्यात वृद्धावस्थेची किंवा नोकरीत सेवानिवृत्तीची तयारी करायला पाहिजे. हे विवरण पुरुषांना आणि स्त्रियांना दोघांनाही उद्देशून व उपयुक्त असे आहे.

या अवस्थेत मुख्य तीन अडचणी असतात

१. शारीरिक दुर्बलता वाढत्या प्रमाणात येऊ लागते. पूर्वीप्रमाणे फिरणे, खेळणे, काम करणे, प्रवास इत्यादी गोष्टी होऊ शकत नाहीत.

२. पचनशक्ती दुर्बल होत जाते. पूर्वीप्रमाणे आहाराचे पचन होत नाही. आहार कमी व हलका लागतो.

३. वेळ भरपूर असतो. तो कसा घालवावा ते कळत नाही. इतर लोक आपापल्या कामात, आणि आपण मात्र रिकामे अशी स्थिती होते.

या तीनही अडचणी लक्षात घेऊन त्यांचे निवारण करता येते.

शारीरिक दुर्बलता वाढत असली तरी त्याही स्थितीत शरीर व मन कार्यक्षम ठेवण्याकरता सौम्य व्यायामाची आणि शारीरिक कामांची सवय करावी. आसने, प्राणायाम, फिरणे, हलके व्यायाम, घरकाम, बागकाम, इत्यादी गोष्टी केल्या तर शरीर शेवटपर्यंत आरोग्यावस्थेत राहील.

पचनशक्ती कमी झालेली असते हे लक्षात घेऊन आहारात बदल करावा. मुख्य म्हणजे जिभेवर ताबा ठेवायला हवा. तारुण्यात ज्यांनी खाण्यापिण्यातच सौख्य मानले त्यांना ही गोष्ट अत्यंत कठीण जाणार आहे. दिवसभर घरीच असल्याने सतत खाण्यापिण्याचा मोह होत असतो. तो ज्यांनी जिंकला त्यांची वृद्धावस्था सुखाची होईल. तो ज्यांना जिंकता आला नाही त्यांनी आजार आणि अपमृत्यू या दोन आपत्तींची तयारी ठेवायला हवी.

रिकामपण हा सर्वांत मोठा प्रश्न असतो. ज्यांना वाचन-श्रवणाची हौस असते त्यांचा या गोष्टीत काहीतरी वेळ जातो. ज्यांना ही सवय नसते ते अत्यंत दु:खी आणि चिडखोर बनतात. म्हणून चांगले वाङमय वाचण्याची सवय ठेवा. वृद्धावस्थेत फार उपयोग होईल. तसेच शेवटपर्यंत टिकतील असे छंद वाढवा. व्हायोलिन, सतार, दिलरुबा, हार्मोनियम यांसारखे एखादे वाद्य वाजविणे; कॅरम, पत्ते, बुद्धिबळे, इत्यादी बैठे खेळ; बागकाम, सुतारकाम, रेडिओ बांधणे, शास्त्रीय प्रयोग करणे, इत्यादी दोन तीन छंद तारुण्यातच लावून घ्या. त्यांची वाढ सेवानिवृत्तीच्या काळात करता येईल. मग वेळ कसा घालवावा यापेक्षा वेळ कसा काढावा हा प्रश्न उत्पन्न होईल. ज्या वृद्धांनी दिवसभर करण्यासारखी कामे आणि छंद आधीच साध्य केले ते अत्यंत सुखी होतात.

[३०-९-१९६४

# ७८. मातृदेवा ! काय ही स्थिती !

**मातृदेवो** भव । पितृदेवो भव । आचार्य देवो भव ।।

मातेला देवतेसमान पूज्य माना.

वडिलांना देवाप्रमाणे मान द्या.

गुरूंना देवाचे स्थान द्या.

या तीन व्यक्तींपैकी वडील आणि गुरू यांना तुम्ही माना की न माना, ते तुमच्या मानापमानाच्या पलीकडे आहेत. ते आपल्या पायावर उभे राहू शकतात. ते स्वत:ची काळजी घेऊ शकतात.

प्रश्न आहे मातृदेवाचा. तिची काळजी तुम्ही घेतली नाही तर या जगात तिला देवाशिवाय कोणीही त्राता नाही. आणि देव आकाशात असल्यामुळे या भूमीवर त्याचा तिला प्रत्यक्ष उपयोग होऊ शकत नाही. तिच्या देवाचे स्थान तुम्ही घेतले नाही तर मात्र तिचे दुर्दैव.

विचार करा. तुमच्या बाल्याची पहिली दहा पंधरा वर्षे तिने स्वार्थ-त्यागपूर्वक तुमची सेवा केली. तुम्ही वीतभर बालक होता तेव्हा तुमचे खाणेपिणे आणि हागणे-मुतणे यांची व्यवस्था किळस आणि कंटाळा न वाटता तिने केली. तुम्ही बालपणी आजारी असताना अहोरात्र मांडीवर घेऊन, डोळ्याला डोळा न लावता जागरणे करून तुमची शुश्रूषा केली. तुम्ही आपल्या पायावर हिंडू फिरू लागला तरी तुमच्या खाण्यापिण्याची, प्रकृतीची, कपड्यांची, स्वच्छतेची सर्व प्रकारची काळजी तिने घेतली. वेळ, श्रम, विश्रांती, सुख—कशाकडेही न पाहता तिने तुमची सेवा करून तुम्हाला वाढविले. स्वतःचे सुख विसरून, कष्ट आणि त्याग यांची पराकाष्ठा करून तिने आपले सर्वस्व तुमच्याकरता दिले; आत्मसमर्पण केले. मातेच्या त्यागाला जगात तोड नाही. कारण निरपेक्ष वृत्तीने, शुद्ध प्रेमाने, परत-फेडीची आशा न ठेवता, स्वयंप्रेरणेने—तुमच्याकरता आईने त्याग केला.

या मातृप्रेमाची फेड तुम्ही कोणत्या प्रकाराने करीत आहात. मातृप्रेमाने ? की मातृद्रोहाने ? का उदासीनतेने आणि उपेक्षेने ?

आजच्या समाजव्यवस्थेत वृद्ध माता हा प्राणी अनावश्यक वाटू लागला आहे. वार्द्धक्यात आणखी वैधव्याची आपत्ती आली तर बिचारीचे हाल विचार-ण्याची सोयच नाही. वृद्धावस्था, दुर्बलता, असहायता, मुलांनी केलेली उपेक्षा —या सर्वांनी तिला प्रत्यक्ष मृत्यूपूर्वीच मृत्यूच्या यातना भोगाव्या लागतात.

ज्या मुलांच्या करिता तिने आपल्या तारुण्यात सर्वसुखाचा त्याग केला त्या मुलांना आपल्या तारुण्याच्या सुखात आईची अडचण नकोशी वाटू लागली, तर त्या माउलीने कोणाकडे जावे ? आपल्या बदलत्या नव्या समाजव्यवस्थेत या प्रश्नाचा विचार करायची वेळ आली आहे.

असहाय्य वृद्ध मातांना आधार आणि आश्रय देणाऱ्या पुत्रतुल्य संस्थांची आता गरज आहे. अशा मातांच्या पालनपोषणार्थ लागणारा सर्व खर्च मुलांनी करावा अशा प्रकारच्या कायद्यांचीही आवश्यकता निर्माण झाली आहे. बदलत्या परि-स्थितीला तोंड देण्याकरता नवीन संस्था व संघटना जो निर्माण करू शकतो तोच खरा जिवंत समाज.

पण या संस्था निघेपर्यंत स्वत:लाच प्रश्न विचारा--मातृदेवते, मी तुझ्याशी कसे वागतो ? पुत्रप्रेमाची, मातृप्रेमाची परतफेड मी मातृभक्तीने करतो, का मातृद्रोहाने ?

[ ६-१०-१९६४

## ५९. विवेकानंद–लघु आवृत्ती

"हिंदूधर्माचे स्वरूप असे व्यापक आणि उदात्त आहे" अशा वाक्याने समारोप करून स्वामी विवेकानंद यांनी जागतिक धर्मपरिषदेतील आपले भाषण संपविले. त्यानंतर त्यांनी अमेरिकेत, युरोपात आणि पूर्वेकडील देशांत अनेक दौरे काढून जगाला भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय करून दिला. हिंदू धर्माच्या विशाल, समावेशक, पुरोगामी, सहिष्णू आणि उदार स्वरूपाकडे जगाचे लक्ष वेधून घेतले.

पाश्चिमात्य विचारवंतांनी विवेकानंदांच्या विचारांचे कौतुक केल्यामुळे भारतीयांचेही लक्ष त्यांच्याकडे गेले. जगाच्या व्यासपीठावर ज्या माणसाचा मान होतो त्याचे विचार तरी काय आहेत ते येथील सुशिक्षित लोक पाहू लागले. त्यामुळे हिंदु धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या आणि उपासना पद्धतींच्या अभ्यासाला नवीन प्रारंभ झाला. मध्यंतरी विवेकानंदांचे कार्य दृष्टिआड झाले होते. आता शताब्दीच्या आणि विवेकानंद शिलास्मारकाच्या निमित्ताने ते पुन: प्रकाशात येत आहे.

विवेकानंदांनी धर्मप्रसाराचे जे काम केले ते पुढे अनेक पिढ्या अनेक शतके चालू राहिले पाहिजे. त्याकरिता अनेक विवेकानंद निर्माण होणे आवश्यक आहे. त्यांच्या भव्यतेएवढा पुरुष प्रत्येक पिढीला मिळणे कठीण व अशक्य आहे. पण लहान प्रमाणावर त्यांचे काम प्रत्येकाला करता येईल. तुम्ही व मी लघु विवेकानंद होऊ शकतो. आपापल्या क्षेत्रात त्यांच्या विचारांचा अभ्यास करू शकतो.

आपल्या प्रचाराचा प्रदेश कोणता ? प्रारंभ अगदी स्वत:पासूनच करा. स्वत:लाच हिंदू धर्माची तत्त्वे समजावून सांगा. त्यांचा अभ्यास करा. विवेकानंदांचे ग्रंथ वाचा. भगवद्‌गीता वाचा. महाभारत-रामायण वाचा. सर्व ग्रंथांचा सारांश एकच आहे. पण तो काय आहे ते तुम्ही वाचा व त्यावर मनन करून धर्माविषयी तुमचे विचार निश्चित करा. असा अभ्यास झाला म्हणजे त्यावर खूप विचार, चिंतन मनन करा. असे केल्यावर तुमच्या मनात एक प्रभावी श्रद्धा निर्माण होईल, आणि आपले हे विचार इतरांनाही सांगावेत असे वाटू लागेल.

स्वत:चा अभ्यास पूर्ण झाल्यावर तुमच्या कुटुंबात, मित्रमंडळीत, गावात, जिल्ह्यात-- अशा शक्य त्या सर्व ठिकाणी विवेकानंदांच्या विचारांची माहिती द्या

त्यांचा परिणाम समाजाच्या विचारावर व त्यानंतर आचारावर हळूहळू होऊ लागेल. तुमच्यासारखे हजारो लोक आपापल्या प्रदेशात लघु विवेकानंद होऊन त्यांचे कार्य करू लागले तर देशातील वैचारिक वातावरण बदलून जाईल.

अशा लघु विवेकानंदांतूनच पुनः पुढे एखादा विराट विवेकानंद निर्माण होईल आणि तो हिंदू धर्माचा व तत्त्वज्ञानाचा संदेश आजच्या भाषेत व आजच्या परिस्थितीला अनुरूप अशा स्वरूपात अवघ्या जगाला सांगेल.

तोपर्यंत आपण आपापल्या क्षेत्रात ते काम करून भावी विवेकानंदांची पार्श्वभूमी तयार करू या.

[ ६–१०–१९६४

## ६०. राष्ट्रीय ऐक्याची वैदिक ऋचा

**समाजाच्या** प्रत्येक अवस्थेत विचारवंतांना ऐक्याची विवंचना लागलेली असते. समाज फुटीर असला म्हणजे तो दुर्बल होतो आणि समाजात एकजूट असेल तरच तो बलवान होतो. ही कल्पना वैदिक काळीही ऋषींच्या मनात प्रामुख्याने होती. ऋग्वेदातील पुढील एक ऋचा पाहा—

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।।
यथा वः सुसहासति ।।

या ऋचेचा अर्थ अगदी साधा आणि सरळ आहे. "तुमचा सर्वांचा विचार एकसारखाच असावा. तुमच्या अंतःकरणातील भावना एकसारख्या असाव्यात. तुमच्या सर्वांच्या मनातील विचार समान असावेत. असे झाले तरच तुमच्यात एकजूट राहील व तुमच्या समाजाला बळकटी येईल."

कोठल्याही समाजातील नागरिक समान निष्ठेने, समान विचारसरणीने, आणि समान भावनेने प्रेरित झालेले असतील तरच त्यांच्यात ऐक्य निर्माण होईल. आपल्या सर्वांच्यामध्ये विचार, भावना आणि श्रद्धा समान आहेत या जाणिवेने त्यांना परस्परांबद्दल प्रेम, जिव्हाळा आणि बंधुभाव वाटेल.

देशकालमानाने समाजातील विचार, भावना आणि निष्ठा बदलत असतात. लहान लहान गट करून आपापले हित पाहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. असे अनेक गट निर्माण झाले की, त्यांच्या हितात विरोध येतो, कलह सुरू होतात. समाज दुबळा होतो. परचक्राला बळी पडतो.

समाजातील नेत्यांचे आणि विचारवंतांचे महत्त्वाचे कार्य असे असते की, त्यांनी समाजाला समान विचार, भावना आणि श्रद्धा या दिल्या पाहिजेत. सर्वांच्या मध्ये समान हित निर्माण केले पाहिजे. त्यांनी समाजाला अशी शिकवण दिली पाहिजे की, लहान लहान गटांचे आणि संघांचे स्वार्थ देशहिताच्या आड येता कामा नयेत.

लहान गटाच्या पुढाऱ्यांनीही आपल्या अनुयायांना राष्ट्रीय ऐक्याचे शिक्षण दिले पाहिजे. धर्म, भाषा, प्रांत, व्यवसाय, राजकीय पक्ष यांच्या तत्त्वावर अनेक लहान लहान गट निर्माण होतात आणि ते आपापल्या गटातील सभासदांच्या हिताचे संरक्षण करतात. पण लहान गटाचे हित राष्ट्रीय हिताच्या आड येता कामा नये हे त्यानी लक्षात ठेवायला हवे. या दोहोंत विरोध उत्पन्न झाला तर देशहित प्रथम आणि लहान गटाचे हित नंतर अशी शिकवण पाहिजे. नाही तर ऐन परचक्राच्या वेळी हे लहान गट डोके वर काढून देशाचा घात केव्हा करतील याचा नेम नाही.

समाजाच्या आणि राष्ट्राच्या ऐक्याचा जो विचार पाच हजार वर्षांपूर्वी वैदिक काळामध्ये झाला तो विचार समाजस्थैर्याच्या दृष्टीने चिरंतन महत्त्वाचा आहे. प्रत्येक कालखंडात त्याचे महत्त्व आहे. आजच्या काळाला तर आहेच आहे.

[ १५-१०-१९६४

# ६१. भ्रष्टाचार आणि वरिष्ठ लोक

**समाजात** सर्वत्र भ्रष्टाचार माजलेला आहे, अशी ओरड आज सर्वत्र चालू आहे. भ्रष्टाचाराविषयी बातम्या किंवा तक्रारी नाहीत असा एकही दिवस जात नाही. सध्याच्या कालखंडात तर या प्रवृत्तींनी सीमा गाठली आहे. आशावादी विचारवंतांनाही निराश करणारी परिस्थिती आलेली आहे.

प्रत्येक समाजाच्या इतिहासात असे कालखंड अधूनमधून येत असतात. त्यांच्या विरुद्ध तक्रार करणारे लोक आहेत; आणि भ्रष्टाचार नाहीसा व्हावा असे सर्वसामान्य लोकांना वाटते, हीच एक आशेची जागा आहे.

आपल्या प्राचीन वाङ्मयात या प्रवृत्तीची मीमांसा अनेक ठिकाणी केली आहे. त्या सर्वांचा निष्कर्ष इतकाच आहे की, वरिष्ठ आणि श्रेष्ठ अशा ठिकाणी जी जी माणसे स्थानापन्न झालेली आहेत ती समाजाचे नैतिक वातावरण टिकवतात, सुधारतात किंवा रसातळाला नेतात. 'यथा राजा तथा प्रजा',

'राजा कालस्य कारणम्'—अशा अर्थाच्या म्हणी सर्वांना परिचित आहेत. राजा याचा अर्थ आजच्या काळात व्यापक दृष्टीने घ्यावयास पाहिजे. वरपासून खालपर्यंत ज्यांच्या ज्यांच्या हातात थोडीफार सत्ता आहे ते ते आपापल्या क्षेत्रातील राजेच आहेत. ते जसे वागतील त्याप्रमाणे त्यांच्या हाताखालचे कनिष्ठ, आणि कनिष्ठांच्या वागण्याप्रमाणे त्यांच्या हाताखालचे कनिष्ठतर लोक वागतील.

ऑफिस, कारखाना, हॉस्पिटल, पार्सल ऑफिस इत्यादी ठिकाणचा चोरीचा माल ज्या घरी येत असेल, तेथील मुले भ्रष्टाचाराचे बाळकडू घेतल्याशिवाय कशी राहतील ? हेडक्लार्क, स्टेशन मास्टर, स्टोअर क्लार्क, मुख्य इंजिनियर, मॅनेजर अशी अधिकारावरची माणसे लाचलुचपतीला सरावलेली असली की त्यांच्या हाताखालच्या लोकांत तो एक आदर्श पाठच घालून दिल्यासारखे होते. जसे साहेब तसे नोकर. उलट अधिकाराच्या जागेवरला मनुष्य प्रामाणिक, निःस्पृह, मोहाला वळी न पडणारा, स्पष्टवक्ता, नियमाने आणि कायद्याने चालणारा असेल तर त्याच्या कनिष्ठ नोकर वर्गातही तसेच वातावरण निर्माण होईल. म्हणून महाभारतात पुढील श्लोक आहे—

> कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।
> इति ते संशयो मा भूत् राजा कालस्य कारणम् ।।

राजा, मुख्य मंत्री, मंत्री, उपमंत्री, अधिकारी, उप-अधिकारी या सर्वांचे अनुकरण इतर लोक करतात. वरिष्ठांनीच संशयातीत राहिले पाहिजे. लंचावतार प्रथम वरच्या पातळीवर जन्म घेत असतो. मग त्याचे खाली अवतरण होते.

अधिकाराच्या ठिकाणी असलेल्या श्रेष्ठ व्यक्तींकडून भ्रष्टाचार आणि दुराचार होत असेल तर त्यांची चूक दाखविणारे निःस्पृह आणि त्यागी पुरुष समाजात पाहिजेत. असे पुरुष ज्या समाजात जास्त निर्माण होतील त्या समाजातील भ्रष्टाचाराला आळा बसू शकेल.

[ १९–११–१९६४

## ६२. अनुभव आणि शहाणपण !!

**अनुभवावाचून** शहाणपण नाही अशी मराठीत एक म्हण आहे. शिक्षण घेऊन मनुष्य कितीही शिकला आणि पुस्तके वाचून ज्ञानाचा संग्रह त्याने केला तरी त्यामुळे शहाणपण येईलच असे नाही. शहाणपणाची ती पूर्वतयारी झाली

एवढेच म्हणता येईल. 'नॉलेज कम्स बट विस्‌डम् लिंगर्स.' ज्ञान चटकन येते, पण व्यवहार समजायला वेळ लागतो.

पण शहाणपण यायला केवळ अनुभव तरी पुरेसा आहे काय ? आयुष्याची ५०–६० वर्षे लोटली तरी बुद्धीने अपक्व राहिलेली माणसे काय कमी आहेत ? बोटीवरून प्रवास करणारे खलाशी सगळे जग हिंडून येतात; पण त्यांतले सर्वच शहाणे होतात असे नाही. अनुभवावरही स्वतःच्या मनाचा संस्कार व्हावा लागतो आणि अनुभवांचा संस्कार मनावर व्हावा लागतो. अनुभव महत्त्वाचा आहे असे वाटायला पाहिजे. त्यावर माणसाने चिंतन करायला पाहिजे. त्या चिंतनातून काही सार काढले पाहिजे. ते पक्केपणाने लक्षात ठेवायला हवे; इतके की पुन्हा प्रसंग येईल त्या वेळेला त्याचा उपयोग व्हावा.

आपला अनुभव आणि आपले मन ह्यांची परस्परांशी अशी जास्त ओळख झाली आणि त्यांचे जास्त संघटन झाले म्हणजेच त्यातून शहाणपण निर्माण होते.

आपल्या जीवनात, आजूबाजूला, इतरांच्या जीवनात, समाजामध्ये आणि सर्व जगात प्रत्येक क्षणी घटना घडत असतात; पण त्या मनावर बिंबल्याशिवाय त्यांच्यातून सार काढता येत नाही आणि त्यांच्यापासून शहाणपण मिळत नाही.

'ग्रॅन्ड होटेल' नावाच्या एका कादंबरीत एका मोठ्या होटेलमध्ये कमालीच्या घटना घडत असतात; पण तिथला हुजऱ्या कुरकुर करतो, 'नथिंग एव्हर हॅपन्स्.'

या हुजऱ्याप्रमाणेच राहणारे जगात अनेक लोक आहेत. घटना त्यांच्या मनावर बिंबत नाहीत आणि त्यांचे शहाणपण वाढत नाही.

प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष येणाऱ्या किंवा कळणाऱ्या अनुभवावर सतत चिंतन करायची सवय ठेवा. शहाणपण येण्याचा वेग वाढेल. व्यवहारज्ञानही वाढेल. माणसाच्या विकासाला अंत नाही.

शाळा-महाविद्यालये, शिकवणी, वर्ग, क्रमिक पुस्तके, सामान्य ज्ञान, वाङ्मय इत्यादी कितीही सोयी निघाल्या तरी व्यवहारज्ञान असे कोणीही देऊ शकत नाही. सामान्य ज्ञान हे त्याच्या नावाप्रमाणे सर्वसामान्य नाही. असामान्य प्रसंगातून आणि घटनातून ते ज्याचे त्याने काढायचे असते आणि पुढच्या वेळी त्याचा उपयोग करायचा असतो.

काल आणि अनुभव हे दोन प्रभावी शिक्षक आहेत. शिक्षण घेणाराचे मन संवेदनाक्षम पाहिजे.

[१४–१–१९६५

# ६३. नव्या लेखकांना संधी

**लोकप्रिय** आणि प्रसिद्ध लेखक व्हावे असे तुम्हाला वाटते काय ? सध्या वाचक-वर्गाची संख्या वाढत असल्याकारणाने भावी काळातील लेखकालाही फार मोठे क्षेत्र निर्माण झालेले आहे.

तरुण लेखकाला मराठी भाषेतील उत्कृष्ट लेखक म्हणून कीर्ती मिळवता येईल. त्याचे लेखन असामान्य दर्जाचे असल्यास भारताच्या पंधराही भाषांत त्याचे भाषांतर होईल. त्यापेक्षाही वरच्या दर्जाचे आणि अलौकिक तोलाचे लेखन असल्यास "युनेस्को" सारख्या संस्थेमार्फत इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, जपानी इ. भाषांतून त्याचे भाषांतर होईल. जगप्रसिद्ध अशी "नोबेल पारितोषिका" सारखी पारितोषिके त्याला मिळतील.

मराठी लेखकाला अद्याप नोबेल पारितोषिक मिळालेले नाही. आत्मनिरीक्षणाच्या दृष्टीने या गोष्टीचा विचार झाला पाहिजे.

मराठी लेखकांचे आणि लेखनाचे विषय अतिशय आकुंचित क्षेत्रातून घेतले जातात. जगात वाढत असलेल्या ज्ञानाचा आणि संशोधनाचा वास त्यांना येत नाही.

नव्या ज्ञानाचे आणि संशोधनाचे प्रतिबिंब मराठी लेखनात पडत नाही. या नवीन ज्ञानात कथा-कादंबऱ्यापेक्षाही अद्‌भुत आणि मनोरंजक अशा अनेक गोष्टी आहेत याची लेखकांना जाणीव नाही. प्रत्येक देशातील विद्वान आणि संशोधक जगाच्या ज्ञानात भर टाकीत आहे. वाङ्मय, समाजशास्त्र आणि विज्ञान अशा तीनही क्षेत्रांतील नवीन ज्ञान झपाट्याने वाढत आहे. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, जपानी इत्यादी भाषांतून ते उपलब्ध होत आहे. या ज्ञानाचा अभ्यास तरुण लेखकांनी केला पाहिजे. जगात जे जे नवीन ज्ञान निर्माण होत आहे ते ते सामान्य मराठी वाचकापर्यंत पोचविणे हे आजच्या लेखकाचे पवित्र कार्य (मिशन) आहे.

जगात चालू असलेल्या ज्ञानाच्या, विज्ञानाच्या आणि समाजाच्या घडामोडींचा अभ्यास ज्या लेखकाने केलेला नाही, त्याच्या लेखनात नावीन्य आणि आकर्षकता येऊ शकणार नाही. अभ्यास आणि व्यासंग यांच्या अभावी मराठी लेखक फार पुढे जाऊ शकत नाहीत.

विविध प्रकारच्या ज्ञानाला साहित्याचे आणि वाङ्मयाचे अलंकार चढवून ते मनोरंजक व आकर्षक करणे हे लेखकाचे काम आहे. परंतु या लेखनाकरिता

नवीन विषय निवडण्याच्या दृष्टीने लेखकाने आपली दृष्टी अधिक व्यापक केली पाहिजे. जगातील ज्ञान त्याला उपलब्ध झालेले आहे. त्याविषयी अंधारात राहून तो समाजाला प्रकाश देऊ शकणार नाही. त्यालाही प्रकाशात येता येणार नाही.

नव्या पिढीतील लेखकांना हे आव्हान आहे. ही संधी आहे.

[२०-२-१९६५

## ६४. अश्व, वृषभ आणि गर्दभ—प्रवृत्ती

**आपल्या** जुन्या सामुद्रिक शास्त्रात माणसांची स्वभाववर्णने पशूंच्या भाषेत करण्याची पद्धती आहे. पशूतही चांगली वृत्ती असते, काही वाईटही असते. पण त्यांचे ते जन्मजात स्वभाव असतात. प्राण्यांमध्ये चपळ आणि तापट, मंद आणि संथ, कष्टाळू आणि निर्बुद्ध असे अनेक प्रकार आहेत. घोडा हा थोडा इशारा दिला की जलद दौड करणारा प्राणी आहे. बैलाला मधून मधून आसूड लागतो, गाढवाला एकसारखे झ्याऽऽझ्या करावे लागते.

अश्व, वृषभ आणि गर्दभ. माणसांतही असेच तीन प्रकार नाहीत का ? काही थोडी माणसे अश्व-प्रवृत्तीची असतात. एकदा सूचना दिली की पुरे. पुन्हा सांगायला नको. स्वतःची बुद्धी वापरून अडीअडचणींचे निराकरण करून काम फत्ते करतील आणि अहवाल देतील. हे वरच्या दर्जाचे श्रेष्ठ कार्यकर्ते.

बहुसंख्य लोक दुसऱ्या वर्गातले. एक सूचना पुरत नाही. दोन–तीन वेळा सांगावे लागते. तपशीलवार मार्गदर्शन लागते. पुन्हा पुन्हा विचारायला येतील. पण केव्हातरी कसेतरी काम पूर्ण करतील. ही मध्यम कुवतीची सामान्य माणसे. ही माणसे संख्येने अधिक. समाजातील मोठ्या कामाचा भार यांच्यावर.

तिसरा वर्ग म्हणजे खालचा गाळच. वारंवार सांगूनही, हो हो म्हणतील पण काही करणार नाहीत. सबबी सांगतील, रडगाणी गातील, कामाचे सोंग करतील. कनिष्ठ दर्जाची ही माणसे. महत्त्वाकांक्षा नाही, त्यामुळे कर्तबगारी नाही. यांच्यावर विश्वास टाकायची सोय नाही.

जनावरांना आपले स्वभाव बदलता येत नाहीत. विचारी व महत्त्वाकांक्षी माणसाला ते शक्य आहे. प्रयत्न करून, अहोरात्र जाणीव ठेवून कामे केल्यास वरच्या श्रेणीत त्यांना जाता येईल. उलट अंगचोरपणा आणि निर्बुद्धपणा यांमुळे खालच्या वर्गातही येता येईल.

माणसाला आपल्या कर्तबगारीचा अभिमान पाहिजे. तो त्याच्या आणि समाजाच्या उत्कर्षाला उपकारक असतो. अशा माणसांची संख्या वाढली म्हणजे त्या व्यक्तीला, समाजाला आणि देशाला वैभव प्राप्त होते.

"मी कोणत्या वर्गात आहे ?" याचा ज्याचा त्याने विचार करावा. वाचक पहिल्या वर्गात आहेतच.

माणसांशी तुलना केल्याबद्दल पशूंना काय वाटेल ?

[ १६-३-१९६५

## ६७. मुलांच्या शिक्षणाकरिता पालकांना वेळ नाही !!!

**मुले** अभ्यासात मागे का पडली ? घरी सोय असून मुलांना बोर्डींगमध्ये का ठेवले ? वाईट संगती लागून मुले का बिघडली ?

वरील तिन्ही प्रश्नांचे उत्तर एकच आहे आणि ते पालकांना व शिक्षकांना माहिती आहे. "पालकांना वेळ नाही." या एका उत्तरात वरील तिन्ही प्रश्न निकालात निघतात. आजकाल पालकांचे हे कारण फार मोठ्या प्रमाणावर ऐकू येते. सर्वांना त्याचा परिचय आहेच.

या बाबतीत खरे खोटे काय आहे त्याची शहानिशा ज्या त्या पालकाने केली पाहिजे. आपल्याला वेळ नाही ही वस्तुस्थिती आहे का केवळ सबब व आत्मसमर्थन आहे ? सोयीस्कर रीतीने आपण आपली फसवणूक तर करून घेत नाही ना ? आत्मवंचना करून मुलांचीही वंचना तुम्ही करीत नाही ना ? वरील सबब सांगणाऱ्या पालकांच्या बाबतीत शेकडा नव्वद प्रमाणात आत्मवंचनाच असण्याचा संभव आहे.

प्रत्येक पालकाने आपल्या मनात पुढील प्रयोग करून पाहावा. नापास झालेली, बिघडलेली आणि बोर्डिंगमध्ये राहणारी मुले तुमच्या नजरेला नजर देऊन विचारीत आहेत. "आई बाबा, खरंच तुम्हाला वेळ नाही म्हणून आमच्या आयुष्याची माती करीत आहात काय ? इतर गोष्टी करून थोडाही वेळ या तुमच्या मुलांकरिता तुम्ही देऊ शकत नाही ना ? आम्ही तुमचा रोजचा कार्यक्रम पाहात आहोत, त्यात आमच्या वाट्याला वेळ देता येत नाही असे तर दिसत नाही." या प्रश्नाला तुम्ही काय उत्तरे द्याल ? मुलांना ते पटेल का ?

तुम्हाला असे वाटेल की आपला मौल्यवान वेळ मुलांना देण्यापेक्षा नोकरी, वकिली, डॉक्टरी, व्यापार-व्यवसाय, महिलामंडळे, शॉपिंग इत्यादी उलाढालींमध्ये घालवून अधिक नावलौकिक मिळवावा. अधिक पैसा मिळवावा. तो पुढे मुलांच्या नावाने ठेवावा. मोठ्या आईबापांची मुले आणि खूप पैसा, यापेक्षा मुलांना काय पाहिजे ?

मुलांना पाहिजे तुमचे प्रेम, तुमचे लक्ष, तुमचे प्रेमळ मार्गदर्शन. ते तुम्ही दिले तर मुलेही आपला पैसा मिळवतील. तुमच्या संचित धनापेक्षा त्यांच्या स्वावलंबनाचा आणि आत्मविश्वासाचा पैसा जास्त टिकाऊ स्वरूपाचा राहील. उलटपक्षी पालकांच्या मार्गदर्शनाच्या अभावी बिघडलेली मुले, पालकांनी जन्मभर राबून मिळवलेला पैसा चुटकीसारखा उडवून टाकतील.

मध्यम वर्गातील आजचे आईबाप सुशिक्षित आहेत. बहुसंख्य मॅट्रिक आहेत आणि बरेचसे पदवीधरही आहेत. त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायलाच पाहिजे.

अगदी प्राथमिक शिक्षणाच्या अवस्थेपासून मुलांकडे नीट लक्ष दिले तर मुले आपापल्या मार्गी लागून पुढे त्यांना थोडा वेळ मार्गदर्शनही पुरेसे होईल. मुलांचे हस्ताक्षर, शुद्धलेखन, वाचन, उजळणी, हिशेब, प्राथमिक इंग्रजी पाठांतर इ. गोष्टींकडे पहिल्यापासून लक्ष दिले तर पुढच्या शिक्षणाचा पाया मजबूत होईल. मुले वरच्या वर्गात गेल्यानंतर त्यांच्या अभ्यासात तुम्ही मार्गदर्शन करू शकत नसला तरी अभ्यासातील आणि शाळेतील घडामोडींची विचारपूस करा. त्यांची पुस्तके पाहा. लेखनवह्या पाहा. वाचन घ्या. पाठांतर पाहा. भाषांतर विचारा. संगत कोणाची आहे ते पाहा, आणि असेच सुचेल ते करा. आपल्या अभ्यासात आणि शालेय जीवनात तुम्हाला गोडी आहे ते मुलांना कळू द्या. त्यामुळे त्यांना अभ्यासात आणि शाळेत गोडी वाटू लागेल आणि मुले नापास झाली म्हणून, व ती बिघडली म्हणून तुम्हाला पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही.

तुमची मुले मोठी झाल्यावर आपल्या मोठेपणाचे रहस्य सांगताना त्यांनी असे उद्गार काढावेत की "आमच्या मातापित्यांनी आमच्या शिक्षणाकडे बारीक लक्ष दिले म्हणून आम्ही मोठे झालो."

[ १०-४-१९६५

# ६६. कामचुकारपणा म्हणजे देशद्रोहच !

**कामचुकारपणा** आणि बेजबाबदारपणा यांची वाढ हळूहळू प्रत्येक क्षेत्रात होत आहे. या दुर्गुणांना वेळीच आळा घातला नाही तर वाईट परिणाम होतील. या दुर्गुणांमुळे त्या त्या व्यक्तीचे अखेर नुकसान होईलच. अशा व्यक्तींची अधिकाधिक वाढ होऊ लागली तर त्यामुळे देशाचा आणि समाजाचा घात होईल.

सुशिक्षित आणि अशिक्षित, कष्ट करणारे आणि बैठे काम करणारे, सरकारी काम करणारे आणि खाजगी धंदा करणारे, लहान वयाचे आणि मोठ्या वयाचे—अशा सर्वांच्यामध्ये हे दुर्गुण चोरपावलांनी शिरत आहेत.

प्रत्येक समाजात विचारांचे आणि गुणांचे असे एक वातावरण असते. आजच्या आपल्या समाजाच्या वातावरणात कामचुकारपणा, बेजबाबदारपणा आणि बेपर्वाई या दुर्गुणांचे हळूहळू प्राबल्य वाढत आहे. त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने आपापल्या मगदुराप्रमाणे केला पाहिजे. अपघाताच्या संख्येत होत असलेली वाढ, कुठलेही काम न होणे किंवा दिरंगाईने होणे, या गोष्टी प्रत्येक क्षेत्रात अनुभवाला येत आहेत. शाळाकॉलेजांतील विद्यार्थी, हमाल, घरकामाचे गडी आणि बाया, कामगार, कारकून, अधिकारी, व्यापारी, लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी—अशा समाजातील सर्वच थरांत बेजबाबदारपणा वाढत आहे. कामे न करण्याकडे प्रवृत्ती होत आहे. इतरांच्याविषयी पर्वा वाटेनाशी झाली आहे.

काम करण्याच्या मुळाशी असलेली आपल्या विचाराची बैठक केवळ स्वार्थावर आधारीत आहे. तिला व्यापक सामाजिक अर्थाची ओळख करून देणे जरूर आहे. कामाच्या मुळाशी असलेला नवीन ध्येयवाद, नवीन तत्त्वज्ञान, नवीन वेदान्त समाजात रुजवला पाहिजे.

मी जे काम करतो ते माझ्या योगक्षेमाकरता आहेच पण त्यापेक्षाही त्याला व्यापक अर्थ आहे. माझ्या लहानसहान कामाचाही माझ्या समाजावर बरावाईट परिणाम होणार आहे. एखाद्या मोठ्या यंत्रातील स्क्रूप्रमाणे माझे वैयक्तिक काम लहान असले तरी देशाचे यंत्र चालण्याच्या दृष्टीने त्याची जरूरी आहे. माझे काम मी चांगले केले नाही तर देशाच्या विकासात, संरक्षणात आणि कीर्तीत कमीपणा येईल, देशाचे पाऊल मागे पडेल. माझ्या कामचुकारपणामुळे उपासमार, अराजक, पराभव आणि गुलामगिरी यांना मी निमंत्रण दिल्यासारखे होत आहे.

हा फार मोठा विचार झाला. अगदी साधा विचार म्हणजे मी जे पैसे घेतो त्याचा मोबदला माझ्या मालकाला कामाच्या रूपाने दिला पाहिजे. तो दिला नाही,

मी काम केले नाही तर मला लोक फुकटखाऊ म्हणतील. हा विचार प्रत्येकाला शिकवला पाहिजे.

हा विचार समजायला फारसा कठीण नाही, पण तो सर्वांनी आचरणात आणण्याची गरज आहे. स्वतःमध्ये सुधारणा करू म्हणजे आपल्याभोवती तरी नवीन वातावरण तयार होईल. कामचुकारपणाचा देशद्रोह मी करणार नाही असा निश्चय करू या.

[१५-६-१९६५

## ६७. कटू अनुभव चघळीत बसू नका

**सुखदुःखे** प्रत्येकाला आहेत. 'जगी सर्वसुखी असा कोण आहे ? विचारी मना, तूच शोधोनि पाहे ।।' इंग्रजीत एक म्हण आहे--'एव्हरीवन् हॅज टु बेअर हिज् ओन क्रॉस.' प्रत्येकाला आपल्या दुःखांचे ओझे वाहावेच लागते. तुम्हीच फक्त दुर्दैवी आणि बाकी जग अगदी सुखात लोळते आहे असे मुळीच नाही.

संसारात दुःखे अनेक रूपे घेऊन येतात. दारिद्र्य, आजार, मृत्यू, म्हातारपण—ही दुःखे अनादी कालापासून चालत आलेली आहेत. ती आजही आहेत आणि भावी काळातही राहातील. नातेवाइकांनी, मित्रांनी आणि सहकाऱ्यांनी आपल्यावर काही दुःखे लादलेली असतात. अपमान, वंचना, अन्याय, निंदा, बेअब्रू, फसवणूक, बेइमानी, कृतघ्नता, बेपर्वाई, क्रूरता, द्वेष, मत्सर, हेवा, नालस्ती--अशी अनेक दुःखे आपला दोष नसताना इतरांच्या दुष्टपणामुळे आपल्याला भोगायला लागतात.

पण दुःखाबरोबर आपण अनेक सुखेही भोगलेली असतात. कुटुंबातील माणसांचे व मित्रांचे प्रेम, काही सुखात गेलेले दिवस, चांगले सहकारी, आयत्या वेळी आपल्याला झालेली मदत—अशी अनेक सुखेही आपल्या वाट्याला आलेली असतात.

आता प्रश्न असा की या सुख-दुःखांपैकी कोणत्या भागाचा नेहमी विचार करायचा. काही माणसांना आपली दुःखे उगाळीत बसण्यात समाधान वाटते. तेच तेच प्रसंग पुनः पुनः आठवून ते त्यांवर रवंथ करीत बसतात, आणि कान किटेपर्यंत इतरांना ऐकवीत असतात. नको या माणसाशी बोलणे असे वाटू लागते. पूर्वीच्या दुःखांनी ते पुनः पुनः दुःखी होऊन आपल्या दुःखात भर घालीत असतात. जणू काही यांनी कधी सुखी जीवन अनुभवलेच नाही ! जगात प्रत्येकाला स्वतःचीच

दुःखे इतकी आहेत की पुनः इतरांची दुःखे दत्तक घ्यायला त्याला सवड नसते. म्हणून जीवनातील सुखी बाजूकडेही पाहा. सुखाच्या गोष्टी बोलून इतरांच्या सुखात भर टाका. दुःख वाढवू नका.

आपल्यापेक्षा कितीतरी अभागी दुर्दैवी प्राणी जगात आहेत त्यांच्याकडे पाहा. त्यांनी काय करावे ? तेही जीवन जगत असतात, आत्महत्या करीत नाहीत. अकाली वैधव्य आलेली स्त्री, निपुत्रिक कुटुंबे, श्रीमंती जाऊन दारिद्र्यात राहणारी माणसे, क्षयासारख्या असाध्य रोगांनी जर्जर झालेले रुग्ण, बालपणापासून पंगू असलेली माणसे, युद्धात अपंग झालेले सैनिक, नीच माणसांच्या दुष्टपणाला बळी पडलेले लोक--अशी कितीतरी दुःखी माणसे या समाजात आहेत. माणसाने नेहमी खाली आणि वर, मागे आणि पुढे पाहात असावे. खाली आणि मागे पाहून समाधान मानावे, वर आणि पुढे पाहून नवीन उमेद व महत्त्वाकांक्षा बाळगावी.

कडू अनुभव सतत चघळीत बसू नका.

[ ७-७-१९६५

# ६८. इतर धर्मांतील सुविचार

**हिंदू** नागरिकांनी प्रथम स्वतःचे धर्मग्रंथ अभ्यासावेत. भगवद्गीता आणि उपनिषदे यांत काय विचार सांगितले आहेत ते वाचावेत. त्यानंतर त्यांनी इतर धर्मांचेही काही ग्रंथ पाहावेत. बायबल, कुराण, झेंदावेस्ता, ग्रंथसाहेब इत्यादी प्रमुख धर्मग्रंथांतील तत्त्वांची व विचारांची माहिती घ्यावी. आता मराठी भाषेत असे वाङमय उपलब्ध झालेले आहे.

नैतिक आणि धार्मिक शिक्षणावर मी अनेक वेळा लिहितो आणि बोलतो. धार्मिक शिक्षणावर मत प्रदर्शित करताना मी असे सांगतो की शाळा-महाविद्यालयांतून सर्व विद्यार्थ्यांना सर्व धर्मांची माहिती द्यावी. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना सॉक्रेटीसपासून सर्व प्रमुख तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा अभ्यास होतो. भूमिती शिकवताना यूक्लिड आणि भास्कराचार्य असा फरक केला जात नाही. विज्ञानाचा अभ्यास करताना आर्किमिडिज आणि कपिल या दोन्ही परंपरांची माहिती आवश्यक आहे. सारांश, मानवाने निर्माण केलेले ज्ञान कोणत्याही देशातले असले तरी तो सर्वांचा वारसा समजला जातो. त्याचप्रमाणे सर्व धर्मसंस्थापकांनी आणि प्रेषितांनी जे विचार प्रदर्शित केले तो सर्व मानव जातीचा वारसा आहे. गीता-उपनिषदे भारतीयांची आहेत तशी ती सर्व जगाची आहेत. त्याचप्रमाणे

बायबल-कुराण इत्यादी ग्रंथ त्या त्या धर्मीयांव्यतिरिक्त इतरांचेही आहेत. मानवाला थोर विचारवंतांनी दिलेले हे ज्ञान घेतल्याशिवाय मनुष्य सुशिक्षित व सुसंस्कृत होऊ शकत नाही.

स्वतःच्या धर्मात राहून, त्याचे योग्य आचरण करूनही इतर धर्मांचा अभ्यास करता येतो. तसा झाला म्हणजे सर्वांच्या लक्षात येईल की, काही कडवट, माथेफिरू, अडाणी, धर्मवेडचा अनुयायांच्या कल्पना त्यांच्या धर्मात नाहीत. किंबहुना त्या त्यांच्या धर्माच्या विरुद्ध आहेत. अहिंसा, परोपकार, भूतदया, बंधुत्व, शुद्धाचरण, क्षमाशीलता, सहिष्णुता, चारित्र्य, दानधर्म इत्यादी कल्पना इतर धर्मांतही आहेत. भिन्नता कोठे आहे ? ईश्वर, आत्मा, विश्वाची उत्पत्ती, मृत्यूनंतरची स्थिती, पुनर्जन्म अशा तत्त्वांबाबत भिन्नता आहे. ती दोन धर्मांत आहे तशी प्रत्येक धर्मातील दोन पंथांतही असते. सारांश, नैतिक आचरणाच्या बाबतीत सर्व धर्मांची एकवाक्यता आहे. ईश्वरविषयक तत्त्वज्ञानात विविध धर्म आणि प्रत्येक धर्मातील पंथ यांत भिन्नता आहे.

प्रत्यक्ष आचरणाकरता नैतिक विचारांचा उपयोग होतो. " ही तत्त्वे तुमच्या व आमच्या धर्मात सारखीच आहेत " असा प्रचार केला तर अनेक धर्मांचे लोक मनाने एकत्र येतील. धर्मभिन्नतेचा जो बाऊ केला जातो तो कमी होईल.

याच्याही पुढे एक पाऊल जाता येणे शक्य आहे. हिंदूंनी इतर धर्मानुयायांपुढे त्यांच्या त्यांच्या म्हणजे ख्रिस्ती, मुसलमानी, पार्शी धर्मावर व्याख्याने द्यावीत. त्यांचा धर्म व त्यातील नीतितत्त्वे काय आहेत ती त्यांनाच सांगावीत, आणि शेवटी समारोप करावा की गीतेमध्ये देखील हेच विचार सांगितले आहेत. तुम्ही म्हणाल, " काही तरीच ! " नाही. माझ्या एका ब्राह्मण माजी विद्यार्थी मित्राने हा प्रयोग केला. त्याने मशिदीत कुराणावर प्रवचन केले आणि ते श्रोत्यांना आवडले. त्याला पुनः पुनः भाषण करण्याकरता बोलावणी आली. गीतेवरील माझी पुस्तके मागवून घेऊन ती वाचणारांत माझे ख्रिस्ती व मुसलमान बंधू आहेत.

आपण परस्परांच्या धर्मांचा अभ्यास करायला लागलो की धर्मवेडचा लोकांच्या अडाणी विचारातील पुष्कळसा वारा काढून घेतल्यासारखे होईल. 'यांनाही आपल्या धर्माची माहिती आपल्यापेक्षा जास्त आहे' या जाणिवेने त्यांचे डोके थंड होईल. त्या धर्मातील सूज्ञ लोक आपले स्नेही होतील. मग ते तुमच्या धर्माविषयीही जिज्ञासेने प्रश्न विचारतील आणि ऐकून घेतील. सहिष्णुता वाढीस लागेल.

बहुधर्मप्रधान अशा या भारतात बंधुभाव निर्माण करण्याचा हा एक आवश्यक मार्ग आहे. यातूनच एकराष्ट्रीयत्वाचा व भावनात्मक ऐक्याचा विकास होईल.

[ १२-७-१९६५

# ६९. हातातल्या गोष्टीही हातात नसतात

टेनिसच्या जागतिक स्पर्धा चालू होत्या. जगातील नामांकित आणि श्रेष्ठ खेळाडूंची चुरस लागलेली होती. या निमित्ताने वर्तमानपत्रात दोन चित्रे आली. ती मला फार आवडली. एक चित्र एका स्त्री खेळाडूचे होते. आपला शॉट बरोबर गेला नाही म्हणून अगदी निराश झालेली आणि चिडलेली अशी ती दिसत होती. अगदी असेच चित्र एका पुरुष खेळाडूचे होते.

आपल्यालाही खेळात असाच अनुभव येत नाही का ? मी अलीकडे कॅरम खेळायला सुरुवात केली आहे. त्यात मला तरी अनुभव असाच येतो. एखादा शॉट अगदी हुकमी वाटतो, पण तो जातच नाही; आणि एखादा अनपेक्षितपणेच यशस्वी होतो !

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचे असेच आहे. सदासर्वदा यश कुणालाच येत नाही. यश आणि अपयश यांचे मिश्रण असते. त्यांचे प्रमाण कमी जास्त असते.

रणांगणावरील युद्धात, उद्योगधंद्यात, व्यापारात, शेतकी–बागायतीत, नोकरीत, परीक्षेत, सांसारिक जीवनात, निवडणुकीत कुठल्याच क्षेत्रात निर्भेळ आणि सोलीव यशाची अपेक्षा ठेवू नका. निराश व्हाल.

कधीमधी अपयश येणारच, या तयारीने आणि सावधगिरीने उद्योग करणाराला निराशेचे धक्के बसणार नाहीत. तो चिडणार नाही, खचणार नाही. यशाची अपेक्षा, पण अपयशाचीही तयारी ठेवणाराला त्याच्या जीवनात फार मोठे धक्के बसणार नाहीत.

अखेरपक्षी विचार करता अपयशाच्या मानाने यशांचीच संख्या जास्त नाही का ? चुकलेल्या टोल्यांपेक्षा बसलेल्या टोल्यांचीच एकूण संख्या अधिक नाही काय ? पाऊण ग्लास भरलेला आहे, हे अधिक महत्त्वाचे; पाव ग्लास रिकामा हे कमी महत्त्वाचे आहे. हे प्रमाण विश्वातल्या नियमाला धरूनच आहे.

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैनं पापमवाप्स्यसि ॥

सुखदुःख, नफातोटा, यश-अपयश समान मानून जीवनाच्या रणांगणात उतरा ! पाप लागणार नाही व निराशाही येणार नाही.

नेम चुकल्याबद्दल फार निराश होऊ नका. नंतरचा लागेल, त्याच्या नंतरचा लागेल. हेच जीवन आहे.

[ १३–७–१९६५

# ७०. तुमची सिताफळं पाण्यावरली हायेत

**मला** अंगणातल्या बागेची फार हौस आहे. अगदी लहानपणापासून भाजी-पाला–फुलझाडे लावण्याची आणि बागेत सर्व प्रकारची कामें आपल्या हाताने करण्याची मला सवय आहे. नवीन घर बांधताना बागेकरता मी मुद्दाम मोठी जागा मोकळी ठेवली. अगदी प्रारंभापासून अनेक प्रकारची फळझाडे लावली. सात आठ वर्षांत नारळ मिळायला लागले. पहिल्या वर्षी सगळे म्हणचे पन्नाससाठ नारळ चोरीला गेले ! केळीचे घड वर्षाकाठी पंधरावीस मिळतात. लिंबे, पेरू, चिकू, पोपया काही आम्हाला, काही चोरापोरांना अशी विभागणी होते ! " लाभालाभौ समौ कृत्वा " मनोवृत्तीचीही जोपासना करता येते.

मी एक सिताफळाचे झाड लावले. त्याला फळे यायला लागली. पण बाजारातली फळे हिवाळचात, आणि आमच्या झाडाची फळे पावसाळचात असे व्हायला लागले. त्यामुळे फळाची चव कमी; ती पांचट निघू लागली. मला कोडे पडले.

आमच्या घरी एक माळीण येत असते. तानूबाई तिचे नाव. मी तिला विचारले, "तुमची सिताफळे अजून येत नाहीत. आमच्या झाडावर इतक्या लौकर का येतात ?" त्या बाईने विचार न करता ताडकन उत्तर दिले "तुमची सिताफळं पाण्यावरली हायेत." मला अनेक दिवस जो प्रश्न सुटला नव्हता त्याचे या बाईने चुटकीसरशी उत्तर दिले. अनुभवाचे ज्ञान आणि पुस्तकी ज्ञान यात इतका फरक आहे !

या एका प्रसंगाने ज्ञानाची प्रक्रिया स्पष्ट झाली. प्रत्यक्ष कृतीतून आणि अनुभवातून ज्ञानाची उत्पत्ती होते. मनुष्य काम करतो, काम करता करता अनुभव घेतो, अनुभवावर विचार करतो, त्या विचारातून काही अनुमाने बांधतो. अशी अनुमाने पुन: अनुभवाच्या मुशीत घालतो आणि शेवटी पक्के ज्ञान तयार होते. असे ज्ञान हजरजबाबी असते. जिभेच्या शेंडचावर ते असते. ते मुद्दाम लक्षात ठेवायला लागत नाही. पाठ करायला लागत नाही. कारण ते कृतीतून व अनुभवातून जन्मलेले असते.

अशिक्षित तानूबाईपेक्षा सुशिक्षित अण्णासाहेबांना एक सवलत अधिक आहे. तानूबाईला पुस्तकी ज्ञानाची संधी नाही. अण्णासाहेबांना पुस्तकी ज्ञान, अधिक कृतीतून मिळालेले ज्ञान अशा दुहेरी ज्ञानाचा फायदा आहे. पुस्तकातले ज्ञानही इतरांच्या अनुभवातूनच निघालेले असते. पण तो अनुभव इतरांचा असल्याने त्या ज्ञानाचा खोल ठसा आपल्या मनावर पडत नाही म्हणून ते ज्ञान लौकर विसरले जाते. काम करता करता मिळालेले ज्ञान पक्के लक्षात राहाते. पण अद्ययावत

पद्धतीने काम करायला पुस्तकातील माहितीची मदत होते. अशा रीतीने पुस्तकी ज्ञान आणि अनुभवजन्य ज्ञान यांचा समन्वय सुशिक्षित माणसाला करता येतो.

माणसाने आपल्या मर्यादित क्षेत्राबाहेर जाऊन विविध प्रकारची कामे करण्याची सवय ठेवावी. त्या कामातून अनुभव मिळतो, अनुभवावर चिंतन केले की ज्ञान प्राप्त होते. त्यांचा वाटेल त्या क्षेत्रात उपयोग करता येतो. काम→अनुभव →चिंतन → वाचन → ज्ञान →अधिक सुधारलेले काम, अशी ही साखळी आहे. अशिक्षित माणसे त्याच त्या चाकोरीतून काम करीत राहातात. त्यांच्यात सुधारणा फार मंदगतीने होते. सुशिक्षित माणसाला कामातला अनुभव आणि पुस्तकांतले ज्ञान अशा दोन्हींच्या साहाय्याने अधिकाधिक चांगले व सुधारलेल्या पद्धतीने काम करता यायला पाहिजे.

सुशिक्षित माणसाने हाती घेतलेल्या कामाच्या पद्धतीत सतत सुधारणा आणि प्रगती दाखविली तरच त्याच्या शिक्षणाचे सार्थक झाले असे होईल.

[२०-७-१९६५

# ७१. हार नाकारण्याचे तारतम्य

**पुराच्या** आपत्तीत सापडलेल्या लोकांची रात्रंदिवस निःस्वार्थीपणाने सेवा केल्याबद्दल काही स्वयंसेवकांचा सत्कार एका सभेत व्हायचा होता. त्यांच्याकरिता हार-गुच्छ आणले होते. प्रेक्षक-श्रोते आणि उत्सवमूर्ती म्हणून आळीतले काही पुढारी निमंत्रणावरून सभेला आले होते. सभेत स्वयंसेवकांची स्तुती व गौरव करणारी भाषणे झाली. हार घालायची वेळ आली तेव्हा चालकांच्या मनाची चलबिचल झाली. स्वयंसेवकांना घालायला आणलेले हार त्यांनी आळीतल्या पुढाऱ्यांना घातले आणि त्यांनीही ते घेतले ! स्वयंसेवकांच्या वाट्याला फक्त शब्दांचे गुच्छ आले.

असे होते. काम करणारे निराळे आणि त्यांच्याबद्दल मानसन्मान घेणारे निराळे. खरा मान कोणाचा होता आणि फुकटचा मान कोणी उपटला हे प्रेक्षकांना कळते.

वरील प्रसंगी तुमच्या गळ्यात हार घालायला चालक आले असते तर तुम्ही काय केले असते ? त्या गल्ली-पुढाऱ्यांनी हार नाकारायला पाहिजे होते. 'सत्कार आमचा नसून स्वयंसेवकांचा आहे, त्यांना हार घाला' असे त्यांनी

सभाचालकांना सांगायला हवे होते. अहो, पण फुकट हार मिळत असताना तो नाकारायलाही धैर्य लागते, प्रामाणिकपणा लागतो.

अनेक प्रसंगी असे होते. प्रत्यक्ष काम करणारी माणसे निराळी असतात आणि त्या कामाबद्दल मोठेपणा व मानसन्मान यांचे धनी निराळेच असतात. त्यामुळे सामान्य कार्यकर्ते नाराज होतात. 'कष्टाला मात्र आम्ही आणि मानसन्मान घ्यायला मात्र हे' असे त्यांना वाटते. ते नाराज होतात. निरुत्साही होतात. हिरमुसले होतात.

काम करणाराला त्याच्या कामाबद्दलचे योग्य ते श्रेय मिळाले पाहिजे. माणसाला पैशाची अपेक्षा असते तितकीच मानसन्मान, अभिनंदन, कौतुक, कीर्ती, स्तुती, प्रसिद्धी यांचीही अपेक्षा असते. योग्य प्रमाणात तिची तृप्ती झाली तर चांगली कामे करणारे लोक पुढे येतात. सत्कृत्ये वाढीला लागतात. तुम्ही एखाद्या ठिकाणी प्रमुख असाल तर तुमच्या सहकाऱ्यांना आणि कनिष्ठ सेवकांना त्यांच्या कामाबद्दलचे श्रेय देण्याची काळजी घ्या. त्यांच्या कामाबद्दलचा मोठेपणा, तुम्हाला मिळत असला तरी धैर्याने तो नाकारा आणि कामे करणारांकडे तो वळवा. हार स्वतः घेण्यापेक्षा योग्य माणसाकडे तो वळवण्यात आणि स्वतः तो नाकारण्याला औदार्य आणि धैर्य लागते. आपले सहकारी, कनिष्ठ सेवक आणि प्रत्यक्ष कामे करणारी माणसे यांना त्यांच्या त्यांच्या कामाबद्दलचा योग्य तो मोठेपणा, मानसन्मान, आणि प्रसिद्धी मिळू द्या.

हार आणि सन्मान आपण केव्हा घ्यावा आणि इतरांकडे तो केव्हा वळवावा याचे तारतम्य दाखवणारी व्यक्तीही इतरांच्या आदराला पात्र होते.

[ २०-७-१९६५

## ७१. भ्रष्टाचाराचे मूळ विचारात

आपल्या समाजात भ्रष्टाचार वाढत आहे अशी प्रत्येक जण ओरड करतो. चार-चौघांच्या गप्पा निघाल्या की हाच विषय; व्याख्यानालाही तोच विषय; राजकीय चळवळीलाही तेच खाद्य; आणि वर्तमानपत्रालाही तोच माल-मसाला !

भ्रष्टाचार व्हायला निदान दोन माणसे लागतात—कारण ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. इच्छेने अथवा अनिच्छेने, मोहाने अथवा जाणूनबुजून, सवय अथवा आपद्धर्म म्हणून दोन अथवा अधिक माणसांच्या व्यवहारात भ्रष्टाचार संभवतो.

धर्म, नीती, न्याय, नियम, कायदा, सदसद्‌विवेकबुद्धी आणि माणुसकी यांना धाब्यावर बसवून, त्यांचे उल्लंघन करून जे वर्तन केले जाते तो भ्रष्टाचार; त्यांचे पालन करून जी क्रिया होते तो सदाचार.

भ्रष्टाचार किंवा सदाचार या प्रवृत्ती आहेत. त्यांच्या मुळाशी वाईट किंवा चांगले विचार असतात. भ्रष्टाचाराला प्रवृत्त करणारा विचारच असतो. भ्रष्टाचारापासून निवृत्त करणारा आणि सदाचाराला प्रवृत्त करणारा विचारच असतो. अखेरपक्षी विचार हेच मूळ आहे. विचारांचे सामर्थ्य फार मोठे आहे.

असत्य, अप्रामाणिकपणा, स्वार्थ, मोह, समाजद्रोह या प्रवृत्ती आहेत. त्यांच्या उलट सत्य, प्रामाणिकपणा, आत्मसंयमन, मनोनिग्रह, समाज-हित-बुद्धी याही प्रवृत्तीच आहेत. अनिष्ट प्रवृत्तींचा प्रतिकार करून इष्ट प्रवृत्तींची वाढ करावयाची झाल्यास चांगल्या विचारांचे वातावरण समाजात सर्वत्र तयार व्हावयास पाहिजे.

निदान एवढे सत्कार्य प्रत्येकाला करता येईल. ते आपल्या हातात आहे. त्याला सरकार नको, कायदा नको. चांगले विचार, चांगले आचार, चांगल्या प्रवृत्ती यांचा आपापल्या वर्तुळात प्रसार करा. प्रचार करा. संभाषण, वाचन, लेखन, पुस्तकांची देवघेव—इत्यादी मार्गांनी प्रत्येकाला हे करता येण्यासारखे आहे.

नुसते "भ्रष्टाचार—भ्रष्टाचार" असे ओरडण्यापेक्षा सद्विचार आणि सदाचार यांच्या प्रसाराकरता आपल्या हातात आहे ते तरी करा ! चांगल्या विचारांचा प्रसार करायला कायदा, परवानगी, संपत्ती कशाचीच गरज नाही. तुमची तळमळ मात्र जरूर पाहिजे.

[ १२-८-१९६५

## ७३. अननोन् सोल्जर्स—अज्ञात वीर

**शाळा**-कॉलेजांतील सामन्यात एखादा मुलगा बक्षीस मिळवून प्रसिद्धीला येतो. परंतु त्याच्या आणि त्याच्या संस्थेच्या यशाला त्याचे इतर सवंगडीही हातभार लावीत असतात. त्यांचीही कामगिरी मोलाची असते. पण ते अज्ञात राहतात.

कारखाने, कचेऱ्या इ. ठिकाणी जी जी उत्कृष्ट कामे होतात, त्यांना जे अलौकिक यश मिळत असते, त्याला अनेकांचे श्रम खर्ची पडलेले असतात. कारखान्याचे व चालकांचे नाव प्रसिद्ध होते, पण यश मिळवून देणारे कामगार अज्ञातच राहतात.

रणक्षेत्रावर मोठमोठ्या लढाया आणि युद्धे होतात. त्यात काहींचे पराक्रम अलौकिक होऊन त्यांचा नावलौकिक होतो. पण त्यांच्या यशाला कारणीभूत झालेले आणि पराक्रम करणारे हजारो वीर अज्ञातच राहतात.

या अज्ञात राहणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रांतल्या वीरांनी आपल्या समाजाला आणि देशाला पुढे आणलेले असते. सत्कृत्य करणाऱ्या सर्वांनाच प्रसिद्धी मिळणे शक्य नाही. अशा प्रसिद्धीला काही किंमतही राहणार नाही, आणि केवळ प्रसिद्धी-करताच सत्कृत्य करीन अशी मनोवृत्ती झाली तर पराक्रमाचा दुष्काळच पडेल. अनेकांनी पराक्रम करावा त्या वेळेला प्रसिद्धीचे भाग्य एखाद्याला मिळते. बाकीचे अप्रसिद्धच राहतात. सत्कृत्य करून ते गुप्त ठेवण्याचे महत्त्व आपल्या धर्मात फार आहे. गुप्त दान करावे आणि त्याचा बोभाटा करू नये ही आपली परंपरा आहे. अज्ञात राहूनही सत्कृत्य आणि पराक्रम करण्याची परंपरा ज्या समाजात आहे तो समाज जिवंत राहतो.

देशाकरिता आणि समाजाकरता आज महायज्ञ चाललेले आहेत. त्यांचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. रणक्षेत्राच्या आघाडीवर, रणक्षेत्राच्या पिछाडीला, कारखान्यात, कचेरीत, शेतात, ज्या ज्या ठिकाणी कामे चालली आहेत त्या त्या ठिकाणी तो यज्ञच आहे. त्या यज्ञात जे जे लोक समर्पण बुद्धीने तन-मन-धन लावून कामे करतात त्यांच्यामुळे देश पुढे जातो, त्यांच्यामुळे रणक्षेत्रावर यश मिळते.

ते ते सर्व "अन्नोन् सोल्जर्स"—अज्ञात वीरच आहेत.

[१५-९-१९६५

# ७४. भारत-पाक संघर्षाचा तुम्हाला बोध

**भारत**-पाक संघर्षातून एक महत्त्वाचा बोध सर्वसामान्य नागरिकांनी घेण्यासारखा आहे. राष्ट्रीय सद्गुण म्हणून काही गुणांची जोपासना प्रत्येक नागरिकाने बुद्धिपुरस्सर केली पाहिजे.

पाककडे अद्ययावत् शस्त्रे, रणगाडे, विमाने असून त्याला माघार घ्यावी लागली. भारताकडे जुन्या बनावटीची शस्त्रे, रणगाडे व स्वनिर्मित विमाने होती. तरी आपली सरशी झाली. भारतीय जवानांचे धैर्य व जिद्द ही उत्कृष्ट होतीच, पण यशप्राप्तीला आणखीही काही लागते. कामातील अचूकपणा व उत्कृष्ट सराव यामुळे आपल्या सैन्यात एक प्रकारची "इफीशियन्सी" व कमावलेले नैपुण्य होते.

अचूकपणा आणि उत्कृष्ट सराव हा सेनादलातील शिक्षणाचा आत्मा आहे. तो आपल्या जवानांनी आत्मसात केला म्हणून आपल्या तोफांची व विमानांची अचूक नेमबाजी झाली व तिचा योग्य तो परिणाम झाला. अचूक नेमबाजी आणि शस्त्र हाताळण्याचा सराव या गोष्टींत पाक सैनिक कच्चे पडले; पण उद्या स्वतःचा कमकुवतपणा नाहीसा करून ते पुन्हा रणांगणात उतरले तर आपली तयारी त्यांच्यापेक्षा सरस पाहिजे. याच गुणांत पटाईत असलेल्या दुसऱ्या शत्रूशी मुकाबला करण्याचा प्रसंग येणार आहे त्याची तयारी आज केली पाहिजे.

अचूकपणा आणि उत्कृष्ट सराव या लष्करी जीवनातील गोष्टी नागरिकांच्या इतर व्यवसायांतही उतरल्या तर आघाडीप्रमाणेच पिछाडीची तयारीही सर्वोत्कृष्ट होईल. आजचा नागरिक हा उद्याचा सैनिक आहे. सर्वंकष महायुद्ध सुरू झाले की विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, यंत्रज्ञ, कामगार इत्यादी सर्वांना आघाडीवर जावे लागते. निदान पक्षी स्वतःच्या गावाच्या आणि घरादाराच्या रक्षणाची आघाडी त्यांना सांभाळावी लागते. त्या वेळी या गुणांचा उपयोग होईल.

नागरिकांचे प्रत्येक काम संरक्षणाला उपयोगी आहेच. शेती, कारखानदारी, व्यापार, संशोधन इत्यादी प्रत्येक व्यवसायाचा उपयोग संरक्षणामध्ये होतो. या सर्व उद्योगात अचूकपणा आणि उत्कृष्ट सराव हे गुण वाढविले तर उत्पादनाचा दर्जा वाढेल आणि त्याचे प्रमाणही सव्वा ते दीड पटीने अधिक होईल.

आजच्या आपल्या कामामध्ये निष्काळजीपणा, भोंगळपणा, कष्टाचा अभाव, सराव करण्याचा कंटाळा व कामचुकारपणा हे दुर्गुण प्रामुख्याने दिसतात. परिचित भाषेत सांगावयाचे झाल्यास इफीशियन्सीचा अभाव आणि इन-इफीशियन्सीचा प्रभाव वाढत आहे. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने ते धोकादायक आहेत. अचूकपणा आणि सराव हे गुण सैनिकाप्रमाणे प्रत्येक नागरिकाच्या कामात दिसले पाहिजेत.

[ १६-१०-१९६५

# ७७. दीन बालकांचा बालक दिन

**१४ नोव्हेंबर** रोजी बालदिन साजरा झाला. श्रीमंताच्या घरात वर्षाचे ३६५ दिवस बालदिन साजरा होतच असतो. आईबाप आपल्या ऐपतीप्रमाणे मुलांचे सर्वप्रकारे कोडकौतुक करीतच असतात. खाऊ आणि खेळणे या बाबतीत कमतरता पडत नाही. ही बालके खरोखरीच दैववान आहेत. असे भाग्य जन्मोजन्मी त्यांच्या वाट्याला येवो.

खरा बालकदिन पाहिजे तो समाजातील दीन बालकांच्या करिता. रस्तोरस्ती आणि गल्लोगल्ली, झोपडीझोपडीतून आणि मोडक्या तोडक्या घरातून, भीक मागणारी आणि काबाडकष्ट करणारी, असंख्य दीन बालके आहेत, त्यांच्याकरता. समाजाला संपन्नावस्था येईपर्यंत यांची संख्या अशीच राहणार. या बालकांच्या जीवनांत काहीतरी आनंद आणण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.

या बालकांना वाटीभरही दूध मिळत नाही, पोटभर सकस अन्न नाही. थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्याकरता अंगभर कपडे नाहीत. खेळण्याची आणि करमणुकीची साधने त्यांच्याजवळ नाहीत. निवाऱ्याची जागा आणि शिक्षणाच्या सोयी त्यांच्याकरता नाहीत. सक्तीने शाळेत घातले तरी त्यांच्याजवळ पुस्तके आणि वह्या-पेन्सिली नाहीत. या बालांचा बालकदिन साजरा व्हावयास पाहिजे.

आपण आपल्या मुलाबाळांचे वाढदिवस अवश्य साजरे करावेत. त्यांना सर्वतोपरी सुखात ठेवण्याचा प्रयत्न करावा. हा बालदिन वर्षभर साजरा करीत राहावा. पण त्यांचे वाढदिवस साजरे करताना आपल्या भोवतालच्या समाजातील एखाद्या तरी दीन बालकाची आठवण ठेवा. त्याला एखादे खेळणे अथवा पुस्तक द्या. पावशेर दूध द्या किंवा जेवायला घाला. अंगात घालायला शर्ट द्या किंवा पायात घालायला चप्पल द्या. त्याच्याकरिता काही तरी करा आणि ते तुमच्या बालकाच्या हाताने करा. त्याला या गरीब बांधवाबद्दल बंधुभाव वाटू द्या. श्रीमंतांची, मध्यमवर्गीयांची आणि गरिबांची सर्वांचीच बालके ही राष्ट्राची भावी संपत्तीच आहे. संपत्ती निर्माण करणारी शरीरे, हात, बुद्धी, कर्तबगारी, संशोधन प्रवृत्ती या सर्व गोष्टी या सर्व बालकांच्या ठिकाणी आहेत. भावी जवान, कारखानदार, संशोधक, शास्त्रज्ञ, राजकारणी नेते, शिक्षक अशा कर्तबगार नागरिकांची ही अविकसित रूपेच आहेत. त्यांच्या विकासाला हातभार लावा. म्हणजे स्वर्गीय नेहरूंची जयंती आणि १४ नोव्हेंबर बालकदिन साजरा केल्यासारखे होईल.

[ १४–११–१९६५

## ७६. आपल्या आरोग्यातील आदर्श

**एका** मित्राचे घरी आम्ही कै. लालबहाद्दूर शास्त्री यांच्या निधनाच्या दिवशीच बोलत बसलो होतो. तेथे भिंतीवर दोन सचित्र कॅलेंडरे होती. एकावर महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू बोलत होते. दुसऱ्यावर पंडित जवाहरलाल लालबहाद्दूरना काही कानमंत्र देत होते.

आता तसेच तिसरे चित्र काढायचे झाल्यास कसे काढाल ? मी तरी असे चित्र काढीन की, कै. शास्त्री काही सामान्य माणसांपुढे बोलत आहेत. त्यांना मार्गदर्शन करीत आहे. तुम्ही काय सुचवता ?

लो. टिळक गेले तेव्हा चिंता पडली—आता त्यांचा वारसा कोण चालवणार? महात्मा गांधी गेले त्यानंतर विवंचना पडली की नेहरूंना कसे जमेल ? नेहरूंच्या नंतर शास्त्रींच्याबद्दल लोक साशंक होते. केतकरांच्या नंतर आश्रम कसा चालेल अशी अनेकांना चिंता पडली !

या चिंता अनादी काल जन्माला येऊन लोप पावल्या आहेत. काळाचा आणि कर्तबगारीचा अखंड प्रवाह चालू आहे. त्यात खंड नाही. थोडा चढउतार, थोडी वेडीवाकडी वळणे--असे हे चालायचेच.

लोकमान्य, महात्मा आणि पंडित नेहरू यांच्या तोलाच्या पुढाऱ्यांची सवय असलेल्या आपणाला यापुढे सामान्यातील असामान्य पुढाऱ्यांची सवय केली पाहिजे. सामान्यातील असामान्याला, अलौकिकत्व ओळखायला, ते पुढे आणायला, त्यांचे कौतुक करायला शिकले पाहिजे.

कै. शास्त्रींच्या ठिकाणी असे गुण होते की ते सामान्य माणसाला, प्रत्येकाला साध्य आहेत. शास्त्रींच्या गुणांनी डोळे दिपून आपण आंधळे होत नाही. गुणांकडे खोलवर पाहावते व त्यांचे अनुकरण करता येईल इतके ते आटोक्यातले वाटतात.

त्यांचे गुण म्हणजे सामान्य सज्जन माणसाच्या ठिकाणी असलेले गुण. साधेपणा, सरळ स्वभाव, सौजन्य, सहिष्णुता, सहानुभूती, प्रामाणिकपणा, श्रद्धा या सौम्य गुणांना शास्त्रींनी खंबीरपणा आणि निश्चय यांची जोड दिली. हे गुण असणारा नेता अलौकिक नाही तरी लौकिक कार्य करू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे.

असे शास्त्री आज समाजाच्या प्रत्येक पातळीवर पाहिजेत. जेथे जेथे नेतृत्वाची गरज आहे तेथे तेथे हे गुण पाहिजेत.

पुढे येणाऱ्या पिढीला हा आदर्श आहे. हा वारसा चालवला तर भारताचा उत्कर्ष धीमेपणाने पण निश्चितपणे होत राहील.

सामान्य माणसांनी सामान्य गुण मिळवण्याचा असामान्य प्रयत्न करायला पाहिजे.

[ ११-१-१९६६

# ७७. सतत वाचाल तरच वाचाल

**वाचन** करणे हे जगण्याकरता आज आवश्यक झाले आहे. म्हणून म्हणतो सतत वाचन कराल, तरच जगाच्या कालप्रवाहात वाचाल; नाही तर नाहीसे व्हाल.

ज्या प्राचीन संस्कृतींना लिपी आणि लेखनकला होती त्यांची आजपावेतो दहा हजार वर्षांनीही माहिती तरी मिळते. ज्या प्राचीन समाजांना लिपी आणि लेखन-वाचन नव्हते त्या नष्ट झाल्या आहेत.

आजची जागतिक संस्कृती वाचनप्रधान आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाला साक्षर करण्याचे भगीरथ प्रयत्न चालू जाहेत. यूनेस्कोसारखी संघटना हे काम सर्वत्र करीत आहे.

वाचन ही आज निव्वळ करमणुकीची गोष्ट राहिली नाही. ललित साहित्या-पुरतीच ती मर्यादित नाही. आपापला व्यवसाय यशस्वी रीतीने चालविण्याकरिता प्रत्येकाला वाचन आवश्यक झाले आहे.

स्वतःच्या व्यवसायातील आजतागायत उपलब्ध असलेली माहिती रोजच्या रोज वाचल्याशिवाय डॉक्टर, वकील, व्यापारी, कारखानदार, अध्यापक, संशोधक, सार्वजनिक कार्यकर्ते यांची कामे पहिल्या दर्जाची आणि यशस्वी होणार नाहीत. नेहमीचे घरकाम करणाऱ्या गृहिणीने देखील गृहशास्त्र, आहारशास्त्र, आरोग्य-शास्त्र या विषयांच्या नवीन शोधांची माहिती वाचनाने मिळविली पाहिजे. लोकशाही समाजातील नागरिकाला वाचन अपरिहार्य आहे. जगातील घडामोडी आणि मतप्रवाह कळल्याशिवाय ते मतदानास पात्र होणार नाहीत.

दिवसभर आपले व्यवसाय करून थकलेल्या-भागलेल्या माणसांना मानसिक विश्रांती म्हणूनही ललित वाङमयाचे किंवा अन्य वाचन जरूर आहे. ह्या वाचनाने विश्रांती मिळून मानसिक ताण,कमी होतो, आरोग्य कायम राहाते आणि आयुष्य वाढते.

वाचन करण्यासारखे साहित्य अतिशय शीघ्र काळात आणि मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. त्यामुळे थोड्या वेळात पुष्कळ वाचनाची कला आत्मसात करणे जरूर झाले आहे. शीघ्र वाचनाची कला वाढीला लावा. थोड्या वेळात पुष्कळ वाचन करून त्यातील वेचक सार काढण्याची आणि ते मनात साठविण्याची कला वाढवा. शीघ्र वाचनाची कला वाढविली नाही आणि रोज वाचन केले नाही तर तुमचा बॅक नंबर म्हणजे शिळा अंक होईल ! रद्दीत जाणे कोणाला आवडेल ?

प्रत्येक कुटुंबाची बौद्धिक पातळी तेथील ग्रंथसंग्रहावरून लक्षात येते. मराठी भाषेतील निदान २०-२५ उत्कृष्ट ग्रंथ तुमच्या घरात आहेत काय ? नसल्यास मिळवायला प्रारंभ करा. एखाद्या ग्रंथालयाचे सभासद व्हा आणि नवनवीन पुस्तके तुमच्या घरातील माणसांना दिसतील अशी ठेवा.

साक्षर असून निरक्षरासारखे अज्ञ राहू नका.

[ १३-२-१९६६

# ७८. नुसते "चांगले" म्हणू नका

**चांगल्या** गोष्टींना चांगले म्हणणारांची संख्या फार थोडी आहे. गोष्ट चांगली आहे असे मनातून वाटते, पण तोंडातून तसे शब्द फुटत नाहीत. कौतुक करून उत्तेजन देण्याचे आपल्याकडून होत नाही. हा मराठी माणसाचा स्वभाव आहे.

चांगल्याला 'चांगले' म्हणून म्हणतात ते चांगलेच आहे. पण नुसते चांगले म्हणू नये. काय चांगले आहे आणि कशामुळे चांगले आहे ? चांगले म्हणजे नक्की काय आहे ? हे थोडया जास्त शब्दांत व्यक्त करावे. त्यामुळ आपल्या विचारात आणि शब्दसंग्रहात भर पडून भाषा संपन्न होईल. "चांगला" हा शब्द वापरून झिजला आहे आणि गुळगुळीत व गुळमुळीत झाला आहे.

चांगले म्हणजे काय याचे पृथक्करण करणारे शब्द आपल्या मनाशी योजून ठेवा आणि त्यांचा योग्य वेळी समर्पक उपयोग करीत जा. या दृष्टीने मराठी भाषा संपन्न आहे. पण तिचे शब्दभांडार बँकेतल्या दीर्घ मुदतीच्या ठेवीप्रमाणे गुंतलेले आहे. त्याला चालू खाती घालून व्यवहारातल्या चलनी नाण्याचे स्वरूप दिले पाहिजे.

असे करायला प्रथम मनाशीच विचार करायला पाहिजे. ती सवय इष्ट आहे. तुम्ही विचार करू लागला की तो तो विचार आपापले शब्द मनाच्या खाणीतून खणून काढील.

एखादे चित्र किंवा देखावा चांगला झाला म्हणजे काय ? आकर्षक, आल्हाद-कारक, अवर्णनीय, अप्रतिम ......... स्वयंपाक चांगला झाला म्हणजे काय ? रुचकर, खमंग, खुशखुशीत, स्वादिष्ट, चवदार ......... एखाद्याचा पोषाख चांगला म्हणजे काय ? शालीन, ऐटबाज, झोकदार, रुबाबदार, संभावित ......... भाषण चांगले

म्हणजे काय ? मुद्देसूद, शैलीदार, विचारप्रवर्तक, परिणामकारक.........एखादा लेख चांगला म्हणजे काय ? नवीन विचाराचा, सुंदर शैलीचा, व्यवहारोपयोगी, स्मरणीय, मननीय.........

अशा रीतीनेच पुढे पुढे विचार करा म्हणजे तुमच्या कल्पना वाढतील, शब्दसंपत्तीत भर पडेल आणि बोलण्याला वजन येईल.

मला असे वाटायला लागले आहे की कौतुकात कंजूषपणा करणारा माणूस विचारशक्तीचा उपयोग करण्यातच सुस्त असतो. अभिप्राय द्यायचा म्हणजे एखादी गोष्ट चांगली का वाईट, व ती तशी का याचा विचार करायला पाहिजे. नंतर तो व्यक्त करायला समर्पक शब्द आठवायला पाहिजेत, आणि ते आपल्या मुखातून बाहेर काढायचे श्रम घ्यायला पाहिजेत. कोण घेतो इतके श्रम ! त्यापेक्षा दिसेल ते पाहावे, ऐकू येईल ते ऐकावे, पुढे येईल ते खावे, बोलू नये. बुद्धीलाही कष्ट नाहीत, जिभेलाही श्रम नाहीत !

हे सर्व वाचल्यानंतर देखील तुम्ही म्हणाल, संपादकीय लेख " चांगला आहे. " संवयीचा परिणाम, दुसरे काय ?

[ ९-३-१९६६

## ७९. कुशल मध्यस्थांची गरज

**सांसारिक,** सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय जीवनात सर्वत्रच कुशल अशा मध्यस्थांची सतत जरूरी असते. बहुसंख्य माणसे आणि पक्ष एकेरी मनोवृत्तीचे असतात. त्यांचा स्वभाव व वृत्ती एकांगी, आग्रही, अहंकारी, आक्रमक, मोडतोड प्रवृत्तीची, बेपर्वाई अशी असते. अशा दोन बाजू एकत्र येणे आणि नांदणे अगदी अशक्यच. दोन बाजूंपैकी एक बाजू अशी असली तरीही सहजीवन अशक्य होते. परंतु या प्रवृत्ती नसलेल्या, एकत्र राहू इच्छिणाऱ्या, तडजोड वृत्तीच्या अशा दोन व्यक्ती किंवा पक्ष असल्यास त्यांच्यात सहजीवन शक्य असते. काही कारणामुळे सत्प्रवृत्तीच्या अशा दोन व्यक्तींत किंवा पक्षांत काही गैरसमज आणि बेबनाव झालेला असतो. उद्देश चांगला परंतु सहजीवन आणि सहकार्य यांच्या तंत्राचे अज्ञान हीच मुख्य अडचण असते. अशा वेळी कुशल मध्यस्थाचा फार उपयोग होतो.

" जे पिंडी ते ब्रह्मांडी " या न्यायाने वरील नियम आपल्या खाजगी संसारात लागू पडतो तसाच तो समाजाच्या आणि जगाच्या व्यापक संसारातही लागू पडतो. घरात दोन चांगल्या व्यक्ती असल्या तरीही व्यवहारज्ञानाच्या अभावी गृहकलह

होतात. समाजातही चांगल्या हेतूने प्रेरित असे दोन पक्ष असले तरीही त्यांच्यात वैमनस्य वाढते. संसारात आई-बाप आणि मुले, भाऊ-भाऊ, पति-पत्नी, वृद्ध-तरुण, सासूसासरे आणि सुना इत्यादी जवळच्या व्यक्तींमधील बेबनाव ज्या कारणांनी होतो तीच कारणे सामाजिक जीवनात जातीजाती, पक्षपक्ष, प्रांतप्रांत यांच्यातील बेबनावाला कारणीभूत होतात. या सर्वच ठिकाणी जर उभयपक्षी सत्प्रवृत्ती असतील तर कुशल मध्यस्थाच्या साहाय्याने शांती, आनंद आणि सहजीवन शक्य आहे.

मध्यस्थाचे कार्य ही एक मनोवृत्ती आहे. ती जन्मतःच असते व प्रयत्नानेही वाढविता येते. मध्यस्थाचा मुख्य गुण म्हणजे विधायक काम व्हावे व शांती नांदावी ही प्रबल इच्छा. दुसरा गुण म्हणजे दोन्ही बाजूंमधील गुणदोष अचूक हेरण्याचे बुद्धिकौशल्य. आणि तिसरा गुण म्हणजे अंतःकरणास भिडणारी भाषा बोलण्याचे कौशल्य. असे मध्यस्थ जितके अधिक प्रमाणात मिळतील तितक्या प्रमाणात, निदान टाळण्यासारखे आणि परिहार्य असे कलह टाळता येतील. निदान सज्जन माणसे तरी केवळ गैरसमजाने एकमेकांशी न भांडता सलोख्याने राहू शकतील. दुर्जनांशी वागण्याचे मार्ग मात्र निराळे आहेत.

मानवाचा स्वभाव ही अनाकलनीय अशी बाब आहे. एखाद्याच्या मनात काय काय विचार, आठवणी, भावना, अनुभव काम करीत असतात ते ओळखणे कठीण आहे. त्यामुळे मध्यस्थाच्या प्रयत्नाला नेहमी यश येईलच असे नाही; पण शुद्ध हेतूने प्रयत्न करीत राहावे हे आपले काम आहे. यश आले तर ठीकच; नाही तर परिस्थितीत थोडी तरी सुधारणा होईल. निदान अधिक विघडणार नाही.

तुम्ही आहात का चांगले मध्यस्थ ?

[ १४-४-१९६६

# ८०. बोला, पण आधी शब्द तोला

**संभाषणाच्या** ओघात कधी कधी आपण बोलू नये ते बोलून जातो. चार माणसांत बसलो म्हणजे थोडी अहंकाराची जाणीव असते. बुद्धीची चमक दाखवावीशी वाटते. भाषेवरील प्रभुत्वाचे प्रदर्शन करण्याचा मोह होतो. विनोद, कोटया, उपहास व थट्टा करण्याची लहर येते. आणि संभाषणाच्या भरात आपण काही ना काही बोलून जातो. पण परिणाम काय होतो ?

मेनी एक शॉट् ॲट् रँडम् सेंट् ।
मे हिट् दि मार्क दि आर्चर् नेव्हर् मेंट ।।

ज्याची थट्टा होते, ज्याच्या वर्मी घाव बसतो. त्याच्या ते जन्मभर लक्षात राहाते. मनाची जखम भरून येत नाही—शरीराची भरून येते, पण वण राहातोच की ! बोलणाराला त्याची जाणीवही नसते.

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एका मुखवस्तू गृहस्थाकडे आम्ही ग्रामोफोन रेकॉर्ड ऐकायला गेलो होतो. त्या वेळी ग्रामोफोन घरी असणे म्हणजे आजच्या काळात टेलिव्हिजन जवळ असण्यासारखे होते. रेकॉर्ड लावली म्हणजे मी विचारी, "हा राग कोणता आहे ?" ते गृहस्थ उपहासाने म्हणाले, "यांना राग सांगायला लागतात." ऐकलेले राग मी विसरलो पण त्या माणसाच्या बोलण्याचा राग मनातून अजून गेला नाही. चाळीस वर्षे झाली.

एकदा माझ्याकडे एक गृहिणी काही कामाला आल्या. बोलता बोलता म्हणाल्या, "आमच्या मिस्टरना एम्. एस्सी. ला मी बसायला लावले." माझ्या जिभेवर शब्द आले होते, "मग पेपर तुम्हीच लिहिले का ?" पण मी ते शब्द अडवून ठेवले. विनोद ठीक झाला असता पण त्याची किंमत किती पडली असती ? दोघांनाही.

वाणीचा आणि भाषेचा योग्य उपयोग ही एक तपश्चर्याच आहे. तिला आत्मसंयमनाची व जिव्हा-नियंत्रणाची सवय करावी लागते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।।—गीता अ. १७

इतरांना न दुखवणारी, सत्य, गोड, हितकारक अशी भाषा बोलणे ही एक वाणीची तपश्चर्या आहे. ती करणाराच्या भाषेत तपश्चर्येचे सामर्थ्य येते.

संसारात आधीच कष्ट, निराशा, अपमान, अपयश इत्यादी दुःखे आहेत. त्या दुःखावर आणखी डागण्या का द्याव्यात ? शक्य झाले तर गोड बोलून, सहानुभूती दाखवून, निदान स्वस्थ बसून—जगाच्या आनंदात भर घालू या.

[ १५-६-१९६६

# ८१. अशी ही नवी दृष्टी!

**विश्वाचा** आणि कालाचा विस्तार अनंत अनादी आहे. सामान्य माणसाला त्याची कल्पना येत नाही. गीतेच्या अकराव्या अध्यायात भगवान अर्जुनाला म्हणाले, "या सृष्टीची व कालाची कल्पना तुला तुझ्या दृष्टीने यायची नाही. मी तुला दिव्य दृष्टी देतो !" आणि मग या विशाल विश्वाचे आणि काळाचे मूर्तिमंत चित्र त्यांनी अर्जुनापुढे उभे केले.

दिव्य दृष्टी म्हणजे जगाकडे पाहण्याची व्यापक विशाल दृष्टी. आपले आकुंचित स्थान आणि आपला चालू मर्यादित काळ यांच्या कक्षा विस्तृत करीत करीत, त्या अनंतापर्यंत नेऊन पोचवायच्या. आजचे शास्त्रज्ञ व इतिहास संशोधक तेच करीत आहेत.

सर्वसामान्य माणसाची दृष्टी अगदी आकुंचित असते. स्वतःचे घर आणि स्वतःचा चालू संसार याच्या पलीकडील जग त्याला दिसत नाही. स्थलाच्या दृष्टीने त्याची दृष्टी आपल्या घराच्या चार भिंतींपुरती, म्हणजे हजारपाचशे चौरस फुटांपुरती मर्यादित असते. काळाच्या दृष्टीने कालचा दिवस गेला, आजचा कसा जाईल एवढीच त्याची विवंचना असते. चालू काळाच्या फार मागे किंवा फार पुढे जाण्याची ताकद त्याच्या स्मृतीत किंवा कल्पनाशक्तीत नसते. माणसांच्या बाबतीत देखील आपण व आपली बायकापोरे यांच्या पलीकडे तो फारसा पाहात नाही. सारांश स्थल, काल आणि माणसे या तीन बाबतींत त्याचे जग अगदी क्षुद्र असते.

मनुष्य जसजसा सुसंस्कृत होत जातो तसतसा तो आपली दृष्टी हळूहळू विशाल करतो. स्थलाच्या दृष्टीने त्याला आपला देश आणि सारे जग दिसू लागते. कालाच्या दृष्टीने तो इतिहासाकडे पाहून मानवी संस्कृती कशी वाढली ते समजून घेतो आणि भावी काळात काय होईल त्याचे आडाखे बांधतो. प्राणिमात्राच्या बाबतीतही त्याच्या प्रेमाच्या मर्यादा व्यापक होतात. सर्व मानवजातीच्या कल्याणाचा आणि असहाय्य अशा मुक्या प्राण्यांचाही तो विचार करतो. या विशाल दृष्टीमुळे मनुष्य मोठा होतो.

या दिव्य दृष्टीचा उपयोग आपल्या रोजच्या कौटुंबिक, सामुदायिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात देखील करता येईल. ज्यांनी तो केला ते उदार दूरदृष्टी पुरुष म्हणून प्रसिद्ध झाले. इतका लांबचा पल्ला गाठता आला नाही तरी आपल्या भोवतालच्या समाजाकडे व्यापक दृष्टीने पाहायचा प्रयत्न करा. त्यातील विविधताही पाहा आणि एकताही पाहा. आपण त्या समाजात आणि तो आपल्या जीवनाचा भाग या आपलेपणाने पाहा.

तसेच तुमच्या स्मृतीत असलेल्या कालाचा विचार करा. त्याच्याही मागली माहिती इतिहास देईल ती मिळवा, आणि तशीच कल्पनेची दृष्टी भावी काळावर वळवा. म्हणजे जीवनातील संक्रमणाचे चित्र तुमच्या दृष्टीपुढे उभे राहील. मागचा आणि उद्याचा काळ अखंड आहे. त्यात सतत जन्म-जीवन-मृत्यू यांचे चक्र फिरत आहे. ते चक्र व्यक्ती, कल्पना, विचार, समाज, राजकारण या सर्वांच्याच मागे लागले आहे असे दिसेल. माणसे आणि श्रद्धा यांत सतत संक्रमण होत आहे ते कळेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

हीच दिव्य दृष्टी. हीच विशाल, व्यापक दृष्टी. काळाच्या उदरात डोकावणारी दृष्टी. पृथ्वी आणि सूर्य-मंडळ भेदून अनंत अनंत विश्वे पाहणारी दृष्टी. हिचा तत्त्वज्ञानात उपयोग आहे, विज्ञानातही आहे आणि रोजच्या जीवनात तर आहेच आहे.

[ १९-७-१९६६

## ८२. योगायोगांचा वाहता प्रवाह

**आपल्या** जीवनाचे सिंहावलोकन करा. आपल्याला जे थोडेफार यश आले आहे त्याला काही अंशी योगायोग आणि काही अंशी तुमचा प्रयत्न या दोन गोष्टी कारणीभूत आहेत. योग्य वेळी योग्य माणूस भेटणे, योग्य गुरु मिळणे, योग्य मार्गदर्शन होणे, योग्य शिक्षा होणे, योग्य पुस्तक किंवा विचार हातात पडणे, नेमकी जाहिरात किंवा माहिती मिळणे, एक ना दोन, अनेक गोष्टींमुळे यश मिळालेले असते. त्या योग्य गोष्टींचा तुम्ही उपयोग करून घेतला म्हणून योगायोगाचा उपयोग झाला हेही महत्त्वाचे आहे.

योगायोगांचा प्रवाह अखंड वाहाता आहे. ते ओळखण्याची दृष्टी पाहिजे. सावधानता पाहिजे. शक्याशक्यता अजमावण्याची कल्पनाशक्ती पाहिजे. भावी काळाचे चित्र उभे करण्याची प्रतिभा हवी. योग्य संधी मिळण्याचा योग सतत येत असतो. त्याचा उपयोग करून घेण्याची तत्परता दाखवणे आपल्या हातात आहे.

योगायोग प्रारंभावरून ठरत नाही. तो परिणामावरून ठरत असतो. येणाऱ्या प्रत्येक घटनेच्या पोटात यशापयशाची शक्यता असते. काही योगायोग वाया जातात, काही फलदायी होतात. परीक्षेतही १०० पैकी १०० गुण कोणाला मिळतात ? ६० पेक्षा अधिक पडले तरी पहिला वर्ग मिळतोच ! तसेच योगा-योगांचे व संधीचे आहे. शेकडा ४०-५० वाया गेल्या तरी तुम्हाला दुसरा वर्ग मिळायला अडचण नाही.

हाती आलेले एखादे पुस्तक, एखादा विचार, सहज भेटणारी एखादी व्यक्ती, अचानक स्फुरलेली एखादी कल्पना, दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची एखादी संधी, भाषण-लेखन-संवादाच्या रूपाने आपली बुद्धिमत्ता दाखवण्याचा एखादा प्रसंग, अंगावर सहज पडलेले एखादे जबाबदारीचे काम, मानापमानाचा एखादा प्रसंग, अशा कितीतरी गोष्टींचा बुरखा घेऊन संधी आणि योगायोग येत असतात. बुरख्याच्या आड सुरूपता असेल, कुरूपताही असेल ! अनेक स्थळे पाहावीत तेव्हा एखादा जन्माचा साथी मिळतो. तसेच योगायोगांचे आहे. सर्वांची शक्यता

अजमावयाची असते. काही फलदायी होतील. काही वाया जातील. जागरूक राहण्याची सवय ठेवणे आपल्या हातात आहे. एखाद-दुसऱ्या संधीचा उपयोग होतो आणि नंतर आपण म्हणतो—योगायोग. परिणामावरून, प्रारंभी नव्हे.

संधी आणि योगायोग यांचा अखंड प्रवाह चालूच आहे. काही जण पाण्यात असून कोरडे राहातात किंवा तळाशी जातात. काही जण त्याच्या पृष्ठभागावर हात मारून पैलतीराला जातात.

भवितव्यानां द्वाराणि भवन्ति सर्वत्र । शाकुंतल

भाग्याची दारे सर्वत्र आहेत. गती आणि प्रगती करणाऱ्या प्रत्येकाच्या मार्गात ती लागतात.

[१५-८-१९६६

# ८३. सात पिढ्यांचे सात सूर

**सा रे ग म,** प ध नी सा. षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद–सात स्वर. कधी कोमल, कधी तीव्र; कधी मंद्र सप्तकात, कधी तार सप्तकात. या स्वरांतून संगीत निर्माण होते. नादब्रह्माची प्राप्ती होते. कारण ते सूर एकमेकांना संभाळून वागतात. वादी-संवादी, वर्ज्यावर्ज्य, तीव्र-कोमल, मंद्र-तार, केव्हा कोठे यायचे ते जाणून आपापल्या जागी बसतात. त्यांना वागवणारा कलावंत त्यांचे स्वभाव ओळखून त्यांचा उपयोग करतो.

आपल्या खाजगी आणि सामाजिक जीवनातही या सात स्वरांचा खेळ चाललेला असतो. आपल्या प्रत्येकाच्या हयातीत सात पिढ्या व्यवहार करीत असतात. या सात पिढ्यांच्या सात सुरांतून जीवनातील संगीत निर्माण होते. १ ते १० वयापासून ६०-७० च्या वयापर्यंतची माणसे म्हणजे प्रत्येक दशवर्षातील एकेक पिढी आहे. बाल वय १ ते १०, कुमार वय १० ते २०, या अगदी संस्कारमय वयातील दोन पिढ्या. यानंतर क्रमाक्रमाने विशीतील, तिशीतील, चाळीशीतील, पन्नाशीतील आणि साठ-सत्तरीच्या पुढची अशा या सात पिढ्या. त्या प्रत्येक कुटुंबात, संस्थेत, कचेरीत, कारखान्यात, राजकारणात, सभेत, सार्वजनिक कामात—प्रत्येक ठिकाणी असतात. प्रत्येकाला खालच्या व वरच्या पिढ्यांशी वागावे लागते. कधी जमते, कधी जमत नाही. का जमते आणि का जमत नाही ?

प्रत्येक पिढीच्या मनाचा, भावनांचा, बुद्धीचा, संस्कारांचा आणि आचारांचा, पिंड, त्या त्या पिढीच्या पहिल्या वीस पंचवीस वर्षांत घडतो. प्रत्येक पिढीच्या या

वयात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आर्थिक, कौटुंबिक आणि जागतिक परिस्थिती निरनिराळी असते. कधी सामाजिक चळवळी, कधी राजकीय क्रान्त्या, कधी शैक्षणिक क्षेत्रातील बदलत्या कल्पना, कधी आर्थिक सुबत्ता किंवा मंदी, कधी जागतिक शांतता किंवा महायुद्ध, कधी दारिद्र्य किंवा श्रीमंती, अशा गोष्टी प्रत्येक पिढीने आपल्या संस्कारक्षम वयात पाहिलेल्या असतात. त्यामुळे त्यांच्या आचारविचारांची दिशा बनते. म्हणून प्रत्येक पिढीचा सूर निरनिराळा असतो. कधी कोमल अथवा तीव्र; कधी मंद्र तर कधी तार सप्तकात; कधी वादी अथवा संवादी.

जगात माणसाशी वागताना एखाद्याचा सूर तुमच्या सुराशी जुळत नसेल तर निराश होऊ नका. त्या माणसाच्या संस्कारक्षम वयातील काळाचा, त्याच्या पहिल्या वीस पंचवीस वयातील परिस्थितीचा विचार करा, म्हणजे तो तसा का आहे ते तुम्हाला समजेल. मग कसे वागावयाचे ते ठरवा. यंत्राशी काम करतानाही त्याची सर्व माहिती आधी घ्यावी लागते. तसेच माणसाचे नाही का ?

आणि स्वत:विषयी काय ? तुमच्या मनाचा पिंड कसा बनला आहे ? तुमच्या संस्कारक्षम वयात काय परिस्थिती होती आणि तिच्यामुळे तुम्ही कसे बनलात याचाही सवडीने विचार करा. तुमचा सूर कोमल आहे का तीव्र ? मंद्र किंवा मध्य सप्तकात आहे का तार सप्तकात ? त्याला अनुसरूनच इतरांचेही सूर लागतील हे लक्षात ठेवा.

माणसामाणसातील ही विविधता पाहून धोरणाने वागा म्हणजे तुम्ही सुखी व्हाल; त्यांनाही सुख लागेल.

[ १८-९-१९६६

## ८४. उलट्या काळजाची अवलाद

'**उलटे काळीज**' हा शरीरशास्त्राचा किंवा वैद्यक शाखेतला विषय नाही. तो एक सामाजिक आणि नैतिक शास्त्राचा भाग आहे. तो तज्ज्ञांच्या क्षेत्रातील विषय नसून प्रत्येक शहाण्या, विचारी माणसाच्या रोजच्या व्यवहाराशी संबद्ध असलेला विषय आहे. ही उलट्या काळजाची माणसे वाटेल ते करायला तयार असतात. न्याय, नीती, माणूसकी, दया, सत्य, धर्म इत्यादी गोष्टी हे कोळून पितात. त्यांना कशाचा विधिनिषेध नसतो. त्यांना नियम, कायदे, सद्बुद्धी या माणूसकीच्या उपाधी बंधनकारक नसतात. त्या चौकटीत हे लोक बसतच नाहीत.

उलटया काळजाची पैदास सर्वत्र सर्वकाळी होते. हे लोक शहरात आहेत, खेडयात आहेत. सुशिक्षितांत आहेत, अशिक्षितांत आहेत. व्यापार, वकिली, वैद्यकी, नोकरी, शिक्षण, राजकारण, बेकारी आणि चोरी अशा सर्व प्रतिष्ठित आणि अप्रतिष्ठित व्यवसायात थोडयाफार प्रमाणात ते असतातच. हा त्या त्या व्यवसायाचा गुण-दुर्गुण नसून, त्या माणसांचा गुण-दुर्गुण त्या त्या व्यवसायांना लागतो. महाभारतकाळात हे लोक होते, ऐतिहासिक काळातही होते आणि आजही आहेत. धान्याचे पीक जसे हंगामाप्रमाणे कमीजास्त होते तसे याही पैदाशीचे आहे. समाजाच्या नैतिक वातावरणाप्रमाणे ही पैदास कधी विपुल, कधी मर्यादित असते. आजचे वातावरण तिला विशेष अनुकूल आहे.

यांच्या कृतींना अंत नाही. माणसांचे खून म्हणजे यांच्या हातचा मळ. ते स्वतः करतील किंवा घडवून आणतील. 'कोल्ड ब्लडेड मर्डर' म्हणतात ते यांच्या हाती असतात. बलात्कार करणारा दुसरा एक वर्ग आहे. यातही प्रतिष्ठित व अप्रतिष्ठित असे प्रकार आहेत. त्यामुळे सर्व बलात्कार बाहेर येत नाहीत. कायदा सुधारून या लोकांना षंढ करण्याची शिक्षा दिली तरच हे वठणीवर येतील. माणसांचे रक्त आणि पित्त हळूहळू शोषण करून त्यांना न कळत मारणारांचा आणखी एक प्रच्छन्न वर्ग आहे. अन्न आणि औषधे हे यांचे मुख्य कार्यक्षेत्र ! आणखीही वर्ग आहेत. आपल्या गाडयांना घातपात करून अनेक लोकांना ठार मारणारे आणि जन्माचे अधू करणारे लोक याच वर्गातले. वर्तमानपत्रे वाचा म्हणजे कळेल.

हे सर्व उपद्व्याप कशाकरता, आहे ठाऊक? सत्ता, संपत्ती आणि स्त्री या गोष्टी कमी श्रमात, कमी वेळात आणि कमी--काय बरे मी म्हणणार होतो ? कमी बुद्धी वापरून. पण तसे नाही. असामान्य बुद्धी वापरून हे लोक आपले व्यवसाय करतात. सत्ता, संपत्ती, विषयसुख या गोष्टी तुम्ही आम्ही मिळवू इच्छितो. पण आपण न्याय, नीती, कायदा, सत्य, माणूसकी यांची बंधने पाळून या गोष्टी मिळवतो. उलटया काळजाच्या लोकांना ही बंधने नाहीत हाच मुख्य फरक आहे.

यावर उपाय नाही काय ? आहे. माणूसकी व न्याय धाब्यावर बसवून सत्ता संपत्ती मिळवता येते, टिकविता येते, असे जोपर्यंत समाजात वातावरण आहे तोपर्यंत ही पैदास वाढणार. या अवलादीची चलती राहाणार. पण व्यक्ती, समाज, सरकार आणि सरकारविरोधी पक्ष या सर्वांचाच अशा अन्यायाच्या हिंसात्मक, लबाडीच्या मार्गांना सतत प्रतिकार झाला तर ही अवलाद कमी होईल. संपुष्टात येणार नाही. हिचे बीज सतत अस्तित्वात असते. समाजात त्याला प्रतिकूल असे वातावरण निर्माण झाले पाहिजे. आणि वातावरण निर्माण

करणारे तुम्ही आम्ही, तो शेजारचा, त्याच्या पलीकडचा, त्याच्या शेजारचा--असे सर्व जण आहोत. या अवलादीचा बीमोड आपणच करू शकू.

[ १९-१०-१९६६

## ८७. निदान इतके करता येईल

**आज** सकाळीच एक गृहस्थ भेटावयास आले. माझ्याकडे माणसे दोन कारणांकरता येतात. एक--संस्थेला देणगी द्यायला, दुसरे--त्यांचेच काही काम करवून घ्यायला. आज हे गृहस्थ तिसऱ्याच कारणाकरता आले होते. त्यांच्या मुलाच्या विवाहानिमित्त मी "सदाचार-चिंतनी" पुस्तक भेट दिले होते. ते मुलाने-सुनेने वाचायच्या आधी यांनीच वाचले. "त्या पुस्तकातील विचार मला आवडले. अगदी माझ्या मनातले विचार आहेत. आता भेटीदाखल वस्तू द्यायचा प्रसंग येईल तेव्हा हीच पुस्तके देणार आहे." असे सांगून निघाले. मीही खूष झालो ! जाताना त्यांना "गीतेतील मुख्य विचार" आणि "शिक्षण, शील व संस्कार" ही पुस्तके वाचायला दिली.

आश्रमात जायला घरातून बाहेर पडतो तो दाराशीच एक भगिनी भेटल्या. बोलावे की नाही असा क्षणभर विचार करून त्या मग धीर करून म्हणाल्या "तुमच्या पुस्तकातील विचार मला फार फार आवडले म्हणून लिहिणार होते. पत्र लिहिण्यापेक्षा समक्षच बोललेले बरे. आता समारंभात वगैरे याच पुस्तकांचा उपयोग करणार आहे."

एकदा "विद्यार्थी आरोग्य" या विषयावर एक परिसंवाद होता. तो झाल्यावर एक गृहस्थ माझ्याजवळ येऊन म्हणाले, "तुमच्याशी जरा बोलू का ? ओळख नाही म्हणून संकोच वाटतो. तुमच्या, "गीतेतील मुख्य विचार" या पुस्तकातला एक विचार मी रोज वाचतो. फार समाधान वाटते. मला संस्कृत येत नाही. पण तुमचे पुस्तक समजते !!" मी त्यांना म्हणालो, "आता या गीतेचा प्रसार करणे तुमच्याच हातात आहे."

नाशिकचे एक डॉक्टर समाचारमधला विचार फलकावर लिहून सार्वजनिक ठिकाणी ठेवतात. एका माजी विद्यार्थ्याने सरकारी नोकरांचा एक प्रशिक्षण वर्ग सदाचार चिंतनीच्या आधारे चालवला. एका ट्रेनिंग कॉलेजच्या प्रिन्सिपॉलने "गीतेतील मुख्य विचार" वर ज्ञानेश्वरी मंडळात प्रवचन दिले, त्या वेळेपासून त्यांना लोक अती मान देऊ लागले. एका कॉलेजातील प्राचार्य रोज एक विचार

प्रार्थनेच्या वेळी वाचवून घेतात. एक हायस्कूल 'चिंतनी' व 'गीता' या दोन पुस्तकांच्या आधारे प्रश्न काढून मुलांच्या परीक्षा घेते व बक्षिसे देते. एक गृहस्थ या विचारांच्या आधारे शाळेत भाषणे करतात व निबंधस्पर्धा घेऊन बक्षिसे देतात. एकदोन मित्रांनी आपल्या मुलांच्या साहाय्याने घरीच "संस्कार वाचनालय व ग्रंथालय" काढले असून ते शेजारच्या कुटुंबियांना संस्कारप्रधान विचारांची पुस्तके वाचायला देतात. त्यांतले पहिले पुस्तक 'चिंतनी' असते. काही माजी विद्यार्थी समाचार आल्याबरोबर ऑफिसमधल्या सगळ्या मंडळीत तो वाचनाकरता फिरवतात.

"समाज बिघडत चालला आहे" असे म्हणून बोटे मोडीत बसण्यापेक्षा ही मंडळी आपापल्यापरी विधायक कामे करीत आहेत. राजकीय सत्ता आपल्या हातात नाही, पण विचारांचा प्रसार करायची सत्ता आहे. स्वातंत्र्य आहे, साधने आहेत, साहित्य आहे. योजकस्तत्र दुर्लभः !

निदान एवढे करील त्यालाच इतरांवर टीका करायचा अधिकार आहे. निष्क्रिय टीकेने निराशेत भर घालू नका. सक्रिय आचाराने आपल्या शेजाऱ्यापासून सुधारणेला प्रारंभ करा.

[१४-११-१९६६

# ८६. नवे द्रष्टे व लेखक पाहिजेत

**देशाला** स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशाचा सर्व कारभार, आर्थिक व्यवहार आणि उद्योगधंदे भारतीयांच्या हातात आलेले आहेत. या प्रक्रियेमुळे पूर्वी ज्यांच्या हातात संपत्ती व पैसा नव्हता त्यांना तो सहजपणे मिळून एक नवीन धनवान वर्ग निर्माण होत आहे. फार श्रम न करता पैसे मिळविण्याच्या सोयी अनेकांना उपलब्ध झालेल्या आहेत.

या पैशाचे काय करावे असा प्रश्न या नवीन धनिकांच्या पुढे आहे. त्यांचा हा प्रश्न सोडविण्याकरता समाजात दुसरा नवीन वर्ग निर्माण झालेला आहे. या वर्गात सिनेमाचे निर्माते व कलावंत, चैनीच्या वस्तू निर्माण करणारे कारखानदार, अशा वस्तूंची जाहिरात करणारे प्रतिभावान लेखक, उत्तान विषयावरची मासिके व वाङ्मय काढणारे लेखक, प्रकाशक व चित्रकार, असे सर्व लोक या वर्गात येतात. ज्यांच्या हातात पैसा आहे अशा लोकांच्या सुखोपभोगाच्या, चैनीच्या आणि कामविषयाच्या भावना प्रदीप्त करण्याला सतत इंधन पुरवीत राहाणे आणि त्या मार्गाने पैसेवाल्यांच्या खिशातला पैसा आपल्या खिशात आणणे हे या नवीन

वर्गाचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या ठिकाणी ध्येयवाद आहे पण तो केवळ नैयक्तिक स्वार्थाचा आणि धनसंचयाचा !

भारतीय संस्कृती, विचार आणि मूल्ये या सर्व गोष्टी त्यांच्या फायद्यापुढे त्यांना क्षुद्र वाटतात. आपल्या कृतीने आपण समाजातील उदात्त गोष्टींना धुळीला मिळवीत आहोत याची त्यांना फिकीर नाही.

या दोन्ही वर्गांना जो पैसा मिळतो त्याचा उपयोग पाश्चिमात्य पद्धतीचे पोषाख, राहाणी, करमणुकी आणि विलास यांचा उपभोग घेण्यात आणि आपल्या कलेच्या द्वारे त्याचे प्रदर्शन करण्यात त्यांना धन्यता वाटते. या लोकांनी भारतीय जीवनाला हानिकारक असे नवीन वातावरण निर्माण केले. कलेवर विचारवंतांचे आणि शासनाचें नियंत्रण नसले म्हणजे ती समाजाच्या अभिरुचीला कसे विकृत वळण लावू शकते त्याचे चित्र आज या देशात पाहावयाला सापडते.

सांस्कृतिक जीवनाला गौणपणा आणण्याच्या दृष्टीने तिसऱ्या एका विचार-प्रवाहाचा परिणाम होत आहे. गेल्या वीस-बावीस वर्षांत विज्ञानाचा विकास अतिशय शीघ्र वेगाने झाला आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपले भारतीयांचे बाह्य जीवन बदललेले आहे; परंतु हे जीवन बदलणारी दृष्टी आणि मनोवृत्ती आपण आत्मसात केलेली नाही. प्रयोगाची प्रवृत्ती आणि त्या प्रवृत्तीवर आधारलेले बुद्धिनिष्ठ आणि विचारप्रधान असे फेरबदल आपल्या मनोवृत्तीत झालेले नाहीत. यामुळे पाश्चिमात्य बाह्य जीवनाचे अनुकरण म्हणजे विज्ञानाची प्रगती अशी आपल्या लोकांची चुकीची समजूत झालेली आहे.

त्याचा परिणाम असा झालेला आहे की, परिस्थितीचा व परंपरेचा विचार न करता परकीयांच्या बाह्य जीवनाचे उथळ अनुकरण आज समाजात होत आहे. ज्यांच्या हातात फार कष्ट न करता मिळविलेला पैसा खेळत आहे असा नवा धनिक वर्ग पाश्चिमात्य जीवनाच्या अंधानुकरणाचे धडे सर्वसामान्य समाजास देत आहे. आमच्या मासिकात येणाऱ्या जाहिराती, चित्रपटात व नाटकात प्रेक्षकांच्यापुढे ठेवलेले पोषाखांचे व रीतीरिवाजाचे धडे, आमच्या उत्तान साहित्यात वाचकांच्या पुढे लेखकांनी ठेवलेले आचारांचे आदर्श, या सर्व गोष्टी निर्बंद्ध व सवंग अनुकरणामुळे निर्माण झालेल्या आहेत.

भारतीय संस्कृतीचाही विकास ज्ञान-विज्ञानाच्या समन्वयामुळे झालेला आहे. तो तसाच चालू राहिला पाहिजे. त्याकरिता खरोखरीची वैज्ञानिक आणि प्रायोगिक निष्ठा समाजात अवश्य दृढमूल व्हावयास पाहिजे.

भारतीय संस्कृतीच्या अभिमानी लोकांनीही आपल्या विचारमांडणीची पद्धती बदलावयास पाहिजे. आजचा तरुण वाचक हा बुद्धिनिष्ठ आणि विज्ञानप्रधान

अशा शिक्षणातून बाहेर पडणारा आहे. आधुनिक समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानव-वंशशास्त्र, ऐतिहासिक संशोधन, अशा प्रकारची नवीन नवीन शास्त्रे अस्तित्वात आली आहेत. त्यांच्या ज्ञानाचा प्रकाशझोत भारतीय संस्कृतीवर टाकून तिची छाननी केली पाहिजे. तिच्यातील तत्कालीन आणि चिरकालीन, प्रादेशिक आणि व्यापक अशा विभागांचे पृथक्करण केले पाहिजे. यापुढे भारतीय संस्कृतीवर लिहिणाऱ्या व विचार करणाऱ्या मंडळींना जगात वाढलेल्या शास्त्रांची माहिती पाहिजे. भारतीय संस्कृतीविषयी पाश्चिमात्य विचारवंतांच्या मनात अद्याप फार मोठा आदर आहे. तो टिकवून आपल्या विचारांची भर जगातील विचारांत घालावयाची असेल तर अभ्यासू असे नवे द्रष्टे व लेखक निर्माण झाले पाहिजेत.

[ १४–१–१९६७

# ८७. चिकित्सक वृत्ती वाढवाच

**बोलण्याची** कला निघाली तेव्हा मानवाला अतिशत आश्चर्य वाटले. एक अलौकिक कला संपादन केल्याची त्याला जाणीव झाली. ही शक्ती म्हणजे एक दैवतच आहे असे त्याला वाटले. 'सरस्वती', 'शारदा' अशी नावे देऊन या कलेच्या ठिकाणी त्याने दैवत्व मानले.

भाषणाची कला निघाल्यानंतर कित्येक शतकांनी लेखनाची कला निर्माण झाली. तिच्यामुळे मानवाला अधिकच आश्चर्य वाटले. स्थल आणि काल यांना न जुमानता विचार–संक्रमण करणाऱ्या या कलेविषयी मानवाला पावित्र्य वाटले. ग्रंथांची पूजा होऊ लागली. ग्रंथवाचन हे पवित्र कार्य मानले गेले.

भाषण आणि ग्रंथ यांविषयी वाटणारे पावित्र्य आणि श्रद्धा अद्यापही फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहेत; पण त्यांना ओहोटी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण त्यांचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग होऊ लागला आहे.

वाणीचा आणि लेखनाचा उपयोग इतरांना मार्गदर्शन करणे हा होता. त्याऐवजी लोकांची फसवणूक करण्याकडे या कलांचा उपयोग होऊ लागला आहे. सत्याचा प्रसार करण्याऐवजी सत्याचा अपलाप करण्याच्या कामी त्यांचा उपयोग होत आहे. लोकांना वस्तुस्तिती सांगण्याऐवजी अतिशयोक्ती करण्याच्या कामी वाणीचा आणि लेखनाचा उपयोग होत आहे.

आजच्या लोकशाहीच्या युगात कोठल्याही प्रकारच्या निवडणुका आल्या म्हणजे त्या वेळी निघणारे जाहीरनामे आणि होणारी भाषणे पाहिली म्हणजे वर

सांगितलेले तत्त्व लगेच लक्षात येईल. कोठलेही प्रचारकी वाङ्मय वरील तत्त्वाची साक्ष देईल. वर्तमानपत्रातील व रेडिओवरील जाहिराती या देखील वरील तत्त्वाचे उत्तम उदाहरण आहे.

भाषण आणि लेखन यांना सत्य आणि पवित्र म्हणून त्यांच्यावर अंधश्रद्धा ठेवण्याचा काळ गेला. चिकित्सक वृत्तीने वाचण्याचा आणि ऐकण्याचा काळ आला आहे. प्रत्येक क्षणाला आपण जे ऐकतो आणि वाचतो त्यात खरे किती आणि खोटे किती, हितकर काय आणि हानिकारक काय, वास्तविक किती आणि अतिशयोक्ती किती—अशा चिकित्सा–वृत्तीचे युग आता आले आहे. आता बावळट आणि अंधश्रद्ध राहून चालणार नाही.

पूर्वीच्या पिढ्यांपेक्षा आजच्या पिढीतील लोकांना ऐकायला आणि वाचायला खूप मिळते. हे प्रमाण आणखीही वाढणार आहे. त्याचा अर्थ असा की सत्याबरोबर असत्य, मार्गदर्शनाबरोबर फसवणूक, आणि वस्तुस्थितीबरोबर अतिशयोक्ती यांचेही प्रमाण वाढणार आहे.

अशा परिस्थितीत आपली चिकित्सक वृत्ती जागृत पाहिजे. अंधश्रद्धा आणि बावळटपणा यांचा बुद्धिपुरस्सर त्याग केला पाहिजे. पूर्वीच्या ग्रंथांतून प्रत्येक लेखक आपल्या ग्रंथाच्या श्रवणाची व पठणाची फलश्रुती लिहीत असे, " हा ग्रंथ वाचणाराला पुत्रपौत्र, धनधान्य, संपत्ती, दीर्घायुष्य, आरोग्य, मोक्ष इ. मिळेल." अशा फलश्रुतींतही पुष्कळच अतिशयोक्ती असे !

हा लेख वाचणारा आणि त्याप्रमाणे वागणारा व्यवहारात फसवला जाणार नाही, अशी या लेखाची फलश्रुती आहे. तिच्यात मात्र अतिशयोक्ती नाही हं !

[ १६–२–१९६७

# ८८. अक्षर-लेखनाची कसोटी

**सुबोध,** सबोध आणि सुरस हे तीन शब्द लक्षात ठेवा.

एक क्षणभर डोळे मिटून स्वस्थ बसा. तुम्ही वाचलेले लेख आणि ग्रंथ आठवण्याचा प्रयत्न करा. त्यांतले कोणते विशेष आवडले आणि लक्षात राहिले त्यांची निवड करण्याचा प्रयत्न करा. कोणते लेख किंवा ग्रंथ तुमच्या डोळ्यांसमोर येतात ? अशी आठवण करताना अगदी बालपणी वाचलेल्या शालेय व इतर पुस्तकांचाही परामर्श घ्या. ज्या लेखनाचा ठसा तुमच्या मनावर कायमचा उठला आहे ते तुमच्या जीवनाचा एक भागच झालेले आहेत. तुमच्या मनाचा, बुद्धीच

आणि भावनांचा पिंड त्यांनी बनविलेला आहे. तुमच्या जीवनाच्या दृष्टीने त्या लेखांना मरण नाही. हेच अक्षर लेखन होय. ते अविनाशी आहे.

आता अशा लेखनाचे लक्षण काय आहे त्याचा थोडासा विचार करा. हेच लेख लक्षात का राहिले आणि बाकीचे का विसरले गेले ? तुमच्या दृष्टीने त्यांच्या लक्षणांची चिकित्सा करा. एवढी गोष्ट खरी की ते लेखन तुम्हाला समजले, तुम्हाला आवडलेही आणि विशेष म्हणजे तुमच्या जीवनाला त्यांनी काही तरी मार्गदर्शन केले. ते लेखन सुबोध होते, सबोधही होते आणि सुरस तर होतेच होते.

तुम्हाला लेखन करायचे झाले तर याच गोष्टी लक्षात ठेवा.

तुमचे लेखन सुबोध असले पाहिजे. त्याचे सहज आकलन झाले पाहिजे. त्याने मनोरंजन झाले पाहिजे आणि ते थोड्या वेळात वाचून होईल अशी त्याची रचना पाहिजे. आजच्या जीवन-कलहात माणसाला वेळ आहे थोडा. त्या थोड्या वेळात सहज वाचून होईल असे उत्कृष्ट वाङ्मय त्याला पाहिजे.

ते लेखन सबोधही पाहिजे. वाचकांच्या जीवनाला उपयोगी पडेल असे काहीतरी तत्त्व किंवा तात्पर्य त्याने दिले पाहिजे. कोणताही व्यवहार झाला की मनुष्य विचार करतो की यातून टिकाऊ स्वरूपाचे असे माझ्या पदरात काय पडले ? असे टिकाऊ विचार तुमच्या लेखनात असल्याखेरीज त्याला अक्षरता नाही. ती नुसतीच अक्षरे होतील. रेल्वेच्या टाईम टेबलमध्येही अक्षरे असतात, पण ती सहा महिन्यांनी निकामी होतात. वाङ्मयात बोध, तात्पर्य किंवा मार्गदर्शन असावे की नाही असा वाद फक्त साहित्यिकच करतात. आपल्यासारख्या सामान्य वाचकांपुढे तो प्रश्न नसतो. आपल्याला बोधही पाहिजे आणि कलाही पाहिजे

म्हणूनच सरसता हे चांगल्या लेखाचे लक्षण ठरते. ते आकर्षक आणि मनोरंजक पाहिजे. आता आकर्षक म्हणजे विनोदी आणि हलके फुलके असाच काही अर्थ नव्हे. माणसाच्या जीवनाला स्पर्श करणारे जे जे लेखन असते ते ते त्याला मनोरंजक वाटते. रुक्ष तत्त्वज्ञान आणि इतिहास अशा विषयांवरील लेखनही ललित वाङ्मयाइतकेच मनोरंजक असू शकते. माणसाच्या जीवनाचे व विचारांचे उत्कट प्रश्न ज्यात प्रतिबिंबित झालेले असतात ते लेखन उत्कृष्ट ठरते.

म्हणून लेखन करा, अवश्य करा. आणि ते सुबोध, सबोध आणि सुरस असे असू द्या. मग सबंध आयुष्यात तुम्ही एकच लेख, एकच गोष्ट, एकच कविता किंवा एकच ग्रंथ लिहिला तरी पुरे. तेच लेखन अक्षर राहील.

[२०-३-१९६७

# ८९. आपली माणसे—त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारा

**जगात** सर्वगुणसंपन्न असा कोण आहे ? अवतार म्हणून ज्यांना आपण मानतो असे श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्यामध्येही दोष होते. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारखी जागतिक कीर्तीची माणसेही सर्वस्वी निर्दोष नव्हती. प्रत्येक माणसात काही गुण, काही दोष असतात. गुणांचे आणि दोषांचे प्रमाण कमी अधिक असते एवढाच फरक.

गुणांच्या दृष्टीने सर्वस्वी परिपूर्ण अशी माणसे पाहाणारांची निराशाच होईल. आणि तसेच प्रत्येकाचे थोडयाफार प्रमाणात होते. आपल्या कुटुंबाचाच विचार करा. जन्म देणारे आई-बाप, सख्खे बहीण-भाऊ, संसारातील भागीदार आणि कुटुंबातील इतर माणसे—ही गुणांच्या दृष्टीने परिपूर्ण असावीत असे आपल्याला वाटते. आपण तशी अपेक्षा करतो आणि निराश होतो.

आता कुटुंबाबाहेरची माणसे पाहा. आपले लांबचे नातेवाईक, मित्रमंडळी, शेजारीपाजारी, व्यवसायातील सहकारी, ज्येष्ठ किंवा कनिष्ठ व्यक्ती, मालक आणि नोकर आणि अशाच तऱ्हेने नेहमी निकट संबंध येणारी माणसे. यांच्यातही कोणीच परिपूर्ण नसतो. प्रत्येकात काही गुण आहेत, काही दोष आहेत.

आता तुमच्या स्वतःकडे पाहा. " माझ्यात काय गुणदोष आहेत ? " असे स्वतःला विचारा; आत्मनिरीक्षण करा; जवळच्या माणसांना विचारा. आपण आपल्यापासून निराळेच आहोत अशा दृष्टीने आरशात पाहा. तुम्हाला लवकर कळेल की आपल्यातही पुष्कळ गुणदोष आहेत. आपली पूर्वी कल्पना होती तितके गुणसंपन्न किंवा निर्दोष आपण स्वतः नाही.

अशा स्थितीत माणसाने काय करावे ? घराचा त्याग करता येत नाही किंवा समाजाचा त्याग करून हिमालयात जाऊन राहता येत नाही. आपले जग जसे आहे तसेच ते स्वीकारले पाहिजे. आपल्या माणसांचा त्यांच्या गुणदोषांसह स्वीकार करा. त्यातच खरी आपुलकी आणि खरे प्रेम आहे. उलटपक्षी तुमच्या गुणदोषांसह तुमचा स्वीकार करावा असे तुमच्या जवळच्या माणसांना तुम्ही सांगा, त्यामुळे परस्परांविषयी गैरवाजवी अपेक्षा राहाणार नाहीत. गुणदोषांची जाणीव ठेवून, डोळे उघडे ठेवून, क्षमाशील आणि उदार वृत्तीने वागा. गुणांचा गौरव करा, दोषांकडे डोळेझाक करा.

प्रत्येक मनुष्य उत्क्रांतीच्या एका पातळीवर जन्म घेतो आणि तेथून पुढे प्रगती करीत राहतो. कोणी जन्मतःच शांत स्वभावाचे, क्षमाशील, विवेकसंपन्न,

प्रेमळ, कष्टाळू, सहानुभूतिपूर्ण, परोपकारी वृत्तीचे असे असतात. त्याच्या उलट काही लोक जन्मत:च शीघ्रकोपी, संतापी, अविवेकी, सहानुभूतिशून्य, रुक्ष भावनेचे, सुखलोलुप, स्वार्थी असे जगात येतात. बहुसंख्य लोक या दोन्ही टोकांच्या मधल्या अवस्थेत कोठेतरी असतात.

मानवाचे अंतिम ध्येय शांती, दया, क्षमा, सहानुभूती, आत्मसंयम, प्रेम, उद्योगशीलता, विवेक, नि:स्वार्थता अशा गुणांचा विकास करून परिपूर्ण होणे हे आहे. त्या ध्येयाकडे वाटचाल करायचा तुम्ही स्वत: प्रयत्न करा आणि आपल्या माणसांना त्या वाटेवर, प्रवासात साहाय्य करा. आपल्या माणसांना, त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारून, तुम्ही उभयता परिपूर्ण आणि निर्दोष होण्याचा प्रयत्न करा.

[१९-४-१९६७

## ९०. माणूस पाहून काम द्या

**अयोग्यः** पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः । अपात्रता काम करणाऱ्या माणसात नसते. योग्यायोग्यता पाहून योग्य काम सांगणारा कुशल योजक पाहिजे. असे योजक फार थोडे.

इतिहासकालीन एका गोष्ट आहे. दुपारची शांत वेळ होती. निर्जन अशा देवळात एका सरदाराची पत्नी देवाला प्रदक्षिणा घालीत होती. तिला एका आडदांड माणसाने अडविले. बाईही तेजस्वी होती. नुसत्या डोळ्याच्या धाकाने तिने त्या माणसाला बाजूस सारले. तिने घरी येऊन आपल्या पतीस सांगितले, "हा माणूस निधड्या छातीचा आहे. याला स्वारीवर पाठवा." हाच मनुष्य पुढे लढाईत फत्ते मिळवून आला. त्याच्या बंडखोरपणाचा लढाईत उपयोग झाला.

माणसे ओळखण्याची ही एक कला आहे. काही लोकांना ती जन्मजात असते. इतरांना प्रयत्नाने मिळवता येते. श्रेष्ठ-कनिष्ठ किंवा बरोबरीच्या चार माणसांशी घरी-दारी ज्याला वागावे लागते, अशा प्रत्येक माणसाला ही कला आवश्यक आहे. घरात, आळीत, गावात, समाजात, कारखान्यात, कचेरीत, लष्करात, संघटनेत—हरएक ठिकाणी या कलेचा उपयोग आहे. हे एक मानसशास्त्रच आहे. यशस्वी प्रमुखांच्या जीवनावरून माणसे जोखण्याच्या कलेची काही सूत्रे सांगता येतील.

मुख्य म्हणजे माणसाच्या मनाची पारख पाहिजे. त्याच्या गुणावगुणांचे मूल्यमापन करून गुणांना वाव देणारे योग्य असे काम त्या माणसाला देता आले

पाहिजे. दिलेल्या कामामुळे माणसाला त्याच्या पात्रतेच्या प्रमाणात मोठेपणा मिळून त्याच्या अहंकाराची तृप्ती झाली पाहिजे.

माणसा-माणसात फरक असतो, सगळे सारखे नसतात, हे नेहेमी लक्षात ठेवायला पाहिजे. बुद्धी, भावना व कर्तबगारी या गोष्टी माणसा-माणसात भिन्न असतात. तुलना करून माणसांना हीन लेखू नये. त्यामुळे त्यांच्यात न्यूनत्वाची सतत जाणीव राहते.

ज्याच्याशी वागायचे त्या माणसाविषयी आपुलकी दाखविली पाहिजे. त्याच्या चुका पोटात घालण्याची तयारी पाहिजे. मनाचा उदारपणा पाहिजे. सर्वच माणसे थोड्या फार प्रमाणात चुका करतात. क्षमाशीलता हे माणसाचे प्रमुख भूषण आहे. राग हा माणुसकीचा शत्रू आहे. रागाच्या पोटी कटू शब्द तोंडातून बाहेर पडतात. आणि माणसाच्या हृदयाला जखमा होतात. मोठी माणसेही चुका करतातच. ही जाणीव श्रेष्ठ-कनिष्ठ दोघांनी ठेवावी.

चार माणसे एकत्र काम करणारी असली म्हणजे एकमेकांविषयी बरे-वाईट समज व गैरसमज होणे अपरिहार्य असते. गैरसमज कधी पोटात ठेवू नयेत. ते ठेवणाराच्या पोटात दुखतच राहतात. प्रांजळपणाने बोलून व चर्चा करून त्यांचे निराकरण करणे हा एक प्रभावी इलाज आहे. कुढया मनाची माणसे न बोलता कटुतेचे संगोपन करीत बसतात. मोकळ्या मनाची माणसे आपुलकीने बोलून गैरसमज दूर करतात.

तुम्हीही केव्हा तरी, कुठे तरी प्रमुख व्हाल. नेतृत्वाच्या या गुणांचा तुम्हाला उपयोग होईल. अभ्यासाने व विचाराने ते साध्य होऊ शकेल. यशस्वी नेतृत्वाची ही गुरुकिल्ली आहे. लहान-मोठया, श्रेष्ठ-कनिष्ठ, सर्वच व्यक्तींनी ती हस्तगत करावी.

[१५-६-१९६७

# ९१. लहान भांडणे विसरायची असतात

एकदा मी मुंबईहून नाशिकला चाललो होतो. मी डब्यात बसल्यावर एक गुजराथी कुटुंब येऊन पलीकडे बसले. त्यांनी आपले जड सामान माझ्या डोक्यावरच्या नाजूक शेल्फवर ठेवले. मी सांगितले, 'तेथे ठेवू नका, डोक्यावर पडेल.' त्यावरून कुटुंबातील बाईची व माझी जरा कटू बोलाचाली झाली. अशा वातावरणात आमचा प्रवास सुरू झाला.

मी डोळे मिटून गीतेतील एकेका अध्यायाचे मनातच पठण आणि चिंतन करीत बाराव्या अध्यायापाशी येऊन भक्तियोग संपवला, अन् माझी तंद्री भंगली.

"आपण यातले काही खायला घ्या ना" त्या बाईंने माझ्यापुढे आपला फराळाचा डबा धरून मला सौजन्यपूर्वक विनंती केली.

मी—"मला पथ्य आहे, मी काही खात नाही. माफ करा."

त्या—"हे पथ्याचेच आहे. आमच्या मंडळींकरता मुद्दाम आळणी केले आहे."

मी—"पण मी नुसता दूध-फळावर आहे. आपण घ्या."

अशा रीतीने आमच्या मौनभंगाला प्रारंभ झाला. त्या बाईंनी माझ्या आजाराची चौकशी करून एका प्रसिद्ध वैद्याचे नाव व पत्ता देऊन त्यांचे औषध घ्यायचा आग्रह केला. मीही त्यांच्या साहेबांच्या आजाराविषयी माहिती विचारली. त्यांना एक दुर्धर रोग झाला होता व त्याकरता मुंबईला खेपा चालू होत्या. परस्परांच्या सुखदु:खांची आम्ही देवघेव केली, आणि गाडी सोडताना हसत हसत निरोप घेतला.

मी तत्त्वे सांगणारा लेखक. त्या व्यवहारकुशल भगिनी होत्या. "लहान-सहान भांडणे विसरायची असतात" असा उपदेश मी करीत असतो. पण त्याचे आचरण आणि उदाहरण त्या बाईंनी मला शिकविले.

आमची आजी नेहमी म्हणायची, "भांड्याला भांडे लागून आवाज व्हायचाच; म्हणून काही भांडी फोडायची नसतात. भांडी एकत्र ठेवलीच पाहिजेत." माणसांच्या स्वभावात भिन्नता आहे तोपर्यंत लहानसहान गोष्टींवरून भांडणे व्हायचीच. पण ती तेवढ्यापुरतीच ठेवून विसरायची असतात. भांडणाच्या मुद्द्यांपेक्षा आपल्या सुखदु:खांच्या समान देवघेवीच्या गोष्टी कितीतरी अधिक आहेत, नाही का ? परस्परांना पाहिजे असते सहानुभूती, प्रेम, मदत व सहकार्य. या गोष्टी दिल्याने दुप्पट होऊन सव्याज परत मिळतात. भांडणे जपणारा माणूस स्वत:च मनात झिजत राहतो. कुटुंबातील माणसे, गावातले पार्टीवाले, घरमालक-भाडेकरू, जमीनदार-कुळे, मालक-नोकर, धनको-ऋणको—अशा सर्वांनीच भांडणाचे मुद्दे बाजूला ठेवून इतर गोष्टींविषयी व इतर प्रसंगी प्रेमाने वागायला काय हरकत आहे ? विचार करा.

एकदा माझ्या दोन चिमुरड्या नाती इतक्या भांडल्या, इतक्या भांडल्या की त्यांनी रडून ओरडून आकाश-पाताळ एक केले; घर डोक्यावर घेतले. मला वाटले या आता दिवसभर एकमेकींच्याकडे फिरकणार नाहीत. दुसऱ्याच घटकेला दोघी जणी माझ्या गादीवर शेजारी शेजारी बसून घसरगुंडी खेळत होत्या ! परमेश्वरा, ही भांडणे विसरण्याची साधी कला आमची आम्हाला परत दे.

उगीचच आम्ही प्रौढ म्हणवतो. या लहान नाती माझ्या गुरु आहेत. भांडण उगाळीत बसणारांचे गुरु कोण आहेत ते त्यांचें त्यांनी पाहावे.

न विसरणे आणि डूग धरणे हा स्वभाव सर्पयोनीचा आहे, म्हणून बिचारी युगानुयुग सरपटत राहिली आहे. तिच्या देहाला आणि मनाला उंची आणि उदात्तता यांचा अनुभव नाही. ही ऐच्छिक देणगी मानवालाच आहे. घेईल त्याला ना !

या चातुर्मास्यात हे एक व्रत घेण्यासारखे आहे. निदान चार महिने ट्रायल द्या. गुण आल्यास पुढे चालू ठेवा.

[ १७-७-१९६७

# ९१. गीतेने बनवलेला माझा पिंड

**कुणालाही** न सांगितलेल्या काही वैयक्तिक गोष्टी मी या लेखात तुम्हाला सांगणार आहे.

माझ्या जीवनात मला जी थोडीफार सार्थकता प्राप्त झाली आहे तिला कारण गीतेचे वाचन व चिंतन आहे. गीता हा विचारांचा महासागर आहे. त्यातले एक-दोन विचारही अमलात आणले, तरी माणसाच्या जीवनात फार मोठे परिवर्तन होऊ शकते. माझ्या जीवनात परिवर्तन करणारे दोन विचार. एक म्हणजे निर्विकार वृत्ती आणि दुसरा सतत चिंतन.

निर्विकार वृत्तीला गीतेमध्ये समत्वयोग, निर्द्वंद्ववृत्ती, द्वंद्वातीतता इ. पारिभाषिक शब्द आहेत. निर्विकारता हा साधा शब्द मी उपयोगात आणतो. युद्धातील यश व अपयश दोन्ही सारखेच समजून आपले कर्तव्य कर असा अर्जुनाला उपदेश केलेला आहे. याच तत्त्वाचे व्यापक उपयोजन करून माणसाने जीवनात सुखदु:ख, मानापमान, स्तुती-निंदा, लाभ-हानी, प्रिय-अप्रिय या गोष्टी समान समजाव्यात. चांगले झाले तरी फार हुरळून जाऊ नये, वाईट झाले तरी फार दु:ख करू नये. तत्त्व लिहायला व सांगायला सोपे आहे पण आचरणात आणताना, मनाला सतत शिक्षण द्यावे लागते. जीवनातील प्रत्येक सुखदु:खाचा प्रसंग हा शिक्षणाचा अभ्यासक्रमच आहे, या जाणिवेने मी चांगल्या आणि वाईट प्रसंगांचे सारखेच स्वागत करतो.

दुसरे तत्त्व, सतत ध्यान व चिंतन करावे असे आहे. माणसाने रोज थोडा वेळ तरी आत्मचिंतन करावे असा गीतेचा उपदेश आहे. वैयक्तिक सुधारणेच्या दृष्टीने त्याचा फार उपयोग होतो. माझ्या ठिकाणी असलेले गुणदोष, मला साध्य करावयाचे गुण आणि नष्ट करावयाचे दोष यांचा विचार दिवसातून ठराविक

दोन तीन वेळा मी करतो. सकाळ संध्याकाळ प्राणायाम झाल्यानंतर, झोपण्यापूर्वी आणि जाग आल्याबरोबर, आणि ज्या ज्या वेळी मन रिकामे असेल त्या त्या वेळी मी अशा प्रकारचे चिंतन करतो. त्याचा एक फायदा झाला आहे. कोणत्याही दोषावर मात करून आपण त्याला जिंकू शकतो असा मला आत्मविश्वास आला आहे. या चिंतनाच्या अखेरीस आनंद, समाधान, शांती, निर्भयता आणि निश्चितता या प्रवृत्तींचा मी अभ्यास करतो. म्हणजे निव्वळ शब्दांचे चिंतन न करता, त्या प्रवृत्तींचा विकास करण्याची सवय करतो.

त्या त्या दिवसातील बऱ्या वाईट प्रसंगावर मात करण्याच्या दृष्टीने या चिंतनाचा फार उपयोग होतो.

वरील दोन विचारांच्या आचरणाने मी जीवनात समाधानी आहे. सर्व प्रकारच्या परिस्थितीत समाधानी राहण्याचा प्रयत्न करीन. गीतेतून मला ही दोन रत्ने सापडली; तुम्हाला दुसरी सापडतील. शोध करून पाहा.

[ २-८-१९६७

# ९३. गणेश उपासना आणि बुद्धिविकास

**आपल्या** समाजात सध्या चालू असलेली गणेशाची उपासना कशा प्रकारची आहे ही चिकित्सा करून तिच्यात थोडे परिवर्तन करणे आवश्यक आहे. श्रीगणेश ही मुख्यतः बुद्धीची देवता आहे. परंतु आपण करीत असलेल्या उत्सवात आणि उपासनेत उपासकाच्या बुद्धीच्या विकासाला फारच थोडा अवसर आहे. नाहीच म्हटले तरी चालेल. "गणेशा मला बुद्धी दे" व "विद्यार्थी लभते विद्याम् ।" असे म्हणणे, एवढ्यापुरताच बुद्धीचा व विद्येचा संबंध आहे. सारांश, आपल्या गणेशोपासनेत विचारांच्या व तत्त्वज्ञानाच्या विकासाचा असा फार थोडा भाग आहे. त्याची जोड देणे वैचारिक संक्रमणाच्या आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.

वर्षातून एकदा भाद्रपद महिन्यात जो गणेशोत्सव होतो त्यात लो. टिळकांनी वैचारिक जागृतीचा समावेश केला होता. राजकारणाबरोबर धर्म, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र इ. विषयांवर विद्वान व विचारी वक्त्यांची माहितीपूर्ण भाषणे होत. ती प्रथा बंद पडली. तिचे पुनरुज्जीवन होणे आवश्यक आहे. अनेक गणेशोपासक वर्षभर उपासना करीत असतात. पण त्यांच्या कार्यक्रमात तत्त्वचिंतन आणि विचार यांचा भाग फारच थोडा असतो; नसतोच. अभिषेक, मंत्रपठण, स्तोत्रपठण,

देवदर्शन, महाप्रसादग्रहण, गणेशयाग इ. कार्यक्रम असतात. त्यांचेही महत्त्व आहे. परंतु वैचारिक कार्यक्रमाशिवा त्यांची परिपूर्ती होऊ शकत नाही. उपासनेचा तो एकच डोळा आहे.

गणेश-पुराणात असलेल्या गणेश-गीतेकडे फारसे कोणी लक्षच दिलेले नाही. ती वाचनात नाही आणि पाठांतरातही नाही. अनेक गणेश उपासकांना तिची वार्ताही नाही ! ह्या गीतेचा परिचय असणे अत्यंत आवश्यक आहे. गणेश पुराणामध्ये क्रीडा-खंडात अध्याय १३८ ते १४६ यांत गणेश-गीता आलेली आहे. तिची परंपरा अशी आहे—गणेशाने ती वरेण्यास सांगितली, तीच व्यासाने सूताला व सूताने शौनकाला सांगितली. तिचे ११ अध्याय आहेत आणि एकूण ४१६ श्लोक आहेत. ती संस्कृतमध्ये असून भाषा अगदी सोपी आहे. तिची मराठी गद्य-पद्य भाषांतरेही उपलब्ध आहेत.

गणेश-गीता आणि भगवद्गीता यांत अतिशय साम्य आहे. भगवद्गीताच संक्षिप्त करून, पुनरुक्ती टाळून, सुबोध संस्कृतमध्ये पुनः सांगितली आहे असे वाटते. कृष्ण आणि अर्जुन यांच्या ऐवजी गणेश आणि वरेण्य या दोघांत हा संवाद आहे. बाकी सर्व विषय व तत्त्वज्ञान भगवद्गीतेचेच आहे. निष्काम कर्मयोग, आत्मसंयमन पातंजल योगशास्त्र, सृष्टीचे उत्पत्तिशास्त्र, विश्वरूपदर्शन, विभूतिवर्णन, भक्ति-मार्ग, मोक्षसाधन इ. विषय भगवद्गीतेच्या क्रमानेच आले आहेत. पातंजल योग-शास्त्र आणि पूजापद्धती यांचे वर्णन गीतेपेक्षा आधुनिक आहे. पुनरवृत्ती व विस्तार टाळण्याकरिता भगवद्गीतेतील २, ३ किंवा ४ अध्यायांचा समावेश एकेका अध्यायातच केला आहे. त्यामुळे ११ अध्यायांत १८ अध्यायांची ७०० श्लोकांची संपूर्ण गीता बसली.

ही गीता केवळ गणेश-भक्तांनीच वाचली पाहिजे असे नसून इतर देवतांच्या उपासकांनाही ती मार्गदर्शक आहे. " माझ्यामध्ये शिव, विष्णू, शक्ती आणि सूर्य यांचे ऐक्य पाहणे हाच योग " असे गणेशाने सांगितले आहे. बौद्धिक आणि वैचारिक विकासाचे इतके उत्कृष्ट साधन उपलब्ध असताना जे उपासक त्याचा उपयोग करणार नाहीत त्यांना, " मी तरी बुद्धी कशी देऊ ? बुद्धीचा विकास तुमचा तुम्हीच घडवून आणला पाहिजे " असाच आशीर्वाद श्रीगजानन देतील.

गणेशगीतेचे वाचन व चिंतन करून तुमची गणेशोपासना विचारप्रधान व बुद्धिनिष्ठ करा. निर्बुद्ध कर्मठ उपासनेवर संतुष्ट राहू नका. प्रगती करा.

[१७-९-१९६७

# ९४. स्त्री-पुरुष समानता

**स्त्री-पुरुष** समान मानले जावेत हा मुद्दा आता नवीन राहिलेला नाही. तत्त्व या दृष्टीने त्याला सर्वत्र मान्यता आहे. प्रत्येक क्षेत्रात त्याची हळूहळू अंमलबजावणी कशी करावयाची हा खरा विधायक विचारसरणीचा प्रश्न आहे.

भारतातील पुरुषांनी स्त्री-स्वातंत्र्य व समानता मान्य करण्यात आघाडी मारली आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्षेत्रात कोणत्याच राष्ट्राने, रशियाने देखील, इतकी उडी मारलेली नाही.

निसर्गाने स्त्री-पुरुषात विषमता ठेवली आहे. पण समाजाने तिच्यात भर न घालता ती कमी करण्याच्या दृष्टीने स्त्रियांना अधिक सवलती दिल्या पाहिजेत. शिक्षण, व्यवसाय, कामाचे तास, आरोग्याच्या सोयी, घरकामे, अपत्यसंगोपन इत्यादी दृष्टींनी स्त्रियांच्या सुखसोयींची कायद्याने व संकेतांनी अधिक उदारतेने योजना केली पाहिजे.

नैतिक आचरण आणि लैंगिक संबंध या क्षेत्रातही समानता पाहिजे. पण मी निराळ्या अर्थाने हे विधान करीत आहे. पुरुषांनी घेतलेले स्वातंत्र्य व स्वैरता स्त्रियांना द्यावी असा अर्थ नसून स्त्रियांवर असलेला संयम, निर्बंध व मर्यादा पुरुषांवरही कायद्याने, सक्तीने, संकेतांनी लादावयास पाहिजेत असा माझा कटाक्ष आहे. पहिल्या पिढीतील आगरकरांसारखे सुधारणावादी या वृत्तीचे होते. त्यांचा परिणाम सुशिक्षित पुरुषांवर झाला. १८०० ते १९०० या काळातील पुरुषांपेक्षा १९०० ते १९६० या काळातील पुरुष नैतिक आणि लैंगिक बाबतीत अधिक संयमी झाला. स्त्रियांवर असलेली बंधने स्वखुषीने त्याने स्वतःवर लादून घेतली. महाराष्ट्रात ही प्रक्रिया विशेष दिसते.

समाजधारणेचे तत्त्व स्वैरत्व असावे का संयम असावे हा प्रश्न आहे. त्याग का भोग अशी विभागणी मी करीत नाही—ती अतिरेकी होते. सुखभोगाची स्त्री-पुरुषांना समान संधी असावी, पण तिला धर्म, नीती, कायदा व संकेत यांचे बंधन असावे. ही बंधने दोघांना सारखीच असावीत. स्त्रियांनी पतिव्रताधर्म पाळावा व पुरुषांनी एकपत्नीव्रत आणि गृहस्थाश्रमातील ब्रह्मचर्य पाळावे. कायदा व रूढी यांची वाटचाल या दृष्टीने व्हावी, उलट दिशेने नव्हे.

बहुपतीत्व, बहुपत्नीत्व, विवाहवयोमर्यादा, स्त्री-पुरुषांचे घरातील व समाजातील स्थान या गोष्टी सामाजिक, ऐतिहासिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर अवलंबून आहेत. समाजात स्त्रिया अधिक झाल्या की बहुपत्नीत्व येते व पुरुष अधिक असले

की बहुपतीत्व येते. आर्थिक सुबत्ता व घरातील कामात यांत्रिक सुधारणा होतील त्या प्रमाणात स्त्रियाही विकास करून घेण्यास स्वतंत्र होतील.

स्त्रियांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन समाजात जे अनैतिक अत्याचार होतात त्यांना अत्यंत कठोर शिक्षा द्यायला हव्यात. बलात्कार करणारांवर शस्त्रक्रिया करून त्यांना नपुंसक आणि षंढ करून टाकले तर जन्माची अद्दल घडेल. त्यांना उजळ माथ्याने समाजात वावरता येऊ नये. निसर्गाने स्त्रियांना जे विषमत्व दिले आहे ते शक्य तितक्या कायदेशीर मार्गांनी कमी केले पाहिजे.

लैंगिक निर्बंध आणि पावित्र्य यांच्या कल्पना स्त्री-पुरुषांना समान हव्यात. त्या संयमावर आधारलेल्या असाव्यात. स्वैरवृत्तीने उपभोग घेण्याची वृत्ती समाजात वाढली म्हणजे त्याची रोमन साम्राज्यासारखी अधोगती होत जाते व तो दुर्बल होऊन परकीय आक्रमणाला बळी पडतो. स्वतःचा दोष नसताना स्त्रियांवर जो भ्रष्टतेचा प्रसंग येतो त्यापासून त्यांना संरक्षण, शुद्धी आणि स्वीकार यांची सोय कायद्याने व संकेतांनी करायला हवी. बुद्धिपुरस्सर होणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या लैंगिक गुन्ह्यांना समान शासन असावे. शासनाबरोबर पश्चात्ताप आणि नंतर शुद्धी व स्वीकार यांचीही सोय हवी.

आज उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा उपयोग करून खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता यथाशक्य लवकर आणली पाहिजे. समाजातील निम्मा वर्ग स्त्रियांचा आहे. त्याला कर्तबगारीची पूर्ण संधी मिळाली पाहिजे.

[ १२–१०–१९६७

# ९७. रागाच्या रोगावर उपाय

**माणसाचा** राग हा एक प्रकारचा रोग आहे. हा रोग मानसिक आहे, परंतु त्याचा शरीरावरही हळूहळू परिणाम घडतो. काही जणांच्या ठिकाणी तो जन्मतःच असतो, काही जणांच्या स्वभावात तो परिस्थितीमुळे हळूहळू येतो. या रोगावर बाहेरच्या डॉक्टरचे औषध उपयोगी पडत नाही. त्यावर स्वतःच उपचार करावा लागतो. शांतवृत्ती आणि आत्मसंयमन यांचा सतत ध्यास आणि विचारशील वृत्तीची जोपासना ही रागाच्या रोगावर प्रभावी औषधे आहेत. त्यांच्या साहाय्याने रागावर हळहळू नियंत्रण घालता येते.

क्रोधाला जिंकून मनःशांती आणि सुख साध्य करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. ज्या माणसाला या आयुष्यात शांती आणि क्षमा हे गुण संपादन करता आले नाहीत त्याचे आयुष्य वाया गेले असे मी समजतो. रागावर विजय न

मिळवता वृद्ध झालेल्या माणसाला 'वृद्ध म्हणजे वाढलेला' असे न म्हणता क्षीण म्हणजे 'कमी झालेला किंवा वृद्ध म्हणजे वाढ खुंटलेला' असे म्हणणे योग्य होईल. रागाच्या अवसानात मनुष्य भलतीच गोष्ट करून जातो आणि नंतर पस्तावतो. वर्तमानपत्रातील मारामारी व खुनाची प्रकरणे या सत्याची साक्ष देतील.

एकदा जुन्या पाठ्यपुस्तकात एक गोष्ट होती. एका घर मालकिणीने मुंगूस पाळले होते. आपल्या लहान मुलाला पाळण्यात निजवून ती पाण्याला गेली. परत येऊन पाहाते तो रक्ताने तोंड माखलेले मुंगूस सामोरे आले. याने आपल्या मुलाला खाल्ले असे वाटून तिने डोक्यावरचा हंडा त्याच्या डोक्यात घातला व त्याला ठार केले. घरात जाऊन पाहाते तो मूल पाळण्यात सुरक्षित होते. मुंगसाने मारलेल्या सापाचे तुकडे इतस्ततः पसरलेले होते. या उतावळ्या आणि रागीट बाईसारखे पदोपदी वागणारे अनेक लोक आहेत.

रोजच्या व्यवहारातीलच उदाहरणे देता येतील. वेळेवर स्वयंपाक झाला नाही म्हणून नवरा बायकोवर रागावतो. नवरा बाहेरून उशीरा आल्याने आपला सिनेमा बुडाला म्हणून बायको रागावते. टेरेलिनच्या पॅण्टला पैसे दिले नाहीत म्हणून मुलगा बापावर रागावतो आणि मुलगा परीक्षेत नापास झाला म्हणून बाप रागावतो. अगदी क्षुल्लक कारणाकरिता अधिकारी आपल्या नोकरावर रागावतात आणि थोडे काम जास्त पडले की नोकर मालकावर रागावतात. असे रागाचे अनेक प्रसंग दिवसातून येत असतात. धुसफुस, संताप, आरडा-ओरड, कडवट भाषा यामुळे वातावरण असह्य होऊन जाते.

रागाला काही वेळेला सबळ कारण असते, पण पुष्कळ वेळा पुरेसे कारण नसते. दुसऱ्या माणसालाही त्याची काही बाजू असते. तिचा शांतपणे विचार केला आणि ती समजावून घेतली म्हणजे रागाचा पोकळपणा कळून येतो. पण फाजील स्वाभिमानाखातर तसे कबूल करायची आपली तयारी नसते. रागावणारा माणूस आतून जळत असतो. राग शरीराला खातो, हृदयाला धक्का आणतो, मज्जातंतूंना दुर्बल करतो, विचारशक्तीला बधिर करतो आणि माया, प्रेम, स्नेह, माणूसकी यांना तिलांजली देतो; माणसाच्या आत्म्याचा अधःपात घडवून आणतो. रागामुळे जीवनातील शांती आणि समाधान ही सुखे नष्ट होतात. माणूस स्वतः दुःखी होतो आणि इतरांनाही दुःखी करतो.

रागाला जिंकण्याचा अभ्यास करा. त्यामुळे घरात, कचेरीत, समाजात, सर्वत्रच सुखशांतीचे वातावरण निर्माण होईल. गुन्हेगारी कमी होईल. विचारशीलता आणि प्रयत्नपूर्वक जोपासलेली शांती हा रागावर रामबाण उपाय आहे.

[ १६-११-१९६७

# १६. संकटाच्या सान्निध्यात संसार

**वर्तमानपत्रात** एकदा बातमी आली होती की नदीच्या पुराने एक गावातली घरे आणि शेती वाहून गेली. मला एका गृहस्थाने विचारले—हे लोक मग नदीच्या काठी का राहातात ? दुसरीकडे का जात नाहीत ? मी त्याला उत्तर दिले, बाबारे, त्यांची घरे तेथे आहेत. शेतीवाडी आहे. ती त्यांनी दुसरी-कडे कशी हलवायची ? जेथे पोटापाण्याचे साधन आणि निवारा, तेथे माणसे राहातात. शिवाय त्यांची देवळे, नातेवाईक, मित्र, सगेसोयरे जवळपास असतात. त्यांनाही कसे नेणार ?

आता भारताचीच गोष्ट पाहा. पाकिस्तानी सरहद्दीवर सीमाप्रश्नाचा मोठा पट्टा आहे, तेथल्या लोकांनी कोठे जायचे ? शत्रूचे बेमुर्वतखोर लोक वाटेल तेव्हा गोळ्या मारणार, जनावरे नेणार, माणसे-बायका-मुले पळवून नेणार, उभी पिके कापून नेणार, म्हणून का ते घरदार, शेती सोडून गेले आहेत ? संकटाशी टक्कर देत राहिले आहेत. रात्रंदिन त्यांना युद्धाचा प्रसंग !

जगात अनेक ज्वालामुखी आहेत. केव्हा उद्रेक होऊन लाव्हारस, राख' दगड, धोंडे, आग बाहेर पडेल याचा नियम नाही. एटना, व्हेसूव्हिअस, रिचनी, आसो इत्यादी ज्वालामुखींच्या परिसरात शेतीवाडी करून राहाणारे लोक आहेत. संरक्षणाची तयारी ठेवतात अन् राहातात. मौंट आसोच्या मुखातून धूर येत होता. मी आतमध्ये २०–२५ फूट जाऊन आतून गंधक काढून आणला. स्मृतिचिन्ह म्हणून. पांपी शहर २००० वर्षांपूर्वी व्हेसूव्हिअसच्या राखेत गाडले गेले. त्यात वेशीवरचा एक रखवालदार हातात काठी घेऊन उभाच्या उभा असलेला—सांगाड्याच्या रूपात सापडला. हे रोमन लोकांचे शौर्य.

जपानमध्ये आम्ही १९३८ च्या ऑगस्टमध्ये गेलो होतो. पहिल्याच रात्री भूकंपाचा धक्का ! लोक म्हणाले पडून राहा, काही होत नाही. आता कोयनेच्या निमित्ताने आम्ही मराठे लोकांनी संकटात राहायला शिकायचे आहे. मनाची तयारी केलीच आहे. अशा संकटामुळेच माणसाचा स्वभाव कणखर बनतो.

अहो, संकट कुठे नाही ? पुण्यात पानशेच झालेच ना ? मुंबईत दारू-गोळ्याच्या जहाजाचा स्फोट झालाच ना ? रेल्वे-बस-टॅक्सी-टूरिंगला रोज अपघात होतात म्हणून प्रवास थांबले आहेत का ? संकट आणि मृत्यू कुठेही आहेच. अती खाण्यामुळे रोग होऊन, विडी सिगारेटमुळे कॅन्सर होऊन, अनेक अपरिहार्य कारणांनी माणसे मरतात म्हणून त्या गोष्टी कुणी सोडल्या ? मृत्यूचे संकट बाहेरचे आहे तसे आपल्या मूर्खपणाचेही आहेच.

आज देशात लोकवस्ती दाट आहे. तरी खंडीभर पोरांना जन्म देणारे मूर्ख आईबाप आहेतच. शेतीला पुरेशी जमीन नाही. शहरात घरे नाहीत. देशात अन्न नाही. अशा स्थितीत स्थलांतर करणार कुठे ? चंद्रावर तर सर्व खडकच आहेत. मंगळावर तर आगच आहे. आहात तेथेच राहा आणि संकटाशी सामना देत संसार करा, हाच कोयनामातेचा संदेश आहे.

[ १४-१-१९६८

# ९७. रागाचा रोग—उपचार व पथ्यपाणी

**'रागाचा रोग'** हे माझे संपादकीय प्रत्येक कुटुंबात आवडीने वाचले गेले. प्रत्येक जण दुसऱ्याकडे पाहून हसून सुचवू लागला की, 'हे तुलाच उद्देशून लिहिले आहे !' या लेखावर मजकडे काही पत्रे आली आहेत. त्यातील काही भाग इतरांना उपयोगी पडेल.

एक गृहस्थ लिहितात, "मी रागीट म्हणून प्रसिद्ध आहे आणि मला त्याचा अभिमानही आहे. पण तुमचा लेख प्रसिद्ध झाल्यापासून माझ्यात फारच फरक पडला आहे. राग हा रोग आहे असे कळल्यानंतर लोक माझ्या समाचाराला येऊ लागले ! मला सहानुभूतीची पत्रे आली. 'तुमचा राग (रोग) आता कसा आहे ? बरे वाटते ना ?' असे प्रत्येक जण वारंवार विचारू लागला. आता मी रागावलो तरी इतर लोक ते मनावर घेत नाहीत. माझ्याकडे ते एखाद्या पेशंटप्रमाणे (वेड्याच्या इस्पितळातील ल्यून्याटिक्) सहानुभूतीने पाहातात. 'अरेरे बिचारा' म्हणून चक्चक् करतात ! माझ्या रागाचा इतरांवर परिणाम होत नाही, व त्यामुळे रागाला आता काही किंमतच राहिली नाही. त्यामुळे माझा हा रोग निम्मा कमी झाला. म्हणजे ट्रीटमेंट इतरांनी घेतली व मलाही दिली. असाच आणखी एखादा लेख पाठवावा. गुण येत आहे."

दुसऱ्या एक भगिनी लिहितात, "आमच्या घरात एक रागाच्या रोगाचा पेशंट आहे. हा रोग आहे असे समजल्यावर आम्ही त्याच्यावर औषण-पाणी शोधू लागलो. वैद्यकीय ग्रंथात काही माहिती मिळाली नाही. तरी उपचार, पथ्यपाणी, अनुपान इत्यादी गोष्टी कळवाव्यात. म्हणजे नर्सिंग करणाऱ्या आमच्यासारख्यांना मार्गदर्शन होईल." मी पुढील उत्तर पाठविले आहे.

"रागाच्या रोग्याला पेशंटासारखे सहानुभूतीने वागवा. घरात एक वेडा आहे, त्याचा स्वतःचा इलाज नाही, या दृष्टीने त्याच्याकडे पाहा. तुमचे डोके

शांत ठेवा. हे पहिले औषध. तुमचा आनंद, शांती, समाधान, उल्हास यात तिळमात्र फरक पडू देऊ नका. आपल्या रागाचा कोणावर काडीचाही परिणाम होत नाही हे पाहून पेशंटचा निम्मा रोग उतरेल. नॉर्मलवर यायला काही दिवस लागतील. रोग्याचा राग मनावर घेऊ नका. त्याच्याशी अबोला धरू नका, दुरावा किंवा कडवटपणा दाखवू नका. तुमचे अगत्य, प्रेम, माया व स्नेह यात किंचितही काटकसर करू नका. या पथ्यपाण्याचा फार उपयोग होतो हे लक्षात ठेवा. नाहीतर त्याचा रोग जायचा अन् तो तुम्हाला लागायचा."

राग हा स्पर्शजन्य रोग आहे. याचे जंतू वातावरणातून पसरतात व इतरांना बाधा होते. पण यावर उपाय आहे. आनंद, उल्हास, शांती, समाधान —या गोष्टीही वातावरणातून इतरांमध्ये प्रवेश करतात. या भावना व्हायरस (सूक्ष्मजंतू) सारख्या आहेत. राग, मत्सर, द्वेष, असूया यांच्या व्हायरसपेक्षा घराच्या वातावरणात आनंद, शांती, समाधान, उल्हास, प्रेम, माया, स्नेह यांच्या जंतूंचे प्रमाण जास्त प्रमाणात सोडा. रागाच्या रोगाच्या शरीरात ते पसरले की रागाचे व्हायरस क्षीण होतील. उपचार करून गुण कसा काय येतो ते कळवा, पुढची ट्रीटमेंट नंतर कळवीन. रोग्याचा चार्ट नीट जपून ठेवा."

आणखी एक पत्र मनोरंजक आहे—"आमच्या घरात आम्ही सगळे रागीट आहोत. पाळीपाळीने रागावतो. आता कळले, हा रोगच आमच्या कुटुंबात आहे. आता कोणी रागावला की आम्ही म्हणतो, "याला अटॅक आला आहे बर का. काही दिवस सेग्रीगेट करू या. एखादा दिवस त्याला विश्रांती घेऊ द्या म्हणजे बरे वाटेल." आणि या उपचारांचा परिणाम आमच्यावर होऊ लागला आहे. अशाच प्रकारे द्वेष, हेवा, मत्सर इत्यादी घरगुती रोगावर काही घरगुती इलाज असल्यास कळवावेत." मी उत्तर पाठविले की—"आमची ही निसर्गोपचार पद्धती आहे. सर्व रोगांवर औषध एकच. जो रोग असेल त्याच्यापेक्षा प्रबल अशा विरोधी उपचारांचा मारा करायचा. रागावर आनंदाचा, द्वेषावर प्रेमाचा, मत्सरावर सहकार्याचा इत्यादी. गुण येण्याची घाई करायची नाही. रोग हळूहळू येतो तसा न कळत जातो."

अगदी दुःसाध्य रोगाकरता क्वचित प्रसंगी होमिओपाथीचाही उपयोग करावा लागतो. म्हणजे रोग्याचा राग एकपट असला तर आपण दसपट रागाचा आव आणावा व त्याचा राग हतबल करून टाकावा. रोग्याचा आवाज वाढला असेल तर आपण आणखी तारस्वरात वरच्या पट्टीत आवाज लावावा. आम्हालाही रागावता येते हे रोग्याला कळले पाहिजे. मात्र अंतःकरणाला या रागाचा स्पर्श होऊ देऊ नये. आतून शांत असावे. रागाचे सोंग आणावे. नाही तर तुम्हालाच

तो रोग लागायचा ! पेशंट बरा व्हायचा आणि डॉक्टर रोगी व्हायचा, असे न व्हावे.

वाचकांनी आपापले अनुभव कळवावेत.

[ २२–२–१९६८

# ९८. माणसं वागवण XXX आहे

**पुढचा** मजकूर इतक्यात वाचू नका. वरच्या मथळ्याच्या वाक्यात फुल्या काढून जागा सोडली आहे, तेथे तुम्ही कोणता शब्द भराल ?

"कठीण आहे" "कला आहे" असे दोन पर्याय मला सुचतात. त्यांपैकी तुम्ही कोणता स्वीकाराल ?

या जगात वस्तू, वाणी आणि व्यक्ती अशा तिघांशी आपला संबंध येतो. वस्तूशी म्हणजे यंत्रसामग्रीशी संबंध येणारी अशी काही कामे असतात. वाणीशी म्हणजे कारकुनी, लेखन, हिशेब इत्यादी स्वरूपाची कामे असतात. आणि तिसऱ्या प्रकारच्या कामात व्यक्तीशी, माणसाशी, कामगाराशी, कारकुनाशी, असा संबंध येतो. आपल्यापेक्षा कधी लहान, कधी मोठी, कधी बरोबरीची, अशा पातळी वरच्या व्यक्तींशी व्यवहार करावे लागतात.

वस्तू आणि शब्द यांपेक्षा माणसांची गोष्ट वेगळी आहे. प्रत्येक माणसाला मन आहे. प्रत्येकाचा स्वभाव निराळा. प्रत्येकाची विचाराची दिशा निराळी. प्रत्येकाचे धोरण आणि हेतु निराळे असतात. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन वागावे लागते. यंत्रे सगळी सारखी असतात. पण प्रत्येक माणूस हा भिन्न असतो. एका-सारखा दुसरा नाही. प्रत्येकामध्ये कर्तव्यनिष्ठा, बुद्धिमत्ता, कल्पकता, सौजन्य, प्रामाणिकपणा इत्यादी गुणांचे मिश्रण निरनिराळे असते. ते सर्व ओळखून प्रत्येक माणसाशी जो वागतो तो यशस्वी होतो. ते ज्याला जमत नाही त्याला विशेषसे यश येत नाही.

माणसांशी वागतांना त्यांचा त्यांचा स्वभाव माहीत पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्या स्वभावाचीही स्वतःला जाणीव पाहिजे. आपण शांत आहोत की तापट; मनमिळाऊ का तुटक; कर्तव्यदक्ष की कामचुकार; कष्टाळू की आळशी; प्रामाणिक की लबाड; उदार की आपमतलबी—याचे आपल्याजवळ मूल्यमापन पाहिजे. तुमचे तुम्हाला करता आले नाही तरी आजूबाजूची माणसे ते अचूक करतात हे लक्षात ठेवा. तुमच्या ठिकाणी ज्या प्रमाणात सद्‌गुण असतील त्यापेक्षा अधिक गुणांची अपेक्षा इतर माणसांकडून करू नका.

प्रत्येक जण स्वतःला परिपूर्ण समजतो. पण हा एक भ्रम आहे.

इतर माणसांशी वागताना काही ठोकळ तत्त्वे अवश्य पाळा. निष्कारण मने दुखवू नका. माणसे तोडणे सोपे असते, जोडणे कठीण असते. गैरसमज झालेले असतात ते वाढू देणे चांगले नाही. प्रांजलपणे समोरासमोर बोलल्यामुळे अनेक गैरसमज दूर होतात. एकमेकांचे विचार व हेतू परस्परांना कळतात. विचारांची देवाण-घेवाण केल्याने शेकडा नव्वद टक्के प्रश्न आपोआप सुटतात. उलट दूर दूर राहण्याने व अबोला धरल्याने माणसे मनातच कुढत राहातात, आणि गैरसमज व कडवटपणा वाढत जातात.

इतकी पथ्ये पाळली की इतर माणसांशी आपले संबंध चांगले राहातात. पण यालाही अपवाद आहे बर का ! काही थोडी माणसे दुष्ट व मूर्ख असतात. काही केले तरी त्यांना राजी राखणे कठीण असते. अशा माणसांचे वर्णन अनेक शतकांपूर्वी भर्तृहरीने केले आहे, ते शाश्वत सत्य आहे—" परंतू मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी. " काय वाटेल ते करता येईल पण दुष्ट आणि मूर्ख माणसांचे समाधान करणे कठीण आहे, हे ओळखून त्यांच्याशी वागायला पाहिजे. मूर्खांना मूर्ख आणि दुष्टांना दुष्ट म्हणू नका. पण ते लक्षात ठेवून त्यांच्याशी वागा.

माणसं वागवणं ही एक कला आहे. प्रयत्नसाध्य आहे.

[ १४-३-१९६८

## ९९. जाळपोळ आणि मोडतोड हा देशद्रोह आहे

**राजकीय**, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात असमाधान आणि असंतोष व्यक्त करण्याचे अत्यंत अनिष्ट आणि समाजविघातक मार्ग रूढ होत आहेत. त्यांची वेळीच दखल घेऊन त्यांना आळा घातला नाही तर या देशाला बरे दिवस येणार नाहीत.

इतिहासकाळातील स्वाऱ्यांमध्ये जुलमी आणि क्रूर सेनापती व राजे, जाळपोळ, नासधूस आणि कत्तल या मार्गांचा अवलंब, शत्रूच्या मुलखात करीत असत. ही इतिहासाची आवृत्ती पुनः सुधारलेल्या समाजात आणि काळात होऊ लागली आहे ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे.

या विध्वंसक कृत्यात भाग घेणारे अशिक्षित आणि सुशिक्षित दोन्हीही वर्ग आहेत ही तर त्यापेक्षा चिंताजनक गोष्ट आहे. आदर्श वर्तनाचा धडा कोणी घालून द्यायचा, व कोणाचा कित्ता अशिक्षितांनी गिरवायचा हा प्रश्नच आहे. विद्यार्थी

नाराज झाले की सिनेमागृहाची मोडतोड करतात, बसेस जाळतात, दिव्यांच्या काचा फोडतात. कामगार असंतुष्ट झाले की कारखान्याला आग लावतात, यंत्राची मोडतोड करतात, मालाचे साठे लुटून नेतात. राजकीय पक्षाचे अनुयायी निषेध प्रदर्शित करण्याकरता पोस्ट ऑफिसे, रेल्वे स्टेशने, आगगाड्या, बसेस, रेडियो स्टेशन्स यांची नासधूस करून त्यांना आगी लावतात.

आधीच हा देश गरीब आहे. यंत्रसामग्री दुर्मिळ आहे. इमारतींची, घरांची, घरबांधणीच्या सामानाची टंचाई आहे. वाहतुकीची साधने कमी आहेत. अशा स्थितीत वाहने, इमारती, यंत्रे यांची नासधूस आणि जाळपोळ करणे अत्यंत गंभीर देशद्रोह आहे. याला वेळीच आळा घातला नाही तर या देशाची आर्थिक व औद्योगिक प्रगती होणे शक्य नाही. जी प्रगती होईल तिची फळे असंतोषाच्या अशा चळवळीत नामशेष होऊन जातील.

देशाचा नाश होऊ नये या बाबतीत तरी सर्व पक्षांचे एकमत व्हावे. त्यांनी या निदर्शनाबाबत काही संकेत ठरवावेत.

जाळपोळ, मोडतोड आणि नासधूस करण्यामुळे देशाचे संरक्षणविषयक सामर्थ्य खच्ची होते. हे अप्रत्यक्षपणे शत्रूला मदत केल्यासारखे आहे. देशात अशी जाळपोळीची चळवळ चालू असता परचक्र आले तर आपली धडगत नाही, हे या लोकांना कळत नाही की कळत असून त्यांचे ते धोरणच आहे ?

सामान्य नागरिक या बाबतीत हतबल आहे. राज्यकर्ता पक्ष, राजकीय पक्ष, त्यांचे पुढारी यांच्या हातात या सर्व विनाशक चळवळीची सूत्रे किंवा प्रतिबंध करण्याची साधने आहेत. त्यांनीच एकत्र येऊन ठरवले पाहिजे की—

जाळपोळ म्हणजे देशद्रोह.

यंत्राची मोडतोड म्हणजे देशद्रोह.

इमारतींची नासधूस म्हणजे देशद्रोह.

देशद्रोहाला रशियात काय शिक्षा आहे ? चीनमध्ये काय आहे आणि भारतात काय शिक्षा आहे ?

[ १६-३-१९६८

## १००. सत्तेचे—सामुदायिक शक्तीचे कोलीत

**आजच्या** नागरिकाला आपला उद्याचा कार्यक्रम ठरवणे अशक्य झाले आहे. कारण उद्या कोणत्या गोष्टी चालू असतील आणि कोणत्या बंद असतील याची शाश्वती नाही. संप, हरताळ, घेराओ, बंद, मंद इत्यादी कोणती चळवळ उद्या सुरू असेल याची निश्चिती नाही. वर्तमानपत्र उघडल्यावर कळणार.

वाहनाच्या संपामुळे कामावर जाणे अशक्य होईल. हॉटेलवाल्यांच्या संपामुळे खाणेपिणे बंद होईल. अमुक बंद--तमुक बंद यांमुळे हालचाल आणि खाणेपिणे सर्वच बंद होईल. आपल्यालाच कोणी घेराओ केला तर शिरसलामत घरी येण्याची पंचाईत. वुईल-पत्र करून, विमा उतरूनच घराबाहेर पडायला पाहिजे. कामाला गेल्यावर तेथे अचानक संप असला तर आत जायची पंचाईत, परत यायची मुष्कील.

हे संप करणे आणि न करणे हा तुमच्या आमच्या किंवा संप करणारांच्या इच्छेचा प्रश्न राहिला नसून काही निवडक पुढाऱ्यांच्या इच्छेचा तो प्रश्न असतो. पूर्वी जशी राजेराजवाड्यांची आणि नबाबांची एकमुखी सत्ता असे, तसे या पुढाऱ्यांचे झाले आहे. संपामुळे त्यांना प्रसिद्धी मिळते आणि प्रसिद्धीमुळे सत्ता-संपत्ती-सामर्थ्य वाढते. त्यांचा उपयोग पुढच्या संपाकरता होतो.

वाहतूक, वीज, पाणीपुरवठा, दूध, खाणेपिणे, गावसफाई, या गोष्टी दैनंदिन गरजेच्या आहेत. पण त्यांच्यावर केव्हा संक्रांत येईल याचा नेम नाही. सर्वसामान्य नागरिक हा संप पुढाऱ्यांच्या लहरीचा बळी झालेला आहे. या गोष्टींचा आता कळस होत चालला आहे.

कामे व कष्ट करणारांच्या तक्रारी असतात, गाऱ्हाणी असतात,-अगदी मान्य आहे. त्यांना न्याय पाहिजे-अगदी मान्य आहे. पण त्याकरता संप-बंदी-घेराओ-हरताळ इत्यादी मार्गांमुळे आपण आळीपाळीने एकमेकांच्या जीवनाचे मातेरे करून टाकतो. कम्युनिस्ट राज्यातही या गोष्टींना बंदी आहे. दुसरे चांगले मार्ग काढायची वेळ आली आहे असे नाही का वाटत ?

[ १७-४-१९६८

REFBK-0024794

...ठे ... वाचनालय ठाणे
३९३४
निबंध २४६९४
२२/१/९६
... शाखा (...)

लेखक परिचय



## डॉ. गजानन श्रीपत खैर

एम्.ए. (बॉंबे व कोलंबिया युनि.),
पीएच्.डी. (न्यूयॉर्क युनि.)

जन्म : १५ जून १८९८

**१९२० ते १९७० पुणे विद्यार्थी गृहाचे**
**आजीव सेवक व प्रमुख**

**महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक**
**मुख्य अध्यापक व मार्गदर्शक**

**संस्थेची ५० वर्षे सेवा आणि ५० हजारांचे संचयदान करून सेवानिवृत्त**

* पूना, बॉंबे व कर्नाटक युनि. मधील एम्. एड्. वर्गाकरिता कंपॅरेटिव्ह् एज्यु. विषयाचे सन्मान्य प्राध्यापक व पीएच्. डी. करता संशोधन-मार्गदर्शक.
* १९५२ ते ५८ विधान परिषदेचे सभासद.
* बॉंबे युनि. सेनेट, पूना युनि. कोर्ट, एस्. एस्. सी. बोर्ड, सेकंडरी एज्यु. बोर्ड, इंटिग्रेशन कमिटी, एज्युकेशन कमिशन टास्क फोर्स, इलाखा प्राथमिक शिक्षक संघ, टीचर्स व हेडमास्टर्स फेडरेशन, सरकारी टेक्स्ट बुक्स व करीक्युलम रिसर्च ब्युरो इ. मध्ये प्रामुख्याने शैक्षणिक कार्य.
* अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी, जपान इ. देशांत प्रवास व शिक्षण-पद्धतीचे निरीक्षण.
* प्रवास, शिक्षण, गीता इ. विषयांवर व्याख्याने, लेख, ग्रंथ व संशोधन.

### गीतेवरील वाङमय व इतर ग्रंथ :

▭ सर्वबोध पद्यगीता रु. ३–५० ▭ मराठी गीता व विवरण रु. ६/–
▭ गीतेतील मुख्य विचार रु. ६/– ▭ गी. मु. विचार-पुरवणी मराठी श्लोक रु. २/–
▭ मूळ गीतेचा शोध रु. १०/– ▭ गीतेचा दृष्टिकोन In Press
▭ त्रिकाल गीता In Press ▭ गीताविकास २ री आवृत्ती मुद्रणावस्थेत
▭ बालगडचा किल्ला In Press ▭ सदाचार चिंतनी भाग १ ते ५ प्रत्येकी रु. १०/-
▭ **Quest for The Original Gita, Rs. 32/–** (सोमैया प्रकाशन)
▭ जीवनात गीता रु. १२/–